म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ३८१७.

प्राज्ञपाठशाळामंडळ-पुस्तकमाला.

# पहिलीं चार पुस्तकें.

१ अस्पृश्योद्धार विचार

२ धर्मभ्रष्टांचें शुद्धीकरण

३ क्षत्रियवैश्यांचें अस्तित्व

४ [illegible] विधवांचा धर्म

REFBK-0006971

किंमत १ रुपया

९१२

॥ धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा ॥

प्राज्ञपाठशाळामंडळ पुस्तकमाला.

# पहिलीं चार पुस्तकें.

REFBK-0006971

लेखक

मह[illegible] दिवेकर.

हें पुस्तक [illegible] प्रत्येकास लव-
नियतकालिकें
कर मिळावें अशी उत्कंठा असते; तरी तें घेतल्या-
पासून निदान ७/४ दिवसांत परत करण्याची कृपा
करावी.

किंमत एक रुपाया.

# अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| अ. | प्रस्तावना लेखकाची | पृ. २ |
| आ. | श्री. चिं. वि. वैद्य यांची प्रस्तावना | पृ. ६ |
| १ | अस्पृश्योद्धार विचार | |
| | भाग १ ते ७ | पृ. १–५५ |
| २ | धर्मभ्रष्टांचें शुद्धीकरण | ५६–९३ |
| | अध्याय १ ते ६ | |
| | परिशिष्टें ४ | ९३–१०९ |
| ३ | क्षत्रिय वैश्यांचें शास्त्रसिद्ध अस्तित्व | |
| | आणि प्रायश्चित्त | ९४–१२९ |
| ४ | हिंदु विधवांचा धर्म | १२९–१५० |

# लेखकाचे दोन शब्द.

प्राज्ञपाठशाळा मंडळाची पहिलीं चार पुस्तकें आज द्वितीय मुद्रण करून महाराष्ट्रियजनतेला सादर करण्याचा योग येत आहे याबद्दल आनंद वाटतो. धार्मिक आणि सामाजिक विषयावरील वाङ्मय सद्यःपरिस्थिति लक्ष्यांत घेऊन लिहिल्यास जनता त्याचा स्वीकार करिते ही गोष्ट या द्वितीय मुद्रणानें सिद्ध केली आहे. श्रीक्षेत्र नाशीक येथें सिंहस्थीं जी संस्मरणीय हिंदुधर्म परिषद भरली तेव्हांपासून मंडळानें या क्षेत्रांत पाउल टाकिलें. मंडळाचे अध्यक्ष गुरुवर्य वेदशास्त्रसंपन्न नारायण शास्त्री मराठे यांच्या संमतीनें-च लेखकानें त्या सभेपुढें एक योजना मांडली व पुढें वृत्तपत्रांतून लेखन-द्वारा लोकजागृति सुरू केली. केसरी व इतर वृत्तपत्रांतून प्रसिद्ध केलेल्या लेखमाला पुस्तक रूपानें ग्रथित केल्या व मंडळाच्या नांवावर प्रसिद्ध केल्या. पुस्तकांतील विषयाबद्दल आणि भाषेबद्दल केव्हांही लेखकच जबाबदार आहे. मंडळ ती जबाबदारी घेऊं शकत नाहीं. धार्मिक सामाजिक विषयांत मंडळाचें धोरण ठरलेलें आहे. तें म्हटलें म्हणजे जुनी परंपरा व देशकाल वर्तमान लक्ष्यांत घेऊन दोहोंचा मेळ घालण्याचा प्रयत्न करणें हें होय. मंडळ हें धोरण पाहातें व लेखकाची मनोभूमिका हीच असल्यास पुस्तकास संमति देतें. सर्वच्या सर्व पुस्तक वाचणें, चर्चा करणें, सुधारणा सुचविणें हें काम मंडळाला तर अशक्यच. परंतु मंडळानें नेमिलेल्या कमिटी-लाहि वेळेनुसार होत नाहीं. सारांश तपशिलाबद्दल लेखकच जबाबदार असून धोरणबद्दल मंडळ पूर्ण जबाबदार आहे, ही गोष्ट प्राज्ञपाठशाळा मंडळा-च्या हितचिंतकांनीं लक्ष्यांत ठेवावी.

पुस्तकांतील विषय व साक्षात् व्यवहार पाहिला तर अस्पृश्यांचे बाबतींत उत्तरोत्तर पाऊल पुढेंच पडत आहे. घराबाहेर अस्पृश्यता मानू नये ही पुस्तकांतील विचारसरणी सर्वसंमत होऊं लागली आहे. शुद्धिकार्य तर चांगलें जोरानें चालत आहे व अधिक चांगलें चाललें पाहिजे असें सर्वांना वाटत असून शुद्धीकृताचा समावेश पूर्व जातींत कांहीं अपवाद वर्ज करून व्हावा असें पुष्कळ म्हणू लागले

आहेत. वेदाधिकार देण्या करितां आमचे मित्र आहिताग्नि वे. शा. सं. धुंडिराज दीक्षीत पांचवडकर यांनीं तर द्विजसंस्था काढली असून चिंचवड येथें श्री. परचुरे शास्त्री यांनीं कांहीं उपनयनेंही केली एवंच या क्षेत्रां'त ही प्रगति आहे. विधवांच्या वपनासंबंधीं विकल्पाचा शास्त्रार्थ जनता कृतीनें चाळीत आहे. विधवांनीं पातिव्रत्याचें कवच म्हणून कुंकू लावावें हा मुद्दा पहिल्या आवृत्तींत साधारणपणें मांडिला होता. पण मूळ हेतूचा विपर्यास होऊं लागल्यामुळें मंडळाच्या अध्यक्षांच्या आज्ञेनुसार आम्ही तो भाग द्वितीय मुद्रणांत वगळला आहे. परंतु लेखकाचें किंवा लेखकानें ज्यांची सूचना आत्मसात् केली त्या सद्गुहस्थांचें मत बदललें असें मात्र नव्हे. आमचीं मतें कायम आहेत. परंतु शिस्तीकरितां मंडळाची आज्ञा म्हणून तीं मतें पुस्तकांतून काढलीं आहेत इतकाच अर्थ सुज्ञांनीं समजावा.

हीं चार पुस्तकें लोकशिक्षण व लोकमत परिवर्तन याकरितां आहेत. म्हणून छपाई खर्च निघताच निम्याशिम्या प्रति मंडळानें जवळ जवळ मोफत विकण्याचें ठरविलें आहे.

भारताचार्य श्री. चिं. वि. वैद्य यांनीं वेळांत वेळ काढून प्रस्तावना लिहिण्याचें काम उत्तम तऱ्हेनें केलें याबद्दल मंडळातर्फे त्यांचे आभार मानिले पाहिजेत. पुस्तकाचें काम सुबक केल्याबद्दल गोवर्धन प्रेसमधील मित्रमंडळी श्री. देव, मुरकुटे व हरोलीकर ह्यांचेही आभार मानले पाहिजेत. शेवटीं ज्याच्या सत्तेनें अखिल चराचराची उलाढाल होते त्या ईश्वराचें स्मरण करून त्याच्या कृपेनें हिंदुसमाज अभ्युदयक्षम होवो अशी प्रार्थना करून वाचकांची रजा घेतो.

श्रीगुरुपूर्णिमा १८४८
प्राज्ञपाठशाळा वांई

महादेवशास्त्री दिवेकर,
चिटणीस
प्राज्ञपाठशाळा मंडळ, पुस्तकमाला.

# प्रस्तावना.

प्राज्ञपाठशाळामंडळ (वांई)या संस्थेनें प्रसिद्ध केलेल्या पुस्तकमालेंतील हा ग्रंथ असून लोकासमोर धार्मिक,ऐतिहासिक व सामाजिक परिस्थितीची योग्य समालोचना करून राजकीय दृष्ट्या अवश्य असे विचार मांडण्याचा मंडळाचा हेतु आहे. तो हेतु चांगल्या तऱ्हेनें ह्या ग्रंथांत सिद्धीस गेलेला आहे. हल्लींच्या हिंदुस्थानच्या राजकीय परिस्थितींत जे अत्यंत जिव्हाळ्याचे प्रश्न लोकांसमोर निर्णयाकरतां आले आहेत त्यांची धर्मदृष्ट्या साधार विवेचन करून योग्य दिशा ह्या ग्रंथांत दाखविलेली आहे. अस्पृश्योद्धार, त्याचप्रमाणें शुद्धीकरण, क्षत्रिय वैश्यांचें अस्तित्व व विधवांचा धर्म ह्या चार विषयांवर ह्या ग्रंथामध्यें साधार व मार्मिक विवेचन केलेलें असून भावी सुधारणांचा मार्ग योग्य रीतीनें दाखविलेला आस्तिक हिंदुधर्मीयांना पटेल असाच दाखला आहे. ह्या प्रत्येक विषयावर हल्लीं हिंदु समाजांत मोठी खळबळ उडून राहिलेली आहे,अशा जरूरीच्या वेळीं मंडळानें हा ग्रंथ प्रसिद्ध केला ही गोष्ट फारच अभिनंदनीय आहे.

हिंदु समाजांत हल्लीं अस्पृश्य असलेले लोक स्पृश्य व्हावेत हें राजकीयदृष्ट्या अत्यंत इष्ट आहे, हें कोणीहि कबूल करील. अस्पृश्यतेमुळें हिंदु समाजाचें संघटण होत नाहीं; अस्पृश्यतेमुळें मुसलमान व खिस्ती धर्मास हिंदुधर्मांतून माणसें परधर्मांत नेतां येतात, इत्यादि धडधडीत अडचणी हिंदुसमाजास हल्लीं जाचूं लागल्या आहेत. पण त्यामुळें हिंदुधर्मासंबंधानें कमी कल्पना करण्याची आवश्यकता नाहीं. हिंदुधर्मांत मूळची अस्पृश्यता नाहींच ह्या कल्पनेचें आस्तिक धर्मदृष्ट्या खंडण करावयास पाहिजे, तें ह्यांत योग्य रीतीनें केलें आहे. तसेंच अस्पृश्यता हा हिंदुधर्मावर मोठा कलंक आहे हाहि विचार अतिशयोक्तीचा आहे, खऱ्या हिंदुधर्मभावनेचा, इतिहासज्ञानाचा किंवा समाजशास्त्रोत्क्रांतिज्ञत्वाचा तो द्योतक नाहीं हेंहि ह्या ग्रंथांत दाखविलेलें योग्य आहे. पण महात्मा गांधींचें हें वाक्य अस्पृश्यता घालविणें हल्लींच्या परिस्थितींत किती आवश्यक आहे ह्याच्या कळकळीचे द्योतक आहे. ' न हि

निंदा निंद्यं निंदितुं प्रवर्तते ' ह्या म्हणीप्रमाणें हिंदुधर्माच्या निंदेकरतां तें प्रसिद्ध झालेलें नसून ह्यापुढें हिंदु लोकांनीं अस्पृश्यता ठेऊं नये, अशाविषयीं त्यांस उद्युक्त करण्याकरतां तें उच्चारिलेलें आहे हें उघड आहे.

अस्पृश्यता निरनिराळ्या प्रकारची कशी उत्पन्न झाली ह्याच्याविषयीं प्रचलित असलेलीं सर्व मतें सांगून ह्या ग्रंथांत तीं विचारांत घेतलेलीं आहेत. त्याचप्रमाणें अस्पृश्यांतहि आर्य रक्त कसें आहे हेंहि ह्यांत दाखविलें आह. साधुसंतांनीं-ज्ञानेश्वर एकनाथ वगैरेनीं ह्यापूर्वीच ती काढून टाकण्याचा प्रयत्न कसा केला आहे हेंहि ह्या ग्रंथांत त्या त्या साधूंचे उत्कृष्ट उतारे देऊन दाखविले आहे. परीट, बुरूड, नट इत्यादि पूर्वी मानलेले अस्पृश्य हल्लीं अस्पृश्य राहिलेले नाहींत, हेंहि ह्यांत दाखविलेले लक्ष्यांत घेण्यासारखें आहे. महार, मांग,भंगी अशा दोनचार अस्पृश्यांचेंच अस्पृश्यत्व कायम राहिलेलें आहे. तेंहि हल्लींच्या परिस्थितींत कां व कसें घालवावें हें ह्या ग्रंथांत चांगलें दाखविलेलें आहे. गोमांसभक्षक मुसलमान व खिस्ती हे धर्मशास्त्रदृष्ट्या ह्यांहूनहि अस्पृश्य आहेत; त्यांची अस्पृश्यता हल्लीं बिलकुल राहिलेली नाहीं.मग धार्मिक हिंदूंनीं ह्यांस खुशाल शिवावें आणि महारमांगांस स्पर्श झाला असतां आंघोळ अशुद्ध मानावें हें आश्चर्य नव्हे काय?मुसलमान व खिस्ती राजे झाल्यानें जर ते अस्पृश्य राहिले नाहींत तर हल्लींच्या स्वराज्यांत महारमांग हेहि मतदानाच्या अधिकारानें राज्यांशभाक् झालेले आहेत, तेव्हां ह्यापुढें त्यांची अस्पृश्यता गेलीच पाहिजे. ते आपला अस्पृश्य धंदा करीत असतां त्यांचा स्पर्श झाल्यास शुद्धीचें आचमन वगैरे करावें. पण इतर वेळीं त्यांचा स्पर्श झाला असतां आचमनाचीहि प्राप्ति नसावी. मुसलमानांचा किंवा साहेबांचा हस्तस्पर्श करून कोणता हिंदू हल्लीं घरीं आल्यावर आचमन करतो ? ज्यास विशेष शुद्धि ठेवायाची असेल त्यानें वाटल्यास घरीं आल्यावर स्नानहि करावें. पण मी सोनगीर येथें सांगितल्याप्रमाणें हा प्रश्न त्यांचा नसून जे हिंदु लोक स्नान करणार नाहींत त्यांस अशुद्ध नाहींच किंबहुना आचमन करणार नाहींत त्यांस अशुद्ध मानूं नये अशा स्वरूपाचा आहे. हिंदु समाजानें मुसलमान व खिस्ती यांची अस्पृश्यता घालविली त्याच वेळीं हा प्रश्न सुटला.

२८।७८

आणि ह्यापुढेंहि प्रत्यक्ष स्वराज्य होईल तेव्हां लोकसत्तेचाच अवलंब राहील आणि अस्पृश्यांनाहि मतदानाचा अधिकार राहील तेव्हां भावी स्वराज्यांत सुद्धां अस्पृश्यता राहणें शक्य व हित नाहीं. आतां प्रत्यक्ष हल्लीं अस्पृश्यता घालविणें म्हणजे घराबाहेर व घरांत जेथपर्यंत मुसलमान येतो तेथपर्यंत अस्पृश्यता मानूं नये. बाजारांत, शाळेंत, कचेरींत, आगगाडींत, सभेंत अस्पृश्यता राहूं नये हें सरळच झालें. पण देवळांत आणि पाणवठ्यावर अडचण वाटते, त्याचा निर्गम कसा करावा ह्यांविषयींच्या या ग्रंथांत केलेल्या सूचना आदरणीय आहेत.

ह्या ग्रंथांच्या दुसऱ्या पुस्तकांत धर्मभ्रष्टांच्या शुद्धीकरणाचा प्रश्न विवेचिला आहे. पतितपरावर्तन हें नांव बदलून वरील नांव दिलें आहे तें योग्यच आहे. हाहि प्रश्न धर्मदृष्ट्या व राजकीयदृष्ट्या अत्यंत जिव्हाळ्याचा आहे. ह्या प्रश्नास बौद्धांच्या काळांत इतकें महत्त्व आलें नाहीं. कारण, बौद्ध झालेले लोक हे गोमांसभक्षक कधींच नव्हते, किंबहुना मांसभक्षकहि नव्हते. मुसलमानांच्या वेळेपासून ह्या प्रश्नाचें स्वरूप कठीण झालें आणि हिंदुधर्मास गोहत्येची आणि गोमांसाची अत्यंत चीड असल्यानें मुसलमानांच्या जबरदस्तीनें बाटविण्याच्या अत्याचारास आळा कसा घालावा ह्या प्रश्नाची हिंदुसमाजास मोठी काळजी पडली. तथापि गोमांसभक्षणासहि प्रायश्चित्त आहे हें लक्ष्यांत घेऊन मुसलमान व ख्रिस्ती झालेल्या लोकांसहि वेळोवेळीं प्राचीनकाळीं, शिवाजी महाराजांच्या काळीं व पेशवाई अखेरपर्यंत कसें लोकांनीं शुद्ध करून घेतलें त्याचा साधार व मनोरंजक इतिहास या पुस्तकांत दिलेला धर्महट्टी ब्राह्मणांनींहि व इतर हिंदूंनीं विचार करण्यासारखा आहे. देवलस्मृति मुसलमानांनीं सिंध घेतलें त्यावेळीं झाली हें ह्या पुस्तकांतील मत मला मान्य नाहीं; तरी सत्ययुगीन देवलस्मृत्याधारें असें प्रायश्चित्त देतां येतें, त्यांत संशय नाहीं. ही स्मृति या ग्रंथाच्या परिशिष्टांत समग्र दिलेली आहे. प्रायश्चित्ताचा विधिहि ह्या ग्रंथांत दिलेला आहे; तो चांगला व थोडक्यांत आहे.

तिसऱ्या पुस्तकांत क्षत्रियवैश्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न विवेचिला आहे. वेदोक्त चळवळीचा पूर्व वृत्तांत ह्यांत दिला असून ही जी महाराष्ट्रांत विशेषतः स्पृश्यामध्यें भयंकर अनिष्टकारक दुही माजली आहे तिचा इतिहास त्यांत

दिला आहे. ह्या वादाच्या बुडाशींहि धर्महट्टच आहे. ह्या वादाच्या मुळाशीं असलेलें 'कलावाद्यन्तयोः स्थितिः' हें वाक्य प्रथम वाईंत धर्ममार्तंड लेलेशास्त्री ह्यांनीं पुढें करून मराठ्यांच्या क्षत्रियत्वाबद्दल विरोध केला ह्या पूर्वपक्षाचा व विरोधाच्या खंडणाचा सिद्धांत हल्लीं वांईच्याच प्राज्ञपाठशाळेच्या मंडळा-मार्फत वांईच्याच विद्वान् शास्त्रयांनीं पुढें मांडिला आहे हें अभिनंदनीय आहे. किंबहुना वांईवरचा हा कलंक त्यांनीं धुवून काढला आहे. कारण, हें वाक्य वांईतच १४ व्या शतकांत प्रकट झालें असें मी आपल्या मध्य-युगीन भारताच्या पुस्तकांत ( भा. २ इंग्रजी परिशिष्टांत पहा ) दाखविलें आहे. १४ व्या शतकांपर्यंत हिंदुस्थानांतील धर्मशास्त्री हिंदुस्थानांत क्षत्रिय-वैश्य आहेत असेंच मानीत होते, असा पुरावा मिळतो. इतिहास काय म्हणतो ह्या भागांत ही माहिती थोडक्यांत दिली आहे, त्यांत एकदोन चुका आहेत हें खरें. हर्षवर्धनानें अश्वमेध यज्ञ केला नाहीं आणि राज-पुतान्यांतील क्षत्रिय घराण्यांनीं मुसलमान बादशहांस मुली दिल्या ह्यामुळें त्यांचें क्षत्रियत्व बिघडलें नाहीं. कारण त्यांनीं मुसलमानांच्या किंवा इत-रांच्या मुली केल्या नाहींत. तथापि ह्यांत दिलेली माहिती महत्त्वाची आहे. आणखीहि शेंकडे शिलालेखात रजपुतांनीं व मराठ्यांनीं (उ. शिलाहारांनीं) आपणांस क्षत्रियोत्तम असें स्पष्टपणें म्हटलें आहे. आठव्या शतकांतील कुमा-रिलाच्याहि ग्रंथांत स्पष्टपणें 'हल्लीं' क्षत्रिय असल्याचा उल्लेख आहे. तेव्हां 'कलावाद्यन्तयोः स्थितिः' हें वचन अगदीं अलीकडचें सुमारें १४ व्या शत-कांतलें आहे हें निर्विवाद आहे. असो, क्षत्रियवैश्यांचे संस्कार पुष्कळ पिढ्या लुप्त झाल्यानें त्यांस प्रायश्चित्त कोणचें व कसें द्यावें ह्याविषयींची साधार माहिती ह्या पुस्तकांत दिलेली आहे, ती लोकांनीं लक्ष्यांत घ्यावी. त्याच-प्रमाणें सासवनें येथील वैश्याश्रमांत भावी वैश्य पिढीला वैदिक संस्कार करण्याची सूचना व त्या धर्तीवर मराठे क्षत्रियांनीं भावी पिढीस संस्कारयुक्त करण्याची सूचना ह्या पुस्तकांत दिलेली उत्तम आहे.

शेवटल्या पुस्तकांत हिंदु विधवांच्या प्रश्नावर चांगली चर्चा केली आहे. हा प्रश्न सामाजिक व धार्मिक असून शिवाय त्याला थोडेसें राजकीय स्वरूपहि आहे. तरुण हिंदु विधवा कित्येकवेळां मुसलमानांच्या ताब्यांत सांप-डून तंटे उत्पन्न होतात हा कटु अनुभव नेहमीं येतच आहे. ह्या आपत्तीचें

मुख्य मूळ बालविधवाविवाह हिंदुसमाजांत रूढ नाहीं. ह्यांत आहे. ह्यासंबंधानें ह्या पुस्तकांत जास्ती चर्चा व्हावयास पाहिजे होती. परंतु तो विषय पुष्कळ चर्चित झालेला आहे म्हणून सोडलेला दिसतो. पण अक्षतांचा विवाह संसारयुक्त व्हावा आणि होत असे ह्याबद्दल कांहीं शंका नाहीं. कलिवर्ज्यवचन बाजूला ठेऊन असे विवाह रूढ झालेच पाहिजेत. म्हणजे हिंदुसमाजावरची खरी काळिमा नष्ट होईल. अलीकडे प्रौढ विवाह होऊं लागले आहेत, त्यामुळें हा प्रश्न कमी महत्त्वाचा झाला आहे हें खरें. पण सर्व हिंदुस्थानांत विशेषतः उत्तरेकडे ब्राह्मणवैश्यांत हे बालविवाह अद्याप रूढ आहेत आणि विधवाविवाह निषिद्ध मानिला जातो, तेव्हां हें संकट अद्याप आहेच. त्याचा प्रतिकार झाला पाहिजे.

प्रौढ विधवांचा विवाह जसा बंद आहे तसा म्हाताऱ्या विधुरांचा पुनः विवाह समाजानें बंद करावा ही ग्रंथकर्त्याची विचारसरणि मान्य करण्यासारखी आहे. शास्त्रांत मनाई नसली तरी पन्नास वर्षांवरच्या विधुरास विवाह करूं देऊं नये. असें केलें असतां समाजसेवा करणारे पुरुष समाजसेवा करणाऱ्या विधवा स्त्रियांप्रमाणेंच हिंदुसमाजास लाभतील.

विधवावपन अवश्य नाहीं हीहि गोष्ट ग्रंथकर्त्यानें योग्य तऱ्हेनें सांगितली आहे. जीवन्ती चेत्यक्तकेशा० ह्या वचनांतील त्यक्तकेशा हें विशेषण भ्रातृमतीं कन्यामुद्वहेत् ह्या वचनांतील भ्रातृमती विशेषणाप्रमाणें केवल प्राशस्त्यबोधक आहे, हें उघड आहे. आणि वपन ऐच्छिक व प्रौढ वय झाल्यावरच करण्यासारखें आहे. वपनासंबंधानें विधवांची जी दुर्दशा होते तीहि ग्रंथकर्त्यानें दाखविलेली समाजानें लक्ष्यांत घेण्यासारखी आहे.

सकेशा विधवांचा धर्म पुस्तकांत उत्तम रीतीनें शास्त्राधारें वर्णिलेला आहे. अशा रीतीनें तपस्वी आचरण करणाऱ्या विधवा हिंदुसमाजाला ललामभूत आहेत हें कोणीहि कबूल करील; व इंद्रियनिग्रह करून शुद्ध वर्तन ठेवणाऱ्या व समाजाची व कुटुंबाची सेवा करणाऱ्या हजारों हिंदु विधवा वंदनीय आहेत ह्यांत शंका नाहीं. असो. ह्याहि पुस्तकांतील विवेचन साधार व मार्मिक आहे; आणि गरीब विधवांना दाखविलेले धंदे म्हणजे सूत कातणें, बायकांच्या व मुलांच्या रोगांचें ज्ञान संपादन करून चिकित्सा करणें व स्त्रीशिक्षणाच्या कामाकरतां

स्त्रीशिक्षक पुरविणें हें अत्यंत उपयुक्त धंदे सुचविलेले विधवांनीं जरूर उचलावे; आणि हिंदुसमाजानें ते धंदे चालविण्यास त्यांस लायक करण्याच्या संस्था उत्पन्न कराव्या ही सूचना चांगली आहे.

एकंदरींत ह्या ग्रंथांतील चारी पुस्तकांत हिंदुसमाजास सध्यां अत्यंत नडत असलेल्या चार प्रश्नांचा सांगोपांग विचार केला असून शास्त्राधारें हिंदुधर्माची उदात्तता न घालवितां त्या प्रश्नांचीं सोडविलेलीं उत्तरें हिंदुसमाजास पटतील अशींच आहेत. सुधारकांचा कट्टरपणा सोडून व दुर्धारकांचा हट्टीपणा वर्जून ह्या ग्रंथांत केलेली चर्चा आस्तिक हिंदुधर्माभिमानी व हिंदुसमाजाची राजकीय उन्नति करूं पाहाणाऱ्या सर्व लोकांस मान्य होईल अशी मला खात्री आहे. ग्रंथांतील एकदोन स्थळें सोडून ह्या ग्रंथांतील विवेचन मलाहि मान्य आहे, एवढें सांगून ही अल्प प्रस्तावना संपवितों.

पुणें आषाढ शु॥ १ १८४८ — चिंतामण विनायक वैद्य.

वा. निबंध ... 

॥ ॐ ॥

॥ धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा ॥

प्राज्ञपाठशाळामंडळपुस्तकमाला.

## पुस्तक पहिलें

# अस्पृश्योद्धार–विचार.

## भाग पहिला.

### अस्पृश्यतेची शास्त्रसिद्धता.

हिंदुस्थान हें राष्ट्र हल्लीं उदयोन्मुख बनत चाललेलें असून स्वातंत्र्याकरितां जो जो मोबदला द्यावा लागेल, तो तो देण्यास तें बद्धपरिकर झालें आहे. स्वातंत्र्याच्या आड जें जें म्हणून येईल तें तें नाहींसें करण्याचा राष्ट्रानें कृतनिश्चय केला आहे; हें सद्यःपरिस्थितीवरून लक्षांत येतें. स्वायत्ततेशिवाय हिंदुस्थानांत यापुढें माणुसकीसुद्धां टिकावयाची नाहीं, अशी राष्ट्राची खात्री झाल्यामुळें तें नोकरशाहीपुढें ठाण मांडून सनदशीर युद्ध खेळण्यास उभें राहिलें आहे. राष्ट्रोद्धाराकरितां सुरू केलेल्या अनेक उद्योगांपैकींच अस्पृश्योद्धार हा असून त्याला राष्ट्रिय महासभेनें हातीं घेतल्यामुळें विलक्षण स्वरूप आलें आहे. हिंदुस्थानच्या जनतेपैकीं एकपंचमांश जनतेला अस्पृश्य स्थितींत ठेवून स्वराज्य मिळणार नाहीं, किंवा मिळालें तरी तें चिरकाल राहाणार नाहीं; असें राष्ट्रीय महासभेला वाटूं लागल्यामुळें तिनें "अस्पृश्यता अशास्त्रीय आहे, तो एक हिंदुधर्मावर कलंक आहे" असें सांगण्यास सुरवात केली आहे. राजकारणी पुढाऱ्यांप्रमाणें समाजसुधारकांनींही आजपर्यंत आपल्या मताप्रमाणें या बाबतींत पुष्कळ प्रयत्न केले आहेत. सर्वांच्या प्रयत्नांना यश येण्याची सुवर्णसंधी आतां आली असून या प्रश्नाला धर्मशास्त्राची संमति

पाहिजे आहे. अस्पृश्यता शास्त्रसिद्ध आहे कीं नाहीं, अस्पृश्यतेबद्दल जुन्या-नव्यांचीं मतें काय आहेत, देशकालवर्तमान ध्यानांत घेतां शास्त्राधारानें अस्पृश्यता कमी करणें शक्य, इष्ट व धर्म्य आहे कीं नाहीं इत्यादि प्रश्नांचा विचार धर्मशास्त्रदृष्ट्या करण्याचें आम्ही योजिलें आहे.

या प्रश्नाच्या इतिहासाकडे नजर दिली तर असें दिसून येतें कीं, अव्वल इंग्रजीमध्यें हिंदुस्थानच्या उद्धाराकरितां पाश्चात्यांच्या अनुकरणवजा ज्या गोष्टी करण्यांत आल्या त्यांतीलच ही एक गोष्ट आहे. या प्रश्नाला पहिल्यानें पाश्चात्यविद्याविभूषित सुधारकांनीं जन्म दिला. अस्पृश्योद्धारार्थ शाळा काढल्या, आश्रम उघडले व व्याख्यानेंहि झोडिलीं; परंतु यापासून फारशी फलनिष्पत्ति झाली नाहीं. उलट सुधारकवर्ग त्यांच्या चुकीच्या पद्धतीमुळें लोकांच्या मनांतून उतरला. तथापि हा प्रश्न लोकांपुढें मांडण्याचें काम हिंदुस्थानांत जसें कांहीं व्यक्तींनीं चालविलें होतें, तसेंच मुंबई इलाख्यांत विशेषतः मराठी प्रांतांत हा प्रश्न लोकांपुढें वरचेवर आणण्याचें काम अत्यंत चिकाटीनें रा. विठ्ठल रामजी शिंदे यांनीं चालविलें होतें. हल्लीं या प्रश्नाला इतकें महत्त्व येण्याचें कारण राष्ट्रिय सभा हें होय. १९१७ सालीं कलकत्ता येथें अस्पृश्यता निवारणाचा ठराव पहिल्यानें राष्ट्रियसभेंत पास झाला. त्यामुळें थोडी खळबळ उडाली. कै. वा. लोकमान्य टिळकांनीं स्वराज्यशिष्टाईचे वेळीं हा प्रश्न राष्ट्रापुढें मांडला. लोकमान्यांच्या पश्चात् राष्ट्राचें धुरीणत्व महात्मा गांधींच्याकडे आलें. त्यांनीं या प्रश्नाला इतकें चालन दिलें कीं, तसें आजपर्यंत कोणीच दिलें नाहीं. स्वराज्याकरितां हपापलेल्या व स्वातंत्र्याकरितां आशाळभूत झालेल्या जनतेची इच्छा हा प्रश्न सोडविल्याशिवाय परिपूर्ण होणार नाहीं, अशी महात्माजींनीं खात्री दिली.

जनतेला जसें स्वातंत्र्य पाहिजे आहे तसा धर्महि पाहिजे आहे. धर्माचे संस्कार निरक्षर जनतेवर साक्षर जनतेपेक्षां फार दृढ व गंभीर असे आहेत. हिंदुस्थानाची जनता शेंकडा ८० याच वर्गांतली असल्यामुळें कोणीहि देशभक्त कितीहि मोठा असला तरी तिच्या धार्मिक विचारांत कल्पनातीत क्रांति करूं शकणार नाहीं. महात्मा गांधींसारखा सात्त्विक आणि तेजस्वी राष्ट्रभक्त अस्पृश्यता काढून टाका असें सांगतो म्हणून लोक ऐकून तरी घेतात. "येरा गबाळांचा" जनतेपुढें पाड नाहीं. अजाण जनतेला सुजाण करण्याचा प्रयत्न

सुशिक्षितांनीं आजपर्यंत फारसा केला नाहीं, इतकेंच नव्हे तर ते जनतेमध्यें मिळूनमिसळूनहि वागले नाहींत. यामुळें जसा राष्ट्राचा सरकारवरचा विश्वास उडालेला आहे, तसा अशिक्षितांचा सुशिक्षितांवरचा विश्वास साफ उडाला आहे. खरी वस्तुस्थिति अशी असल्यामुळें अज्ञ जनतेला एकदम वाडवडिलांनीं चालविलेले आचार सोडण्यास सांगितलें तर त्याचा इष्ट परिणाम होत नाहीं.

निरक्षर जनतेला जरी धर्माचें तात्त्विक स्वरूप माहीत नसलें तथापि जनतेची धर्मावरील श्रद्धा अढळ आहे, हें पुढाऱ्यांनीं विसरून चालावयाचें नाहीं. पुढाऱ्यांना जनतेची नाडी जर बरोबर अवगत नसली तर त्यांचें इष्ट कार्य कधींहि घडून येणार नाहीं. देशांतील एकपंचमांश लोकांची अस्पृश्यता कायम ठेवून जशी स्वराज्यप्राप्ति व्हावयाची नाहीं; तशीच बहुजनसमाजाची व पुराणमताभिमान्यांची धर्मश्रद्धा विचारांत न घेऊनहि भागावयाचें नाहीं. अस्पृश्यता नाहींशी करण्यामध्यें जो लोकसंग्रह करण्याचा हेतु आहे तो साध्य करीत असतां लोकविग्रह किती होत आहे, याचाहि विचार अवश्य केला पाहिजे. नाहींतर बाहेरचे चार पाहुणे घरांत येण्याकरितां दार मोकळें केलें, परंतु पाहुणे तर कोणी आलेच नाहींत आणि घरांत लोक जे होते तेहि बाहेर निघून गेले, असें होईल. केवळ स्वराज्याच्या दृष्टीनें या प्रश्नाकडे पाहून चालावयाचें नाहीं, तर धार्मिक आणि सामाजिक दृष्टीनेंही या प्रश्नाचा विचार झाला पाहिजे. अद्याप आधुनिक सुशिक्षितवर्गामध्यें ही दृष्टि आलेली नाहीं; कारण त्यांनीं आपल्या धर्मग्रंथाचें धार्मिकबुद्धीनें अवलोकनहि केलेलें नाहीं; अर्थात् आचरणासंबंधीं सांगायला नकोच! तात्पर्य, अस्पृश्यता हा हिंदुधर्माला डाग आहे, कलंक आहे, असें म्हणून बहुजनसमाजाची श्रद्धा दुखवून सहानुभूति गमाविण्यापेक्षां शास्त्रार्थ समजून घेऊन अस्पृश्यता कोणत्या कारणानें आली, ती कां नाहींशी केली पाहिजे, ती नाहींशी करणें धर्मशास्त्राविरुद्ध आहे कीं काय इत्यादि प्रश्न धार्मिक दृष्टीनें त्यांच्यापुढें मांडले गेले तरच त्यांचा चांगला परिणाम होईल.

पुराणमताभिमानी लोक व अज्ञ बहुजनसमाज यांचीं मतें बनण्याला काय शास्त्राधार आहेत व त्यांच्या काय काय समजुती आहेत हें आतां आपण पाहूं. इंग्रजी शिक्षण सुरू झाल्यापासून, जगांत ईश्वर नाहीं, पुनर्जन्म

नाहीं आणि जातीही नाहींत, अशी जरी कांहीं सुशिक्षितांची समजूत झाली असली तरी जुन्या लोकांच्या समजुती आहेत त्याच कायम आहेत. जगामध्यें ईश्वर आहे, पुनर्जन्म आहे, कर्मानुसार फळ भोगावें लागतें, जसें करावें तसें भरावें, पापपुण्यानुसार मनुष्याला चौऱ्यांयशी लक्ष योनींपैकीं कोणत्या तरी योनींत जन्म घ्यावा लागतो, मनुष्ययोनींत जन्मलेलीं सर्व माणसें सारखीं नसून त्यांच्यामध्यें कर्माप्रमाणें कांहीं फरक आहे, अशा प्रकारचीं मतें जुन्या लोकांचीं आहेत. धंद्यावरून निरनिराळ्या जाती बनल्या असें जरी कित्येकांचें मत असलें तरी श्रुतिस्मृतिग्रंथांत अस्पृश्य वर्गाची म्हणजे चांडाळ लोकांची एक स्वतंत्र योनी मानली असून ती जन्मसिद्ध आहे असें सांगितलें आहे. छांदोग्य उपनिषदाच्या पांचव्या अध्यायाच्या दहाव्या खंडांत पुढीलप्रमाणें स्पष्ट उल्लेख आहे.

तद्य इह रमणीयचरणाअभ्याशो ह यत्ते रमणीयां योनिमापद्येरन्ब्राह्मण-योनिं वा क्षत्रिययोनिं वा वैश्ययोनिं वाऽथ य इह कपूयचरणा अभ्याशो ह यत्ते कपूयां योनिमापद्येरञ्श्वयोनिं वा सूकरयोनिं वा चांडालयोनिं वा ॥ ७ ॥

ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या योनींपैकीं एखादी योनि पुण्यवान् प्राण्यांना सत्वर प्राप्त होते आणि ज्यांचें आचरण निंद्य असेल त्यांना श्वान-योनि, सूकरयोनि व चांडाळयोनि यांपैकीं एकादी सत्वर प्राप्त होते, असा या श्रुतीचा अर्थ आहे.

" श्वसूकरखरोष्ट्राणां गोजाविमृगपक्षिणाम् ॥
चण्डालपुक्कसानां च ब्रह्महा योनिमृच्छति ॥" मनु. अ. १२

ब्रह्मघातकी मनुष्य पापनिष्कृतीकरितां ज्या ज्या योनीमध्यें जन्म घेतो त्यांतील चण्डालयोनि ही एक आहे.

अत्रिस्मृतीमध्यें "एकाक्षरप्रदातारं यो गुरुनाभिमन्यते । शुनां योनिशतं गत्वा चण्डालेष्वभिजायते ॥१०॥" असें वचन आहे. तात्पर्य, श्रुतिस्मृतींच्या प्रमाणांनीं चंडाल ही एक जाति असून ती उत्पत्तिसिद्ध आहे, असें मान-ण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. भगवान् श्रीकृष्णांनींहि भगवद्गीतेमध्यें "येऽपिस्युः पापयोनयः" असें म्हणून त्रैवर्णिकबाह्य पापयोनींचा उल्लेख केलेला आहे.

पापयोनींचें अस्तित्व कबूल करून त्यापैकीच चांडाळयोनि आहे, असें सिद्ध झाल्यावर पापयोनींचा विटाळ पुण्ययोनींना होणार हें स्वाभाविकच आहे. पापपुण्याच्या कल्पनेवर धर्माधर्म आणि धर्माधर्मांच्या कल्पनेवर सुखदुःखांची इमारत रचलेली आहे. पूर्वजन्मकृत पातकाप्रमाणें पापयोनि ज्याला प्राप्त होत असते, त्याचा संपर्क तो पातकी असल्यामुळें इतरांना लागूं नये हें इष्ट आहे. सुतक्याची शिवाशिव, रजस्वलेचा विटाळ, अमेध्य पदार्थ, स्पर्शजन्य दोष हे स्वच्छास्वच्छतेच्या दृष्टीनें आणि आरोग्याच्या व वैद्यशास्त्राच्या दृष्टीनें जसे उपयुक्त आहेत, तसाच पापयोनींचा स्पर्श निदान पापपुण्याची भावना बाळगणाऱ्यांना इष्ट आहे असें म्हणतां येणार नाहीं. शास्त्रकारांनीं या पापपुण्याच्या आणि धर्माधर्मांच्या विचारानेंच पापयोनींचा स्पर्शदोष सांगितला आहे. पापयोनींचा स्पर्श झाल्यास स्पर्शदोषनिवृत्तीकरितां स्नानादि प्रायश्चित्तेंहि सांगितलेलीं आहेत.

दिवाकीर्तिमुदक्यां च पतितं सूतिकां तथा ॥
शवं तत्स्पृष्टिनं चैव स्पृष्ट्वा स्नानेन शुध्यति ॥ मनु ५–८५
श्वपाकं पतितं व्यंगमुन्मत्तं शवहारकं ।
सूतिकां साविकां नारीं रजसा च परिप्लुताम् ॥
श्वकुक्कुटवराहांश्च ग्राम्यान् संस्पृश्य मानवः
सचैलः साशिरःस्नात्वा तदानीमेव शुध्यति ॥ देवलस्मृति ॥
शवस्पृष्टं दिवाकीर्तिं चितिं पूयं रजस्वलाम्
स्पृष्ट्वा त्वकामतो विप्रः स्नानं कृत्वा विशुध्यति ॥ बृहस्पति ॥
यस्तु छायां श्वपाकस्य ब्राह्मणो ह्यधिरोहति ।
तत्र स्नानं प्रकुर्वीत घृतं प्राश्य विशुध्यति ॥ अंगिरास्मृति ॥
चंडालं पतितं चैव दूरतः परिवर्जयेत् ॥ व्याघ्रपाद ॥
चितिवृक्षाश्चितिर्यूपश्चाण्डालो वेदविक्रयी ।
एतान् वै ब्राह्मणः स्पृष्ट्वा सचैलो जलमाविशत् ॥ शातातपस्मृति.

याप्रमाणें निरनिराळ्या स्मृतींमध्यें आज ज्या वर्गाला आपण अस्पृश्य वर्ग समजतों त्या वर्गाला चंडाल, श्वपाक, दिवाकीर्ति अशीं नांवें देऊन

त्यांचा स्पर्श झाल्यास सचैल स्नान करावें असें सांगितलें आहे. हा शास्त्रार्थ केवळ स्मृतींमध्यें आहे असें नाहीं. तर श्रुतीमध्यें सुद्धां आहे.

तस्मान्न जनमियान्नान्तमियान्नेत्पाप्मानं मृत्युमन्ववायानीति ॥ बृहदारण्यक. अ. १ बा. ३ कंडिका १०.

या श्रुतीवरील शांकरभाष्यहि विचारार्ह आहे.

तस्मात् तं अंत्यजनं नेयात् न गच्छेत् संभाषणदर्शनादिभिर्न संसृजेत । तत्संसर्गः पाप्मनासंसर्गः कृतः स्यात् पाप्माश्रयोहि सः ॥

म्हणून अंत्यजांशीं संभाषण, दर्शन इत्यादि संसर्ग करूं नये; त्यांचा संसर्ग केला असतां पाप लागतें. कारण ते पापाचें आश्रयस्थान आहेत. प्रत्यंत देशनिवासी लोकासंबंधानें म्हणजे चातुर्वर्ण्यबाह्य समाजासंबंधानें ही श्रुति आहे हें विसरूं नये.

हिंदुधर्मशास्त्रामध्यें चंडाल, श्वपाकादींचाच विटाळ सांगितला असें नाहीं, तर म्लेंच्छ, पाखांडी आणि स्वधर्मभ्रष्ट ब्राह्मण यांचाहि विटाळ सांगितला आहे.

सभायां स्पर्शने चैव म्लेंच्छेन सह संविशेत् ।
कुर्यात् स्नानं सचैलं तु दिनमेकमभोजनं ॥ ५८ ॥ देवलस्मृति ॥
शैवान् पाशुपतान् स्पृष्ट्वा लोकायतिकनास्तिकान् ।
विकर्मस्थान् द्विजान् शूद्रान् सवासा जलमाविशेत् ॥
ब्रह्मांडपुराण ॥

वेदबाह्य मतवादी व पाखांडी यांचा विटाळ तर मानावाच. परंतु भलभलतीं कर्मे करणारे द्विज ( त्रैवर्ण ) व शूद्र यांचाहि विटाळ धरण्यास सांगितलें आहे. अत्रिस्मृतीमध्यें दहा प्रकारचे ब्राह्मण सांगितले असून त्यांत

क्रियाहीनश्च मूर्खश्च सर्वधर्मविवर्जितः ।
निर्दयः सर्वभूतेषु विप्रश्चाण्डाल उच्यते ॥ ३८१ ॥

चांडालाचे दुर्गुण असणाऱ्या ब्राह्मणाला चांडाल म्हटलें आहे, हें निदान ब्राह्मणांनीं तरी लक्षांत ठेविलें पाहिजे. याप्रमाणें निरनिराळ्या शास्त्र ग्रंथांवरून अस्पृश्यता अस्पृश्यवर्गापुरतीच आहे, असें नसून तिची व्याप्ति

निरनिराळ्या व्यवहारामध्यें आहे, हें सुज्ञांच्या लक्षांत येईल. हिंदुधर्मासारखा सर्वांना पोटांत ठेवणारा गंभीर धर्म नाहीं. कारण तो सर्वांचें आपल्यामध्यें समावेशन करितो; हें जरीं खरें असलें तरी तो आपल्या संस्कृतीचा बचाव केल्यावांचून राहत नाहीं; हें ही खरें आहे. अस्पृश्यता ही हेंच तत्त्व उत्कट-पणें रक्षण करण्याकरितां उत्पन्न झालेली आहे. हिंदुधर्मामध्यें प्रेम, दया, आणि वात्सल्य हीं आहेत व अस्पृश्यतेमध्यें तिरस्कार द्वेष व कठोरता आहे म्हणून हिंदुधर्मावर तो एक कलंक आहे, असें कांहींचें म्हणणें आहे. आक्षे-पकांचें हें म्हणणें घटकाभर प्रमाण मानलें तरी अस्पृश्यवर्गाखेरीज इतरत्र जी अस्पृश्यता आहे, तिची वाट काय? देवब्राह्मणासमक्ष जिचें पाणिग्रहण केलें, तिला रजस्वला झाल्यावर तीन दिवस अस्पृश्य मानण्यात येतें हा कोणत्या द्वेषाचा परिणाम ? सोवळ्यानें पूजा करणारा बाप ओवळ्या मुलाला स्पर्श करीत नाहीं, म्हणून त्याचें अंतःकरण द्वेषाग्नीनें पेटलेलें असतें असें म्हणाव-याचें काय ? अगदीं जिवलग स्नेही आपल्या सुतकी मित्राला कडकडून भेटत नाहीं,म्हणून त्याच्या ठिकाणीं तिरस्कार किंवा तिटकारा उत्पन्न झाला, असें म्हणतां येईल काय ? कधींहि म्हणतां येणार नाहीं. याच दृष्टीनें अस्पृश्य वर्गाच्या अस्पृश्यतेकडे पाहिलें म्हणजे निष्कारण उत्पन्न झालेले धर्मग्रंथांबद्दलचे गैरसमज नाहींसे होतील.

पुराणमतवादी लोक व श्रद्धावान् बहुजनसमाज यांचीं जीं मतें बनलीं आहेत आणि त्यांनीं ज्या चालीरीतींचा अवलंब केला आहे, त्यांना कांहीं तरी आधार आहे यांत शंका नाहीं. श्रुतिस्मृतिपुराणोक्त वरील वचनांवरून अस्पृश्यता शास्त्रसिद्ध आहे, हें सहज लक्षांत येईल.

# भाग दुसरा.

## अस्पृश्योत्पत्तिविषयक नवीं जुनीं मतें.

पूर्वी सप्तसिंधूच्या कांठीं आर्यांनीं आपलें वास्तव्य केलें होतें. हे आर्य पूर्वेकडे व दक्षिणेस विंध्यपर्वताच्या पलीकडे हळूहळू राहावयास जाऊं लागले. आर्यांनीं या आपल्या सर्व वसाहती अग्निहोत्रपुरःसर स्थापन केल्या. आर्यांचें अग्निहोत्र जेथें स्थापिलें जाई त्या भूमीस यज्ञभूमी म्हणत. आणि त्या यज्ञभूमींत अनार्यांना ( राक्षसांना ) येण्यास प्रतिबंध असे. या यज्ञभूमींत आर्यांचे फक्त चार वर्णच राहात असत.

स्मृताश्च वर्णाश्चत्वारः पंचमोनाधिगम्यते ।

ज्या देशामध्यें चातुर्वर्ण्य स्थापना झालेली नसे त्या देशांना प्रत्यन्तवासी किंवा म्लेंच्छ देश असें म्हणत असत.

चातुर्वर्ण्यव्यवस्थानं यस्मिन्देशे न विद्यते ।
स म्लेंच्छदेशो विज्ञेय आर्यावर्तस्ततः परः ॥ बृ. वि. स्मृ. अ ८४
सिंधुसौवीरसौराष्ट्र तथा प्रत्यन्तवासिनः ।
कालिङ्गान्कोकणान्वङ्गान्गत्वा संस्कारमर्हति ॥ देवल. स्मृ. श्लो. १६

आर्यांनीं आपल्या समाजाच्या दार्ढ्याकरितां असे नियम घातले कीं, चातुर्वर्ण्यव्यवस्थारहित म्लेंच्छ देशांत जर कोणी गेला तर त्याला पाप लागेल आणि संस्कारावांचून पुनःशुद्धि होणार नाहीं. या प्रतिबंधावरून व वसाहतीप्रीत्यर्थ झालेल्या आर्यानार्यांच्या झगडयावरून असें अनुमानितां येतें कीं, आर्य हे अनार्यांना जवळ येऊं देत नसत, व नरमांसभक्षक राक्षस हल्ला करण्यास आल्यास त्यांचा उच्छेद करीत. मात्र आर्यांनीं सर्वच अनार्यांचा उच्छेद केला असें नव्हे; ज्यांनीं आपल्याबद्दलचा द्वेषभाव टाकिला त्या अनार्यांना त्यांनीं आपल्या सहवासांत ठेवून घेऊन त्यांची सुधारणा केली. आर्य सहवासाचा फायदा अनार्यांना मिळून ते उद्योगधंदे व शेती करून पोट भरूं लागले. घर करून राहाण्याची व वस्त्रें नेसण्याची त्यांना गोडी लागली

आर्यभाषेचा व आर्य देवतांचा परिचय झाला. ग्रामव्यवस्थेमध्यें वृत्ति मिळाली व उच्चवर्णाकडून पौरोहित्य करून घेण्याचा मान मिळाला. आर्यांनीं अनार्यांची याप्रमाणें उन्नति केलीच; परंतु कांहींना चातुर्वर्ण्यामध्येंसुद्धां स्थान दिलें, असें ऐतिहासिक म्हणतात.

आर्यसंस्कृतीचा स्वभाव संग्रह करण्याचा असल्यामुळें त्या स्वभावानुरूप अनार्यांना अनुलोमसंकर जातीमध्यें पुढें पुढें गणण्यांत येऊं लागले. आर्य म्हणजे त्रैवर्णिक. अनुलोम संतति आणि द्वेषभाव विसरून आर्यांची सेवा करण्यास तयार झालेले अनार्य मिळून शूद्रवर्ग व शुद्ध अनार्य म्हणजे अस्पृश्य वर्ग अशी व्यवस्था झाली. अट्टल अनार्यांचा स्वभाव कांहीं केल्या बदलला नाहीं. त्यांचे सगळे घाणेरडे धंदे, गलिच्छ आचारविचार, मांसाहार, मद्यपान वगैरे गोष्टींवरून त्यांना गांवाबाहेरच ठेवण्यांत येऊं लागलें. या अनार्यांवर आर्यांनीं अगदीं कडकडीत बहिष्कार घातला. याचें कारण त्याचा संसर्ग यांना लागूं नये हें एक व दुसरें त्यांनीं आर्यांच्या जवळ येण्याची इच्छा दर्शवावी व आपले आचारविचार सुधारावे. असल्या अनार्यांनीं मुडदेफरासाचें काम करावें असें सांगितलें आहे.

दिवा चरेयुः कार्यार्थं चिन्हिता राजशासनैः

अबान्धवं शवं चैव निर्हरेयुरिति स्थितिः ॥ मनु.स्मृ. अ १०श्लो.५५

वध्यांश्च हन्युः सततं यथाशास्त्रं नृपाज्ञया ।

वध्यवासांसि गृण्हीयुः शय्याश्चाभरणानि च॥ मनु.स्मृ.अ १०श्लो.५६

आर्यांनीं असल्या अनार्यांनासुद्धां आपल्या ग्रामव्यवस्थेमध्यें वृत्ति दिली, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. अद्याप खेड्यापाड्यामध्यें जे हक्कदार व बलुतेदार आहेत, त्यांमध्यें गांवच्या महाराला व मांग, चांभार, ढोर यांनाहि बरेंच महत्त्व आहे. सारांश अनार्य म्हणजे अस्पृश्य होत, असें हा पक्ष म्हणतो.

अस्पृश्यवर्गाच्या उत्पत्तीसंबंधानें दुसरें एक मत असें आहे कीं, आर्य म्हणजे फक्त त्रैवर्णिक व अनार्य म्हणजे शूद्र, असें आर्यानार्यांचें मिळून चातुर्वर्ण्य बनलें. चार वर्णांपेक्षां दुसरा कोणताहि वर्ण अस्तित्वांत नव्हता.

" ब्राह्मणः क्षत्रियो वैश्यस्त्रयो वर्णा द्विजातयः ।।
चतुर्थ एकजातिस्तु शुद्रो नास्ति तु पञ्चमः ।। " म. स्मृ. अ. १० श्लो. ४

याप्रमाणें वर्णव्यवस्था होती. समाजामध्यें सर्व प्रकारच्या वृत्तीचे लोक असावयाचेच. परंतु दुष्ट लोकांच्या उलाढालीमुळें समाजाची घडी विस्कलित होऊं नये म्हणून समाजशासनसंस्था अस्तित्वांत आली. प्राचीन काळीं हें समाजशासनाचें काम राजा व प्रजा या उभयतांचे विचारें होत असे. समाज-नियंत्रण करणाऱ्या सभेनें जे नियम ठरविले असतील ते अमलांत येत आहेत कीं नाहीं हें पाहण्याचें काम राजाचें असें. म्हणून समाजामध्यें जे पंचमहापातकी असत त्यांना बहिष्कृत करण्यांत येत असे.

" ब्रह्महत्या सुरापानं स्तेयं गुर्वंगनागमः ।
महांति पातकान्याहुः संसर्गश्चापि तैः सह।। " म. स्मृ. अ. ११ श्लो. ५४.

खून, मद्यपान, चोरी, व्यभिचार व हीं पातकें करणाऱ्यांशीं संबंध ठेवणें अशीं हीं पांच महापातकें आहेत. हीं पातकें करणाऱ्यांना समाजाबाहेर काहीं काल प्रायाश्चित्ताकरितां ठेवण्यांत येत असे. कुकर्में करणाऱ्यांना ताळ्यावर आणण्याकरितां बहिष्कार हा मोठा जालीम उपाय त्या वेळीं अमलांत आणीत असत. पातक्यांना पूर्ण पश्चात्ताप झाला असें आढळल्या-नंतर पुनः त्यांना चातुर्वर्ण्यामध्यें समाविष्ट केलें जात असे. निरनिराळ्या पातकांबद्दल पृथक् पृथक् शिक्षा सांगितलेल्या आहेत. शारिरदंड, धनदंड सोसण्यास जो अशक्त असेल व जो प्रायश्चित्त घेणार नसेल त्याच्यावरच शेवटचा निर्वाणीचा बहिष्काराचा उपाय करण्यांत येत असे, हें मनुस्मृतीं-तील नवव्या अध्यायांतील पुढील उताऱ्यावरून समजून येईल.

ब्रह्महाच सुरापश्च स्तेयीच गुरुतल्पगः ।
एते सर्वे पृथग्ज्ञेया महापातकिनो नराः ।। २३५
चतुर्णामपि चैतेषां प्रायाश्चित्तमकुर्वताम् ।
शारीरं धनसंयुक्तं दण्डं धर्म्यं प्रकाशयेत् ।। २३६
गुरुतल्पे भगः कार्यः सुरापाने सुराध्वजः ।

स्तेये तु श्वपदे कार्यं ब्रह्महण्यशिराः पुमान् ॥ २३७

असंभोज्या ह्यसंयाज्या असंपाठ्याऽविवाहिनः ।

चरेयुः पृथिवीं दीनाः सर्वधर्मबहिष्कृताः ॥ २३८ ॥

ज्ञातिसंबन्धिभिस्त्वेते त्यक्तव्याः कृतलक्षणः ।

निर्दया निर्नमस्कारास्तन्मनोरनुशासनम् " ॥ २३९

आपल्या प्राचीन संस्कृतीमध्यें बहिष्कार ऊर्फ वाळीत टाकणें हें मोठें शस्त्र होतें. मी मी म्हणणाऱ्यांना या शास्त्रापुढें चळवळ कापावें लागे. हल्लींच्या विस्कलित स्थितीमध्यें कांहीं सत्ता नसतांहि मोठमोठ्या सुधारकांना आपल्या मताविरुद्ध असलेल्या गोष्टींना समाजाच्या भीतीमुळें मान द्यावा लागतो. यावरून पूर्वीं या शास्त्राचें पाणी किती प्रखर असेल याची वाचकांनींच कल्पना करावी. खरोखर मनुष्याला ताळ्यावर आणण्याचा हा सर्वोत्तम उपाय आहे. मात्र हा शेवटचा आहे. त्यापूर्वीं वाग्दंड, धिग्दंड व धनदंड हे सांगितलेले आहेत. या त्रिदंडांना जो वश होत नसेल त्याच्यावर या चतुर्थ दण्डाची अंमलबजावणी करीत असत. या दंडरूपी सुमहत्तेजाला जे शरण येत नसत, त्यांना जन्मभर नव्हे पिढ्यानुपिढ्या चातुर्वर्ण्यबाह्य स्थितीमध्यें कांहीं तरी धंदे करून उदरनिर्वाह करावा लागे. अर्थात् प्रायश्चित्तविहीन जो पंचमहापातकी वर्ग तोच अस्पृश्य वर्ग होय.

बरेच दिवस एका विशिष्ट परिस्थितीमध्यें राहण्यास निर्ढावलेल्या या लोकांना पुनःचातुर्वर्ण्यांत आपलें स्थान पटकाविण्याची बुद्धि झाली नाहीं आणि त्यांना वर आणण्याचेहि कोणी प्रयत्न केले नाहींत. पंचमहापातक्यांनाच केवळ बहिष्कृत करीत असें नसून स्वधर्मभ्रष्टांनासुद्धां तीच शिक्षा देण्यांत येई.

" न तिष्ठति तु यः पूर्वां नोपास्ते यश्च पश्चिमाम् ।

स शूद्रवद्बहिष्कार्यः सर्वस्मात् द्विजकर्मणः" ॥ म. स्मृ २ श्लो ११३

एखादा मुरदाड द्विज जर हट्टानें संध्या करीत नसेल तर त्यालाहि त्याच्या ठिकाणीं क्रियालोपजन्य पातित्य येऊं नये म्हणून ताळ्यावर आणण्याकरितां भगवान् मनूंनीं अशा प्रकारच्या शिक्षा सांगितलेल्या आहेत. पंचमहापातकामुळें जसें पातित्य येतें तसेंच क्रियालोपामुळेंहि पातित्य येतें.

" शनकैस्तु क्रियालोपादिमाः क्षत्रियजातयः ।
वृषलत्वं गता लोके ब्राह्मणादर्शनेन च ॥ " म. स्मृ. अ. १० श्लो. ४३

पौंड्रक, चौड्र, द्राविड, कांबोज, पारद, किरात वगैरे ज्या क्षात्रिय जाति त्यावेळीं अस्तित्वांत होत्या त्यांना क्रियालोपामुळें वृषलत्व प्राप्त झालें. ऐवढें खरें कीं, पातकजन्य पातित्य व क्रियालोपजन्य पातित्य नाहींसें करण्याची एका काळीं कांहीं तरी व्यवस्था होती. या व्यवस्थेमुळें हे लोक पुनः वर येत असत, परंतु बुद्धधर्माच्या अमदानीमध्यें समाजनियंत्रण करणारी शक्ति नष्ट झाल्यामुळें सर्व पतिताचा एक कायम वर्ग बनला. त्याचे धंदेहि अगदीं घाणेरडे असे असल्यामुळें त्यांना भिन्न भिन्न संवयी व आचार जडून त्यांची स्ववर्णप्रवेशेच्छा नष्ट झाली व हा वर्ग कायम राहिला.

अस्पृश्य वर्गाच्या उत्पत्तीसंबंधानें तिसरेंहि एक मत पुढीलप्रमाणें आहे. हें मत नव्याजुन्यांना सारखेंच महत्त्वाचें असें आहे. विशेषतः जुने लोक याला अधिक मान देतात असें म्हटल्यास चालेल. आर्यांच्या वर्णव्यवस्थेमध्यें बीजक्षेत्रशुद्धीला अत्यंत महत्व दिलें असून अनुलोम संतति ही मातृसजातीय कशी असते व प्रतिलोम संकर कसा अनिष्ट आहे, हें मनुस्मृतीच्या दहाव्या अध्यायांत फार उत्कृष्ट दाखविलें आहे. कोणापासून कोणता प्रतिलोम संकर होतो व त्यांनीं कोणकोणते धंदे करावेत याचाहि विचार येथें केला आहे. आर्यांना प्रतिलोम संकर अत्यंत घातुक वाटत होता म्हणून त्याचा प्रतिबंध व्हावा या उद्देशानें अत्यंत कडक नियम ठिकठिकाणीं त्यांनीं सांगितले आहेत.

शुद्रादायोगवः क्षत्ता चण्डालश्चाधमो नृणाम् ।
वैश्यराजन्यविप्रासु जायन्ते वर्णसंकराः॥ म.स्मृ. अ.१० श्लोक १२.

आयोगवश्च क्षत्ताच चण्डालश्चाधमो नृणाम् ।
प्रातिलोम्येन जायन्ते शूद्रादपसदास्त्रयः ॥ म.स्मृ.अ. १० श्लो. १६

ब्राह्मण्यां क्षत्रियात्सूतो वैश्याद्वैदेहकस्तथा ।
शूद्राज्जातस्तुचण्डालःसर्वधर्मबहिष्कृतः ॥ याज्ञ. स्मृ.अ.१ श्लो.९३

या मनु व याज्ञवल्क्य स्मृतींतील श्लोकांवरून आर्यांना संकराचा किती तिटकारा होता, हें व्यक्त होत आहे. हीन बीज व उच्च क्षेत्र यांपासून उत्पन्न

झालेली संतति प्रामुख्यानें समाजापुढें असूं नये म्हणून 'चण्डालश्चाधमो नृणाम्' चण्डाल हा मनुष्यामध्यें अगदीं अधम समजावा असें म्हटलें आहे. याज्ञवल्क्य स्मृतीमध्यें तर 'सर्वधर्मबहिष्कृतः' हें पद फार अर्थपूर्ण वापरलें असून अशा माणसांना कडक बहिष्कार घालावा असें सुचविलें आहे. चंडाल, श्वपाक, धिग्वण, पुक्कस, कर्मचंडाल, सौनिक म्हणजे खाटिक, चांभार, मांग, ढोर, मारेकरी, वगैरे अस्पृश्यांची अशीच उत्पत्ति दिलेली आहे. वर्णसंकर होऊं नये, याकरितां ही दक्षता घेतली असून शैथिल्यानें संकर झालाच तर ही व्यवस्था सांगितली आहे. वर्णसंकराचें प्रतिलोम संकर हें एक प्रमुख कारण असून आणखीं कांहीं कारणें आहेत, हें पुढील श्लोकावरून दिसतें.

> व्यभिचारेण वर्णानामवेद्यावेदनेनच ।
> स्वकर्मणांच त्यागेन जायन्ते वर्णसंकराः ॥ म. स्मृ. अ. १० श्लो. २४

वर्णव्यवस्थेमध्यें जितकें महत्त्व बीजक्षेत्रशुद्धीला दिलें आहे, तितकेंच महत्त्व स्वकर्तव्यप्रतिपालनाला दिलें आहे. मनुष्य स्वकर्मच्युत झाला व इंद्रियार्थांच्या ठिकाणीं प्रसक्त होऊन भलभलतें कर्म करूं लागला, म्हणजे तो पतित होतो असा सिद्धांत आहे. तात्पर्य, **प्रतिलोमसंकर म्हणजे अस्पृश्य वर्ग असा** या मताचा निष्कर्ष आहे.

वर दिलेल्या तीन मतांखेरीज आणखी एक मत अगदीं अलीकडे पुढें आलें आहे. तें असें—सर्व मुख्य जातींचें व पोट जातींचें एकीकरण म्हणजे चातुर्वर्ण्य संस्थापना होय. हें चातुर्वर्ण्य आर्यांनीं स्थापन केलें व संस्कृतभाषा-संभवसंस्कृतीचा सर्वांना परिचय करून दिला. भारतीय युद्धापर्यंत हें काम मोठया जोरानें चाललें होतें. परंतु भारतीय युद्धानंतर सर्वत्र वाताहत झाली आणि पुढें बुद्ध धर्माचा उदय होऊन प्रवृत्तिधर्म नाहींसा झाला. बुद्ध धर्मानें चातुर्वर्ण्यवृद्धीला वाव दिली नाहीं; इतकेंच नव्हे तर इस्लामी संस्कृतीला आंत घुसण्यास जागा करून दिली. इस्लामी संस्कृतीचा असा कांहीं जोराचा तडाका बसला कीं, त्यांतून बचाव करतां करतां नाकीं नव आले. छत्रपति श्रीशिवाजी महाराजांनीं स्वराज्यसंस्थापना करून जरा स्थिर-स्थावर केली, तों पुढें पानिपतचा प्रळय ओढवला आणि हिंदवी स्वराज्याची इमारत ढांसळू लागली इतक्यांत इंग्रजांनीं म्हणजे पाश्चात्य संस्कृतीनें

आम्हांला मिळलें. हल्लीं आपण तिच्याच दाढेमध्यें सांपडलों आहोत. तात्पर्य, भारतीय युद्धापासून चातुर्वर्ण्य संस्थापनेचें कार्य अपुरेंच राहिलें आहे ज्या जाती चातुर्वर्ण्यांत समाविष्ट झाल्या त्या झाल्या आणि ज्या राहिल्या त्याच अस्पृश्यवर्गांत मोडत आहेत.

याप्रमाणें अस्पृश्यवर्गाच्या उत्पत्तीसंबंधानें वर दिलेली नव्याजुन्यांची मतें प्रचलित आहेत. यांतलें कोणतें मत स्वीकारावें, हें ज्याचें त्यानें आपापल्या मनाशीं ठरवावें; कारण प्रत्येक मतामध्यें अस्पृश्यतेला बीजभूत असा कांहीं ग्राह्य भाग आढळतो व तो युक्तीला पटतो. अस्पृश्यवर्ग तर आज अस्तित्वांत आहेच आणि अस्पृश्यता ही शास्त्रतः व व्यवहारतः चालत आलेली आहे, एवढी गोष्ट खरी. ही नाहींशीं करणें, आहे तशी चालू ठेवणें, आणि हळूहळू कमी करीत जाणें हे तीन पक्ष या ठिकाणीं संभवतात. अस्पृश्यता सर्वस्वी नाहींशी करणें हें जितकें अशक्य आहे तितकेंच ती आहे तशीच सर्वस्वी कायम ठेवणें अशक्य आहे. यास्तव देशकालवर्तमान याचा विचार करतां अस्पृश्यता व्यवहारांत आणि सार्वजनिक सामुदायिक कार्यक्षेत्रामध्यें कमी करतां येणें कसें शक्य आहे, याचें विवेचन शास्त्राधारानें पुढील भागांत करूं.

# भाग तिसरा.

## अस्पृश्यता कमी करणारे शास्त्राधार.

मागील दोन भागांत अस्पृश्यवर्गाच्या उत्पत्तीबद्दलची मुख्य चार मतें सांगितलीं. आतां या भागांत फक्त जुन्या मतांचा विचार करून शास्त्र-शुद्ध अस्पृश्यता शास्त्राधारानेंच कमी करतां येणें शक्य, इष्ट, व धर्म्य आहे, कीं नाहीं हें पहावयाचें आहे.

श्वानसूकर योनींप्रमाणें चांडाल योनि ही स्वतंत्र असून ती जन्मसिद्ध आहे, ती पापपुण्यानुसार प्राप्त होत असते; हें मत बहुजनसमाज, पुराणमताभिमानी व धर्मनिष्ठ भाविक लोक यांमध्यें प्रचलित आहे. प्रतिलोम संकराचा कांहीं भाग म्हणजे अस्पृश्यवर्ग होय, असें जें दुसरें मत आहे तेंहि या मतांत अंत भूत होतें, म्हणून या दोनहि मतांचा एकत्र विचार केल्यास कांहीं हरकत नाहीं.

प्राचीन काळीं अनुलोम व प्रतिलोम विवाह होत असत. हीन वर्णाची स्त्री व उच्च वर्णाचा पुरुष यांच्या विवाहाला अनुलोम म्हणत व उच्च वर्णाची स्त्री व हीन वर्णांतील पुरुष यांच्या विवाहाला प्रतिलोम म्हणत. एकाकाळीं ह्या दोहोंच्या संबंधानें झालेली संतति पितृवर्णाची समजली जात असे. पुढें पुढें पितृसावर्ण्य नष्ट होऊन मातृसावर्ण्य उत्पन्न झालें. कारण असें असावें कीं, आर्यांना हें पितृसावर्ण्य चातुवर्ण्य शुद्धीला घातक वाटलें. याज्ञवल्क्यस्मृतीमध्यें शूद्रदारोपसेवनाचा निषेध याच दृष्टीनें केलेला आहे. अनुलोम व प्रतिलोम संबंधानें उत्पन्न झालेल्या संततीला पुढें पुढें म्हणजे बुद्धोत्तरकाळीं तुच्छ लेखण्यांत येऊं लागलें. बुद्ध संस्कृतीनें आर्यांची चातुर्वर्ण्य संस्था अगदीं खिळखिळी करून टाकली. त्या आपत्तींतून वर येण्याकरितां आर्यांना आपल्या चातुर्वर्ण्यामध्यें चालत असलेली ही गल्लत बंद करणें अवश्य वाटलें, म्हणून त्यांनीं मातृसावर्ण्याचा निर्बंध घातला. संकर जातींचें अस्तित्व या वेळीं चांगलें मान्य झालें होतें म्हणून त्यांना वृत्या वगैरे लावून दिल्या. पाणिनीकाली संकर जाति नसून फक्त चातुर्वर्ण्य होतें, असें

इतिहास संशोधक राजवाडे ह्मणतात. ऐतिहासिक चर्चेचें हें स्थळ नसल्या-मुळें पूर्वी एका काळीं प्रतिलोमसंतति धर्मशास्त्रमान्य होती, ती पुढें अमान्य होऊन तिजवर अधर्मसूचक संकराचा शिक्का बसला; एवढा सिद्धांत घेऊन पुढें चालणें भाग आहे.

ब्राह्मणीचे ठिकाणीं क्षत्रियापासून झालेला सूत, वैश्यपासून झालेला वैदेहक आणि शूद्रापासून झालेला चांडाळ हे सर्व व मागध, आयोगव वगैरे प्रतिलोमसंकर होत. याशिवाय पुक्कस, श्वपाक, धिग्वण, कर्मचांडाळ यांचाहि याच वर्गात समावेश होतो. चांडाळापासून निषादीच्या ठिकाणीं झालेला अंत्यावसायी म्हणजेच डोंब होय. या सर्व जातींना अस्पृश्य मानण्यांत येतें असें नाहीं. एवढें खरें कीं, या प्रतिलोमसंकराला धर्मशास्त्रविरुद्ध स्त्रीपुरुष-संबंधानें झालेली संतति—अर्थात् अधर्म संतति—असें समजण्यांत येऊं लागलें. त्यांच्यामध्यें हल्लीं आपसांत जो स्पर्शास्पर्श दिसतो त्याचें कारण स्मृतीमध्यें सांगितलेली उत्पत्ति हेंच असावें. ढोर महारांस शिवत नाहींत, महार मांगास शिवत नाहींत, व मांग डोंबास शिवत नाहींत! अशा या संकर जातीमध्यें जन्माला येणें पाप आहे असें वाटावें म्हणून या जातींना पापयोनि म्हटलें आहे. या संकराला दिलेलीं नांवें अनार्यांच्या नांवांवरून सुचलीं असावीं, असासुद्धां कांहींचा तर्क आहे. चांडाल हें नांव चंड या अनार्य जातीवरून सुचलेलें आहे. चातुर्वर्ण्यबाह्य प्रदेशामध्यें जे लोक होते त्यांच्याबद्दल तिर-स्कारसूचक अशीं नांवें दिलीं असण्याचा संभव आहे.

आतां या प्रतिलोमसंकराचा स्पर्शास्पर्शदोष कसा मानण्यांत येतो हें पाहूं. अंत्यावसायी म्हणजे अगदीं शेवटचा किंवा डोंब असा अर्थ कोणी करतात.

> चण्डालः श्वपचः क्षत्ता सूतो वैदेहकस्तथा ।
> मागधायोगवाश्चैव सर्वे अंत्यावसायिनः ॥

हा एक सुप्रसिद्ध श्लोक आहे. या श्लोकांत सर्व प्रतिलोमसंकरांची नांवें असून त्यांना अंत्यावसायी म्हटलें आहे. चंडालश्वपचांपेक्षां अंत्यावसायी हा निकृष्ट आहे, असें या श्लोकावरून दिसत नाहीं. चंडालश्वपचांना आपण वेड किंवा महार असें म्हणतों, परंतु हे दोघे एक नसून त्यांची उत्पत्ति

भिन्न भिन्न आहे. क्षत्ता हा शूद्रबीज व क्षत्रियक्षेत्र यापासून झालेला असून त्याचा धंदा बिळांतील प्राणी मारून खाण्याचा आहे. सूत हा क्षत्रियब्राह्मणीपासून होतो. त्याचा धंदा रथ हांकण्याचा आहे. वैदेहक हा वैश्यब्राह्मणीचा मुलगा. याचें काम अंत:पुराचें संगोपन करण्याचें असतें. मागध हा वैश्यक्षत्रियापासून उत्पन्न होतो व वाणिज्य धंदा करतो. आयोगव हा शूद्रवैश्याचा मुलगा असून तो पाथरवटाचें काम करितो. क्षत्ता म्हणजे वडार व आयोगव म्हणजे पाथरवट.यांचीं घरें गांवाबाहेर असतात. परंतु त्यांचा स्पर्शदोष चांडालश्वपचांप्रमाणें मानला जात नाहीं. पाथरवट हें स्वतःला वडारापेक्षां श्रेष्ठ समजतात. एवंच या सप्त अंत्यावसायांपैकीं फक्त दोघांचाच विटाळ हल्लीं मानण्यांत येतो.

अंत्य किंवा अंत्यज हा शब्द अस्पृश्य वर्गाचा वाचक आहे. हा शब्द जेथें जेथें आलेला आहे, त्यावरून कांहीं निष्पन्न होतें किंवा काय हें पाहूं.

मनु, याज्ञवल्क्य,पराशर वगैरे स्मृतींमध्यें अंत्य किंवा अंत्यज हा शब्द निरनिराळ्या प्रसंगीं आलेला आहे. गोविंदराज व मेधातिथि हे जे सुप्रसिद्ध टीकाकार त्यांनीं जो ठिकठिकाणीं अंत्य किंवा अंत्यज या शब्दाचा अर्थ केलेला आहे. त्यांमध्यें एकवाक्यता आढळत नाहीं. मनु. अ. २. श्लो. २३८ यांत अंत्य शब्दाचा अर्थ ‘ चंडाल ’; अध्याय ४-७९ अंत्य शब्दाचा अर्थ ‘ रजकादयः ’; अध्याय ८-२७९ अंत्यज शब्दाचा अर्थ ‘शूद्र’ असा केला आहे. कुल्लूक भट्टांनीं वरील दोघां टीकाकारांचीच ‘ री ’ ओढली आहे. नुसत्या मनुस्मृतीच्याच आधारानें विचार केला तर शूद्र, परीट, बुरुड व चण्डाल या सर्वांचा अंत्य किंवा अंत्यज वर्गामध्यें समावेश होतो. परंतु हल्लींच्या व्यवहारांत आपण उपरिनिर्दिष्ट सर्व अंत्यजांचा विटाळ न मानतां फक्त चाण्डाळांचा मात्र विटाळ मानतों. मनुस्मृतीमध्यें शूद्रापासून सर्वांना अंत्यज समजण्यांत आलेलें आहे. तर पुढील पुढील स्मृतींमध्यें फक्त सात प्रकारच्या लोकांना अंत्यज असें समजण्यांत आलेलें आहे.

रजकश्चर्मकारश्च नटोबुरुड एवं च ।

कैवर्तमेदभिल्लाश्च सप्तैते अंत्यजाः स्मृताः ॥ अत्रिसंहिता श्लोक १९९

— यमस्मृति श्लोक ३३

हा श्लोक या दोन स्मृतींखेरीज आणखीही पुष्कळ ठिकाणीं (मात्र अलीकडच्या ग्रंथांमध्यें) आलेला आहे. या सातांपैकीं चर्मकार-चांभार व मेद म्हणजे भंगी यांचाच विटाळ मानण्यांत येतो.

मेद ही जाति मध्यहिंदुस्थानामध्यें आहे. बुरुड, नट, कोळी, भिल्ल व पटीट यांना अंत्यजांमध्यें घातलें असून त्यांचा विटाळ हल्लीं मानण्यांत येत नाहीं. पूर्वीं कधीं काळीं या सर्वांचा विटाळ मानण्यांत येत असे.परंतु अलीकडे ही रूढि पडली असें सिद्ध होतें. सप्त अंत्यवसायांपैकीं चंडाल व श्वपच आणि सप्त अंत्यजांपैकीं चर्मकार व मेद यांचाच विटाळ हल्लीं मानण्यांत येतो. इतर म्हणजे चारच वर्ग अस्पृश्य आहेत. इतर जे दहा वर्ग आहेत त्यांचा विटाळ मानला जात नाहीं, हें एवढ्या विवेचनाचें सार आहे.

आतां चण्डाल, श्वपच, चर्मकार व मेद हे प्रतिलोम हीनसंकर असून त्यांचा जन्म पापयोनींत झाल्यामुळें ते अस्पृश्य आहेत हें शास्त्रतः प्राप्त झालें. परंतु दहा वर्गांची अस्पृश्यता जशी रूढीनें गेली तशीच यांचीही घालविली पाहिजे. ज्यांची अस्पृश्यता गेली त्यांच्या ठिकाणीं ती पुनश्च आणणें शक्य नाहीं. म्हणून त्यांच्यापैकीं जे चार राहिले त्यांना स्पृश्य कसें करावयाचें हाच काय तो सोडविण्याचा प्रश्न आहे. सुतक व अमेध्य पदार्थस्पर्श यांच्या दोषाप्रमाणें या अस्पृश्य वर्गांच्या स्पर्शदोषांमध्यें कांहीं तारतम्य, विवेक आणि व्यवहार दाखविला म्हणजे त्यांची अस्पृश्यता लवकर कमी होईल.

अस्पृश्यांच्या विटाळाप्रमाणें सुतक्याचा व अपवित्र पदार्थांचा विटाळ मानण्याची आपणांमध्यें चाल आहे. परंतु दोहोंचा विटाळ फार दक्षतेनें व व्यवहार सौकर्यानें मानण्यांत येतो. गाद्या, गिरद्या, मोठमोठीं उंचीं वस्त्रें यांना अमेध्य पदार्थांचा सुतक्यांचा किंवा अस्पृश्यांचा विटाळ झाला असतां त्यांना उन्हांत टाकून किंवा त्यांच्यावर जलप्रोक्षण करून तो विटाळ नाहींसा केला जातो.

तूलिकाचोपधनानि पुष्परक्तांबराणि च ।
शोषयित्वाऽर्कतापेन प्रोक्षणेन विशुध्यति ॥ अंगिरा १४२

असेंच एक वचन देवलस्मृतीमध्येंही आहे. मृताशौचाचा विटाळ आपण मानतो. धर्मशास्त्रकारांनीं व्यवहाराला अडथळा न येईल अशी दक्षता

या बाबतींतही ठेविली आहे. न राज्ञामघदोषोस्ति (म. अ. ५ श्लो. ३) महीपतीनां नाशौचं [ या. व. श्लो. २७ अ. ३. ] म्हणजे राजाला मृताशौचाचा विटाळ नाहीं. पेशव्यांनीं आपलीं सर्व सुतकें संभाळण्याकरितां एक खुंट नेमून त्यास नेमणूक दिल्याची आख्यायिका प्रसिद्धच आहे. विद्वान् ब्राह्मणाला सुतकाचा विटाळ नाहीं तसेंच शिल्पकार, वैद्य, राजे, स्वयंपाकी, न्हावी व मजूर यांना सुतकाचा विटाळ नाहीं हें पुढील वचनांवरून समजून येईल. —

एकाहाच्छुध्यते विप्रो योऽग्नि वेदसमन्वितः ॥ श्लो. ८३
त्र्यहात्केवल वेदस्तु निर्गुणो दशाभिर्दिनैः ॥ अत्रिसंहिता
कारवः शिल्पिनो वैद्या दासीदासास्तथवच ।
राजानो राजभृत्याश्च सद्यः शौचाः प्रकीर्तिताः ॥ प्रचेतसस्मृति

कारण या लोकांनीं जर दहा दहा दिवस सुतक धरलें तर व्यवहार अडून राहील.

सुतक व अमेध्य स्पर्शदोष यांमध्यें शास्त्रकारांनीं किती व्यवहारदक्षता ठेविली आहे हें समजलें; आतां फक्त अस्पृश्यांचा विचार राहिला.

समाजामध्यें अस्पृश्य वर्ग हा प्रतिलोमसंकर किंवा पापयोनि या कोणत्याही नांवानें असला तरी त्याचा इतरांशीं संबंध आल्यावांचून राहात नाहीं. पूर्वी चातुर्वर्णिकांना जेव्हां या लोकांत वागण्याचा प्रसंग येई तेव्हां ते वागत होते, हें पाहून त्याच धोरणानें आपण पुढें गेलें पाहिजे.

स्वराज्य असो वा परराज्य असो; यात्रा, जत्रा, बाजार, नाना, पाणवठे व तीर्थस्नानें हीं अशीं आहेत कीं, तेथें कोणालाहि मज्जाव करणें अशक्य आहे. सर्व जातींचे व पंथांचे लोक अशा ठिकाणीं येतात, त्या वेळीं कांहीं तरी शास्त्र काढल्याशिवाय गत्यंतर नसतें. मात्र हें शास्त्र हुडकून काढण्याचा उद्देश स्वतःचा पवित्रपणा राहिला पाहिजे, या मनःसमाधानार्थ असतो. दुसऱ्याच्या द्वेषाचा त्यांत मुळींच हेतु नसतो. आपत्कालचें शास्त्र पुढीलप्रमाणें आहे.—

दीर्घे काष्ठे शिलापृष्ठे नौकायामापणे तथा ।
देवागारे तथाऽट्टाले स्पर्शदोषो न विद्यते ॥ वृद्धवचन ॥

हा श्लोक पुष्कळ जुन्या शास्त्री मंडळींच्या तोंडून आम्हीं ऐकला आहे, परंतु हा श्लोक कोणत्याहि प्राचीन वा आर्वाचीन स्मृतींत आढळला नाहीं. या मुळें या श्लोकाला शास्त्रीय प्रामाण्य किती द्यावें हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. तथापि व्यवहार मात्र बरोबर असाच चालला आहे. अटाल किंवा अट्टाल असा शब्द महाभारतांत सभापर्व व शिशुपालवध या ठिकाणीं आलेला असून त्याचे अर्थ बाजार, मनोरा, मोठा वाडा असे दिलेले आहेत. या शब्दाचे अपभ्रष्ट रूप अड्डा हें जर मराठींत आलें असेल तर सर्व प्रकारचे लोक एकत्र जमण्याची जागा असा अर्थ घेऊन चालणें इष्ट आहे. या श्लोकाला स्मृतिप्रामाण्य नसलें तरी अशाच प्रकारचे चार दोन श्लोक स्मृतिग्रंथांत आढळतात.

देवयात्राविवाहेषु यज्ञप्रकरणेषु च ।
उत्सवेषु च सर्वेषु स्पृष्टास्पृष्टिर्न विद्यते ॥ अत्रिसंहिता श्लो. २५०

हा श्लोक फार महत्त्वाचा आहे व प्रमाणभूत आहे. यांतील प्रत्येक शब्द लक्षात ठेवण्यासारखा आहे. यात्रा, जत्रा, लग्नकार्यें, यज्ञकर्म आणि इतर प्रकारचे उत्सव अशा प्रसंगीं समाजांतील सर्व तऱ्हेचे लोक एकत्र होण्याचा संभव असतो आणि एकमेकाची एकमेकाला शिवाशिवही होत असते. अशा वेळीं या शिवाशिवीचा फारसा दोष शास्त्रांत मानला जात नाहीं. लग्नामध्यें देवकस्थापना झाल्यानंतर 'अस्पृश्यस्पर्शे दोषाभावमाह' असा उपक्रम करून पुरुषार्थ चिंतामणिकारानें बृहस्पतिस्मृतींतील म्हणून पुढील वचन उद्धृत केलें आहे—

तीर्थे विवाहे यात्रायां संग्रामे देशविप्लवे ।
नागरग्रामदाहे च स्पृष्टास्पृष्टिर्न विद्यते ॥

या श्लोकामध्यें सहा प्रसंगीं अस्पृश्यस्पर्श झाला असतां फारसा दोष नाहीं, असें म्हटलें आहे. सहा प्रसंगांपैकीं तीन महाप्रसंग व तीन आपत्प्रसंग

आहेत. तीर्थांचे पर्वकाळ, देवतांच्या मोठमोठया यात्रा आणि लग्नकार्य हे महाप्रसंग होत व समरांगण, राष्ट्रावरील आपत्ति आणि नगर किंवा ग्राम यांचा दहनकाल हे आपत्प्रसंग आहेत. या प्रसंगीं विटाळ मानून चालणार नाहीं. हें युक्तिसिद्ध आहे. अशाच तऱ्हेचें प्रसंगनिर्देशक आणखी एक वाक्य इतरत्र आढळतें.

प्राकाररोधे विषमप्रदेशे सेनानिवेशे भवनस्य दाहे ।
आरब्धयज्ञेषु महोत्सवेषु तथैव दोषा न विकल्पनीयाः॥ अत्रिसंहिता

या श्लोकामध्यें चार आपत्प्रसंग व दोन महाप्रसंग सांगितले आहेत. पापपुण्याची भावना व धर्माधर्माची कल्पना जोंपर्यंत जिवंत आहे तोंपर्यंत अस्पृश्यस्पर्शदोष राहणारच; किंबहुना तो राहणें इष्ट आहे. परंतु पापयोनींचा व पुण्य योनींचा कांहीं कांहीं ठिकाणीं संबंध येणें मात्र अपरिहार्य आहे. म्हणूनच शास्त्रकारांनीं आपत्प्रसंगीं झालेल्या अस्पृश्यस्पर्शाचा दोष फारच कमी केला आहे. हल्लीं आपल्या राष्ट्रावर मोठी आपत्ति आली आहे, हें कोणीहि सुज्ञ मनुष्य कबूल करील. मृताशौचाच्या विटाळाचा दोषहि आपत्कालीं कमी समजावा असें दक्षस्मृतिकार म्हणतात.

स्वस्थकाले तथा सर्वं सूतकं परिकीर्तितम् ।
आपद्गतस्य सर्वत्र सूतकेऽपि न सूतकम् ॥ दक्षस्मृति.

हें दक्षस्मृतींतील वाक्य फारच दक्षपणाचें आहे. वरील तीन शास्त्रवचनांवरून असें सिद्ध होतें कीं, शास्त्रकारांनीं महाप्रसंगीं आपत्प्रसंगीं अस्पृश्यस्पर्शाचा दोष फारच कमी मानला आहे, दोष अजिबात नाहीं असें म्हटलें नाहीं. या अल्प दोषाला अर्थात् तसेंच लहानसें प्रायश्चित्त पाहिजे; म्हणून शास्त्रकारांनीं तीहि व्यवस्था केली आहे. हल्लींच्या आपल्या जागृतीच्या कालामध्यें धार्मिक, राजकीय, सामाजिक आणि शिक्षणविषयक कार्यांचा विचार करण्याकरितां हिंदू समाज आणि हिंदी समाजही एकत्र जमत असतो व तो जमलाच पाहिजे. अशा वेळीं म्हणजे या महाप्रसंगीं सर्व प्रकारच्या लोकांचा संबंध येऊन अस्पृश्यस्पर्श झाल्यास व तो शास्त्रदृष्ट्या नुसता पाळावयाचा असल्यास आचमनाचें प्रायश्चित्त घेतलें म्हणजे झालें.

रजकं चर्मकारं च नटं धीवरमेव च।

बुरुडं च तथा स्पृष्ट्वा शुद्धेदाचमनाद्विजः॥ अंगिरसस्मृति श्लोक १७

हा श्लोक द्विजांना (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्यांना) उद्देशून सांगितला आहे. हें आचमनाचें प्रायश्चित्त घरीं आल्यानंतर घेण्यास कोणासहि अडचण पडणार नाहीं. कोणाला आचमनाचाहि बाऊ वाटेल; पण तेंहि वाटण्याचें कारण नाहीं. आचमन म्हणजे घरीं आल्यानंतर हातपाय धुणें, चूळ भरणें आणि डोळ्याला पाणी लावणें हें होय. एवढें केलें तरी धार्मिक भावना कायम ठेवून राष्ट्रिय भावनेचेंहि पोषण होईल. व्यवहार सोडावा लागणार नाहीं आणि धर्महि सोडावा लागणार नाहीं. तसा प्रसंग येऊं नये म्हणूनच ही शास्त्रकारांनीं व्यवस्था केलेली आहे.

निवं. २७.५.१९

# भाग चौथा.

## अस्पृश्यतानिवारण.

तिसऱ्या भागाच्या शेवटीं आंगिरस स्मृतींतील आधार देऊन आचमन प्रायश्चित्त घेतल्यानें म्हणजे घरीं येऊन हातपाय धुतल्यानें स्पर्शदोष नाहींसा होतो, असें प्रतिपादन केलें. तोच विचार आणखी बलवत्तर शास्त्रप्रमाणांनीं करून अस्पृश्यतानिवारण शक्य आहे हें या भागांत दाखवावयाचें आहे.

अंत्यज आणि सात अंत्यावसायी अशा चौदा अस्पृश्यांपैकीं हल्लीं व्यवहारांत चंडाल, श्वपच, चर्मकार व मेद(भंगी) या चौघांचाच विटाळ मानण्यांत येतो, हें पूर्वीं सांगितलें आहे. महार, मांग, चांभार, ढोर आणि भंगी यांचा स्पर्श झाला असता जर स्नान करावयास पाहिजे तर मुसलमान आणि खिश्चन यांचा स्पर्श झाला असतांहि स्नान केलें पाहिजे. कारण वेदव्यासस्मृतींत पुढील वचन आहे.

चर्मकारो भटो भिल्लो रजकः पुष्करो नटः ।
विराटो मेद चांडालो दाशः श्वपच कोलिकः ॥ १२ ॥
एतेंऽत्यजाः समाख्याता येचान्येच गवाशनाः।
एषां संभाषणात्स्नानं दर्शनादर्क वीक्षणम ॥ १३॥

वरील दोन श्लोकांनीं स्मृतिकारांनीं अंत्यजांचीं बरींच नांवें दिलीं आहेत. त्यांत गवाशनाः म्हणजे गाईखाणारे—गोमांस भक्षक-अर्थात् गाईला पूज्य न मानणारे जे लोक आहेत त्यांच्याशीं संभाषण केलें कीं स्नान करावें व त्यांना बघितलें कीं सूर्यदर्शनाचें प्रायश्चित्त घ्यावें, असें स्वच्छ म्हटलें आहे. गोमांस भक्षक मुसलमानापेक्षां गोरक्षक अर्थात् गाईला पूज्य मानणारा अस्पृश्य जवळचा नव्हे काय? अंत्यजांच्या स्पर्शाचा तरी विटाळ आहे पण मुसलमानाशीं लांबून भाषण केलें कीं, स्नान व त्याला पाहिलें कीं सूर्यदर्शन, यावरून मुसलमानांचा विटाळ पुष्कळ अधिक आहे यांत संशय नाहीं देवल स्मृतीमध्यें सभायां स्पर्शनं चैव म्लेंच्छेन सह संविशेत्। कुर्यात्स्नानं सचैलं तु दिनमेकमभोजनम् ॥ म्लेंच्छाचा सभेंत स्पर्श झाला म्हणजे सचैल स्नान करावें आणि एक

दिवस उपास करावा असें सांगितलें आहे. धर्मनिष्ठ सज्जनांना आम्हीं हात जोडून विनंति करतों कीं, आपणास हें शास्त्र मान्य आहे काय? असल्यास आपण त्याप्रमाणें आचरण करण्यास तयार आहां काय? मुसलमानाशीं भाषण, त्याचा स्पर्श आणि त्याला पहाणें यावांचून आपला एक तरी दिवस जातो काय? मुसलमानांनीं हजार वर्षें हिंदुस्थानामध्यें धिंगाणा घालून मुसलमान-शून्य असा हिंदुस्थानचा एकादा तरी भाग शिल्लक ठेविला आहे काय? मुसलमानासंबंधानें शास्त्रांत सांगितलेलें प्रायश्चित्त जर अमलांत आणावयाचें असेल तर दररोज उपास, नेहमी स्नान आणि नेहमीं सूर्यदर्शन करीत आयुष्य घालविलें पाहिजे म्हणजे मेलें पाहिजे. महारमांगाच्या स्पर्शाला नुसतें स्नानच सांगितलें आहे, परंतु मुसलमानस्पर्शाला स्नान व एक दिवस उपास सांगितला आहे. अस्पृश्यस्पर्शाला उपासाचें प्रायश्चित्त कोणत्याही स्मृतींत सांगितलें नाहीं, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. मुसलमानाबद्दल इतकें कडक प्रायश्चित्त असतां आज आपला व्यवहार कसा चालला आहे हे विचारपूर्वक पहावें. परधर्मीयांपेक्षां केव्हांही स्वधर्मीय श्रेष्ठ अर्थात् मुसलमान व ख्रिश्चन यांच्यापेक्षां अस्पृश्य हा श्रेष्ठ आणि जवळचा हें देवलस्मृतिकारांचें म्हणणें प्रत्येक हिंदूनें आपल्या हृदयांत कोरून ठेवावें.

मुसलमान व ख्रिश्चन हे परधर्मीय असून ते जर संव्यवहार्य आहेत, तर अस्पृश्य हे असंव्यवहार्य काय म्हणून? मुसलमान व ख्रिश्चन यांचीं पोरें शाळांतून चालतात, नळावर, हौदावर मुसलमान व ख्रिश्चन यांच्याशीं स्पृश्य हिंदूंची धिंगामस्ती झालेली चालते आणि विटाळहि चालतो तर मग बिचाऱ्या अस्पृश्यांनीं त्याच नळावर, हौदावर आणि सार्वजनिक पाणवठयावर पाणी भरण्यास कां येऊं नये? त्यांनीं काय घोडें मारलें आहे कीं ज्यामुळें त्यांना पाणीही मिळूं नये.हा उघड उघड शास्त्रविरुद्ध धादांत अन्याय नव्हे काय? हा दिवसाढवळ्या होणारा अन्याय दूर करावयाचा असल्यास हिंदूंनीं अस्पृश्यांना जवळ करावयास नको काय?

कोणी असें म्हणतील कीं, मुसलमान व ख्रिश्चन यांना शिवावें असें कोण म्हणतो? त्यांचासुद्धां विटाळ मानून स्नान करावें आणि लोकांना मुसलमान, ख्रिश्चन व अस्पृश्य यांच्या स्पर्शानें दोष उत्पन्न होतो म्हणून स्नान करा असें सांगत सुटावें. परंतु हें म्हणणें ओठाच्याबाहेरसुद्धां येणें कठीण

आहे. घराच्या बाहेर मुसलमान व ख्रिश्चन दिसला कीं, त्याला लांबून जा, शिवूं नको, असें म्हणणें हें कायद्याविरुद्ध आहे. सार्वजनिक रस्त्यावर सर्वांना सारखाच हक्क आहे, असें असतांना 'तूं लांबून जा व शिवूं नको' असें म्हटल्यास खटलाच होईल. श्री क्षेत्र वांई या ठिकाणीं अशा तऱ्हेचा एक खटला पूर्वीं झाला आहे. तेथें गंगापुरींत माटेशास्त्री या नांवाचे एक आचार संपन्न शास्त्री होते. ते मंडईमध्यें भाजी आणण्यास गेले असतां तेथें एक ख्रिश्चन त्यांच्या जवळून गेला व त्यांना विटाळ झाला. त्यासरशीं त्या धर्मनिष्ठ ब्राह्मणानें तूं म्लेंच्छ आहेस आम्हां ब्राह्मणाजवळून जाऊं नये, तुला आम्ही शिवून घेणार नाहीं, अशा अर्थाचे अपमानाचे उद्गार काढिले. त्या ख्रिश्चनानें याबद्दल माटे शास्त्र्यांवर फिर्याद केली. 'वाई वाईट आहे' असें नित्य म्हणणाऱ्या कोकणस्थद्वेष्ट्या ली वॉर्नर साहेबापुढें हा खटला चालला. साहेबानीं माटे शास्त्र्यांना "मी खोटें बोलणार नाहीं असें म्हण. मी शिवून घेणार नाहीं असें म्हणूं नकोस" असा औपरोधिक उपदेश केला व एक दिवसाची साध्या कैदेची शिक्षा दिली. या गोष्टीवरून पुराणमताभिमान्यांनीं कोणता बोध घेतला पाहिजे, हें ठरवावें.

वाईतील वरील गोष्ट बऱ्याच दिवसांपूर्वींची आहे. हल्लीं तर सर्वत्र परिस्थिति फारच पालटली आहे. म्हणून ख्रिश्चन, मुसलमान तर राहोतच पण अस्पृश्यांनाहि 'तूं लांबून जा' असें म्हणण्याचे दिवस गेले. कांहीं कांहीं श्रद्धाळु व भाविक लोक असें म्हणतात कीं, अहो, सत्तेमुळें मुसलमानांच्या स्पर्शाचा जुलूम आम्ही सहन केला. सत्तेमुळेंच ख्रिश्चनांच्या स्पर्शाचा जुलूम आम्ही सहन करीत आहोंत. म्हणून अस्पृश्यस्पर्शाचा जुलुम तुम्ही आमच्यावर करणार काय ? सत्तेपुढें शहाणपण नाहीं म्हणून आम्ही दोन वाईट गोष्टी पत्करिल्या. त्यावरून तिसरी गोष्ट पतकरिली पाहिजे असें सिद्ध होत नाहीं. या आक्षेपाचें सरळ उत्तर हेंच कीं अस्पृश्यांनींही सत्यशोधकाप्रमाणें बंडखोरी केली म्हणजे त्यांची अस्पृश्यता नाहींशीं होणार ! हा दिवस येऊं नये आणि हिंदू समाजाची घडी विस्काळित होऊं नये, असें जर वाटत असेल तर पुढें जुलमानें ज्या गोष्टीचा स्वीकार करणार तिचाच आतां स्वखुषीनें स्वीकार करण्यांत शहाणपण व सौख्य नाहीं काय ? पुष्कळ दिवस

वास्तव्य करून राहिलेले विषय आपणाला सोडून जाऊं लागले म्हणजे दुःख होतें. परंतु आपण होऊनच त्यांचा त्याग केला म्हणजे सुख होतें. ' स्वयं त्यक्त्वा ह्येते शमसुखमनंतं विदधति । हा भर्तृहरीनें वैराग्य शतकांत सांगितलेला न्याय अस्पृश्यांच्या बाबतींत लागूं पडतो.

केवळ सत्तेमुळें मुसलमान व ख्रिश्चन यांचा विटाळ गेला हें एकांतिक म्हणणें सिद्ध होणार नाहीं. विटाळ जाण्याला सत्ता व राहाणी थोडी-बहुत कारणीभूत आहे यांत शंका नाहीं. परंतु जेथें सत्ता नाहीं राज्य नाहीं अशा पशूंचा,पक्ष्यांचा,माणसांचा आणि स्थानांचा विटाळ कोणत्या कारणांनीं गेला हें जुन्या विचारांचे लोक सिद्ध करून देतील काय? अपरार्क, स्मृतिचंद्रिका, वीरमित्रोदय, प्रायश्चित्तमयूख इत्यादि धर्मनिबंधामध्यें निरनिराळ्या स्मृतींत सांगितलेलीं कितीतरी स्नाननिमित्तें दिलेलीं आहेत, तीं हल्लीं कोणी तरी पाळतो आहे काय?

## स्नान निमित्तानि

संवर्तः—श्ववराहखरानुष्ट्रान्वृकगोमायुवानरान् ।
काककुक्कुटगृध्रांश्च स्पृष्ट्वा स्नानं समाचरेत् ॥ १८ ॥
काकोलूकस्पर्शने सचैलस्नानं महा व्याहृति होमश्च ॥ १९ ॥

व्यासः—भासवानरमार्जाररखरोष्ट्राणां शुनां तथा ।
सूकराणाममेध्यं वै स्पृष्ट्वा स्नायात्सचैलकम् ॥ २१ ॥

हारितः—एडकं कुक्कुटं काकं श्व शृगाल शिवा वृकान् ।
चिति-यूप-स्मशानानि-विड्-वराह-खरा-शुचीन् ॥ २२ ॥
अवकीर्णिनमन्यं च स्पृष्ट्वा स्नानं समाचरेत् ॥

ब्रह्मांड पुराणे—शैवान्पाशुपतान्स्पृष्ट्वा लोकायतिक नास्तिकान् ॥
विकर्मस्थान् द्विजान् शूद्रान्सवासा जलमाविशेत् ॥ २७ ॥

स्मृत्यंतरेः—स्पृष्ट्वा देवलकं चैव सवासा जलमाविशेत् ॥ २८ ॥

शंखः—रथ्या—कर्दम—तोयेन ष्ठीवनाद्येन वा तथा ।
नाभेरूर्ध्वं नरः स्पृष्टः सद्यः स्नानेन शुध्यति ॥ ३६ ॥

जातुकर्णः—श्वकुक्कुट वराहांश्च ग्राम्यान्संस्पृश्य मानवः

सचैलः सशिराः स्नात्वा तदानीमेव शुध्यति ॥ ३८ ॥

यमः—अजीर्णेऽभ्युदिते वाते श्मश्रु कर्मणि मैथुने ।

दुःस्वप्ने दुर्जनस्पर्शे स्नानमात्रं विधीयते ॥ ४३ ॥

शातातपः—वांतो विरक्तः स्नात्वातु घृतप्राशनमाचरेत् ।

आचामेदेवभुक्त्वान्नं स्नानं मैथुनिनः स्मृतम् ॥ ४६ ॥

आम्ही मीत मीत हे दहा श्लोक दिलेले आहेत. आणखी किती तरी देतां येतील. या श्लोकांवरून कुत्रा, डुक्कर, गाढव, उंट, गवा, वानर, कावळा, कोंबडा, गिधाड, घुबड, भास, मांजर, एडका, कोल्हा, अवकीर्णी म्हणजे वीर्यस्खलन झालेला ब्रह्मचारी, बौद्ध, पाशुपत, जैन, शास्त्रविहित धंदे सोडून भलते धंदे करणारे ब्राह्मण,क्षत्रिय,वैश्य, आणि शूद्र इतक्यांचा विटाळ मानावा आणि स्नान करावें असें सिद्ध होतें. तसेंच दुःस्वप्न, दुर्जनस्पर्श अजीर्ण, हजामत आणि स्त्रीसंभोग यानंतर स्नान करावें असेंही सांगितलें आहे. हें शास्त्र बरोबर पाळणारे धर्मप्रदीप, धर्ममार्तंड, सबंध हिंदुस्थानांत किती सांपडतील? वरील श्लोकांत सांगितलेले पशु, पक्षी आणि माणसें यांचे विटाळ मानले पाहिजेत असें जर हल्लीं कोणी सांगूं लागला तर त्याला वेड्याच्या इस्पितळांत पाठविलें पाहिजे असेंच लोक म्हणतील. वरील श्लोकांत सांगितलेल्या पशुपक्ष्यांची व माणसांची अस्पृश्यता कोणत्या राज्यानें घालविली? कां जुलमानें घालविली? जुलूम,सत्ता व राज्य यांचा कांहीं संबंध नसतां यांचे दोष नाहींतसे झाले; हें उघडउघड दिसत आहे याचें कारण देशकाल व परिस्थिति हेंच होय. निरनिराळ्या स्मृतींत सांगितलेलीं प्रायश्चित्तें त्या त्या काळीं योग्य होतीं. शुचिर्भूतपणा व पावित्र्य या दृष्टीनें सांगितलेल्या गोष्टी त्या काळीं शक्य होत्या व योग्यही होत्या. आतां तो काल गेला, ते दिवस गेले म्हणून पूर्वींची प्रायश्चित्तेंही त्या कालाबरोबरच ठेविलीं पाहिजेत. पूर्वींचा जुना मोठा आजोबाचा आंगरखा दहा वर्षांच्या बटु नातवानें जर आंगांत घातला तर तें जसें अयोग्य होतें,तसेंच प्रायश्चित्त-धर्माचेंही होतें. जुना आंगरखा संग्राह्य वस्तु म्हणून एका बाजूसच ठेवण्यांत नातवाचें शहाणपण आहे व त्यांतच त्या पदार्थाची पूज्यता आहे.

कोणत्याही धर्मकार्याच्या प्रारंभीं 'देशकालौ संकीर्त्य' असें म्हणण्यांत येतें. देशकाल म्हणजेच परिस्थिति. देश व काल यांचा विचार न करतां कोणाला कांहींही सांगतां येणार नाहीं व कांहीं तरी सांगितलें तर त्यांचा उपयोग होणार नाहीं. सुप्रसिद्ध तत्त्ववेत्ता ॲरिस्टॉटल यानें आपल्या नीतिशास्त्र नामक ग्रंथांत विशिष्ट राजकीय परिस्थिति असेल तरच ही नीतितत्त्वें अमलांत येतील असें म्हटलें आहे. सारांश देशकाल विसरून आपले ऋषी वागले नाहींत म्हणून आपणही देशकाल लक्षांत घेऊनच चाललें पाहिजे.

हिंदूधर्मावर व समाजावर हल्लीं आलेली आपत्ति ही प्राणांत पर्यवसायी आपत्ति आहे. ती बुद्धिगम्य आणि तर्कगम्य आहे म्हणून या परिस्थितींत जगावयाचें कसें हा मुख्य प्रश्न आहे. धार्मिक व सामाजिक कारणांनीं होणाऱ्या उलाढाली हल्लीं थांबल्या असून अर्थमूलक सर्व उलाढाली हल्लीं होत आहेत. पूर्वींचे दिवस गेले. सुबत्ता गेली. समृद्धि गेली अन्न गेलें. कल्पना गेल्या. पूर्वींची डोंगरांची उंची व नद्यांच्या पात्रांची खोली कमी झाली. इतकेंच नसून हल्लींच्या हवेंतील परमाणूही पूर्वींचे राहिले नाहींत. पेट्रोल आणि कोळसा यांच्या धुरानें वातावरण हल्लीं बदललें; यांत शंका नाहीं. पूर्वींचें शरीरस्वास्थ्य गेलें, शरीरबल गेलें, पोषाख गेला. ग्रंथ गेले. अध्ययनपद्धति गेली, अन्नांतही बदल झाला. कपडे, पेहेराव, आचारविचार या सर्वांमध्यें बदल झाल्यामुळें पूर्वींचा हिंदु समाज राहिला नसून तो नव्य स्वरूपांत आला आहे. बाप धर्मनिष्ठ वैदिक असला व मोठा आचारसंपन्न असला तरी मुलगा इंग्रजी शाळेंत जातो, तेथें महारांच्या मुलांना शिवतो तसाच घरीं येतो व जेवतो. मुलाला घराबाहेर घालविण्याची बापाची छाती नसते. मुलीही शाळेस जाऊं लागल्या, लग्नें लवकर न होऊं लागल्यामुळें मोठ्या होऊं लागल्या म्हणून विटाळ चोरूं लागल्या तरी घरच्या मंडळींना कांहीं करतां येत नाहीं; अशी स्थिती झालेली आहे. हा विचार करून अस्पृश्यता घरामध्यें जेवढी पाळावयाची असेल तेवढी खुशाल पाळावी. घरामध्यें व्यक्तीनें स्वतःपुरते पाहिजे तितकें धर्मनिष्ठ राहावें. शास्त्रपरंपरा व परिस्थिति लक्षांत घेऊन मुसलमान व खिश्चन यांची जशी अस्पृश्यता गेली तशीच अस्पृश्यांची अस्पृश्यता घालविली पाहिजे त्यावांचून तरणोपाय नाहीं. हिंदु-

स्थानांत शेंकडा ८० माणसें जुन्या आचाराच्या मनःप्रवृत्तीचीं आहेत-म्हणून त्यांनीं जुन्या शास्त्रांत सांगितलेलें आचमनप्रायाश्चित बाहेरून घरांत येतांच घ्यावें. आचमन म्हणजे बाहेरून घरीं आल्यावर हातपाय धुणें हे पूर्वी सांगितलेंच आहे. जुन्या लोकांच्या खात्रीकरितां आचमनाचा प्रबळ शास्त्रार्थ येथें उदाहृत करतो.

१ २ ३ ४
शातातपः—रजकश्चर्मकृच्चैव व्याधतालोपजीविनौ ।
५ ६ ७ ८
निर्णेजकः सौनिकश्च नटः शैलूषकस्तथा ॥ ३३ ॥
९ १० ११
मुखेभग स्तथाश्वाच वनिता सर्ववर्णगा ।
१२ १३ १४ १५
चक्री ध्वजी वज्रघाती ग्राम्यकुक्कुटसूकरैः ॥ ३४ ॥
एतै यदंगं स्पृष्टं स्याच्छिरोवर्जं द्विजातिषु ।
तोयेन क्षालनं कृत्वा आचांतःप्रयतोमतः ॥ ३५ ॥

१ रंगारी २ चांभार ३ पारधी ४ ताडीविक्या ५ परीट ६ कसाई ७ बहुरूपी ८ नाटक्या ९ शाक्त ( ? ) १० कुत्रा ११ वेश्या १२ कुंभार किंवा तेली १३ कलाल १४ ( ? ) १५ कोंबडा १६ डुक्कर असे या शद्बांचे अर्थ आहेत.

वरील अवतरण स्मृतिचंद्रिकेंतील आहे. वीरमित्रोदय ग्रंथामध्यें तालोपजीवी या ऐवजीं जालोपजीवी असा पाठ आहे.त्याचा अर्थ फांसेपारधी. वज्रघातीच्या ऐवजीं वध्यघाती असा पाठ आहे,त्याचा अर्थ मांग असा होतो. प्रायाश्चित्तमयूखामध्यें शौनिकच्या ऐवजीं शौचिक असा पाठ आहे.त्याचा अर्थ भंगी असा आहे बाळंभट्टी व अपरार्क यामध्यें स्मृतिचंद्रिकेचाच पाठ घेतलेला आहे. पण वीरमित्रोदय ग्रंथाच्या प्रायाश्चित्तविवेकामध्यें सौचिक व टक असे पाठ आहेत. सौचिक म्हणजे सूच्याजीवी अर्थात शिंपी व टक म्हणजे धूर्त. वर सांगितलेले सोळा आणि भिन्न भिन्न पाठभेदानें येणारे १७ फांसेपारधी १८ मांग १९ भंगी २० शिंपी व २१ धूर्त इतक्यांचा स्पर्श झाला असतां आचमन करावें असें या शातातप वचनावरून सिद्ध होतें. सर्व महा-

निबंधकारांनीं वरील अवतरण आचमन प्रकरणांतच घेतलें आहे. तिसऱ्या श्लोकांतच "यदंगं स्पृष्टं, आणि तोयेन क्षालनं कृत्वा, आचांतः" हीं पदें अगदीं सुस्पष्ट आहेत. ज्या धर्मनिष्ठ भाविकांना अस्पृश्यता घरांत पाळावयाची असेल त्यांनीं बाहेरून आल्यावर वरील एकवीसांपैकीं सगळ्यांचा किंवा अनेकांचा स्पर्श झाला आहे, असें समजून खुशाल हातपाय धुवून घरीं यावें. असें केल्यानें त्यांची धर्मभावना कायम राहून समाजकार्य व राष्ट्रकार्य याचा विघात होणार नाहीं. घरामध्यें स्पर्शास्पर्श विचार पाळावयाचा असल्यास तो पाळल्यासारखें होईल व घराबाहेर अस्पृश्यतानिवारण केल्याचें श्रेय मिळेल असा दुहजवी फायद्याचा हा वरील मार्ग आहे.

गुदस्त सालीं सोनगीर येथें काशीस्थ पंडितप्रवरांपुढें आम्ही हाच पूर्वपक्ष मांडला होता. त्यांचा आग्रह स्नान व आचमन यांचा समुच्चय करण्याचा होता तर आमचा आग्रह स्नान व आचमन यांच्या विकल्पाचा होता. अस्पृश्यतेचा उत्सर्ग आहे, पण त्या उत्सर्गाला आपत्प्रसंग व महाप्रसंग हे अपवाद आहेत. अपवाद हे केव्हांही उत्सर्गाचें महत्त्व कमी करतात. शास्त्रीय परिभाषेंत बोलावयाचें असल्यास अपवाद हा उत्सर्गाचा बाध करतो असें म्हटलें पाहिजे. दीर्घकाष्ठ, शिलापृष्ठ, नौका, बाजार, अड्डा हे जर उत्सर्गाचे अपवाद आहेत तर त्याच अपवादक स्थळांची यादी हल्लीं वाढविली म्हणजे झालें. शाळा, सभा, कचेऱ्या, आगगाड्या, देवालयें, कीर्तनपुराणप्रसंग, पानवठे, इत्यादि आणखी अपवाद स्थळें पूर्वीच्या यादींत समाविष्ट करण्यास धर्मशास्त्रदृष्ट्या कांहीं हरकत आहे, असें आम्हांस वाटत नाहीं. सत्यं ब्रूयात् हा उत्सर्ग. पंचानृतान्याहुरपातकानि हा अपवाद. याचा अर्थ पांचच स्थळें असा नसून विशिष्ट आपत्प्रसंगीं खोटें बोलावें असाच समजला पाहिजे. वरील वाक्याचें पर्यवसान संख्येवर नसून प्रसंगावर आहे. कदाचित् निर्दिष्ट केलेल्या पांच स्थळाबाहेर एकादा अनिर्दिष्ट प्रसंग येईल. त्यावेळीं कोणत्या धोरणानें वागावें हें समजण्याकरितां वरील श्लोकप्रवृत्ति आहे. अस्पृश्यांच्या प्रश्नांचा विचार करतांना शास्त्रकारांचें धोरण काय आहे, त्यांच्या वचनाचा हेतू काय आहे हें पाहिलें पाहिजे. शास्त्रकारांचें धोरण व हेतू लक्षांत घेऊन त्यांच्याच पावलांर पाऊल टाकीत अस्पृश्यता निवारण केली पाहिजे. आजच्या परिस्थितीप्रमाणें समाजांतील एकोन एक घटकांचे जेवढे

म्हणून सामुदायिक व सार्वजनिक प्रसंग आहेत तेथील अस्पृश्यता अजिबात घालविण्यांत शास्त्रकारांच्या हेतूविरुद्ध आपण वागतों असें म्हणण्याचें कारण नाहीं. शास्त्रवचनांतील अर्थवाद बाजूला ठेवून हेतू लक्षांत घेऊन जर आपण वागलों तर अनेक अडचणींच्या प्रसंगांतून हिंदूसमाजाचा बचाव होईल इतकेंच नव्हे तर त्याचें उज्वल स्वरूपही जगापुढें येईल.

---

# भाग पांचवा.

## नवीन मतांचा परामर्श.

तिसऱ्या व चौथ्या भागांत बहुजनसमाज, धर्मनिष्ठ भाविक लोक व पुराणमताभिमानी जीं शास्त्रवचनें प्रमाण मानतात त्यांचा विचार करून अस्पृश्यता शास्त्राधारें कमी व नाहींशी करणें कसें शक्य आहे हें दाखविलें; ( म्हणजे प्रतिलोमसंकर हा अस्पृश्यवर्ग आणि श्वसूकरयोनीप्रमाणें चांडालयोनी स्वतंत्र आहे या मतांचा विचार झाला. ) आतां अनार्यसमूह किंवा चातुर्वर्ण्यभ्रष्ट पंचमहापातकी म्हणजे अस्पृश्यवर्ग होय; अशीं जीं नवीनांचीं म्हणून दोन मतें आहेत, त्यांचा विचार करूं.

अस्पृश्यवर्ग म्हणजे ' अनार्यसमूह ' होय असें जे म्हणतात त्याला कोणताहि जुना आधार उपलब्ध होत नाहीं. जुन्या ग्रंथांतील अनार्यांचें-चांडालांचें वर्णन काढून पाहिलें व त्यांची हल्लींच्या अस्पृश्यांशीं तुलना केली तर बहुतेक निराशा होते. रामायणामध्यें एका ठिकाणीं चाण्डालाचें वर्णन, पुढीलप्रमाणें आहे.

> अथ रात्र्यां व्यतीतायां तस्यां राजा बभूव ह।
> चाण्डालदर्शनो राम सद्य एव दुराकृतिः ॥
> नीलपीतांबरधरो रक्ताम्बरकृतोत्तरः ।
> संरब्धताम्रघोराक्षः करालो हरिपिङ्गलः ।
> ऋक्षचर्मनिवासी च लोहाभरणभूषितः ॥

हें वर्णन प्राचीनकाळच्या अनार्यांचें ( राक्षसांचें ) आहे. याबद्दल शंका नाहीं.भारतामध्येंही ठिकठिकाणीं व्याधभिल्लांची अशींच वर्णनें आलेलीं आहेत. परंतु वरील वर्णनांतील विशेषणें हल्लीं एकाहि अस्पृश्यास लागू पडत नाहींत.हें वर्णन फार तर हल्लींच्या भिल्लांना वनचरांना क्वचित् क्वचित् लागू पडेल; परंतु त्याचा विचार पुढें कर्तव्य असल्यामुळें हल्लींच्या अस्पृश्यांना ते लागू होत नाहीं, एवढेंच येथें सांगावयाचें आहे.

'शीर्षमापन' या नांवाचें एक नवीन शास्त्र हल्लीं उपलब्ध झालें आहे. त्या शास्त्राच्या आधारानें अस्पृश्य लोकांच्या चेहऱ्याचें ( नाकतोंड, हनुवटी,गाल,यांचें ) मोजमाप घेतल्यास ते अनार्य आहेत, असें म्हणतां यावयाचें नाहीं. कारण आर्यांच्याप्रमाणें यांच्या सर्व अवयवांची परिणत स्थिति दिसते. अस्पृश्यवर्गांपैकीं ढोर व चांभार यांना अनार्य म्हणणें हें या शास्त्राच्या आधारानें शुद्ध वेडेपणाचें होणार आहे. सोलापुरास कमावलेल्या कातड्यांच्या पेट्या, ट्रंका वगैरे करणाऱ्या ढोरांकडे पाहिलें आणि हे ढोर आहेत, असें जर पूर्वज्ञान नसलें तर कोणीहि मनुष्य फसल्याशिवाय राहावयाचा नाहीं. त्यांच्या दुकानांतील स्वच्छता, त्यांचा गौरवर्ण, त्यांचे घारे डोळे हीं पाहिलीं म्हणजे हे आर्यांच्या उच्च वर्णीयासारखे भासतात. ढोर लोक हे महारांचा विटाळ मानतात व कारण सांगतांना "आमचें तोंड बाटलेलें नसून फक्त हात बाटलेले आहेत" असें म्हणतात. ढोरामध्यें महाराप्रमाणें मांसाहार नाहीं. सोलापूरच्या ढोरांप्रमाणें बेळगांवच्या रजपूत ढोरांची चमत्कारिक गोष्ट आहे. बेळगांव हें कर्नाटकांतील प्रमुख स्थान असून तेथें हिंदी भाषेचा गंधही नसतां या रजपूतढोरांची मातृभाषा हिंदी आहे. हा विशेष लक्षांत ठेवण्याजोगा आहे.बेळगावामध्यें दुसरे लिंगाईत ढोर आहेत.त्यांची मातृभाषा कानडी आहे. हे रजपूत ढोर व्यवहारापुरती कानडी बोलतात.
उदेपुरच्या राजधानीचा नायनाट झाल्यानंतर हें रजपूत देशोधडीस लागले व पोट भरण्याकरितां हा धंदा करूं लागले अशी ते माहिती सांगतात. या माहितींत बरेंच तथ्य असावे, असें दिसतें.

ढोराप्रमाणें ठिकठिकाणचा चांभारवर्ग पाहिला तर त्यांतहि गौरवर्ण, नीटसपणा, देखणेपणा हे गुण आढळतात. अशा लोकांना अनार्य म्हणणें बरेंच साहसाचें होईल.

वर भिल्ल व वनचर यांचा उल्लेख आलेला आहे. हे लोक सात पुडयाच्या डोंगरांत व श्रीशैल्यमल्लिकार्जुनाच्या पर्वतावर आम्ही स्वतः पाहिले आहेत. यांच्या अंगावर लोखंडाचे अवजड दागिने आणि चित्रविचित्र तांबडीं वस्त्रें आढळतात. यांच्या ठिकाणीं अद्याप वन्यपणा कायम असून पारधीवर निर्वाह करण्याची चाल आहे. यांना अनार्य म्हणून मानण्यास कांहीं हरकत नाहीं; परंतु चमत्कार असा आहे कीं, या अनार्यांचा आम्ही बिलकुल विटाळ मानीत नाहीं. खानदेशांतील लोक भिल्लांचा विटाळ मानीत नाहींत, पण महारचांभारांचा मानतात. हा भिल्ल महार चांभारांना शिवून आला तरी खपतो. मल्लिकार्जुनाच्या पर्वतावर सर्व यात्रेकरू या प्रामाणिक भिल्लवनचरांच्या डोक्यावर आपलें सामान देतात. सोंवळे व भाजलेले पदार्थसुद्धां त्यांनीं वाहून नेलेले चालतात, असा प्रत्यक्ष व्यवहार आणि रूढि आहे. तात्पर्य अस्पृश्यांना अनार्य असें म्हणण्यास कांहींच आधार नाहीं. उलट खऱ्या अनार्यांना अस्पृश्य मानण्याचा प्रघात नाहीं. अशी दोहोंकडून अडचण आहे. एकंदरींत या मतांत कांहीं तथ्यांश नाहीं असें म्हणण्याची पाळी येते.

सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक वि. का. राजवाडे यांच्या मतें महाराष्ट्रांतील अस्पृश्यवर्ग अनार्य ठरत नाहीं, त्यांनीं आपलें हें मत (रा. मा.वि. चं.) या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत प्रकट केलें आहे. तें विचारार्ह आहे म्हणून येथें थोडक्यांत देतों.

" महाराष्ट्राचें पूर्वींचें नांव दंडकारण्य किंवा दक्षिणापथ होतें. रामायणकालीं या अरण्यांत वन्य आयुधजीवी संघाच्या तुरळक तुरळक टोळ्या होत्या. त्यांना निषाद, पारशव, उग्र व करण असें म्हणत. पाणिनीच्या पूर्वी आर्यांच्या वसाहती दक्षिणारण्यामध्यें नव्हत्या; त्या पाणिनीनंतर शकपूर्व ६०० च्या सुमारास झाल्या असाव्या. नर्मदेच्या उत्तरेकडील मगध देशस्थ-महाराष्ट्रिक, कुरु पांचालिक, राष्ट्रिक,उत्तर कुरु व उत्तर प्रदेशांतील वैराष्ट्रिक व ढुंढारदेशीय परमार असे सूर्य, सोम व अग्निवंशी आर्य यांनीं हल्लीं जेवढा मराठी बोली बोलणारा प्रदेश आहे तेवढा व्यापिला. या आर्यांना महाराष्ट्रामध्यें येण्यास राजकर्तृक जुलूम, जैनबुद्धादि पाखांड व व्रात्यशूद्रादि हीं कारणें उत्पन्न झालीं. पुढें नर्मदोत्तर देशांतील आर्यांचीं इकडे साम्राज्यें स्थापन झाल्यानंतर भोज, पैतिनक, सतियपुत, केरळपुत, पांड्य व चोल हे आर्य

लोक आले व त्यांनींहि कन्याकुमारीपर्यंत वसाहती केल्या. जनमेजयानें नागांचा नायनाट करण्याकरितां जेव्हां सर्पसत्र आरंभिलें तेव्हां नागलोकहि महाराष्ट्रामध्यें वसाहत करण्यास आले. या नागांमध्यें ब्राह्मण, क्षत्रिय, शूद्र, अतिशूद्र व अनिरवसितशूद्र असे भेद होते. एवंच अखिल महाराष्ट्रामध्यें जी लोकसंख्या आहे ती वर सांगितलेल्या निरनिराळ्या आर्यांची संतति आहे. यातच प्रतिलोमसंकर व वन्य अनार्य यांचा समावेश झालेला आहे. महारमांग वगैरे अस्पृश्य जाति आर्यांच्या चिरसहवासानें रंगानें सांवळ्या, चेहऱ्यानें नीटस, दिनचर्येनें स्नानशील व संस्कृतीनें शुद्ध बनल्या आहेत, म्हणून त्यांच्या ठिकाणीं फारसें अनार्यत्व शिल्लक राहिलेलें नाहीं. भिल्ल, कातकरी लोकांत मात्र अनार्यत्व राहिलें आहे." या इतिहास संशोधकांच्या मतें अनार्यत्व क्वचित् क्वचित् भिल्ल, कातकरी वगैरे लोकांच्या ठिकाणीं अवशिष्ट आहे, असें दिसतें. या लोकांचा विटाळ मानण्यांत येत नाहीं हें आम्ही पूर्वींच सांगितलें आहे.

वादाला रंग येण्याकरितां अस्पृश्य हे अनार्य आहेत, असें घटकाभर कबूल केलें तरी त्यामुळें आर्यांवरील जबाबदारी बिलकुल कमी होत नाहीं. आर्यांच्या सहवासानें गेल्या सहा हजार वर्षांत अनार्यांची उन्नती झाली ही गोष्ट निर्विवाद आहे. परंतु यापुढें त्यांची उन्नति करण्याचें सामर्थ्य आर्यांमध्यें आहे कीं नाहीं ? जर असेल तर त्यांच्या अनिष्ट चाली, दुष्ट व्यसनें व तामसी दैवतें हीं नाहींशीं करून धार्मिक व सात्त्विक जाज्वल्य भावना आणि तात्त्विक विचारजन्य शांति ही उत्पन्न करण्याकरितां आर्यांनीं आपली कंबर बांधिली पाहिजे.

आर्य जर तसें न करतील तर हे महामतलबी मुसलमान व हीं येशूचीं कोंकरें त्यांचें हिंदुत्व हिरावून घेतल्याखेरीज राहाणार नाहींत. आर्यांच्या सामर्थ्याच्या परीक्षेची ही वेळ आहे. भिल्ल, गोंड इत्यादिकांना जसें आज 'नॉन हिंदु' असें खानेसुमारीच्या वेळीं नोंदण्यांत येतें, तसेंच यांनाहि 'अहिंदु म्हणून संबोधण्यांत येईल. आणि कांहीं कालानें आर्यांनाच नालायक म्हणण्याचा प्रसंग येईल. १५० वर्षांच्या इंग्रजी सदोष राज्यपद्धतीनें स्वराज्याबद्दल जी पात्रता हिंदूलोकांमध्यें यावयास पाहिजे होती ती न आल्यामुळें आपण त्या पद्धतीचा धिःकार करतों; तोच धिःकार अनार्य लोक

आर्यसहवासाबद्दल प्रकट करूं लागतील. कारण ज्यांच्या इतक्या दीर्घ कालाच्या सहवासानें अनार्यांची अस्पृश्यता कमी झाली नाहीं, आणि ज्यामुळें धार्मिक व सामाजिक शिक्षण मिळण्यास त्यांना अडचण पडली त्या आर्यांच्या सहवासाचा त्यांना तिटकारा येणार नाहीं काय ? आर्यांमध्यें आतां आपली उन्नति करण्याचें सामर्थ्य उरलें नसून ते अगदीं निर्बल झाले आहेत, अशी जर एकदां अनार्यांची समजूत झाली तर घोर प्रसंग गुदरेल म्हणून आर्यांनीं अनार्यांच्या उन्नतीच्या आड येणारी अस्पृश्यता कमी केली पाहिजे.

आर्य सहवासांत राहिलेल्या अनार्यांना लवकरच उत्कृष्ट स्थितीला आणिता येईल, असा आर्यांनीं दृढ विश्वास ठेविला पाहिजे.

शांतिपर्व २९३–तथा सत्सन्निकर्षेण हीन वर्णोऽपि दीप्यते ॥ ४ ॥

सत्सहवासामुळें हीन वर्णसुद्धां देदिप्यमान होतो, हें या व्यासवचनावरून सिद्ध होतें. आर्यांच्या सत्सन्निकर्षाचा परिणाम अनार्यांच्या अभ्युदयावर झालाच पाहिजे. तसा जर न होईल तर आर्यांचें आर्यत्व तें काय ? पुष्कळ दिवस आर्य सहवासांत असलेले, आर्यांच्या संस्कृतीशीं समरस झालेले, आर्यांशीं नम्रभावानें वागणारे अनार्य उत्कृष्ट स्थितीला आतां गेलेच पाहिजेत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र यांच्या सहवासांत म्हणजे आर्य सहवासांत ज्यांचे बरेच दिवस गेले त्यांचा उत्कर्ष मनुस्मृतींत सांगितल्याप्रमाणें झालाच पाहिजे.

मनु—शुचिरुत्कृष्ट शुश्रुषुर्मृदुवागनहंकृतः
अ. ९ ब्राह्मणाद्याश्रयो नित्य मुत्कृष्टां जातिमश्नुते ॥ ३३६ ॥

नम्रपणानें स्वतःला विसरून अनार्यांनीं आर्यांची आजपर्यंत उत्कृष्ट सेवा केली आहे, यांत संशय नाहीं. या उत्कृष्ट शुश्रूषेचा मोबदला त्यांना उत्कृष्ट जातीच्या रूपानें म्हणजे अस्पृश्यतानिवारणानेंच मिळाला पाहिजे. इहलोकांत त्यांची अस्पृश्यता नाहींशी केल्यास परलोकांतही ते आर्यांच्या बरोबरीनें मोक्षस्थानीं येतील असें म्हणण्यास हरकत नाहीं. निर्मत्सर बुद्धीनें अस्पृश्य लोक जसजसे अधिक वागतील आणि त्यांच्या ओंगळ आचारांमध्यें जशीजशी अधिक शुद्धता येत जाईल त्याप्रमाणेंच ते आनंदित होत्साते परलोकीं सुख पावतील.

मनु——यथा यथाहि सद्वृत्तमातिष्ठत्यन सूय कः ।

अ. १० तथातथेमं चामुंच लोकं प्राप्नोत्यनिन्दितः ॥ १२८ ॥

असें भगवान् मनूच्या या वचनावरून निर्धास्तपणें म्हणतां येईल, आर्यांनीं आपलें औदासिन्य सोडण्याचा अवकाश कीं अनार्यांची उन्नति हो हां म्हणतां होईल. उलट अनार्यांनीं आपली राहणी व आचार सुधारल्यास आर्यांच्या कार्याला लवकर यश येईल.+

अस्पृश्य म्हणजे चातुर्वर्ण्यभ्रष्टपतित पंचमहापातकी समूह असें जें नवीनांचें दुसरें एक मत आहे त्याचा विचार केल्यास अस्पृश्यता कमी करण्यास पुष्कळ अवसर आहे असें म्हणावें लागतें. क्रियालोपजन्यपातित्य व पंचमहापातकजन्यपातित्य नाहींसें करण्यास धर्मशास्त्रानें पुष्कळ प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत. त्यांपैकीं एकादें प्रायश्चित्त देऊन अस्पृश्यांस त्यांचे आचारविचार हळूहळू सुधारावयास लावण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कोणी कदाचित् प्रायश्चित्तास अडथळा आणतील.परंतु अडचण दूर करावयाची असें मनांत आणल्यास कांहींतरी मार्ग दिसूं शकेल. या लोकांच्या पिढ्यानुपिढ्या जरी धर्मशास्त्रविहीन आचारविचारांत गेल्या असल्या तरी

अनुक्त—निष्कृतीनां तु पापानामपनुत्तये ।

शक्तिं चावेक्ष्य पापं च प्रायश्चित्तं प्रकल्पयेत् ॥२०९॥ मनु अ. ११

देशं कालं वयः शक्तिं पापं चावेक्ष्य यत्नतः ।

प्रायश्चितं प्रकल्प्यं स्याद्यत्र चाक्ता न निष्कृतिः ॥ याज्ञवल्क्य ९३.

भगवान् मनू व याज्ञवल्क्य यांच्या या आधारानें पुष्कळ कार्य होण्यासारखें आहे. कांहीं कांहीं पापें देहांतप्रायश्चित्तानेंच जातात असें जरी खरें असलें तरी देश,काल,शक्ति व पाप यांचा विचार करणें म्हणजे परिस्थितीचा विचार करणें असें म्हटल्यास चालेल.कोणत्याहि काळीं व कोणत्याही स्थळीं परिस्थितीचा विचार सोडून कांहीं करितां येत नाहीं.निरनिराळ्या परिस्थितीमध्यें निरनिराळे धार्मिक भानगडीचे प्रश्न उपस्थित झाले म्हणूनच निरनिराळे

---

+टीप— वशानें अनार्य असलेल्या या अस्पृश्यांची राहाणी, धंदे,चाली, लग्नें, देवकें, आडनावें यांची माहिती खानेसुमारीच्या रिपोर्टावरून दिल्यास ती बरीच बोधक होईल. परंतु रा. माटे यांनीं ती आपल्या पुस्तकांत दिलेली असल्यामुळें येथें मुद्दाम दिली नाहीं.

धर्मशास्त्रप्रयोजक अवतीर्ण झाले. याज्ञवल्क्यांनीं आपल्या पूर्वीं असे अठरा धर्मशास्त्र-प्रयोजक झाल्याचें उपोद्‌घातांत लिहिलें आहे. धर्मशास्त्रज्ञ हे जरी सर्वज्ञ असले तथापि कालाच्या अनंतत्वांत अनेक गुह्य प्रश्न सांठविले असतात. अशा सर्वच प्रश्नांचा विचार धर्मशास्त्रप्रयोजकांकडून झालेला असतो असें म्हणता येत नाहीं. अर्थात् त्यांच्या दृष्टींतून निसटलेल्या प्रश्नांचा विचार कसा करावा, असा प्रश्न नेहमीं उपस्थित होतो, म्हणून भगवान् मनूंनीं—

अनाम्नातेषु धर्मेषु कथं स्यादितिचेद्भवेत् ।

यं शिष्टा ब्राह्मणा ब्रूयुः स धर्मः स्यादशंकितः ॥ मनुः अध्याय १२

शिष्ट ब्राह्मण परिस्थितीच्या मानानें जो धर्म सांगतील तोच आचरणीय होय, असा शेवटीं निकाल दिला आहे. खरोखर वर्णगुरू या नात्यानें ब्राह्मणांच्यावर मोठी जबाबदारी आहे. या जबाबदारीला जेव्हां ब्राह्मण पारखे होतात, तेव्हां राष्ट्रावर आपत्ति येते, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. समाजनौकेचें सुकाणुं जर अनधिकाऱ्यांच्या हातीं गेलें तर ती नौका आपत्तीच्या खडकावर आदळल्याखेरीज कधींहि राहाणार नाहीं. म्हणून ब्राह्मणांनीं योग्य वेळीं एकत्र होऊन सर्व प्रकारच्या परिस्थितीचें सूक्ष्म पर्यालोचन करून सर्व अस्पृश्यवर्गांच्या प्रायश्चित्ताचा विचार सहानुभूतीनें केला पाहिजे. मद्यपानानिवृत्ति, गोमांसपराङ्मुखता व आचारशुद्धता हीं ज्या अस्पृश्यांच्या ठिकाणीं दिसतील, त्यानें अमूक एक प्रायश्चित्त घेतल्यास त्याची अमुक एक प्रकारची अस्पृश्यता कमी होईल, असें जाहीर केल्यास अस्पृश्यवर्गामध्यें आचारशुद्धतेबद्दल अहमहमिका सुरू होईल.

तात्पर्य शास्त्रविहित मार्गानेंच कांहीं प्रायश्चित्त देऊन आचार सुधारल्यावर अस्पृश्यता हळूहळू कमी करण्यास पुष्कळ अवसर आहे, असें म्हटल्याखेरीज गत्यंतर नाहीं. समाजांतील धुरीणांनीं शास्त्री मंडळींचा या कामीं अवश्य उपयोग करून घेतला पाहिजे आणि त्यांनींहि निःपक्षपातानें योग्य शास्त्रार्थ सांगितला पाहिजे; म्हणजे मोठेंच देशकार्य व धर्मकार्य होईल.

याप्रमाणें चारहि मतांचा विचार करितां अस्पृश्यता कमी करता येणें शक्य, इष्ट व धर्म्य आहे असें ठरलें. आतां अस्पृश्यता कोठें कोठें व कसकशी कमी करावी व त्याला व्यावहारिक अडचणी काय आहेत याचा विचार करण्यापूर्वीं या विषयाबद्दल साधुसंत काय म्हणतात हें पाहूं.

---

# भाग सहावा.

## अस्पृश्य व साधुसंत.

सनातन वैदिकधर्माचा विचार जसा ऋषींनीं व शास्त्रकारांनीं केलेला आहे, तसाच साधुसंतांनीं केलेला आहे. आतांपर्यंत शास्त्रदृष्टीनें जसा अस्पृश्योद्धाराचा विचार केला तसा संतदृष्टीनें या प्रश्नाचा विचार करूं.

महाराष्ट्रिय संतमंडळ डोळ्यांपुढें उभें राहिलें म्हणजे तात्कालिन मुसलमानी अमदानींतील भेसुर परिस्थितीचें चित्र पुढें उभें राहातें. ती दुःखद स्थिति पाहून साधुसंतांच्या ठिकाणीं उत्पन्न झालेला कळवळा, ब्रह्मविद्येचा सुकाळ होण्याकरितां त्यांनीं केलेले महाराष्ट्रभाषेंतील उत्कृष्ट ग्रंथ, त्यांनीं उपदेशिलेली तात्त्विक समता, आणि पाजिलेलें धर्मामृत यांचा विचार केला तर स्वराज्यसंस्थापनेच्या आणि धर्मसंस्थापनेच्या कार्यांत त्यांनीं किती बहुमोल कामगिरी केली हें चांगलें निदर्शनास येतें आणि अशा या साधुसंतांच्या भजनीं अद्याप महाराष्ट्रांतील लाख दोन लाख लोक सदैव तत्पर असलेले पाहून अंतःकरणांत एक प्रकारचें अभिमानयुक्त प्रेम उत्पन्न होतें. किंबहुना असेंहि म्हणतां येईल कीं, महाराष्ट्रांतील जनतेवर संतांनीं देशी बोलींत बोललेल्या वचनांचा जो परिणाम होतो; तो संस्कृत भाषेंत असलेल्या शास्त्रवचनांचा होत नाहीं. म्हणून अस्पृश्यांचा विचार करतांना संतांची दृष्टि काय आहे हें पाहिल्यावांचून गत्यंतर नाहीं.

अस्पृश्यांच्या प्रश्नांचा विचार खरोखर संत दृष्टीनेंच केला पाहिजे रंजल्या गांजल्यांना आपलें म्हणणारे, पुत्रवत् सर्व मनुष्याकडे पाहणारे, दीन दुबळ्यांचे कैवारी, जगद्धिताच्या तळमळीनें ज्यांच्या अंतःकरणांत कालवाकालव होत आहे, असे संतच हा प्रश्न सोडविण्याला खरोखरी योग्य आहेत. शास्त्रकारांचा हेतू लक्षांत घेऊन आणि संतांचा कळवळा विचारांत घेऊनच हा प्रश्न सोडविला पाहिजे. कलकत्त्याचे महापंडित अनंत कृष्ण शास्त्री हे गेल्या सरस्वती उत्सवाकरितां प्राज्ञपाठशाळेंत आले होते. त्यांना आम्ही हाच प्रश्न विचारिला. हल्लीं उपस्थित झालेल्या अनेक प्रश्नांचा विचार करण्याकरितां तुम्ही

कोणती दृष्टी स्वीकारणार ? संतांच्या अंतःकरणाशीं समरस होऊन तरी या प्रश्नांचा विचार करा किंवा निदान न्यायाधीशाची समतेची दृष्टी ठेवा, असें आम्ही सांगितलें. त्यांनीं आम्ही शास्त्री आहोंत, शास्त्रपक्षपाती आहोंत, शास्त्राचे वकील आहोंत,तेव्हां त्याच दृष्टीनें विचार करणार असें उत्तर दिलें. शेवटीं आम्ही त्यांना केवळ शास्त्रवचनांचा व शद्बांचा विचार न करितां शास्त्रकारांचा हेतू पाहून त्यांच्या मनोभूमिकेशीं तद्रूप होऊन विचार करा, अशी विनंति केली. पहावें आतां त्यांच्या ग्रंथातून काय बाहेर पडतें तें.

ज्ञानेश्वरकालीन वाङ्मयापासून तो तुकारामकालीन वाङ्मयापर्यंत जुनें वाङ्मय अगदीं चिकित्सक दृष्टीनें धुंडाळिलें तरी त्यांत अस्पृश्यता निवारक वचनें सांपडणार नाहींत, यांत तिळमात्र संदेह नाहीं. त्या वाङ्मयांत अस्पृश्यता निवारक वचनें सांपडणार तरी कशी ? त्यावेळीं हा प्रश्न कोठें उपस्थित झाला होता ? हें खरें. पण सर्व साधुसंतांनीं समतेच्या बऱ्याच गोष्टी प्रतिपादन केल्या,त्यावरून त्यांचें अंतःकरण कोणत्या प्रकारचें होतें, हें समजण्यास फारशी अडचण पडणार नाहीं.

संत दृष्टीनें विचार करावयाचा म्हणजे तद्रूप व्हावयाचें. आपण स्वतः अस्पृश्य आहोंत अशी कल्पना करावी व एक दिवस स्पृश्य समाजाशीं अस्पृश्याप्रमाणें वागावें म्हणजे 'जावें त्यांच्या वंशा तेव्हां कळे' याचें प्रत्यंतर येऊन अस्पृश्यांच्या दुःखाची कल्पना येईल. परदुःख शीतल हा न्याय सगळीकडेच आहे. परंतु समर्थ म्हणतात " आपणास चिमोटा घेतला । तेणें कासावीस झाला । आपणावरून दुसऱ्याला । राखत जावें ॥ आपला अपमान कोणी केला. " ए, तुझ्या अंगांत कपडे आहेत, चला हो बाजूला " असें एखाद्या सोंवळ्या ब्राह्मणानें अधिक्षेपपूर्वक म्हटलें, आपल्याला सोडून एखाद्या ठिकाणची पंगत जेवावयास बसली किंवा कांहीं कारणाकरितां आपल्यास पंगतींतून हांकून दिलें तर जें मरणप्राय दुःख होतें त्याची कल्पना प्रत्येकानें करावी आणि असें दुःख अस्पृश्यांना दररोज किती तरी वेळां होत असतें याची जाणीव ठेवावी. नवरा मेल्याबरोबर बायकोनें सोवळें झालेंच पाहिजे असें दुसऱ्याबद्दल मनुष्य निष्ठुरपणें चटकन बोलून जातो. परंतु तोच प्रसंग त्याच्या मुलीवर, सुनेवर अथवा बहिणीवर आला म्हणजें अंतःकरण विरघळून जातें

असाहि अनुभव आहे. जुन्या विचाराच्या सर्व शास्त्री पंडितांना आमची अशी हात जोडून प्रार्थना आहे कीं, तुम्ही हल्लीच्या धार्मिक आणि सामाजिक प्रश्नाचा विचार पाहुण्यासारखा परकेपणानें करूं नका. त्या प्रश्नाला आपल्या अंतःकरणांत ठाव द्या. घरांतल्या व्यवहारांत त्यांना स्थान द्या, आणि विचार करा. ब्रह्मेंद्रस्वामींनीं ज्या जागेंत तपश्चर्या केली तेथें जाऊन इतिहास संशोधक राजवाडे कांहीं दिवस स्वामीसारखें राहिले असें म्हणतात. तद्रूप होऊन अभ्यास करण्याची पद्धति सर्वथैव योग्य आहे. देवालयांत मज्जाव, शाळांमध्यें बंदी, पानवठ्यावर हाकालपट्टी व जिकडे तिकडे "शिडी फिडी" अशा स्थितींत आपण काय करूं हें प्रत्येकानें पहावें.

महाराष्ट्रांत वारकरी आणि धारकरी असे दोन अभिजात पंथ आहेत आणि या दोन्ही परंपरेमध्यें पुष्कळ साधुसंत उत्पन्न झालेले आहेत. त्या सर्वांच्या वाक्याचा विचार या प्रबंधांत शक्य नसल्यामुळें श्री ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम आणि श्री समर्थ यांच्या वचनांचा म्हणजे महाराष्ट्र चतुर्वेदांतील कांहीं वाक्यांचा आतां विचार करूं.

सर्व साधुसंतांनीं जो भक्तिमार्ग उपदेशिला त्यांतील बीज 'जें जें दृष्टी दिसें भूत। तें तें मानिजे भगवंत। हा भक्तियोग निश्चित। जाण माझा॥' ज्ञा. अ. १०।। या ओवीमध्यें आहे, किंवा तुकोबारायाचे भाषेंत बोलावयाचें झाल्यास 'देवाची पूजा हे भूतांचें पालन। मत्सर तो शीण सकळांचा'॥ असें सांगतां येईल. सर्व साधुसंतांना समाजामध्यें तात्त्विकदृष्टया असा एक आत्मविश्वास उत्पन्न करावयाचा होता कीं, "नर करणी करे तो नरका नारायण बन जाय." समाजांतील व्यवहारांमध्यें उच्चनीचपणा आणि विषमता ही थोडी असावयाचीच पण ती असली तरी तिचा मोक्षमार्गांत मुळींच विचार करावयाचें कारण नाहीं. मोक्ष किंवा ईश्वरप्राप्ति ही ब्राह्मणांना किंवा वेद म्हणाऱ्यांनाच होते, असें मुळींच नाहीं.

उलट तुकोबाराय असें म्हणतात कीं "वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा। येरांनीं वाहावा भार माथा॥" ज्ञानेश्वर महाराज बहुजन समाजांचें अंगांत आपण कोणीतरी एक आहोत असा आत्मप्रत्यय यावा म्हणून वेदांतापेक्षांहि गीतेची थोरवी अधिकच गातात. वेद हा कंजुष होता. हें वैगुण्य

नाहींसें करावें म्हणून तो गीतारूपानें प्रकट झाला. तरी मज पाहतां तें मागील उणें । फेडावया गीतापणें । वेद वेठला भलतेणें । सेव्य होआवयां ॥ ज्ञा. अ. १८-१४५९
तसेंच पहिल्या अध्यायांत वेदांपेक्षां गीतेचें महत्त्व वर्णन केलें आहे. "हा वेदार्थसागर । जया निद्रिताचा घोर । तो स्वयें श्री सर्वेश्वर । प्रत्यक्ष अनुवादिला ॥
ज्ञा–अ. १

ज्ञानेश्वर महाराजांनीं गीतेचें असें महत्त्व वर्णन करून आणि तिला देशीकार लेणें देऊन आणि श्री एकनाथ महाराजांनीं भागवताच्या एकादशस्कंदावर जी एकाकार टीका " संस्कृत भाषा काय देवांची । आणि प्राकृत काय चोरांची ॥ " असें म्हणून केली, तिनें जनतेच्या वृत्तीचा संकुचितपणा समूळ नाहींसा केला. ज्ञानेश्वरादि संतांच्या पूर्वी ब्राह्मणांशिवाय मुक्ति नाहीं, यज्ञयागांशिवाय चित्तशुद्धि नाहीं, वेदाशिवाय अधिकार नाहीं, आणि संन्यासाशिवाय मोक्षसाधन होत नाहीं अशीं जीं कित्येक मतें प्रचलित होतीं, तीं अकालीं उत्पन्न झालेल्या ढगांप्रमाणें वितळून गेलीं.

" तुका म्हणे याती । हो का तयाची भलती ॥ मनुष्य कोणत्याहि जातीचा असो त्याला ईश्वर भेटतो, अशी संतांची शिकवण सुरू झाल्याबरोबर दुखण्यांतून नुकत्याच उठलेल्या अजाऱ्याची जशी खाऊं खाऊं अशी स्थिति होते, तीच महाराष्ट्रांतील ब्राह्मणेतर जनतेची झाली; हें साधुसंतांच्या नामावळींतील ब्राह्मणेतरांचीं नांवें वांचून दृष्टोत्पत्तीस येतें. पुष्कळ दिवस एकचक्रा नगरींत मधुकरीचे तुकडे खाऊन आळसांत काळ कंठणाऱ्या भीमाला बकाकडे जाण्याचा प्रसंग आला असतां जो आनंद झाला, तोच आनंद या वेळीं अब्राह्मणांना झाला असला पाहिजे. तात्पर्य इतकेंच कीं, ज्ञानोत्तर कर्मनिष्ठा किंवा ज्ञानोत्तर संन्यास असें ध्येय ठरलें म्हणजे जो वृत्तींत पहिल्यापासून फरक पडतो तशाच प्रकारचा फरक एकदम साधुसंतांच्या शिकवणीनें समाजाच्या मनोरचनेंत पडला व त्याचा परिणाम समाजांतील व्यवहारावरहि झाला.

मोक्षसाधनास जाति वर्ण किती अकिंचित्कर आहेत याबद्दल ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात.

## ज्ञानेश्वरी अ. ९

तैसे सकळ तें वैभव । अथवा कुळ जाति गौरव । तैसें शरीर आहे सावेव । परि जीविचि नाहीं ॥ ४६५ ॥ तैसे माझिया भक्तीविण । जळो तें जियालेपण । अगा पृथ्वीवरी पाषाण । नसती कांहीं ॥४३३॥ निंबनिंबोळिया मोडूनी आला । तो काउळयासी सुकाळ झाला । तैसा भक्तिहीन वाढिन्नला । दोषाचिलागीं ॥ ४६७ ॥ म्हणोनि कुळ उत्तम नोहावें । जाति अंत्यजही व्हावें......म्हणौनी भाक्ति गा येथ सरोजाति अप्रमाण ॥४५२॥ तैसे क्षत्रिय वैश्य स्त्रिया । का क्षूद्र अंत्यजादि इया । जाति तंवचि वेगळालिया । जंव न पावती माते ॥ ४६० ॥ मग जाति व्यक्ति पडे विंदुलें । जेव्हां भावें होतीं मज मीनले । जैसे लवणकण घातले । सागरामाजीं ॥ ४३१ ॥ आणि भलतिया जाति जन्मावें । मज भजिजे कां विरोधावें । परी भक्तां का वैरिया व्हावें । माझियाची ॥ ४७२ ॥

### श्री एकनाथमहाराजांचें मत, भा० अ. ११

वैष्णवसेवा अत्यंत कठिण । तेथें जाति नाहीं गा प्रमाण । न म्हणावा शूद्र–ब्राह्मण । भक्तिप्राधान्य भावार्थे ॥ १५ ॥ विदुर दासीपुत्र प्रसिद्ध । त्यासि आवडिला गोविंद । झाला वैष्णवामाजी अतिशुद्ध । कैसोनि निंद्यु म्हणावा ॥ १६ ॥ योनि जन्मला मर्कट । तो वैष्णवां माजीं अति श्रेष्ठ । हनुमंत म्हणावया कनिष्ट । ऐसा पापिष्ट कोण आहे ॥ १७ ॥ राक्षसांमाजी बिभीषण । दैत्यांमाजी प्रल्हाद जाण । भगवंतासी अनन्य शरण । वैष्णवपण तेणें त्यासी ॥१८॥ जाती उत्तम भक्तिहीन । तो वैष्णव नव्हे जाण । अथवा करी दांभिक भजन।वैष्णवपण त्या नाहीं ॥१९॥ वैष्णवीं भावी जाति प्रमाण। शालिग्राम मानी पाषाण । गुरूसी मानी माणुसपण। तो पापिष्ट जाण सर्वथा ॥१४०० ॥ जाणीव शाहणीव शातेपण । सांडूनि जातीचा अभिमान । जो मज होय अनन्य शरण । वैष्णव जाण तो माझा ॥ १ ॥

ज्ञानेश्वर व एकनाथ यांची ही शिकवण प्रौढ व भारदस्त व्याख्याना-प्रमाणें आहे. तर छडी मारून शिकवणाऱ्या पंतोजीप्रमाणें तुकोबाराय म्हणतात [ निर्णयसागरी गाथा ]

वर्ण अभिमानें कोण झाले पावन। ऐसें द्या सांगून मजपाशीं ॥
पवित्र तें कुल पावन तो देश। जेथें हरीचे दास जन्म घेती ॥२०८॥
अभक्त ब्राह्मण जळो त्यांचें तोंड। काय त्यासी रांड प्रसवली।
वैष्णव चांभार धन्य त्याची माता। शुद्ध उभयतां कुळ याति॥ २८५५ ॥
जैसा संग ज्याचे चित्तीं। तुका म्हणे तो त्या याती॥ २८५४ ॥
ब्राह्मण तो याती अंत्यज असतां। मानावा तत्त्वता निश्चयेसी ॥
रामकृष्णनामें उच्चारी सरळें। आठवी सांवळें रूप मनीं ॥
शांति क्षमा दया अलंकार अंगीं। अभंग प्रसगीं धैर्यवंत ॥
तुका म्हणे गेल्या षड्उर्मी अंगीं। सांडूनिया मग ब्रह्मचि तो ॥३०॥

तुकाराम महाराजांनीं ज्याच्या मनांत जशा प्रकारचे विचार असतील तशी त्याची जात ठरवावी. असें जें सांगितलें आहे तें खरोखर लक्षांत ठेवण्यासारखें आहे. तसाच अंत्यजांनासुद्धां आपलें आचार सुधारून कसें ब्राह्मण्य म्हणजे ब्रह्मनिष्ठा अंगीं बाणवितां येईल याबद्दल दिलेला अभंग सर्व अस्पृश्यांनीं हृदयामध्यें कोरून ठेवण्यासारखा आहे. सारांश कोणत्याहि जातीला ईश्वर भेटतो, वर्णाभिमानानें मोक्ष अंतरतो, अभक्त ब्राह्मणापेक्षां ब्राह्मणेतर भक्तच श्रेष्ठ असतो, आणि वैष्णव कोणत्याही ठिकाणीं, कोणत्याहि जातींत आणि कोणत्याहि कुलांत जन्मास येतात, हें थोडक्यांत संतांच्या सर्व उपदेशांचें सार आहे.

अस्पृश्यांचा उद्धार करावयाचा म्हणजे त्यांचे धंदे व त्यांच्या वृत्त्या मोडून त्यांना भलतेंच करावयास लावावयाचें असा अर्थ नाहीं, तर " स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिंलभते नरः ॥ हेंच तत्त्व त्यांच्या गळीं उतरावयास पाहिजे. सर्वांशीं समदृष्टि, सर्वांशीं समता, ठेवून पंडितप्रमाणें समदर्शी व्हावयाचे म्हणजे काय ? हें पुष्कळांना कळत नाहीं. धंदे न सोडतां, जातिधर्म न बिघडवितां अस्पृश्यांची उन्नति करण्यास संतांची परवानगी आहे. परंतु समत्व आणि सारखेपणा यांचा भलताच अर्थ होऊं नये म्हणून पुढील उतारे देतों.

### श्री एकनाथमहाराज भा. अ. ३

एका अन्न आच्छादन । एकासी तो कोरडे कण ।
एका तृण आणि जीवन । एका पयपान यथोचित ॥ ३७२ ॥
जेणें ज्यासी सुख संपूर्ण । तें ते करी उचित श्रद्धे जाण ॥
अनुचित श्रद्धेचें विंदाण । दुःखकारी संपूर्ण सर्वार्थी ॥ ७३ ॥
जेंवि ब्राह्मणा वाढिलें तृण । गाईस वाढिलें मिष्टान्न ।
श्वानासी बैसणें सिंहासन । साधुसी आसन थारोळा ॥ ७४ ॥
व्याघ्रासी पाडिल्या लंघन । त्यासी अर्पू नये गोदान ।
गाय गादल्या संपूर्ण । तैलाभ्यंजन करूं नये ॥ ७५ ॥
हो का देह इंद्रियें जरी एकें । तरी जिव्हांकर्म नव्हे नाकें ।
तैंवी भूतात्मा भूतवेखें । उचितोन्मुखें यजावा ॥ ७६ ॥
करितां यथोचित अर्पण । जरी क्रिया दिसे भिन्न भिन्न ॥
तरी अंतर श्रद्धा अभिन्न । हें मुख्य लक्षण भागवत धर्मी ॥७७॥

### श्री समर्थ ( दासबोध ) द. १७ स. ४

ईश्वर भेद करुनि गेला । त्याच्या बाचेन नवचे मोडिला ।
मुखामध्यें घास घातला । तो + + + केवि घालावा ॥ २७ ॥
ज्या इंद्रियासि जो भोग । तो तो करी यथासांग ।
ईश्वराचें केलें जग । मोडितां उरेना ॥ २८ ॥
साकर माती पृथ्वी होये । परि ते माती खातां नये ।
गरल आप नव्हे काय । परि तें खोटें ॥ द. १३ स. १० अ. ११
अंतर एक तो खरें । परी सांगाति घेवों नये ती महारें ।
पंडित आणि चाट पोरें । एक कैसी ॥ १३ ॥
मनुष्य आणि गधडे । राजहंस आणि कोंबडे ।
राजे आणि माकडें । एक कैसी ॥ १४
भागीरथीचें जल आप । मोरी संवदणीचें तेंही आप ।

कुश्चळ उदक अन्न । सेववेना ॥ १५ ॥
एके उदकें सगळें झालें । परि पाहोनि पाहिजे सेविलें ।
सगट अवघेचि घेतलें । तरी तें मूर्खपणा ॥ १८ ॥
जीवनाचेंच झालें अन्न । अन्नाचें झालें वमन ।
परा वमनाचें भोजन । करितां नये ॥ १९ ॥

जाति धर्म न सोडता धंदे कायम ठेवून अस्पृश्यांची उन्नति कशी करावी हें ज्ञानेश्वरमहाराजांनीं वरीलप्रमाणेंच सांगतलें आहे.

आतां कदर्थवीत व्याधि । बळी कर्णाचिया आधीं । आपपर न शोधी । सद्वैद्य जैसा ॥ १४१ ॥ कां चिखलीं रुतली गाये । घड भाकड न पाहे । जो तियेचिया ग्लानी होये । कालाभुला ॥ १४२ ॥ नाना बुडतयातें सकरुणु न पुसे अंत्यज कीं ब्राह्मणु । काढूनीं राखे प्राणु । हेचि जाग ॥ १४३ ॥ कीं मायवणी पापियें । उघडी केली विपायें । ते नेसविल्यावीण न पाहे । शिष्ट जैसा ॥ १४४ ॥

सद्वैद्य जसा आपपरभाव न ठेवतां व्याधिग्रस्ताची व्याधि दूर करितो. सज्जन मनुष्य चिखलांत रुतलेली गाय ती धड आहे कां भाकड आहे हें न पाहतां तिच्या हंबरड्यानें कासावीस होऊन जसा तिला वर काढतो, पोहणारा मनुष्य बुडणारा हा महार आहे कीं ब्राह्मण आहे याचा विचार न करतां जशी पाण्यांत उडी टाकतो किंवा एखादा शिष्ट चोरांनीं नागवलेल्या माउलीला वस्त्र देऊन मग जसे तिजकडे पहातो त्याप्रमाणें कोणीही आपद्ग्रस्ताशीं वागलें पाहिजे. विदेशी व विधर्मी राज्ययंत्राच्या तप्त कटाहांत सर्व जाती या आपत्कालामध्यें एकसारख्या ढवळल्या जात असतानां 'न पुसे अत्यंज कीं ब्राह्मण' हीच दृष्टि ठेवली पाहिजे. एवंच शास्त्रदृष्टि व संतदृष्टि यांचा विचार केल्यास आपत्कालामध्ये "स्पर्शदोषो न विद्यते" हा शास्त्रार्थ उभयसंमत आहे असें सिद्ध होतें.

# भाग सातवा.

## अस्पृश्यता निवारणाच्या अडचणी व उपाय.

मागील सहा भागांत नव्या व जुन्या मतांचा व साधुसंतांच्या वचनांचा विचार करून अस्पृश्यता कमी करतां येणें कसें शक्य, इष्ट व धर्म्य आहे, हें दाखविलें. आतां अस्पृश्यता कमी करण्यास अडचणी काय आहेत व ती कोठकोठें कसकशी कमी करावी याचा थोडा विचार ह्या भागांत करूं.

राष्ट्रिय सभेचें ध्येय स्वराज्य व विषय राजकारण हा आहे. अस्पृश्यता स्वराज्याच्या आड येऊं लागली म्हणून राष्ट्रिय सभेला आपल्या अधिकाराचा अतिक्रम करून या धार्मिक व सामाजिक विषयाचा विचार करणें भाग पडलें. राजकारणी पुरुष कितीहि लोकप्रिय असले व ते " अस्पृश्यतेला शास्त्रांत प्रमाण नाहीं, अस्पृश्यता हा हिंदुधर्मावर कलंक आहे " असें अगदीं कंठरवानें सांगू लागले तरी हजारों वर्षांचे मुरलेले संस्कार कोणालाही एकदम नष्ट करतां यावयाचे नाहींत, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. राष्ट्रिय सभेनें असल्या धार्मिक प्रश्नाच्या बाबतींत शास्त्रीपंडितांचें किंवा आचार्यपाठांचें मत विचारलें पाहिजे. हिंदुस्थानांतील सर्व चांगली बुद्धि आंग्लमय झालेली असली तरी हिंदुस्थानामध्यें कांहीं विचारी व बुद्धिमान् पंडित असून ते असले धार्मिक प्रश्न राष्ट्रिय दृष्टीनें सोडविण्यास समर्थ आहेत, असें खात्रीनें वाटतें. पुराणमताभिमानी समाज बहुतम असून तो शास्त्रीपंडितांच्या व आचार्यपीठांच्या साधुसंतांच्या अनुयायी वर्गांत मोडतो. राजकारणी पुरुष एवढ्या प्रचंड समाजाच्या पुढाऱ्यांचें मत न घेतां जेव्हां धर्मकारणांत दडपादडपी करतात तेव्हां या वर्गाकडून विरोध होतो. राष्ट्रिय सभेला यापुढें अशा तऱ्हेचे पुष्कळ प्रश्न सोडवावे लागतील, म्हणून जर खरीखुरी सुधारणा कर्तव्य असेल तर राष्ट्रिय सभेनें धार्मिक प्रश्नाच्या वेळीं शास्त्रीपंडितांची कमिटी नेमावी, म्हणजे पुष्कळ उपयोग होईल. राष्ट्रिय सभेनें या कार्यांत आपलें धोरण न बदलणें म्हणजे अस्पृश्योद्धाराच्या मार्गांत एक नसतीच अडचण उपस्थित करणें असें होईल.

स्वयंनिर्णयाचें तत्त्व जगांत आल्यापासून मोठी जागृति झाली आहे. समाजाच्या प्रत्येक घटकाला उच्च स्थान पटकावण्याची इच्छा झाली आहे, हें एका परीनें इष्टच आहे. परंतु त्याबरोबर आपल्यापेक्षां खालच्या वर्गाला तुच्छ लेखण्याची प्रवृत्तीहि वाढत आहे. हें सर्वथैव अनुचित आहे. कांहींनीं म्हणावें, आम्हीच तेवढे उच्च मराठे क्षत्रिय व इतर सर्व लेकवळे व कडू ! दुसऱ्यांनीं म्हणावें.आम्हीच तेवढें खरें आर्य वैश्य; इतरांचें अस्तित्व आम्हाला मान्य नाहीं, ढोरांनीं म्हणावें, आम्ही रजपूतवंशी ढोर, आम्हाला महारांनीं स्पर्श करतां कामा नये. महारांनीं म्हणावें कीं, आम्हाला मांगाचा विटाळ होतो. लेखकानें चांभारवाडा, महारवाडा व ढोरवाडा यांमध्यें निरनिराळ्या प्रसंगीं कीर्तनें केलीं; तेव्हां त्याला अस्पृश्यांमधील अस्पृश्यतेचें हें भेसूर स्वरूप दृग्गोचर झालें व अशा स्थितींत अस्पृश्योद्धार बाजूला राहून कीर्तनकारच अस्पृश्य ठरेल असें वाटलें. अस्पृश्यता कमी करण्यास अस्पृश्यांतील अस्पृश्यता ही दुसरी एक अडचण आहे.

हिंदुस्थान देश हा खेड्यापाड्यांचा आहे.येथें शहरें थोडीं व खेडीं फार अशी वस्तुस्थिति आहे. शहरांतील राहणी व खेड्यांतील राहणी यांमध्यें साहाजिकच फरक पडतो.शहरांत कोणी कोणाला विचारीत नाहीं;पण खेड्यांमध्यें क्षेत्र संकुचित असल्यामुळें एकमेकाला विचारल्याशिवाय चालतच नाहीं. खेड्यापाड्यांची सुधारणा करावी, ग्रामसंस्थांचें पुनरुज्जीवन करावें असें हल्लीं प्रतिपादन करण्यांत येतें. खेड्यामध्यें महारांना गांवकीबद्दल महारकीचें उत्पन्न असतें. त्यांत सरंजामी गांव असला किंवा इनामदारांचा गाव असला म्हणजे तेथें सेव्यसेवकभाव असतो. पुष्कळ खेडीं असल्या प्रकारचीं असल्यामुळें शहरामध्यें जे विचार प्रकट केले जातात त्यांचा खेड्यांतील राहाणीवर अनिष्ट परिणाम होतो. वृत्ति,वतनदारी आणि गांवकी सोडून शहरामध्यें जाण्याची इच्छा होते. यांकरितां खेड्यापाड्यांची पाहणी करून सामान्यतः खेड्यांमध्यें अस्पृश्यता कमी करण्याकरितां काय करतां येईल हें तेथील परिस्थिति लक्षांत घेऊन ठरविलें पाहिजे. पुण्यामुंबईसारख्या ठिकाणीं वाटेल ते ठराव पास करणें सोपें असतें, परंतु खेड्यापाड्यांत राहणाऱ्यांना त्याचा कटु अनुभव येतो. हें लक्षांत घेतलें तर या कार्यास खेड्यापाड्यांतील लोकांकडून जो विरोध होतो तो होणार नाहीं.

समाजांतील निरक्षरता ही या कार्यांत सर्वांत मोठी अडचण आहे. शिक्षणाशिवाय पद्धतशीर विचार करण्याची शक्ति अंगीं येत नाहीं. कोणतीही सुधारणा तर्कशुद्ध विचारानें व सद्भावनेनें चांगली होते. केवळ भावनेच्या जोरावर किंवा अनुकरण म्हणून केलेली गोष्ट टिकत नाहीं. अस्पृश्य वर्ग व अब्राह्मण वर्ग यांची निरक्षरता गेल्यास अस्पृश्यता कमी करण्याच्या योजना फलद्रूप होतील. नाहीं तर 'न जाणे न नेणें अशा पामराला। बुझावूं शकेना विधाता तयाला॥' या पंडितोक्तीप्रमाणें या धार्मिक बाबतींत समाजापुढें हात टेकण्याचा प्रसंग येईल. पुरुषवर्गापेक्षां आमचा स्त्रीवर्ग फार निरक्षर, म्हणून त्यांच्याकडून त्या अबला असल्यामुळें जरी साक्षात् विरोध न झाला तरी अंतःकरणपूर्वक साहाय्य मात्र खास मिळणार नाहीं. समजूतदार स्त्रिया पातिव्रत्यधर्माला अनुसरून या कार्याला थोडेंबहुत साहाय्य करतील. परंतु अशा स्त्रिया फार थोड्या आहेत. नहून एखादा गृहस्थ आपल्या गृहिणीच्या मनाविरुद्ध जर ही सुधारणा अमलांत आणूं इच्छील, तर कुटुंबस्वास्थ्य व गृहसौख्य याचें मातेरें होईल. त्यांतल्यात्यांत ब्राह्मणवर्गापेक्षां अब्राह्मण व अस्पृश्यवर्गांतील स्त्रीवर्गाची निरक्षरता व अडाणीपणा गेल्याशिवाय हें कार्य बिलकुल सुकर होणार नाहीं. या आणि अशाच प्रकारच्या दुसऱ्या अडचणी असल्या तरी त्या दूर करून अस्पृश्य वर्गाची धार्मिक, बौद्धिक, सामाजिक व आर्थिक उन्नति अवश्य केली पाहिजे.

## अस्पृश्यता निवारणाचे उपाय.

१ देवालयें:—हल्लीं प्रत्येक गांवांत जेवढीं देवालयें आहेत, तीं सर्व एकदम सार्वजनिक करता यावयाचीं नाहींत, म्हणून त्यांतील एखादें तरी राम, कृष्ण, विठ्ठल, हनुमंत या देवतेचें देवालय पुजाऱ्याचें मन वळवून सार्वजनिक करावें. तेथें सर्व हिंदूंचा प्रवेश व्हावा. किंवा पुजाऱ्यांखेरीज गाभाऱ्यामध्यें कोणाचाहि प्रवेश नसावा. अर्थात् एका विशिष्ट मर्यादेपासून सर्वांनीं दर्शन घ्यावें. दरसाल या देवालयामध्यें एक दोन उत्सव सार्वजनिक करावेत. उत्सवांत कीर्तनें, पुराणें, व्याख्यानें व गरिबांना अन्नसंतर्पण असा कार्यक्रम ठेवावा. या उत्सवांच्या योगानें सर्व लोक एका प्रसंगानें एकत्र येऊं लागले म्हणजे अस्पृश्योद्धार करण्यास पुष्कळ साहाय्य होईल.

हल्लीं जीं देवालयें आहेत तीं बांधणारांची इच्छा व त्याकरितां खर्च झालेला पैसा यांचा विचार करतां हीं देवालयें सार्वजनिक म्हणजे ब्राह्मणापासून महारापर्यंत सर्वांनीं प्रवेश करण्यास योग्य अशीं नाहींत. कारण ज्या कालांत हीं देवालयें बांधलीं, त्यावेळीं हा विचार मुळींच नव्हता. देवालयामध्ये चार लोकांनीं यावें आणि पूजाअर्चा व्हावी एवढाच त्या वेळीं हेतु होता. हल्लीं पैशामुळें जसा हक्काचा प्रश्न आला आहे, तसा प्रकार पूर्वीं नव्हता. हल्लींच्या व्यवहाराप्रमाणें ज्या देवालयाकरितां सर्व जातींचा पैसा खर्च झाला आहे, किंवा ज्यानें बुद्धिपुरःसर सर्व जातींच्या उपयोगाकरितां एकादें देवालय बांधलें असेल, त्यासच सार्वजनिक देवालय म्हणतां येईल. पूर्वींचीं पुष्कळ देवालयें मराठ्यांच्या व पेशव्यांच्या अमदानींत बांधलेलीं आहेत. या सर्व देवालयांना हल्लींच्या हक्काच्या भाषेंत कधींहि सार्वजनिक म्हणता यावयाचें नाहीं.

हिंदुस्थानांत पुष्कळ धर्मपंथ व संप्रदाय असल्यामुळें पुष्कळ देवालयें विशिष्ट संप्रदायाच्या समूहाची व व्यक्तीच्याच मालकीचीं आहेत. या सर्व खाजगी देवालयांत ( एका दृष्टीनें देवघरांत ) हक्क म्हणून कायदेशीर प्रवेश कोणालाहि करतां यावयाचा नाहीं.

वृत्तीच्या दृष्टीनेंहि या देवालयांच्या प्रश्नाचा विचार केला पाहिजे. देवालयें कोणीहि बांधिलीं असलीं तरी पुष्कळ ठिकाणीं देवाचे पूजकच देवालयांचे व देवांचे मालक आहेत. पूजा करून जें मिळेल, किंवा देवापुढें जें येईल त्यावर निर्वाह करण्याचा धंदा पुष्कळांचा असल्यामुळें देवालयें म्हणजे कांहीं कुटुंबाचा प्रपंच चालविण्याचें साधन, असा अर्थ आहे. तेव्हां या पूजकवर्गाच्या मर्जीविरुद्ध आंत घुसण्याचा प्रयत्न केल्यास अनर्थ ओढवेल. हा पूजकवर्ग नुसता ब्राह्मणांतलाच आहे असें नसून ब्राह्मणेतरांतलाच पुष्कळ आहे, हें आकड्यांनीं सिद्ध करतां येईल. ब्राह्मणांपासून मांगापर्यंत सर्व जातीचे लोक निरनिराळ्या देवतांचे वतनदार पुजारी आहेत. गाणगापूर, नरसोबाची वाडी, औदुंबर यांचे पुजारी जसे ब्राह्मण आहेत तसे श्रीशैल्यमल्लिकार्जुन, बेळगांव जिल्ह्यांतील बैजनाथ यांचे पुजारी लिंगायत, होळकर स्टेटमधील ओंकारममलेश्वराचे पुजारी भिल्ल, पुष्कळ प्रसिद्ध देवा-

लयांचे पुजारी गुरव, कागवाडच्या संतूबाईचे पुजारी मांग व हुकेरी तालुक्यांतील देवीचे पुजारी बेरड आहेत! ह्या सर्व पुजाऱ्यांच्या मिराशी देवालयांत जाण्याचा प्रयत्न अस्पृश्यांनीं केल्यास त्यास ब्राह्मण पुजाऱ्यांपेक्षां ब्राह्मणेतर पुजाऱ्यांकडूनच कांकणभर जास्त विरोध होईल. हा सर्व विचार करून हल्लींचीं देवालयें सार्वजनिक नाहींत, असें आम्हीं म्हणतों.

हल्लींच्या जागृतीकडे पाहतां पुष्कळ देवालयें हळूहळू सार्वजनिक करतां येतील यांत शंका नाहीं. परंतु त्या देवालयामध्येंसुद्धां आंत घुसण्याची इच्छा कोणीच करूं नये. अस्पृश्यांना जर असें वाटत असेल कीं, स्पृश्याचा प्रवेश सर्व देवालयाच्या गाभाऱ्यामध्यें होतो तर ती त्यांची चुकी आहे. पंढरपूरच्या विठोबाची गोष्ट सोडून दिली तर पुष्कळ देवालयामध्यें ब्राह्मणांचाही प्रवेश होत नाहीं. लेखकाला दक्षिण हिंदुस्थानांतील यात्रा करतांना चिदंबरेश्वर मदुरामीनाक्षी, रामेश्वर, विष्णुकांची, व्यंकटगिरी, श्रीरंग या देवालयांमध्यें हाच अनुभव आला. या सर्व देवतांचें दर्शन बऱ्याच अंतरावरून घ्यावें लागलें. ही चाल तिकडे सार्वत्रिक आहे. देवालयाच्या पावित्र्याच्या दृष्टीनें गाभाऱ्यात पुजाऱ्याखेरीज कोणाचाहि प्रवेश नसणें इष्ट आहे. ही दक्षिण हिंदुस्थानांतील चाल महाराराष्ट्रांत अमलांत आल्यास फार बरें होईल. स्पृश्य लोकांनीं आपल्या अस्पृश्य बंधूंकरितां आपली देवालयाच्या गाभाऱ्यांत जाण्याची वहिवाट सोडली म्हणजे तंट्यांचें कारणच नाहीं. स्पृश्य वर्ग चांगला समजूतदार आहे. देवपूजा व अर्चा आपापल्या घरीं करतां येतात; त्याकरितां देवालयाच्या गाभाऱ्यांत गेलें पाहिजे असें नाहीं. हें लक्षांत ठेवून त्यांनीं दुरून दर्शन घेण्याचा परिपाठ ठेवल्यास आमच्या अस्पृश्य बंधूंनाहि देवालयांत जाऊन दर्शन न घेण्याचाच किता मिळेल. अशा रीतीनें हा देवालयांचा प्रश्न सुटेल असें वाटतें.

प्रत्येक उत्सवामध्यें केवळ अस्पृश्यांकरितां कांहीं तरी कार्यक्रम कीर्तन, पुराण, भजन इत्यादिकांचा अवश्य ठेवावा. त्याकरितां उत्सवांतील कांहीं नियत रक्कम खर्च व्हावी. असें झाल्यास आज जो अस्पृश्य वर्ग सर्व उत्साहामध्यें अप्रविष्ट असा असतो व त्यामुळें तो धर्मशानाला पारखा होतो तसा प्रकार होणार नाहीं. देवदर्शन, कीर्तन, पुराणश्रवणाचा

लाभ व उत्सवांत प्रत्यक्ष भाग या सर्व साधनांनीं अस्पृश्य वर्गांची धार्मिक उन्नति होईल.

२ शिक्षण—अस्पृश्य वर्गांची बौद्धिक उन्नति करावयाची म्हणजे त्यांना मुख्यतः शिक्षण द्यावयास पाहिजे. नवीन नवीन शाळा तर त्यांच्या-करितां निघाव्याच, पण हल्लीं ज्या सर्व हिंदी लोकांकरितां शाळा आहेत त्यामध्येंहि त्यांचा प्रवेश व्हावा अस्पृश्यांचीं मुलें केवळ अस्पृश्य म्हणून शाळेंत येऊं नयेत हें म्हणणें गैरशिस्त आहे. अर्थात् या मुलांना शाळेंत बसविलें पाहिजे, सर्व प्राथमिक शिक्षणाच्या शाळांमध्यें अस्पृश्य मुलें शाळें-तच पण एका बाजूला बसावीं. तालुक्याच्या व जिल्ह्याच्या ठिकाणीं ज्या माध्यमिक शिक्षणाच्या शाळा असतील तेथें व उच्च शिक्षण संस्थांत तीं मुलें कुठेंहि बसावीत.

खेड्यापाड्यामध्यें लोकसंख्येच्या मानानें अब्राह्मणांचीं व अस्पृश्यांचीं मुलें जास्त असतात. हीं सर्व शाळेंत एकाच जाऊं लागलीं म्हणजे लहान-पणापासून त्यांचे दळवळण वाढेल. शिक्षकानें थोडी काळजी घेतली आणि तो शिक्षक जर खऱ्या ब्राह्मण अंतःकरणाचा असला तर अस्पृश्य मुलांना स्पृश्य मुलांप्रमाणें वागावयास भाग पाडील. अस्पृश्य संगतीनें ज्यांना आपलीं मुलें बिघडतात असें वाटतें त्यांनीं आपल्या मुलींची निराळी सोय करावी असें कोणी म्हणतात. पण त्यामुळें अस्पृश्यता कमी करण्यास कांहीं मदत होणार नाहीं. म्हणून तो विचार बाजूला ठेवून अस्पृश्य मुलांना शाळें-तच शिक्षण देण्याचीं व त्यांना सुधारण्याची व्यवस्था करावी हें चांगलें. अस्पृश्यांचा उद्धार करावयाचा म्हणजे त्यांना आपल्या बरोबरीला आणा-वयाचें. आपण त्यांच्यासारखें व्हावयाचें असें मात्र नव्हे.

३ इतर सोयी—शाळांप्रमाणेंच मोफत वाचनालयें, व्याख्यानालयें व सभा ही देखील आजकालचीं ज्ञानमंदिरेंच आहेत. सर्व हिंदूंकरितां ज्या सभा असतील; अशा सभेंत अस्पृश्यांनीं आलें पाहिजे व व्यवस्थापकांनीं त्यांची व्यवस्थाहि केली पाहिजे. या ज्ञानमंदिरामध्यें त्यांना प्रवेश होऊं लागला म्हणजे अस्पृश्यांचा सामाजिक दर्जा वाढेल व बौद्धिक उन्नति होईल. अस्पृश्यांना पाणवठयावर प्रतिबंध असल्यामुळें त्यांना चांगलें पाणी प्यावयास मिळत नाहीं असें ऐकण्यांत येतें. वाहतें पाणी जेथें आहे तेथें

अस्पृश्यांनीं स्पृश्यांच्या पाणवठ्यावर येण्याची इच्छा करणें म्हणजे शुद्ध खोडसाळपणा आहे. वाहत्या पाण्याखेरीज इतर ठिकाणीं सर्वांबरोबर अस्पृश्यांना पाणी मिळण्याची व्यवस्था करावी. अस्पृश्य वर्गाची राहाणी सुधारेपर्यंत त्यांना सर्वांबरोबर पाणी भरूं देणें आरोग्यदृष्ट्या व वैद्यशास्त्रदृष्ट्या धोक्याचें होईल, अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं

अस्पृश्यांच्या धार्मिक, सामाजिक व बौद्धिक उन्नतीबरोबर आर्थिक उन्नतीचा विचार केला पाहिजे. हिंदुस्थान देशाची स्थिति आर्थिकदृष्ट्या वाईट असल्यामुळें कितीहि विचार केला तरी हा प्रश्न समाधानकारक सुटत नाहीं. अठरापगड जातींचे धंदे बसल्यामुळें त्या बेकार झाल्या आहेत. अस्पृश्यांपैकीं महार सोडून बाकीचे धंदेवाले आहेत. त्यांना त्या धंद्याचें उत्तम शिक्षण देणें हें सर्वस्वी सरकारांच्या हातीं आहे. अस्पृश्याप्रमाणेंच पुष्कळ स्पृश्य जाति आर्थिकदृष्ट्या अतिशय खालावलेल्या आहेत. त्या मानानें अस्पृश्य वर्गच बरा असें म्हणण्याची पाळी येते. अस्पृश्यांपैकीं महारवर्ग अगदीं दरिद्री आहे. त्याला शेती किंवा मोलमजुरी करून पोट भरावें लागतें. चांभार, मांग, ढोर हे धंदेवाले असल्यामुळें त्यांना पैसा मुबलक मिळतो. परंतु दारूसारखीं व्यसनें तो लुटून फस्त करितात. या वर्गांतील मद्यपान प्रतिबंध हें एक महत्कार्य आहे. तें यशस्वी झाल्यास मिळविलेली मीठभाकर सुखानें खातां येईल. या सर्व वर्गांना लावतां येण्यासारखा धंदा म्हटला म्हणजे सूत कातण्याचा व कापड विणण्याचा आहे. कापूस ज्या प्रांतांत पिकतो तेथें हा प्रयोग यशस्वी होईल. अद्याप पुष्कळ बायकांना सूत कातण्याचें विस्मरण झालेलें नाहीं. या वर्गाकडून हातसुताची हातमागाची खादी निर्माण होऊं लागली म्हणजे आर्थिकदृष्ट्या फायदा होऊन या वर्गाचा सामाजिक दर्जा जवळजवळ कोष्ट्याइतका वाढेल.

४ दळणवळण वाढविणें—अस्पृश्यता निवारणास स्पृश्यांचें व अस्पृश्यांचें दळणवळण वाढविणें हाच मुख्य उपाय आहे. अस्पृश्य हे स्पृश्यांच्या सन्निकर्षांत, सान्निध्यांत, सहवासांत जितके जास्त येतील तितकी त्यांची राहाणी सुधारेल. राहाणीमध्यें स्वच्छता व नीटनेटकेपणा आला कीं शिवाशिवीची कल्पनाहि येणार नाहीं. ओंगळ स्थितींत असलेल्या मनुष्याला स्पर्श करावा असें कधींहि वाटत नाहीं. राहाणी सुधारल्याशिवाय दळणवळण कसें

वाढणार ? असें कोणी म्हणतील,पण दळणवळणाशिवाय राहाणी कशी सुधारेल ? सारांश या दोहोंचा परस्पर संबंध आहे. गांवांतील उत्सव, जत्रा, कुस्त्याचे फड, पालख्यांच्या मिरवणुकी, दसऱ्याचें सीमोल्लंघन, संक्रांतीचा तीळगूळ समारंभ, पाडव्याचें पंचांगश्रवण, या सर्व प्रसंगांचा अस्पृश्यता निवारणाचें कामीं अर्थात् स्पृश्यास्पृश्याचें दळणवळण वाढविण्याचें कामीं चांगला उपयोग होणार आहे. योजकांनीं या संधीचा फायदा घेतला पाहिजे. दसऱ्याचें दिवशीं सोनें देण्याचा शिष्टाचार आहे.तो एकमेकांच्या घरीं जाऊन करावयाचा असतो. स्पृश्यास्पृश्य एकमेकांच्या घरीं या निमित्तानें कां जाऊ नयेत ? तसेंच स्त्रियांचे हळदीकुंकवाचे समारंभ समूहानें कां होऊं नयेत? कोणी मनांत आणीत नाहीं व करीत नाहीं, हीच खरी अडचण आहे. शाळांमध्यें मुलांचा, सभामध्यें पुरुषांचा आणि सणउत्सव अशा प्रसंगीं स्त्रीपुरुषांचा संबंध येऊं लागला म्हणजे आपोआप दळणवळण वाढेल.दळणवळणाच्या वृद्धीचा परिणाम राहाणीवर होईल आणि मग शिवाशिवीचा किंतु मनांत येणार नाहीं.

राहाणी सुधारण्याला सांपत्तिक स्थिति सुधारली पाहिजे असें कांहींचें म्हणणें आहे परंतु तें बरेंच चुकीचें आहे. स्वच्छता, टापटीप, नीटनेटकेपणा याला पैसा लागतो असें नसून स्वच्छतेनें वागण्याची संवय असावी लागतें, हें खरें कारण आहे. संपत्तीचा व स्वच्छतेचा कार्यकारण संबंध जोडतां येणार नाहीं. उलट जुन्या पिढीचे श्रीमंत शेट सावकार लोक पाहिलें तर मळकी धोतरें, बुरसलेलीं तोंडें, बावळटपणाची चर्या आणि घामटपणा दाखविण्यांतच त्यांना मोठेपणा वाटतो. महाराष्ट्रांत कोकणस्थ हे सर्वांत दरिद्री आहेत. पण राहाणी स्वच्छतेची व टापटीपीची असते. त्या मानानें कऱ्हाडे सोडून दिल्यास बाकीच्या देशस्थ, माध्यंदिन व कण्व ब्राह्मणामध्यें अतिशय घामेपणा दिसतो, हें कोणालाहि नाकबूल करतां यावयाचें नाहीं. महाराष्ट्रापेक्षां हिंदुस्थानचा कोणताही भाग सुपीक आहे. पण भुसावळच्या पलीकडे गेलें, विशेषतः संयुक्त प्रांतांत गेलें असतां कल्पनातीत ओंगळपणा व घाण दिसून येतें. संपत्तिमानाच्या ओंगळपणाच्या असंख्य उदाहरणांवरून असें सिद्ध होतें कीं, अस्पृश्याच्या राहाणीचा व त्यांच्या सांपत्तिक स्थितीचा कसलाही कार्यकारण संबंध नाहीं. दररोज

स्नान करणें, धोतरें धुणें, आठ दिवसांनीं अंगातलें कुडतें धुणें, दररोज घरांतला केर काढणें, शौचाहून जाऊन आल्यावर हातपाय धुणें, या गोष्टी करण्याची अस्पृश्यांना संवय लागली पाहिजे. घाणेरडेपणाचा किळस व स्वच्छतेची हौस उत्पन्न झाली कीं, अस्पृश्यांची राहाणी सुधारेल.

**घरगुती नोकऱ्या देणें**–श्रीमंत लोकांनीं अस्पृश्यांना घरगुती नोकऱ्या दिल्या पाहिजेत. विशेषतः संस्थानिकांनीं आपल्या जवळच्या व आपल्या अधिकाऱ्याजवळच्या पट्टेवाल्याच्या नोकऱ्या अस्पृश्यांना दिल्या पाहिजेत. मध्यम स्थितींतील माणसानें असें कांहीं केलें कीं, लोक एकदम बुजल्या सारखें करितात. पण तेंच मोठ्यानें केलें म्हणजे 'यद्यदाचरति श्रेष्ठः' या न्यायानें त्याचें कौतुक होतें. संस्थानिक, राजेरजवाडे, राष्ट्रीय सभेचे पुढारी यांनीं अस्पृश्यांना पट्टेवाले, कारकून, प्रायव्हेट सेक्रेटरी अशा ज्या नोकऱ्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें देतां येतील, त्या द्याव्यांत. पुष्कळ शेट सावकार घरामध्यें मुसलमान नोकर ठेवीत असतात. मुसलमानांपेक्षां अस्पृश्य हा धर्म दृष्टीनें शतपट बरा असल्यामुळें घरांत मुसलमान नोकर न ठेवतां त्यांनीं अस्पृश्य नोकरच ठेवावा. हल्लीं ठिकठिकाणीं भांडीं घासणें, धोतरें धुणें, झाडसारवण करणें, या कामांना माणसें मिळत नाहींत, अशी ओरड आहे. अस्पृश्य स्त्रीपुरुषांचा उपयोग या कामीं होण्यासारखा आहे. कर्नाटकांतील पुष्कळ इनामदारांच्या व जहागीरदारांच्या घरीं महार लोक बरींच कामें करीत असतात. शेण गोळा करणें, आंगण झाडणें, बाहेरचा तट सारवणें, घरांतील लांकुडफांटा फोडणें अशा कामांना अस्पृश्य लोक हल्लीं त्यांना उपयोगी पडतात. ती रुढी हल्लीं जरा वाढविली पाहिजे. अस्पृश्यांच्या स्त्रियांकडून भांडींहि घासून घ्यावीत, एक दोन बादल्या पाणी ओतलें म्हणजे झालें. अस्पृश्याकडून दररोजचे कपडे धुवून घेण्यास हरकत नाहीं. परटाकडून आलेल्या ओल्या पिळ्यावर जसें एक दोन घागरी पाणी ओतून तें घेण्यास हरकत नाहीं तसेंच अस्पृश्यांनीं धुवून आणलेल्या पिळ्यावर पाणी घालावें म्हणजे झालें. परीट हा सप्त अंत्यजांपैकीं असून त्याचा विटाळ गेला आहे. अस्पृश्यांचे विटाळ घालविण्याकरितां पहिल्यानें त्यांना परटाचें काम द्यावें. व ते परीट आहेत असें समजून फार तर त्यांच्याशीं वागावें. हल्लीं जन्मावर ठेवलेले धंदे, कोणीच करीत नाहींत. अर्थात् अस्पृश्यांना स्पृश्यांनीं आपल्य

घरांतील कामेंघामें दिलीं व तीं त्यांनीं केलीं तर त्यांत उभयपक्षीं पाप तर नाहींच पण पुण्य आणि सोय आहे.

गेल्या भाद्रपदांत आम्हीं एका संस्थानांत उत्सवाकरितां गेलों होतों. तेथील संस्थानाधिपतींनीं हुकमाशिवाय अस्पृश्यता कशी कमी करितां येईल असें आम्हांस विचारलें. कोणतीहि गोष्ट विशेषतः धार्मिक सामाजिक गोष्ट हुकमानें होते असें नाहीं. लोकांत थोडी हौस असावी व नंतर हुकूम व्हावा म्हणजे त्या हुकमाला व्यवहार्यता येते. लोकामध्यें अस्पृश्यता निवारणाची चोट तिडीक उत्पन्न करावी; आणि नंतर वर सांगितलेलें दळणवळण वाढविण्याचे उपाय कांहीं हौसेनें तर कांहीं हुकमानें अमलांत आणावें. दक्षिण महाराष्ट्रांतील हिंदुसंस्थानिकांनीं मनांत आणल्यास अस्पृश्यता लवकर संस्थानांत नाहींशी होईल. दरसाल १३ लाख रुपये हिंदूंना अहिंदु करण्यांत निजाम सरकार खर्च करते. त्या मानानें अस्पश्यांना स्पृश्य करण्याचें श्रेय हिंदूसंस्थानिकांनीं घ्यावयास नको काय ?

समाप्त.

|| ॐ ||

|| धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा ||

प्राज्ञपाठशाळा मंडळ–पुस्तकमाला.

# पुस्तक दुसरें.

# धर्मभ्रष्टाचें शुद्धीकरण.

## हिंदुधर्माचा व हिंदुसमाजाचा स्वभाव.

### अध्याय पहिला.

'वाईटांतून चांगलें निघतें' या म्हणीप्रमाणें मलबारांतील मोपल्यांच्या बंडांतून हिंदु समाजाला इष्ट अशी एक गोष्ट निष्पन्न झाली आहे. ती म्हणजे धर्मभ्रष्टांचें शुद्धीकरण ही होय. मोपल्यांचें बंड म्हणजे तेथील हिंदु समाजावर आलेला एक दुर्धर प्रसंग ! पण त्या प्रसंगानें हिंदू समाजाचे डोळे चांगले उघडले म्हणून आनंदच मानला पाहिजे.

हिंदुधर्म आणि हिंदुसमाज सुधारण्याचा प्रयत्न डॉ. कुर्तकोटी ( श्रीशंकराचार्य मठ करवीर ) यांनीं महाराष्ट्र परिषदेच्या द्वारानें गेलीं कांहीं वर्षे चालविला आहे. नाशीक क्षेत्रीं या परिषदेचें जें पहिलें अधिवेशन झालें तेव्हांपासून आम्ही धर्मभ्रष्टांच्या शुद्धीकरणाचा विषय देवलस्मृतीच्या आधारानें वेळोवेळीं परिषदेपुढें व महाराष्ट्रिय हिंदु समाजापुढें मांडीत आहोंत. नाशीकच्या अधिवेशनापूर्वीं मुंबईस कै. वा गजानन भास्कर वैद्य यांनीं नुकतीच हिंदु मिशनरी सोसायटी स्थापन केली होती व कार्यहि सुरू केलें होतें. नागपूर येथील धर्मपरिषदेंत श्री. शंकराचार्यांनीं या प्रश्नावर निर्णयात्मक मत दिलें. पुढें डॉ. मुंजे यांनीं देवलस्मृतीं-

तील महत्त्वाचे श्लोक लोकांपुढें ठेवून मलबारांतील हिंदूबंधूंना धर्मभ्रष्टतें-तून वांचविण्याची खटपट सुरू केली. स्वामी श्रद्धानंदजी यांनीं मलकाना रजपुतांना शुद्ध करून घेण्याची चळवळ सुरू केल्यापासून या प्रश्नाला राष्ट्रिय स्वरूप आलेलें आहे. खरोखर या प्रश्नाची धर्मशास्त्र व समाजशास्त्र दृष्ट्या चांगली चर्चा व्हावयास पाहिजे आणि कार्याचें महत्त्व कळलें पाहिजे, म्हणून आम्ही ह्या विषयाचें यथामति विवेचन करण्याचें योजिलें आहे.

या विषयाकरितां ' पतितपरावर्तन ' असा शब्दप्रयोग करण्यांत येतो; परंतु बाटलेला किंवा बाटगा हा शुद्ध मराठी शब्द चांगला अर्थबोध करून देतो. भ्रष्ट या शब्दापासूनच बाटगा हा शब्द बनलेला आहे. म्हणून ' पतितपरावर्तन ' या शब्दप्रयोगापेक्षा ' धर्मभ्रष्टांचें शुद्धीकरण ' या प्रयोगानें अर्थबोध चांगला होतो. स्मृतिग्रंथांत पतित हा शब्द निराळ्या अर्थी आलेला आहे. विहित कर्म न करणारा, निंद्य कर्म आचरणारा, विषयलोभी मनुष्य पतित होतो. ( मनु. ११–१४ व याज्ञ. ३ श्लोक २१९ ). संध्या न करणारा ब्राह्मण, अभोज्य अन्न सेवन करणारा यति, ब्रह्मचर्यधर्मानें न वागणारा ब्रह्मचारी हे सर्व पतित होतात असें स्मृतिग्रंथांत ठिकठिकाणीं म्हटलेलें आढळतें. त्यावरून पतित शब्द धर्मांतर केलेल्यांना लागू पडत नसून स्वधर्मभ्रष्टांनाच लागू पडतो असें ठरतें. म्हणून धर्मभ्रष्टांचें शुद्धीकरण असें म्हणणें योग्य दिसतें. असो. मुख्य प्रश्नाचा विचार करण्यापूर्वी वैदिक धर्माचें स्वरूप काय आहे व बाह्य धर्मीयांना व बाह्य समाजांना आपल्या समाजांत समाविष्ट करून घेण्याची हिंदू समाजाची कशी पद्धति आहे, तें पहिल्यानें पाहूं.

अगदीं वरवर विचार करणाऱ्या मनुष्यालासुद्धां असें वाटेल कीं, आपल्या धर्मांतील मनुष्यें जर दुसऱ्या धर्मांत घेतलीं जातात तर दुसऱ्या धर्मांतलीं मनुष्यें आपल्या धर्मांत कां येऊं नयेत ? हिंदू वा जर मुसलमान किंवा ख्रिस्ती होतो तर ख्रिश्चनाला किंवा मुसलमानाला हिंदुत्वाची दीक्षा कां बरें देण्यांत येऊं नये ? इतर धर्म जयिष्णु वृत्तीचे असतांना हिंदु धर्म हा सहिष्णु वृत्तीचा आहे हें कांहीं ठीक नव्हे, असेंहि तो आपल्या मनाशीं ठरवील ! परंतु वाचकांना पहिल्या प्रथमच ही विचारसरणी चुकीची आहे

असें सांगून ठेविलें पाहिजे. कारण हिंदुधर्म या नांवाचा धर्म मुळांत अस्तित्वांतच नाहीं. सनातन वैदिक धर्माला " हिंदु धर्म " असें नांव हिंदु समाजावरून पडलें आहे. हिंदुसमाज आणि सनातन वैदिक धर्म या गोष्टी अगदीं अलग अलग आहेत. सनातन धर्माचें स्वरूप पाहिलें तर त्या-सारखा, त्रिगुणात्मक प्रकृतीच्या प्रभावानें उत्पन्न झालेल्या या जगांतील मनुष्यांना यथाधिकार कर्तव्य विभागून देऊन मोक्षमार्ग दाखवून देणारा, जगांत दुसरा धर्मच नाहीं असें म्हटलें पाहिजे. किंबहुना धर्म हा व्यापक शब्द फक्त सनातन वैदिक धर्मालाच अन्वर्थक लागू पडतो. बौद्ध, खिस्त आणि महंमद यांच्या संप्रदायांना जरी आज धर्म असें म्हणण्यांत येतें. तरी त्या संप्रदायाची बरोबरी सनातन वैदिक धर्मातील शैव, गाणपत्य, शाक्त, द्वैत अद्वैत, विशिष्टाद्वैत इत्यादि संप्रदाय करूं लागतील. कोणत्याहि सांप्र-दायिकांना आपल्या मताचा विशिष्ट अभिनिवेश असतो. त्यामुळें इतरांना आपल्या मताची दीक्षा देण्याकरितां त्यांची धडपड विशेष असते. सांप्र-दायिक आग्रही लोकांना स्वमताशिवाय दुसरें मत आवडतच नाहीं. किंबहुना आपल्या पंथाची दीक्षा घेतल्याशिवाय मोक्षसुद्धां प्राप्त होत नाहीं, असेंहि ते प्रतिपादन करूं लागतात. पाणी प्यालें असतां तहान भागते, हें खरें. पण अमुकच विहिरीचें किंवा नदीचें पाणी प्यालें असतां तृषा शान्त होईल असें जर कोणी सांगू लागेल तर तें जितक्या शहाणपणाचें ठरेल तितपतच अमु-कच पंथाची दीक्षा घेतल्यानें मोक्ष मिळतो हें सांगणें शोभणार आहे. सनातन वैदिक धर्माचा पाया हा उच्च तत्त्वावर उभारला गेला असल्या-मुळें आणि तो धर्म तत्त्वनिष्ठ असल्यामुळें व्यक्तिनिष्ठ पंथ किंवा संप्र-दायाप्रमाणें त्याच्या ठिकाणीं अभिनिवेश नाहीं. सनातन वैदिक धर्म हा हा कोणत्याहि देवतेची उपासना करण्यास अथवा कोणतेंहि कर्म करण्यास अधिकार पाहून परवानगी देतो. कर्मामध्यें निष्कामता पाहिजे, तें केवळ कर्तव्यबुद्धीनें केलें पाहिजे आणि उपास्य देवतेवर श्रद्धा पाहिजे, इतकेंच याचें सांगणें आहे.

यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति ।
तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ॥ गी. अ. ७ श्लो. २१

' जो जो मनुष्य ज्या ज्या देवतेची श्रद्धेने पूजा करण्याचें मनांत आणील त्याच्या ठिकाणीं अचल श्रद्धा मीच उत्पन्न करतों, असें भगवान् श्रीकृष्णाच्या मुखानें सांगणारा जगांत एकटाच सनातन वैदिक धर्म आहे. सर्व लोकांनीं एकच आचार, एकच देवता, एकच धर्मतत्त्व मानिलें पाहिजे असा सनातन वैदिक धर्माचा आग्रह नसून विचारस्वातंत्र्यास पूर्ण अवसर देणारा असा हा धर्म आहे. येशूखिस्त आणि महमंद पैगंबर यांच्या संप्रदायाप्रमाणें सनातन वैदिक धर्म हा विशिष्ट संप्रदाय नाहीं म्हणून इतरांना आपल्या पंथाची दीक्षा देणें व आपला संप्रदाय वाढविणें या गोष्टी वैदिक वाङ्मयामध्यें आढळत नाहींत.

सनातन वैदिक धर्माच्या स्वरूपाचा वर सांगितल्याप्रमाणें प्रकार आहे. आतां हिंदू समाजाचा म्हणजे आर्यसंस्कृतीचा इतर संस्कृतीशीं वागण्याचा कसा प्रकार आहे हें पाहूं. जयिष्णु आर्य जेव्हां वसाहत करीत चालले तेव्हां त्यांना निरनिराळे समाज भेटले. त्यांपैकीं बऱ्याच चांगल्या अनार्य संघांचें व व्रात्यांचें आर्यांनीं चातुर्वर्ण्यामध्यें समावेशन करून घेतलें व त्यांना स्वसमाजघटक बनविलें, यांत मुळींच शंका नाहीं. सामवेदाच्या तांड्य ब्राह्मणांमध्ये जशी व्रात्यांची स्तुति आहे तशीच अथर्ववेदसंहितेच्या १५ व्या कांडामध्येंहि आहे. हें कांड गद्यात्मक असून यांत चातुर्वर्ण्यांत आलेल्या इतरांची रहस्यात्मक स्तुति आहे. वेदभाष्यकार सायनाचार्य यांनीं या कांडाची पुढीलप्रमाणें प्रस्तावना केलेली आहे.

अत्र काण्डे व्रात्यमहिमा प्रपञ्च्यते । व्रात्योऽधिकारी व्रात्यो महानुभावो व्रात्यो देवप्रियः ॥ न पुनरेतत् सर्वं व्रात्यपरं प्रतिपादनम् । अपि तु कंचिद्विद्वत्तमं महाधिकारं पुण्यशीलं विश्वसमान्यं कर्मपैरब्राह्मणैर्विदिष्टं व्रात्यमनुलक्ष्य वचनम् इति मंतव्यम् ॥

उपनयनादिसंस्कारविहीन पण पुण्यशील, विश्वसंमान्य, विद्वान् अशा एकाद्या व्रात्याची ही स्तुति आहे, असें सायनाचार्य ' व्रतमर्हतीति व्रात्यः ' या अर्थानें म्हणतात. परंतु असा अर्थ करण्यापेक्षां " व्राते भवः व्रात्यः " म्हणजे संघ करून राहाण्याची कल्पना असणारे लोक असा अर्थ करणें जास्त चांगलें. अशा शूर, धिप्पाड, पराक्रमी लोकांना आर्यांनीं क्षत्रिय करून चातुर्वर्ण्यांत स्थान दिलें असें म्हणवां येतें. भाष्याकाराप्रमाणें ही एक

व्रात्याची स्तुति असें म्हणण्यापेक्षां व्रात्यसंघाची ती स्तुति आहे हेंच म्हणणें जास्त इष्ट दिसतें. या व्रात्यप्रकरणावरून वैदिक आर्य हे कोणत्याही बाह्य संघाचें नुसतें तुजबी राजकीय समावेशन किंवा शुद्ध धार्मिक समावेशन न करतां सामाजिक सामावेशन करीत असत असें म्हणतां येतें. हिंदु समाजांत बाह्यांचा बिलकुल समावेश होत नाहीं व हिंदु समाज हा लखोटबंद आहे असें म्हणतात तें चुक आहे. इतिहाससंशोधक राजवाडे यांच्या भाषेंत बोलावयाचें झाल्यास हिंदु समाज हा मुसलमान समाजाप्रमाणें सरभेसळ, किंवा युरोपियन समाजाप्रमाणें निवडक समावेशन व्यक्तिद्वारा न करितां, जातीद्वारा बाह्याचें समावेशन स्वसमाजांत असामान्य पद्धतीनें करून घेतो. यामुळें हिंदू समाजाचा व बाह्यांचाहि पुढीलप्रमाणें फायदा होतो.

( १ ) मुसलमानाप्रमाणें आपला धर्म बाह्यावर जुलमानें लादण्याची व स्वतःचा समाज दुर्बल करून घेण्याची जरूर राहात नाहीं. ( २ ) युरोपियनाप्रमाणें बाह्याचा समूळ उच्छेद करण्याची किंवा बाह्यांना साक्षात् गुलाम किंवा गुलामवजा बनविण्याची आपत्ति ओढवत नाहीं. ( ३ ) बाह्यांना आपले देवधर्म सोडावे लागत नाहींत. ( ४ ) बाह्यांना आपले आचार विचार मनसोक्त पाळतां येतात. ( ५ ) बाह्यांना आपली भाषा सोडून देणें भाग पडत नाही. (६) बाह्यांना आपल्या गणगोतास मुकावें लागत नाहीं ( ७ ) बाह्याची बीजक्षेत्रशुद्धी यावज्जीवि जशीच्या तशी राहते. ( ८ ) बाह्य शेजारीं ठेवून आर्यांना आपल्या विद्येंत शौचधर्मांत, शास्त्रांत, कलांत व संस्कृतात अप्रतिबद्ध प्रगति साधतां येते. ( ९ ) जातिबद्ध अशा सर्व समाजांत सौख्य, स्थैर्य व समाधान नांदतें. ( १० ) आर्यसंगतीनें व्रात्यांची आस्ते आस्ते बिनबोभाट व अनायासें उन्नति होते. व कालांतरानें त्यांची हिंदुत्वांत गणना होते. हिंदु समाजाचा परक्यांना आपणामध्यें घेण्याचा वरील प्रकारचा स्वभाव आहे. सारांश सनातन वैदिक धर्म हा विशिष्ट व्यक्तिनिष्ठ संप्रदाय किंवा पंथ नसून त्याची भूमिका फार उच्च प्रकारची आहे, हें लक्षांत ठेवून धर्मभ्रष्टांच्या शुद्धीकरणाचा प्रश्न सोडविला पाहिजे.

# बौद्धांचें शुद्धीकरण.

## अध्याय २ रा.

धर्मभ्रष्टांच्या शुद्धीकरणाचा विचार करतांना मुख्य कोणत्या दोन गोष्टी लक्षांत ठेविल्या पाहिजेत याचा विचार पहिल्या अध्यायांत केला. आतां बौद्ध धर्माच्या अमदानींत धर्मभ्रष्टांच्या शुद्धीकरणाची काय स्थिति होती तें पाहूं.

ऋग्वेदकाळापासून ती पाणिनीच्या कालापर्यंत ( खि. पु. १००० ) आर्यसंस्कृतीवर दुसऱ्या कोणत्याहि संस्कृतीचा आघात झालेला नव्हता. आर्यसंस्कृतीवर पाहिला आघात बौद्ध संस्कृतीनें केला. बौद्ध धर्माचा उदय होण्यापूर्वी श्रुति, स्मृति, सूत्रें बीजरूपानें पुराणें एतन्मूलक सनातन वैदिक धर्म वृद्धिंगत होत होता. भारतीय युद्धानंतर आरण्यकीय विचारांना जास्त जोर आला व त्यांतच मूळच्या प्रवृत्तिधर्माविरुद्ध कपिलासारख्या मुनींची विचारसरणी सुरू झाली. जीव, ईश्वर, जगत्, या संबंधानें स्वतंत्र विचार होऊं लागले होतें. अर्थात् या स्वतंत्र विचारांतूनच पुढें षड्दर्शनाची मूलभूत तत्त्वें उत्पन्न झाली. तात्पर्य बौद्ध धर्माच्या उदयापर्यंत धर्मांतरांचा प्रश्न वैदिक संस्कृतीच्या इतिहासांत मुळींच उत्पन्न झाला नव्हता.

गौतमबुद्धाच्या संप्रदायाला विशिष्ट धर्म असें नांव अशोकाचे वेळींच प्राप्त झालें. सर्वसामान्य लोकांना गौतमबुद्ध हा मोठा धर्मसंस्थापक वाटत होता. परंतु वैदिक आर्यांना पाखंडमतप्रवर्तक याच नात्यानें त्याची ओळख होती. गौतमबुद्धाच्या स्वतंत्र विचारानें सहा आस्तिक दर्शनाशीं विरोध करणारीं नास्तिक दर्शनें उत्पन्न झालीं. बौद्धपूर्वकालची सामाजिक स्थिति लक्षांत घेतली तर पितृसावर्ण्य लुप्त होऊन मातृसावर्ण्य नुकतेंच आलेलें होतें. आणि त्रैवर्णिक बाह्य, व्रात्य आणि संकर समाज बराच वाढलेला होता. सावित्रीपतित व्रात्यामध्यें झल्ल, मल्ल, नट, करण, खस, कांबोज यवन वगैरे जसे क्षत्रिय होते, तसेंच करूष, सात्वंत इत्यादि वैश्य होते. जैन व बुद्ध-या दोघानीं स्वतंत्र असा वेदबाह्य व चातुर्वर्ण्यविरोधी मतांची स्थापना करून

शुद्ध त्रैवर्णिकांचा अथवा शुद्ध चातुर्वर्णिकांचा नायनाट करण्याचा सपाटा चालविला. गौतमबुद्धाच्या अनुयायांमध्यें कपिलवस्तूच्या भोंवतालची ऐशीं हजार कुटुंबें आणि कीकट देशांतील कैकाडी हीं होतीं. चातुर्वर्ण्यबाह्य कोळी, कैकाडी, व्रात्य अनार्य व संकर जाति याचाच भरणा बुद्धाच्या अनुयायांमध्यें होता. त्रैवर्णिकांचे ते भानगडीचें यज्ञयाग, शौचधर्म, उपनिषत्‌विचार व इतर सदाचार या सर्वांच्या मुळावर त्यांनीं हल्ला चढविला होता. समाजांतल्या अगदीं खालच्या लोकांना बुद्धाची समता प्रदिपादन करणारीं नीतितत्त्वें तेवढीं समजत असत. अर्थात् बाकीच्या कठीण गोष्टी त्यांना नकोहि होत्या म्हणून बौद्धमताचा स्वीकार महाजनांनीं केलेला नव्हता, अगदीं खालच्या. प्रतीच्या सामान्य जनांनीं तो सांप्रदाय स्वीकारला होता. श्री. कुमारिल-भट्टांनीं श्लोकवार्तिक या ग्रंथांत बौद्धमताचें खंडन केलें आहे.

" चोदनालक्षणोऽर्थो धर्मः " या सूत्रावरील १६३ वें श्लोकवार्तिक पुढीलप्रमाणें आहे.

न चापि स्मृत्यविच्छेदात्सर्वज्ञः परिकल्प्यते ।
विज्ञानाच्छिन्नमूलत्वात्कैश्चिदेव परिग्रहात् ॥ १३ ॥

यांतील " कैश्चिदेव परिग्रहात् " या पदाचा अर्थ पुरुषापसदैः म्लेंच्छैश्च स्वीकारात् असा सांख्यतत्त्वकौमुदीच्या चौथ्या कारिकेंत केला आहे. त्यावरून अधम, ज्यांना शुद्ध बोलतां येत नव्हतें, अशा माणसांनीं बुद्धाचें अनुयायित्व पत्करलें होतें यांत शंका नाहीं. याहिपेक्षां जास्त स्पष्टीकरण श्रीमत् उदयनाचार्य यांनीं केलें आहे. न्यायकुसुमांजलीमध्यें ते म्हणतात—संभवन्ति चैते हेतवो बौद्धाद्यागमपरिग्रहे । तथा हि । भूयस्तत्र कर्मलाघवमित्यलसाः । इतः पतितानामप्यनुप्रवेश इत्यनन्यगतिकाः । भक्ष्याद्यनियम इति रागिणः।स्वेच्छया परिग्रह इति कुतर्काऽभ्यासिनः । पित्रादिक्रमाभावात् प्रवृत्तिरिति पाषांड-संसर्गिणः ॥ × × × आदित्यस्तंभनं पाषाणपाटनं शाखाभंगो भुतावेशः प्रतिमाजल्पनं धातुवाद इत्यादि वंचनात् कुहकवंचिताः। ततस्तान् परिगृण्हतीति संभाव्यते । अतो न ते महाजनैपरिगृहीताः ॥ कांहींच करावयाला नको, कर्म करण्याची जरूरी नाहीं म्हणून आळशी, जगांत त्यांना कोठेंच किंमत नव्हती, अशांचा प्रवेश होत होता. म्हणून अनन्यगतिक पतित; वाटेल तें

खातांपितां येत होते. म्हणून विषयी; पाहिजे तसें वागण्यास आडकाठी नव्हती, म्हणून कुतर्की, व श्राद्धपक्ष करावयास नको म्हणून पाषंडी; असे सर्व प्रकारचे लोक आपल्या विशिष्ट हेतुसिद्धीकरितां गौतमबुद्धाच्या भोंवतीं जमले होते. शिवाय बौद्ध भिक्षु हे किमया करणें, भूतांना बोलावणें, अंगांत भुतें आणणें, झाडें तोडणें, दगड फोडणें आणि सूर्याचा कुंठित करणें असले चमत्कार दाखवीत, त्यामुळें सामान्य जनांना बुद्धानुयायी होण्यांत मौज वाटे. परंतु जडीबुट्टी, जादुटोणा यांना न भुलणारे आणि स्वैराचारांचा निषेध करणारे चातुर्वर्ण्यांतील महाजन बौद्धसंप्रदायापासून अलिप्त होते. असा वरील उताऱ्याचा निष्कर्ष आहे. एवंच त्रैवर्णिकबाह्य समाज आज जसा धर्मांतर करतो तसाच प्रकार त्यावेळींहि होता.

उगमाजवळ नदीचा प्रवाह जसा लहान दिसतो त्याप्रमाणें गौतमबुद्धाच्या हयातींत त्याचे अनुयायी कपिलवस्तूच्या आसपासच पसरले होते. परंतु पुढें अशोक व कनिष्क यांसारख्या राजांनीं दीक्षा घेऊन या मताचा प्रचार सुरू केल्याबरोबर चातुर्वर्ण्यबाह्य समाज बहुतेक बुद्धानुयायी बनला. त्यावेळीं हिंदुस्थानांतील लोकसंख्या आजच्या पेक्षांहि दुपटीतिपटीनें अधिक असावी. हा सर्व प्रचंड जनसमुदाय एकाच राजवटीमध्यें नांदत होता. अशोकासारख्या समदृष्टि राजानें धर्मसमिति भरवून महायानपंथाचा पुरस्कार केल्यामुळें पूर्वींचें बौद्ध धर्माचें स्वरूप नाहींसें झालें व तें वैदिक धर्माशीं मिळतें असें केलें गेलें. बौद्धधर्माच्या उत्कर्षानें जेव्हां भयंकर सर्वव्यापी सामाजिक क्रांति केली त्या वेळीं चातुर्वर्णिकांना मोठा पेंच पडलेला होता. येवढा मोठा बुद्धानुयायी लोकांचा समाज कसा पचनीं पाडावा हा विचार त्या वेळींहि उपस्थित झाला असलाच पाहिजे. बुद्धानुयायी हे मुसलमान लोकांप्रमाणें सर्व बाबतींत अगदीं तुटक राहात नव्हते, तर तत्कालीन हिंदू समाजांतच राहून एकाच राजवटीच्या अमलाखालीं कांहीं विशिष्ट आचार पाळीत असत, इतकेंच दिसतें. बुद्धानुयायांच्याकरितां स्वतंत्र शासनशास्त्र नव्हतें. गौतमबुद्धानें पुष्कळ ब्राह्मणांशीं वाद केले व त्यांना बुद्ध बनाविलें असें म्हणतात. हें शक्यहि आहे. परंतु महाजनांपैकीं एकाद्यानें पाषंड मताचा स्वीकार केला म्हणजे कांहीं त्यानें धर्मांतर केलें असें त्या वेळीं होत नसे. मतस्वातंत्र्यामुळें विचारी मनुष्याचें मतांतर होणें केव्हांहि

असंभवनीय नसतें. चातुर्वर्णिक आर्य आस्तिक दर्शनाचे पुरस्कर्ते, तर बुद्धानुयायी नास्तिक दर्शनाचे अनुयायी होते इतकेंच. गौतमबुद्धाच्या नीतितत्त्वांचा प्रभाव चातुर्वर्ण्यनिबद्ध समाजावरहि झाला फार काय पण बुद्धाचीं नीतितत्त्वें, अहिंसा, संन्यास, आणि त्याच्या अनुयायांतील प्राकृत भाषाहि ब्राह्मणांनीं स्वीकारल्या व बुद्धाची गणना ब्राह्मणांनीं श्रीकृष्णादिकांच्या बरोबरीनें दशावतारांत केली आणि ओढवलेल्या विपत्तीचें परिमार्जन केलें. त्या कालीं चातुर्वर्ण्यविरुद्ध, विशेषतः ब्राह्मणाविरुद्ध सर्व जग उलटलें होतें. अशा दुरवस्थेमध्यें कांहीं स्वीकार व कांहीं त्याग करून बौद्ध समाजाला चातुर्वर्णिकांनीं पचनीं पाडिलें,संकर जातींना निराळी वृत्ति दिली,आणि गौतमबुद्धाच्या मूळ तत्त्वांत फरक करून महायानपंथ सनातन वैदिक धर्माच्या तत्त्वांशीं मिळता असा केला.

कोणताहि नवीन पंथ किंवा संप्रदाय उत्पन्न झाला म्हणजे सामान्य जन त्याचे अनुयायी होतात. गौतमबुद्धाच्या वेळीं हाच प्रकार होता. महाजनांनीं या पाषंड मतांत शिरूं नये, म्हणून आर्यचाणक्यापासूनच बौद्धमतखंडण चाललें होतें. दिङ्नाग, धर्मकीर्ति या बौद्ध ग्रंथकारांचे, आणि उद्योतकराचार्य, कुमारिल, उदयानाचार्य, ईश्वर कृष्ण यांचे झगडे चाललेच होते. बौद्ध व जैन एका बाजूला व वैदिक पंडित दुसऱ्या बाजूला अशी स्थिति होती. वैदिक पंडितांनीं बौद्धमतांतील तत्त्वांवर हल्ल्यांवर हल्ले चढवून त्यांवर आपली छाप बसविली. शेवटीं कुमारिलभट्टांनीं वैदिक धर्माच्या आचार अंगाचें म्हणजे विधीचें पुनः संस्थापन केलें. त्यानंतर श्रीशंकराचार्यांनीं वैदिक तत्त्वज्ञानाची त्यावर भव्य इमारत उठविली. वैदिक पंडितांच्या प्रयत्नाला प्रथम शुंग घराण्यांतील व पुढें गुप्त घराण्यांतील राजांनीं मोठाच आश्रय दिल्यामुळें हां हां म्हणतां सनातन वैदिक धर्माची ध्वजा पुनः फडकूं लागली. श्रीशंकराचार्यांनीं पुष्कळ पाखंड्यांचें खंडण करून त्यांच्याकडून मतांतराचा त्याग करविला व स्वधर्मदीक्षा दिली, अशीं वर्णनें श्रीशंकरदिग्विजयामध्यें आहेत. त्यांवरून बौद्धधर्माच्या अमदानींत धर्मांतराच्या किंवा समाजांतराच्या प्रश्नापेक्षां मतांतराचा प्रश्नच जोरांत होता आणि अशा पाषंड मतांचें तात्त्विक खंडण वैदिक पंडित करीत होते यांत शंका नाहीं. गौतमबुद्धाच्या सर्व-

निबंध ... २८।८८

व्यापी सामाजिक क्रांतीतून जो हिंदु समाज सुरक्षित राहिला, इतकेंच नव्हे तर ज्यानें स्वतः जिवंत राहून बौद्धानुयायांना हिंदु केलें, त्याच्या जिवटपणाचीं कारणें काय आहेत हें वाचकांच्या लक्षांत वरील विवेचनावरून आलें असेलच. तात्पर्य, १ बौद्धधर्म हा धर्म नसून एक पाखंड मत होतें, म्हणून त्याच्यावर पंडितांनीं हल्ले केले व महाजनांना त्याचें यथार्थ स्वरूप समजाऊन दिलें. २ सामान्य जनांवर नीतितत्त्वांचा पगडा चांगला बसतो. म्हणून त्यांनीं त्यांचा स्वीकार केला. ३ शुंग, गुप्त अशा राजघराण्यांनीं पाखंड मतांची उचलबांगडी करण्यास साहाय्य केलें आणि बौद्ध आणि वैदिक धर्मानुयायांना एकाच शासनशास्त्रानें समत्वानें वागवून त्यांच्यांत एकरूपता आणली. ४ महायान पंथांतील तत्त्वें व आचार वैदिक आचाराशीं अगदीं मिळते असल्यामुळें या दोनहि धर्माच्या अनुयायांच्या आचारामध्येंहि एकत्व आलें. चातुर्वर्ण्यबाह्य व्रात्य, अनार्य व संकर या समाजांचें त्यांना निरनिराळ्या वृत्त्या व कामें देऊन म्हणजे सर्व सामाजिक हक देऊन आपल्या समाजांत समावेशन केलें. याप्रमाणें हिंदुस्थानांतच उत्पन्न झालेल्या व हिंदुस्थानांतच वाढलेल्या अशा एका पाखंड धर्माचा किंवा संप्रदायाचा समाज आर्यसंस्कृतीनें आत्मसात् केला.

# मुसलमानांचें शुद्धीकरण.

## अध्याय ३ रा.

गेल्या अध्यायांत बौद्धमतानुयायी समाजाला हिंदु समाजानें आपणामध्यें कसें समाविष्ट करून घेतलें आणि सर्व बौद्ध समाज कसा हिंदु बनविला याचें दिग्दर्शन केलें. आतां मुसलमानांचे एकावर एक हल्ले व स्वाऱ्या होऊन त्यामुळें हिंदुस्थानांत जो कहर झाला व पुष्कळ हिंदूंना त्यानीं जुलमानें मुसलमान केलें त्या भागाकडे वळूं.

मुसलमानी पंथाचा संस्थापक इ० स० ५७० त जन्मला व ६३२ त वारला. ६६४ त मुसलमानांची हिंदुस्थानांवर पहिली स्वारी झाली. त्य

स्वारींत बरीच नासधूस व लुटालूट करून हे आरब लोक परत गेले. त्यानंतर इ. स. ७११ त दमास्कसच्या खलिफाचा सेनापति महमद कासीम यानें आरब सैन्यानिशीं हिंदुस्थानावर स्वारी केली. या वेळीं सिंध प्रांतांतील काहीं भागावर दाहीर या नांवाचा राजा राज्य करीत होता. या स्वारीचें धार्मिक व राजकीयदृष्ट्या फार महत्त्व आहे. इराणांतील एका व्यापाऱ्याचीं संपत्तीनें भरलेलीं जहाजें सीलोनहून इराणाकडे जात असतां वाटेंत तीं सिंध प्रांतांतील चांचे लोकांनीं लुटलीं आणि त्यांतील स्त्री–पुरुष यात्रेकरूंना त्यांनीं कैद केलें. याबद्दल इराणच्या हजाज नामक सुभेदारानें दाहीर राजा-कडे तक्रार केली. परंतु दाहीर यानें नीटसा बंदोबस्त न केल्यामुळें महमद कासीम हा चाल करून आला. त्यावेळीं सिंध देशांत देवाल किंवा देवाल-देवल या नांवाचें व्यापाराचें मोठें ठिकाण होतें. कासीम यानें येऊन एक-दम या देवल बंदरावरच तोफांचा मारा सुरू केला. देवल शहरांतील एका मंदिराच्या कळसावर एक उंच ध्वज फडकत होता. तो शाबूत आहे तोंपर्यंत त्या शहराला भीति नाहीं अशा खुळ्या समजुतीवर तेथील लोक मंत्रतंत्र व जादूटोणे यांच्या योगानें प्रतिकार करण्यांत गुंतलेले होते. कासीमनें पहिल्यानेंच तो कळस उडविला व सर्व शहर हस्तगत केलें. नगरांतील सरसकट सर्व पुरुषांची त्यानें कत्तल केली व शेंकडों स्त्रियांना त्यानें दासी बनविलें. संपत्तीची लूट तर केलीच, शिवाय पुष्कळ लोकांना खुषीनें किंवा जबरीनें मुसलमान केलें. महमद कासीमच्या या स्वारीचें साग्र वृत्त देण्याचें हें स्थळ नव्हे. * इतकेंच सांगावयाचें कीं, कासीम यानें नेरून, शिबिस्थान, ब्राह्मणाबाद, आलोर वगैरे शहरें काबीज करून सर्वत्र धुमाकूळ घातला, पुष्कळ लूट मिळविली व पुष्कळांना मुसलमान करून तो परत गेला.

झालें, येथूनच मुसलमानांच्या धक्काबुक्कीला सुरुवात झाली. गझ-नीच्या महमुदानें पुढें हिंदुस्थानावर द्रव्यलोभानें सतरा स्वाऱ्या केल्या. महमद घोरीला तर हिंदुस्थानांत कायमचें राज्य स्थापन करण्याची इच्छा

---

* जिज्ञासूंनीं चिंतामणराव वैद्यांच्या मध्ययुगीन भारताच्या पहिल्या भागांत तें अवश्य पाहावें.

उत्पन्न झाली. ती त्याचा सरदार कुतुबुद्दीन ऐबक यानें परिपूर्ण केली. गुलाम घराण्यापासून लोदी घराण्यापर्यंत निरनिराळ्या घराण्यांच्या सुलतानांनीं राज्यें केल्यावर पुढें मोंगल बादशहा हिंदुस्थानावर अधिराज्य करूं लागले. दक्षिणेंत बहामनी राज्य, त्याच्यापुढें झालेल्या पांच शाह्या; याशिवाय काश्मीर, बंगाल, माळवा, खानदेश, जोधपूर, मुलतान, सिंध, गुजराथ, इतक्या ठिकाणीं मुसलमानांचीं लहान पण स्वतंत्र राज्यें होतीं, म्हणजे जवळ जवळ सर्व हिंदुस्थान मुसलमानी सत्तेच्या अंकित झालेला होता. बौद्ध पंथाला धर्म हें नांव मिळून त्याचा प्रसार अशोक व कनिष्क या सम्राटांच्या आश्रयामुळें जसा झाला तसाच प्रकार मुसलमानी धर्माचा झाला. मुसलमानांमध्यें धर्मवेड फार! त्यांतून काफिरांना जिंकून लुटावें व त्यांना धर्मदीक्षा द्यावी असा जयिष्णु वृत्तीचा त्यांच्या पैगंबराचा उपदेश! त्यांत हिंदुस्थानची सर्व सत्ता त्यांच्या हातात आल्यावर त्यानीं किती अनन्वित प्रकार केले असतील, किती लोकांना बाटवलें असेल, किती लोकांची कत्तल केली असेल याचा पुरावा इतिहासामध्यें आहेच.

जुलमानें ज्यांनीं मुसलमानी धर्माची दीक्षा घेतली अशा लोकांच्या शुद्धीकरणाचा प्रश्न त्यावेळीं पुढें आला होता यांत शंका नाहीं. शुद्धीकरणाचे प्रयत्न मुसलमानी रियासतींत बरेच झाले असले पाहिजेत यांत शंका नाहीं. पहिला मोठा प्रयत्न सिंध देशांतच झाला व तो महंमद कासीमच्या स्वारीनंतर अवघ्या दहावीस वर्षांतच झाला ही मोठया अभिमानाची गोष्ट आहे. सिंध देशांतील शुद्धीकरणाचा प्रयत्न पूर्वपरंपरा, शास्त्र, परिस्थिति हीं लक्षांत घेऊन देवल नांवाच्या ऋषीनें स्मृति रचून केला हें पक्कें लक्षांत ठेविलें पाहिजे.

## देवलस्मृति

हिंदुस्थान जरठ आहे, त्याच्यांत जिवंतपणा नाहीं, परिस्थितीप्रमाणें विचार करण्याची पात्रता नाहीं असे जे सुधारक लोक आक्षेप घेतात ते निर्मूळ आहेत असें देवलस्मृतीवरून ठरतें. नवीन स्मृतिकार उत्पन्न झाले पाहिजेत असें जें हल्लीं म्हणण्यात येतें त्यास देवल ऋषींनींच नवीन स्मृति करून परिस्थितीप्रमाणें धार्मिक व सामाजिक प्रश्न सोडविण्यास इ. स. च्या आठव्या शतकांत प्रारंभ केलेला आहे. धर्मशास्त्रप्रयोजक अलीकडे मात्र शासन

शास्त्र निर्माण करीनासे झाले, ते निद्रिस्त झालेले आहेत.त्यांना जागें करून नूतन शासनशास्त्र निर्माण करण्याचा मध्यंतरीं बंद पडलेला परिपाठ सुरू केला पाहिजे. देवलस्मृति ही महंमद कासीमच्या स्वारीनंतरचीच आणि देवल ऋषीहि तेथलेच असें ठरवितां येतें. सिंध देशांत यावेळीं त्या बंदराचें नांव " देबाल " असें हिंदी भाषेंत उच्चारलें जात होतें. 'व' बद्दल 'ब'कार उच्चारण्याचा हिंदी भाषेंत परिपाठ आहे. वासुदेव-बासुदेव, विष्णु-बिष्णु असे उच्चार अद्यापि करण्यांत येतात. अर्थात् त्या बंदरांचें नांव देवाल-देबाल-देवल असेंच होतें. आणि देवल स्मृतींत ज्या विषयाचा ऊहापोह केला आहे तो पाहिला म्हणजे देवल बंदरांत राहणाऱ्या ब्राह्मणांशिवाय हा धर्मभ्रष्टांच्या शुद्धीकरणाचा प्रश्न इतर ठिकाणीं पुढें येणें अशक्य होतें. त्यावेळीं दळणवळणाचीं साधनें आजच्यासारखीं नव्हतीं, म्हणून ही स्मृति काशीक्षेत्रांतल्या पंडितांनीं तावडतोब केली हेंहि संभवत नाहीं.

शिवाय देवलस्मृतीचा प्रारंभ पाहिला तर सर्वच शंका नाहींशा होतात.

सिंधुतीरे सुखासीनं देवलं मुनिसत्तमम् । समेत्य मुनयः सर्वे इदं वचनमब्रुवन् ॥ १ ॥

भगवन् म्लेंच्छनीता हि कथं शुद्धिमवाप्नुयुः । ब्राह्मणाः क्षत्रिया : वैश्याःशूद्राश्चैवानुपूर्वशः ॥ २ ॥

कथं स्नानं कथं शौचं प्रायश्चित्तं कथं भवेत् । किमाचारा भवेयुस्ते तदाचक्ष्व सविस्तरम् ॥ ३ ॥

या श्लोकांतील ' सिंधुतीरे ' या पदाचे अर्थ सिंधूनदीच्या तीरावर, किंवा समुद्रकांठीं असे होतात. दोनहि अर्थ आम्हांस इष्टच आहेत. पुराणामध्यें सिंधुदेश असें नांव आहे, अशी शंका पुढें आल्यास उत्तर इतकेंच कीं, कोंकणांत या वेळीं महमद कासीमप्रमाणें कोणीहि कहर केला नव्हता.

कोंकण किनाऱ्याशीं अरबांचा फक्त व्यापारी संबंध होता. जंजिऱ्याच्या शिद्दीचा जुलूम हा पुढच्या काळांतला आहे. तात्पर्य, सिंधुदेश किंवा सिंधुतीर म्हणजे कोंकणप्रांत नसून दाहीर राजाचा सिंधदेशच होय. देवलस्मृतींत ' म्लेंच्छैश्च नीता ' ' म्लेंच्छान्न, ' म्लेंच्छीकृत ' असे प्रयोग पुष्कळ आहेत,

( टीप ) + यावरून आठव्या शतकांतही क्षत्रिय वैश्य होते, मग कलीची काय वाट !

त्यावरून म्लेंच्छ म्हणजे मुसलमान नसून शक, यवन, हूण, पल्लव, बाल्हीक कुशान हे मध्यएशियांतील भटके लोकच होत असेंहि कोणी म्हणतील. कारण, हिंदुस्थानावर यांच्या स्वाऱ्या इ. स. पूर्वी दुसऱ्या व तिसऱ्या शतकांत झालेल्या होत्या, इतकेंच नव्हे, तर युएची उर्फ परकी कुशानघराण्यानें हिंदुस्थानावर साम्राज्यही केलें होतें. परंतु या परक्या लोकांच्या स्वाऱ्या महमद पैगंबराच्या जन्मापूर्वी व त्याचा पंथ अस्तित्वांत येण्यापूर्वी पांचसातशें वर्षांच्या आहेत. त्यांतील असीरिया–असुरिया देशांतील असुर सोडून दिले तर बाकीचे शक, पल्लव, बाल्हीक, मेद, हूण, यवन वगैरे आयुधजीवी संघांचे आचार आर्यसम व आर्यसदृश होते. अर्थात् त्यांच्यामध्यें महमद कासीमानें ज्या अभिनिवेशानें सिंधुदेशावर थैमान घातलें तितका धर्माचा अभिनिवेश या लोकांत नव्हता. या परक्या क्षत्रियांनीं हिंदुस्थानावर राज्यें केलीं, परंतु जुलमानें धर्म लादण्याचें उदाहरण घडलेलें नसून मिनॅंडरसारख्या क्षत्रियानें बुद्धधर्माची दीक्षा घेतल्याचें उदाहरण आढळतें. निष्कर्ष इतकाच कीं, पहिला हिंदु मिशनरी किंवा धर्मभ्रष्टांचें शुद्धीकरण करणारा सिंधुदेशांतील देवल ऋषि हाच होय. या मुनीवर्यानें धर्मभ्रष्टाना जीं प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत तीं पुढें येणार असल्यामुळें त्यांचा उहापोह येथें करीत नाहीं. परंतु दशादिविंशतिं यावत्तस्य शुद्धिर्विधीयते ॥ श्लो. ५२ या श्लोकावरून देवलस्मृति ही ७२१ ते ७३१ च्या दरम्यान झाली असावी असें अनुमानितां येतें. देवलऋषीनंतर कोणकोणते स्मृतिकार किंवा कोणकोणत्या संस्था शुद्धीकरणाचें कार्य करीत होत्या हें उपलब्ध नाहीं. परंतु या अनुपलब्धिप्रमाणावरून शुद्धीकरणांच्या कार्याचा अत्यंत अभाव होता असें म्हणता येत नाहीं. पैठण, काशी अशा क्षेत्रांमध्यें शुद्धीकरणाचेंच कार्य त्यावेळीं चालत असलें पाहिजे. हल्लींच्या क्षेत्रस्थ ब्राह्मणांना जरी मरगळ आलेली असली तरी पैठणच्या ब्राह्मणानीं बहिरंभटाला शुद्ध करून घेतलें असें भक्तिविजयांतील ४४ व्या अध्यायावरून निश्चित सांगतां येतें. तसेंच वसईजवळच्या निर्मळ क्षेत्राच्या आसपासच्या ब्राह्मणांनीं पोर्तुगीज लोकांनीं ख्रिस्ती केलेल्यांना शुद्ध करून घेण्याचा धडाका चालविला होता, असें इतिहासकार सरदेसाई ब्रिटिश रियासतींत लिहितात. हल्लींच्या ब्राह्मणांना हा उतारा बोधप्रद असल्यामुळें तेवढा देऊन हा अध्याय संपवितों.

" बाटून खिस्ती झालेल्या हिंदु लोकांस परत स्वधर्मात घेण्याचे अनेक प्रयत्न तत्कालीन ब्राह्मणांनीं केलेले आहेत. अशा लोकांस आपल्या पिढीजाद धर्मात परत येण्याबद्दल ते उपदेश करीत, इतकेंच नाहीं तर गोकुळ–अष्टमी वगैरेसारख्या मोठ्या मेळ्यांचे दिवशीं बाटलेल्या लोकांस समुद्रस्नान अगर गंगास्नान घालून शुद्ध करून घेत. अशा पवित्र दिवशीं गंगास्नान केल्यानें सर्व पातकांचें जसें क्षालन होतें, तसें क्रिस्त धर्म स्वीकारून व्हावयाचें नाहीं, असा शास्त्राधार ते सर्व लोकांस पटवीत. हीं ब्राह्मणांची युक्ति पाहून पाद्र्यांचें पित्त खवळून जाई; व त्यांचा उद्योग बंद पाडण्याकरितां ठाणें, वसई, मुंबई वगैरे ठिकाणच्या खाड्यांच्या व समुद्राच्या कांठीं त्यांनीं खांबावर जिकडे तिकडे क्रूस रोवून ठेविले होते. असें झालें म्हणजे क्रूस रोविलेला नसेल अशा ठिकाणीं जाऊन ब्राह्मण आपला मेळा भरवीत. शेवटीं खिस्त्यांच्या जाचास त्रासून त्यांनीं वसईनजीक रानांत एक तलाव शोधून काढला. तेथें कांहीं दिवस ब्राह्मणांचें शुद्धीकरण गुप्तपणें चालू होतें. पुढें तें उघडकीस आल्यावर पोर्तुगीज शिपायांनीं ब्राह्मणांवर हल्ला करून त्यांस हुसकून दिलें. त्या वेळीं एक बैरागी एकदां खिस्ती होऊन पुनः हिंदु झालेला निर्भयपणें ( पाद्र्यांच्या ) फौजेच्या समोर एकटा उभा राहिला. तेव्हां तर त्या खिस्त्यांचें पित्त जास्तच खवळून त्यांनीं त्या जागेचा विध्वंस केला व गाई मारून त्यांचें मांस व रक्त तलावांत व बाजूस शिंपडून ती जागा अपवित्र केली. " ( आगष्ट १५६४, पान १८३-१८४ ). देवल ऋषि, पैठणचे ब्राह्मण व निर्मळ क्षेत्रांतील ब्राह्मण यांनीं राजाश्रयावर अवलंबून न राहतां स्वातंत्र्यानें वर्णगुरु या नात्यानें शुद्धीकरणाचें कार्य केलेलें आहे. अर्थात् धर्मभ्रष्टांना शुद्ध करून घेण्याचें कर्तव्य आधीं ब्राह्मणांचें, नंतर शंकराचार्यांचें व शेवटीं राजाचें असें ठरतें. या प्रकरणासंबंधीं एका शंकराचार्यांचें आज्ञापत्र व भक्तिविजयांतील भागहि पुढें परिशिष्टांत दिला आहे तो वाचकांनीं अवश्य पाहावा.

———

# स्वराज्यांतील शुद्धीकरण.

## अध्याय चौथा

मुसलमानांचा चांद सर्वत्र फडकूं लागल्यावरहि सर्व हिन्दुस्थान मुसलमान करण्याची मुसलमानांची महत्त्वाकांक्षा सफल झाली नाहीं. परंतु हिंदूंचा पुष्कळ संहार झाला आणि हिंदुस्थानांत पांचसात कोटी मुसलमानांची वस्ती कायम होऊन बसली. मुसलमान सुलतान व मोंगल बादशहा यांच्यापैकीं हिन्दुमुसलमान समाज धार्मिक आचारानें व बेटीव्यवहारानें एक करण्याची कल्पना फक्त अकबर बादशहाच्या ठिकाणीं दिसत होती. त्यानें 'दिने इलाहि' या नांवाचा एक स्वतंत्र पंथ, सर्व धर्मांतील चांगल्या चांगल्या गोष्टी निवडून तयार केला होता. त्यांत मुसलमानांतील सुन्ता व बहुपत्नीत्व, ख्रिस्तांमधील बाप्तिस्मा व येशूची उपासना, हिंदुधर्मांतील पुनर्जन्म व आत्म्याचें श्रेष्ठत्व, पारशी लोकांतील अग्निपूजा, इत्यादि विषयांची गोळाबेरीज होती. अकबरच्या रजपूत व मुसलमानी राण्या असल्यामुळें व दरबारांत वजनदार हिंदुमुसलमान मुत्सद्दी व सेनापति असल्यामुळें या उभयतांना खूष करण्याचा हा त्याचा प्रयत्न होता. रजपुतांच्या सामान्य दर्जाच्या कन्यांशीं बादशहाचे विवाह झाले. तथापि रजपुतांनीं मात्र मुसलमान मुलींचें पाणिग्रहण केलें नाहीं. शिवाय जहांगीरच्या कारकीर्दींत नूरजहानचें व शहाजहानच्या कारकीर्दींत मुमताजचें वर्चस्व झाल्यामुळें अकबराचें जुनें धोरण बदललें व पुन: इराणी धोरण सुरू झालें. अकबराचें धोरणच जर पुढें राहिलें असतें तर आज हिंदु व मुसलमान या दोन समाजांचा कांहीं निराळाच प्रकार दिसला असता. म्हणजे मध्यंतरीं मुसलमान झालेले आर्य पुनः आर्यांत मिसळले असते. फक्त असीरियांतील कांहीं थोडे-बहुत असुर मुसलमान हिंदुस्थानांत राहिले असते इतकेंच.

मुसलमानी सत्तेशीं टक्कर देणारे राजपुतान्यांतील रजपूत व महाराष्ट्रांतील मराठे हे होत. त्यांतल्यात्यांत मेवाडचे रजपूत हेच काय ते अखेर-

पर्यंत मुसलमानांशीं स्वाभिमानानें वागले. महाराष्ट्रांत रामदास व शिवाजी या ब्रह्मक्षत्र तेजांनीं इस्लामाचा प्रतिकार करून हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. स्वराज्य ही एक अजब चीज आहे. स्वातंत्र्य ही एक मोठी ईश्वरी देणगी आहे. याचा अनुभव ज्याला असतो तोच त्याची किंमत जाणतो. स्वराज्य हातीं आल्यावर म्हणजे सर्व व्यवहार, आचार व प्रायश्चित्त यांची सत्ता हस्तगत झाल्यावर काय पाहिजे तें करतां येईल. धर्म म्हणजे शासनशास्त्र व तें अमलांत आणण्याची सत्ता म्हणजे स्वराज्य होय. शिवाजीच्या कालांत धर्मभ्रष्टांच्या सरास शुद्धीकरणाचा कायदा पसार झाल्याचें दिसत नाहीं. याचें कारण महाराष्ट्रांतील त्या वेळचा मुसलमान समाज क्षूद्र व उपेक्षणीय होता. हें असावें, असें दिसतें. महाराष्ट्रांतले सर्व मुसलमान त्या वेळीं अवघे एक लक्ष होते. ते सर्व दक्षिणी असून मराठाळलेले होते. त्यांच्या ठिकाणीं उत्तरेकडील इराणी-अफगाणाप्रमाणें कडवेपणा राहिला नव्हता. अर्थात् समर्थशिवाजीसारख्या दूरदृष्टि शक्तींना हा क्षुद्र समाज पचनीं पाडणें अशक्य वाटलें नसावें.

कायद्याच्या जोरावर सर्व मुसलमानांना हिंदु करून घेणें हें त्यावेळीं सुलभ कोटींत होतें.शिवशाईंत धर्मभ्रष्टांच्या शुद्धीकरणाचा कायदा जरी दिसत नाहीं, तथापि ब्राह्मण व मराठे सरदार यांना शुद्ध करून घेतल्याचीं ठळक ठळक उदाहरणें आहेत. चातुर्वर्ण्याच्या दृष्टीनें पाहिल्यास महाराष्ट्रांत त्या वेळीं ब्रह्मक्षत्र म्हणजे ब्राह्मण आणि मराठे हेच प्रमुख दिसतात. वैश्यवर्ण महाराष्ट्रांत त्या वेळीं फारसा नव्हता, हें मारवाडी व गुजर यांनीं व्यापार बळकावल्यावरूनच सिद्ध होत आहे.त्रैवर्णिक सोडून दिले तर कोळी कैकाडी शूद्रांचा शुद्रसदृश्यांचा, व अस्पृश्यांचा काय तो समाज शिल्लक राहतो. हे समाज त्या काळीं मंद, मुमूर्षु व स्तब्ध असे होते.मुसलमानांना बाटविण्यास पुरुष व निका लावण्यास बायका या खालच्याच मुमुर्षु समाजांतून मिळत. यावरून महाराष्ट्रांतील बहुतेक मुसलमान समाज निकृष्ट अशा आर्यानार्थ अंत्यजांचा व शुद्ध अनार्यांचा आहे. अंत्यज व अनार्य समाजांतील कांहीं मुसलमान झाले काय किंवा बाटून मुसलमान झालेल्यांना परत हिंदूंत घेतलें काय, कांहीं केलें तरी संख्या फुगण्यापेक्षां त्यांत कांहीं अर्थ नाहीं, असेंच विचारवंतांना वाटलें असावें. भ्रष्ट झालेला हिंदु समाज पुनः हिंदु करून

सामर्थ्य वाढण्याचा संभव असता तर ती गोष्ट विचारवंतांनीं केलीच असती, हें निंबाळकरांच्या शुद्धिकार्यावरून स्पष्टच होतें. खानदानीच्या वृत्तिवंत मराठ्यांना वतनें मिळविण्याकरितां व तीं राखण्याकरितां मुसलमान व्हावें लागलें. परंतु अशांची संख्या अल्पस्वल्प होती. या अल्पस्वल्पांपैकीं बऱ्याच ब्राह्मणांना व मराठ्यांना पुनः स्वधर्मात घेतलें, यांत शंका नाहीं. त्यांतीलच एक निंबाळकर होत.

## निंबाळकरांची शुद्धि.

फलटणचे बजाजी नाईक निंबाळकर यांस आदिलशहानें पकडून मुसलमान झाल्यास मोठी जहागीर देऊं, नाहींतर असलेलें वतनहि जप्त करूं अशी धमकी दिली. ४०० वर्षें उपभोगिलेलें वतन बुडवून पोराबाळांच्या अन्नांत माती कालविण्याचें धाडस बजाजीच्यानें होईना. म्हणून त्यानें शहा जर आपली मुलगी देत असेल तर मी मुसलमान होतों, असें कबूल केलें. त्याप्रमाणें लग्न होऊन बजाजी मुसलमानहि झाला. निंबाळकरांचा भोसले घराण्याशीं फार ऋणानुबंध होता. त्यामुळें त्यानें अप्रशस्त कृत्य केल्याचा पस्तावा झाल्याचें मातुश्री जिजाईस कळविलें, तें ऐकून मातुश्री जिजाईस फार वाईट वाटलें. कारण पिढीजात संबंध असलेल्या या निंबाळकरांच्या घराण्यामुळेंच शहाजी व शिवाजी एवढ्या योग्यतेस चढले होते. तिनें समस्त मराठा मंडळ बोलावून " आपत्प्रसंगामुळें नाईकांकडे कांहीं दोष नाहीं. " असें जाणून शास्त्राधारें त्यास शुद्ध करून गोतांत घेतलेंच; शिवाय निंबाळकराविषयीं कोणताहि किंतु मनांत येऊं नये म्हणून शिवाजीची मुलगी सखूबाई ही जिजाबाईनें निंबाळकरांच्या थोरल्या मुलांस दिली! हें शुद्धि-प्रकरण इतिहासज्ञांस माहीत आहेच. पण शास्त्री, वैदिक, पुराणिक व जुने कर्मठ लोक यांना इतिहास नसतो. म्हणून त्यांनीं वरील शुद्धिकार्यावरून अवश्य तो बोध घ्यावा. अडीचशें वर्षांपूर्वी जिजाईसारख्या एका बाईनें पुढाकार घेऊन आपत्प्रसंगीं एकाद्यास परधर्म स्वीकारावा लागला तरी पुनः स्वधर्मात घेण्यास कांहींच हरकत नाहीं, हें शास्त्र शिकविलें, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. जिजाबाईप्रमाणें पेशव्यांच्या बायकांनींहि अशाच प्रकारचीं ग्रामण्यें तेथल्यातेथें मिटविल्याचीं उदाहरणें आहेत. निंबाळकरांच्या शुद्धी-

सारखीं आणखी कांहीं प्रकरणें आहेत. त्यांचा अभिनिविष्ट लोकांनीं आस्थेनें विचार करावा, म्हणून सरकारतर्फे प्रसिद्ध झालेल्या पेशव्यांच्या रोजनिशींतून २।३ उतारे व राजवाडे यांच्या आठव्या खंडांतील एक आज्ञापत्र येथें देतों. या आज्ञापत्रावर पुष्कळ सह्या आहेत. त्यांतील दोन वाईकर अष्टपुत्रे यांच्या आहेत.

बाटलेल्या ब्राह्मणांस व मराठ्यांस शुद्ध करून घेतलें.

( ३७३ ) " ज्यास आज्ञा केली ऐसिजे, तुम्हीं विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट झालें, पुताजी बिन मुधोजी वाडघर चौगुला कसबा जिती तर्फ चांभारगोंदें, पेराशी दावलजी सोमवंशी यांजकडे चाकर होता. लष्कराबरोबर सुरत प्रांतीं गेला, तेथें मोंगलास हस्तगत झाला. मोंगलानें त्यांस भ्रष्ट केला वर्ष सव्वावर्ष मोंगलांचे सेनेंत होता. राजश्री बाळाजी पंडित प्रधान दिल्लीहून आले ते समयीं पळोन लष्करांत मिळोन गांवास आला. आपली हकीगत सांगितली. ते समस्त गोत बसोन मनास आणून सदरी गोतांत घ्यावें असें गोताचें मत झालें आहे. स्वामी आज्ञा करतील.

याप्रमाणें वर्तणूक करणें म्हणून लिहिलें तें विदित झालें. ऐसीयास पुताजी मजकूर याजवर मोंगलानें बलात्कार करून भ्रष्ट केलें. हा कांहीं संतोषें भ्रष्ट जाहला नाहीं. याकरितां त्यास गोतामध्यें घ्यावयाची आज्ञा केली आहे. तरी समस्त गोत मिळोन शास्त्राप्रमाणें शुद्ध करून गोतामध्यें घेणें आणि पूर्ववत् वर्तन करणें म्हणून पत्र सदरहु वतनदारांस सादर केलें.

(३९९) " राणोजी धुमाळ पाटील मौजे सोनके संमत वाघोळी प्रांत वाई यानें बटीक बनाम उदी अंबाजी निकम सांजमळी मौजे पाटार प्रांत मजकूर येथें विकत घेतली. चार वर्ष त्याचे घरीं आहे. अंबाजी निकम कोणीकडे गेला याचा थांग न लागे. ती हैबतजी सरक वस्ती मौजे तांबव प्रांत फलटण याची मातोश्री मुधोजी नाईक निंबाळकर यांच्या घरास गेली. तेथून काढून अंबाजी निकम यानें आणून विकली. ती हैबती सरक यानें आपली उमगली आणि राणोजी पाटीलपासून नेली. परंतु त्यानें सांगितलें कीं, ती बटीक बाटगी मुसलमानाचा अन्नव्यवहार केला होता असें सांगितलें. यावरून राणोजी पाटील यांस प्रायश्चित्त द्यावयाविषीं पत्रें "

( २८४ ) राजश्री संताजी आटोळे धुरंधर समशेरबहादुर यास आज्ञा कीं, तुळजोभट जोशी मौजे देऊळगांव परगणे घाटबेरी यास यवनांनीं मोहन घालून बाटाविले. कांहीं दिवस त्यांचे सहवासी होता. त्यानंतर देहावरी येऊन पश्चात्ताप होऊन क्षेत्र पैठण येथें ब्राह्मणसभेस उभा राहून आपला अपराध क्षमा करून ब्राह्मणांत घेतलें पाहिजे म्हणून बजीद झाला. यावरून समस्त ब्राह्मणांही शास्त्रार्थ मनासीं आणता अनुताप झाला, त्यास प्रायश्चित्त देऊन ब्राह्मणांत घ्यावा असा निर्णय झाला. त्या उपरी समस्त ब्राह्मणांनीं तुळजोभटास प्रायश्चित्त देऊन शुद्ध करून पंगतीपावन केला. आणि समस्त ब्राह्मणांस परगणे मजकुरच्या शुद्धपत्र करून दिलें आहे. तर तुम्ही परगणे मजकुरच्या देशमुख देशपांडे यांस व समस्त ब्राह्मणांस ताकीद करून तुळजोभटास पंगतीपावन करणें. पैठणच्या पत्रास कोणी जो दिगर करील त्यास तो दिगर करावयास प्रयोजन नाहीं म्हणून पत्र १ तीथवार छ. मजकूर. ”

पेशव्यांच्या रोजनिशींतील वरील उताऱ्यांसारखे पुष्कळ उतारे देतां येतील. परंतु धर्मभ्रष्टांच्या शुद्धीकरणाची कल्पना येण्यास एवढे उतारे पुरेसे आहेत. याहीपेक्षां छत्रपति संभाजी महाराज यांच्या कारकीर्दींतील एक आज्ञापत्र फारच विचारार्ह असें आहे. त्याजवर बऱ्याच ब्राह्मणांच्या व इतर अधिकाऱ्यांच्या सुमारें २३–२४ सह्या आहेत. तें आज्ञापत्र जसेंच्या तसें देऊन हा अध्याय पुरा करतों.

## श्रीमहालक्ष्म्यै नमः

### श्रीत्र्यंबकेश्वर.

॥ श्री सकल गुणालंकरण अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री देशमुख देशपांडे व ज्योतिषी व उपाध्ये व समस्त वेदमूर्ती वस्ती कसबे हरसूल प्रांत अवरंगाबाद समस्त महाराष्ट्र कोंकणस्थ देशस्थ विद्वद्वैदिक गृहस्थ गोसावी यांसीः—

पोष्य. उपाध्ये व मोरेश्वर पंडितराव आशीर्वाद अनुक्रमें नमस्कार. उपरि गंगाधर रंगनाथ कुळकर्णी कसबे हरसूल हा ब्राह्मण मोंगलपाशीं सेवेसी होता. कित्येक दिवस चाकरी करीत असतां मोंगली यावरी

बलात्कार करून बाटविला भ्रष्ट करून यास तीन महिने बंदीखानी निर्बंध ठेविला होता. तेथें यवनासी अन्नोदक संसर्ग घडला. त्यानंतर यास भाग्य अडीच सदी मनसब देऊन चाकर करून ठेविला. पांच वर्षें चाकरी करीत होता. स्नानसंध्यादिक कर्मे करितां नये यास्तव राहिले. पांच वर्षांत अन्नोदक संसर्ग केला नाहीं. दौलत करीत असतां भाग्याचें सुख टाकून अंतःकरणीं अनुताप मानून आपले जातींत यावें यास्तव दौलत संपत्ति सर्व टाकून अनुतापास्तव राजश्री छत्रपति स्वामीपाशीं रायगडास येऊन एक वर्ष गंगाधर रंगनाथ दरबारीं आपणास प्रायश्चित्त द्या म्हणवून सरकारकून व न्यायाधीश व उपाध्ये व दानाध्यक्ष व भले भले ब्राह्मण व समस्त आपले ज्ञातीस शरण येऊन प्रायश्चित्त मागत होता. त्या उपरि राजश्री समस्त राज्यकार्यधुरंधर वर्णाश्रमधर्मप्रतिपादक राजश्री छंदोगामात्य स्वामी ( कविकुलेश ) यांस सर्व वर्तमान विदित झालें. त्यानंतर त्यांहीं ब्राह्मणाचे कष्ट व अनुताप बहुत देखोनी राजश्री छत्रपति स्वामी यास वृत्तांत विदित केला, छत्रपति कृपाळू होऊन प्रायश्चित्त द्यावयासी आज्ञा दिली. त्या उपरि आम्ही राजश्री छंदोगामात्य याचें सभेसी समस्त विद्वद्वैदिक ब्राह्मणाचे संमतीनें मिताक्षरादि निबंध पाहोन प्रायश्चित्त निर्वाह करून, गंगाधर रंगनाथ यासी प्रायश्चित्त संकल्प सांगोन, श्रीयालेस पाठावला. तेथें श्रीगिरि प्रदक्षिणा तीनशेंसाठीं व यात्रा दोनी इतकें चतुर्विंशत्यब्द प्रायश्चित्त पूर्वोत्तरांगसहित गंगाधरें केलें. यथाशास्त्र प्रायश्चित्त विध्युक्त प्रकारें केलें. श्रीक्षेत्रीं समस्त धर्माधिकारी आदकरून ब्राह्मणसंमतीनें तीर्थविधि करून ब्राह्मणभोजन करून, अन्नप्रसाद पंक्तिस घेतला. शुद्धिभोजनें व प्रायश्चित्त प्रदक्षिणा यथाविधि केला म्हणून श्रीक्षेत्रींच्या ब्राह्मणांचीं पत्रें व देशाधिकारी यांचीं पत्रें घेऊन आम्हापाशीं येऊन पत्रें आम्हासी दिलीं. उपरि यथाविधि प्रायश्चित्त पूर्वोत्तरांगसहित वर्तमान राजश्री छंदोगामात्य गोसावी यासी विदित केलें. त्याही मतें मनांस आणून समस्त कारकून व न्यायाधीश यांच्या अनुमतें आम्हांस आज्ञा केली. तें गंगाधर रंगनाथ यास आपले पंक्तीस भोजन देऊन यासी शुद्धिपत्र देणें म्हणून यावरून आम्ही आपले पंक्तीस भोजन देऊन यासी शुद्धिपत्र दिलें. हा ब्राह्मण शुद्ध झाला, संव्यवहार्य जाहाला या उपरि यासी तुम्ही अन्नोद-

कादि व्यवहार यथापूर्व करीत जाणें. जो कोणी याचा ब्राह्मण्याविषयीं संदेह मानील तो देवब्राह्मणद्रोही महापातकी जाणिये. शके १६०८ सोळाशें आठ क्षय संवत्सर, चैत्र शुद्ध द्वितीया सोमवार हे विज्ञप्ती–मोर्तब—

१ मोरेश्वर पंडितराय दानाध्यक्ष

२ राजश्री नारो रघुनाथ अमात्य मुद्रासहित इत्यादि.

मोपल्यांच्या बंडामुळें जुलूम-जबरदस्तीनें बाटविलेल्यांना शुद्ध करून परत स्वधर्मात घेण्याचा देवल स्मृतीवरून शास्त्रार्थ निघाला. देवलस्मृति ही स्मृति म्हणून मान्य केल्यानंतर आणि विज्ञानेश्वरासारख्या महानिबंधकारांनीं देवल स्मृतींतलि म्हणून दिलेलीं वचनें हल्लींच्या देवलस्मृतींत सांपडल्यानंतर या स्मृतीच्या प्रामाण्याबद्दल संशय घेण्यास तिळमात्रहि जागा उरत नाहीं. सोनगीर येथें जमलेल्या जुन्या मतांच्या शास्त्र्यांनीं ही स्मृति प्रमाण मानूनच बलत्कारानें बाटविलेल्यांना शुद्ध करून घेण्यास कशीबशी समति दिली. जुलूम जबरदस्तीशिवाय अन्य कारणांनीं म्हणजे अज्ञान, छद्म, फसगत व अपकृत्य इत्यादि कारणांनीं बाटलेल्या लोकांना शुद्ध करण्याचा विचार देवल-स्मृतींत नसल्यामुळें आम्हीं जेव्हां सोनगीर येथें पोर्तुगीजांनीं जातीच्या जाती कशा लबाडीनें बाटविल्या याचें दिग्दर्शन केलें त्यावेळीं काशीचे महा-महोपाध्याय लक्ष्मणशास्त्री द्रविड यांनीं तुमचें म्हणणें बरोबर नाहीं, हेतु संभवत नाहीं,अशी आम्हांस उडवाउडवीचीं उत्तरें दिलीं ! पोर्तुगीजांचा बाट-विण्याचा धाऊक व्यापार कसा चालला होता याची माहिती–अत्यंत विश्वसनीय माहिती–सरकारामार्फत प्रसिद्ध झालेल्या मुंबई इलाख्याच्या गॅझेटियरच्या तेराव्या व्हॉल्यूमच्या पहिल्या भागांत आढळते. पावबिस्कुटाचे आणि मांसाचे तुकडे विहिरींत टाकून बाटविल्याचा उल्लेख पान २०१ मध्यें आला आहे. त्यांचें मराठी भाषांतर असें आहे. “उरप व इतर जातीची अशी गोष्ट सांगतात कीं, विहिरींत मांसाचे तुकडे टाकून त्यांच्या वाडवडिलांस ख्रिस्ती बनविण्यांत आलें. त्याचप्रमाणें ओरिएंटल ख्रिश्चन स्पेक्टेटरमधील लेखक म्हणतो कीं, पोर्तुगीजांना पावबिस्कीटें असंख्य लोकांच्या तोंडांत जुलमानें कोंबलीं. कांहीं प्रसंगीं जबरदस्तीहि करण्यांत आली असली पाहिजे. परंतु पोर्तुगीज लोकांच्या माहितीवरून असें दिसतें कीं, बाटविण्याच्या कामीं आर्जव व लालुच यांचाच अवलंब करण्यांत आला होता.”

वरील उताऱ्यावरून वर्प,उरप किंवा ओरपी ही हिंदु जात मांसखंड विहिरींत टाकल्यामुळें व बिस्कुटाचा तुकडा तोंडांत कोंबल्यामुळें बाटली गेली आहे, हें वाचकांच्या लक्षांत येईल. जुन्या पंडितांनीं वरील उतारा नीट पाहावा. हिंदु समाजांतील अशा प्रकारें बाटलेल्या निरनिराळ्या जातींत सुद्धां अद्याप पूर्वींचा जातिभेद कसा कायम आहे हें पुढील उताऱ्यावरून दिसून येईल—

"ठाणें जिल्ह्यांत सध्यां जी ख्रिस्त्यांची वस्ती आहे ती प्रथम फ्रॅन्सिस्क व नंतर सेंटझेवियर यांच्या हाताखालील जेसुइटांनीं बाटविलेल्यांच्या वंशजांची आहे. सध्याच्या ख्रिस्ती वस्तींतील मुख्य जाती ब्राह्मण, परभू, सोनार, खत्री, भंडारी, खारपाटील, कुणबी, कुंभार, न्हावी, धोबी, कोष्टी, महार, चांभार, आणि इतर अशा आहेत.

पूर्वींच्या जाती कायम ठेवून फक्त ख्रिश्चन धर्म स्वीकारून राहिलेले हिंदु लोक अद्याप ठाणें जिल्ह्यांत आहेत. बाटून ख्रिस्ती झालेल्या अशा सर्व लोकांना त्यांची परत हिंदु धर्मांत येण्याची इच्छा असल्यास त्यांस शुद्ध करून घेतलें पाहिजे. देवल स्मृति ही बलात्कारानें म्लेंच्छीकृत म्हणजे शब्दशः अर्थ करावयाचा झाल्यास जर मुसलमानापुरतीच असेल तर वरील प्रकारानें बाटून ख्रिस्ती झालेल्या लोकांना देवलस्मृति ही उपयोगी पडत नाहीं. तोंडांत बिस्कुट कोंबणें हा प्रकार जुलमांतच येतो. परंतु विहिरींत मांसखंड टाकणें, तें पाणी प्याल्यानंतर सर्वांनीं बाटलें असें समजणें हा प्रकार छद्म, अपकृत्य, व फसगत या सदरांत येतो.

अशा लोकांना शुद्ध करून घेण्याचा शास्त्रार्थ आहे कीं नाहीं याचा विचार करूं लागल्यास देवलस्मृतींत शास्त्राधार नाहीं असेंच साफ म्हणावें लागेल. "श्रुतिस्मृतिविहितो धर्मः" "तदलाभे शिष्टाचारः प्रमाणम्" असें वसिष्ठ स्मृतींत सांगितलें आहे. त्यावरून श्रुतिस्मृतीच्या अभावीं शिष्टाचार हें एक प्रमाण असून ते बाटून ख्रिस्ती झालेल्या लोकांना शुद्ध करून घेण्याबद्दल उपयोगी पडेल. मराठ्यांनीं आपल्या स्वराज्याच्या अमदानींत या शुद्धिकार्याचा म्हणजे ख्रिश्चन झालेल्यांना शुद्ध करून घेण्याचा सपाटा चालविला होता. फार काय पण हें शुद्धिकार्य करणाऱ्या ब्राह्मणांना मदत व्हावी म्हणून मराठ्यांनीं एक करहि बसविला होता.

वसईचा डॉ० डकून्हाज म्हणतो कीं, बाटलेल्या लोकांस शुद्ध करून जातींत घेण्याचें जें कार्य ब्राह्मणांनीं चालविलें होतें त्यांच्या चरितार्थासाठीं मराठ्यांनीं एक कर बसविला होता.

स्वराज्यामध्यें अशा प्रकारच्या करांची मदत ब्राह्मणांना मिळाल्यामुळें पुष्कळ वर्षीं, अग्री व भंडारी लोक पळशे ब्राह्मणांच्या साहाय्यानें परत हिंदूधर्मांत आल्याचा उल्लेख गॅझेटियरमध्यें पान २०३ वर केला आहे. +

गॅझेटियरवरून स्वराज्यांत शुद्ध करून घेण्याचें कार्य कसें चाललें होतें याची कल्पना येईलच. याहीपेक्षां भरभक्कम शिष्टाचाराचा पुरावा म्हटला म्हणजे अस्सल कागदपत्र हे होत. रा. ब. पारसनिसांच्या पेशवे दप्तरांतील सनदापत्रांतील माहिती या खंडांत ख्रिस्ती झालेल्या लोकांस परत हिंदु-धर्मांत घेण्याबद्दल परवानगीचीं दोन अस्सल पत्रें छापिलीं आहेत. तीं फार महत्त्वाचीं आहेत.एक पत्र १८१२।१० सालचें व दुसरें १८१५।१६ सालचें आहे. दुसरें पत्र लहान व महत्त्वाचें असल्यामुळें तेवढेंच येथें देतों.

यादी गणगावड नाथगावड मौजे भुईगांव बुद्रुक व गोणराय हुलराय कसबे आगाशी वगैरे गांव भंडारी तर्फ मजकूर प्रांत वसई सुरसन शीत अशर मयातैन व अलफ ( इ. स. १८१५-१६ )

भंडारी मजकूर क्रियापाल यांनीं वाजीपुरा येऊन अर्ज केला कीं, पूर्वीं फिरंगी राज्यांत प्रांतांतील कांहीं रयत नेऊन बाटविली. त्याजवर त्यांचे अखेरीस आमचे आजेपणजे किल्ल्यांत वेठीस गेले होते त्यास बाटवूं लागलें, तेव्हां राजी न होत त्यामुळें किल्यांत ७·८ महिने अडकावून ठेवलें. पुढें स्वराज्य झालें, त्यावेळीं फिरंगी लोक निघून जाऊं लागले, त्यासमयीं यांस पाणी छाटोन निघोन गेला.नंतर आमचे वडील घरीं आले. स्वराज्य झाल्यावर वर्षं दहा वर्षांनीं तर्फ अगर वसई येथील बाटे भंडारी शंकराजी केशव यांचे कारकीर्दींत सरकारांत उभें राहून अर्ज केला कीं, आम्हांस मराठे धर्मांत लावावयाची आज्ञा झाली पाहिजे. त्यांस त्या समयीं त्याचा उलगडा झाला नाहीं. पुढें विसाजी केशव यांचे कारकीर्दींत समजाविलें. त्यांनीं मनांत आणून त्याजपासून नजर घेऊन मराठे चालीचे धर्मांस लाविले. त्यावेळेस

---

+ शेवटचें परिशिष्ट पहा.

आमचे वडिलांना सरकारांत उभे राहावें तरी त्यांची नातवांना ( गरीबी ) अन्न खावयास नाहीं, यामुळें राहिले ते आजपावेतों तसेंच राहून मराठे चालीचा धर्म करून आहो. किरिस्ताव चालीप्रमाणें वहिवाट नाहीं. लग्न व पाट मात्र पाद्रीचे देवळांत होतो. पितर वगैरे देवकार्य करणें झाल्यास जोशी वृत्यंशी यास आणून शिधा दाक्षिणा देत असतो. आमचे जातींचीं घरें थोडकीं १०-१२ आहेत. तितक्यांत सोयरीक मिळत नाहीं त्यामुळें मावळ्याची मुलगी व मेहुणी करतो. ते पाद्री करू देत नाहीं. यास्तव मुलगे व मुली मोठया झाल्या लग्नें राहिलीं. तेव्हां आमचा परिणाम लागत नाहीं.यास्तव स्वारी कृपाळु होऊन आमचे जातवानीवर नजर देऊन जीवन-माफक सरकारांत नजर घेऊन आम्हास मराठे धर्माचे चालीस लावून दिलें पाहिजे म्हणून त्याजवरून मनास आणतां विसाजी केशव यांचे कारकीर्दीत तर्फ अगर वसई येथील भंडारी लोक मराठी धर्मास लागले. तुम्ही नातवाना सरकारांत नजर यावयास सामर्थ्य नाहीं. त्यामुळें तसेंच राहिला, आणि लग्न व पाटसमयीं मात्र पाद्रीचे देवळांत जाऊन बाकीची वहिवाट मराठे धर्माचीं डोकीस पागोटें व धोत्रें नेसावीं व पितर देवकार्य करणें तरी जोशी वृत्यंशी बोलावून आणून शिधापाणी व दक्षिणा देत आला. मराठे चाली-प्रमाणें वहिवाट करितां व सोयरीक समयीं मामाची मुलगी व मेहुणी पाद्री करूं देत नाहीं. तुमचीं घरें थोडी सोयरीक मिळत नाहीं. म्हणून लग्नें राहिलीं. पाद्री अडवितो तोवर तुमचे जातीचा परिणाम कोणताही लागत नाहीं. याजकरितां तुमचे नातवानीवर नजर देऊन केराजी शिंदे, भंडारी यास हिंदु धर्म लावून दिला. त्याप्रमाणें हल्लीं तुमचें जातीस क्रियापाल करून हिंदु धर्मास मोकळीक केली असे. तरी क्रियापाल भंडारी यांची हल्लीं वहिवाट आहे. त्याप्रमाणें तुम्ही वर्तणूक करीत जावी. तुम्हास धर्म लावून वृत्यंश नेमून दिला. त्यासंबंधीं जीवन माफक नजर रुपये २५ करार केले असे. त्याविशी गावड भंडारी यांचे नांवें पत्र एक एकूण २५ नजरे-बद्दल जमा धरून सदरहु अन्वये भंडारी यांचें नांव पत्र देववावें छ०. १० माघ इ. स. १८१५-१६.

हें पत्र फार महत्त्वाचें व बोधप्रद आहे. चिमाजी आप्पाची स्वारी होण्यापूर्वी आ॰ शी भागांतील पुष्कळ लोक पोर्तुगीजांनीं बाटविले. भंडारी

क्रियापाल व मोगले या हिंदू जातीचे पूर्वज किल्ल्यांत वेठीस गेले असतांना त्यांना पाणी छाटून म्हणजे बातिस्मा देऊन बाटविण्यांत आलें. पुढें स्वराज्य झाल्यावर दहा वर्षांनीं म्हणजे १७४९-५० च्या सुमारास ज्या जाति संपन्न होत्या त्यांनीं सरकारांत नजर नजराणा देऊन पुन: मराठे धर्माची म्हणजे हिंदुधर्माची दीक्षा घेतली. ज्या जाती गरीब होत्या, खावयास अन्न नव्हतें, त्या शेवटच्या बाजीरावाच्या १८१५ तील वसईच्या तहाच्या वेळच्या स्वारीपर्यंत म्हणजे जवळ जवळ ५०।७५ वर्षें तशाच खिस्ती धर्मांत राहिल्या होत्या. त्यांच्याकडून जीवन माफक म्हणजे यथाशक्ति नजर ( प्रायाश्चित ) अवघे २५ रुपये घेऊन त्यांना शुद्ध करण्याचा हुकूम शेवटच्या बाजीराव साहेबांनीं दिलेला आहे.

धर्मभ्रष्टांच्या शुद्धीकरणाच्या बाबतींत स्वराज्यांतील हें आज्ञापत्र फारच किंमतीचें आहे. महाराष्ट्रियांनीं आतां या विषयाच्या बाबतींत बुचकळ्यांत राहाण्याचें बिलकुल कारण नाहीं. शिवाजी महाराजांनीं बजाजी निंबाळकरास शुद्ध करून घेतलें तर शेवटच्या रावबाजींनीं सबंध जातींना शुद्ध करण्याचें आज्ञापत्र दिलें. देवलस्मृतीवरून जें कार्य होत नव्हतें तें करण्यास स्वराज्यांतील शिष्टाचार सांपडल्यामुळें आतां कसलीच अडचण राहिलेली नाहीं.

---

# सद्य:परिस्थितींत शुद्धिकार्याची जरुरी.

## अध्याय पांचवा

गेल्या चार अध्यायांत धर्मभ्रष्टांच्या शुद्धीकरणाचा जो विचार केला, त्यावरून बौद्धकालांत, मुसलमानांनीं प्रथम जेव्हां हाहाकार उडविला त्या कालांत, आणि पुढें स्वराज्यांतहि शुद्धीकरण झालेलें आहे असें सिद्ध झालें. आतां आपल्या हातीं सत्ता नाहीं, धर्मबंधनें शिथिल झालेलीं, सामाजिक बंधनांची कल्पनाहि नाहीं, अशा स्थितींत आपणांस हा शुद्धीकार्याचा गाडा पुढें रेटावयाचा आहे.

हिंदुस्थानांतील पुराणमतवाद्यांना किंवा जुन्या समजुतीच्या लोकांना हल्लींच्या नवीन जागृतीच्या कल्पनांची आणि उत्पातांची जाणीव नाहीं. पुष्कळ भोळीभाबडीं माणसें इंग्रज बिचारा काय करतो, तो कोठें आपल्या धर्मांत हात घालतो, असें म्हणत असतात. त्यांना आपलें सत्तासर्वस्व गेलें आहे आणि तें मिळविण्याकरितां राष्ट्राची धडपड चालली आहे, याची कल्पनाहि नसते. आम्ही आमचा धर्म बुडविला नसून परक्यांनीं सर्व व्यवहार हिरावून घेतल्यामुळें आमचें सर्व शासनशास्त्र नष्ट झालें, अशी वस्तुस्थिति आहे. धर्म म्हणजे कायदा असा क्षणभर अर्थ केला तर कायदे करण्याची सत्ता व कायदे अमलांत आणण्याची सत्ता या दोनहि गेलेल्या आहेत. निस्पृह ब्राह्मणांनीं धर्मशास्त्र निर्माण करावें आणि क्षत्रियांनीं त्याची अंमलबजाणी करावी असा चालत आलेला दंडक मोडला आहे. व्यवहार दुसऱ्यांच्या हातांत, कायद्याची सर्वप्रकारची सत्ताहि दुसऱ्याच्या हातांत; अशा स्थितींत साधारण व्यवहार, असाधारण व्यवहार, ऋणादान, उपनिधि, साक्षी, लेख, दिव्य, सीमाविवाद, स्वामीपाल, वेतनादान, वाक्पारुष्य, दंडपारुष्य संभूयसमुत्थान, स्त्रीसंग्रह असे सर्वच धर्म बुडालें तर त्यांत नवल काय ? व्यवहार तिसऱ्याच्या हातीं गेल्याबरोबर व्यवहार सौकर्याला आणि समाजसादृश्याला अनुलक्षून सांगितलेलें आचारहि शिथिल झाले. आचार-धर्मांतील शिथिल झालेल्या गोष्टी म्हटल्या म्हणजे वर्णसंस्था, आश्रमधर्म, ब्रह्मचारिधर्म म्हणजे शिक्षणाचे नियम, विवाहधर्म, गृहस्थधर्म, भक्ष्याभक्ष्य, वगैरे होत. आचारधर्म न पाळल्यामुळें द्यावें लागणारे जें प्रायश्चित्त, ज्या प्रायश्चित्ताला इंग्रजींत ( पनिशमेंट ) शिक्षा असें म्हणतां येईल, त्यालाहि कोणी विचारीनासें झालें आहे. निष्कर्ष इतकाच कीं, धर्मशास्त्रग्रंथांत सांगितलेले आचार, व्यवहार व प्रायश्चित्तधर्म हे सर्व स्वकीय सत्तेच्या अभावीं बुडालेले आहेत. परकीय सत्तेनें सत्तासर्वस्व हिसकावून घेतल्यामुळें धर्म, म्हणून कितीहि कंठशोष केला तथापि त्या सत्तेशिवाय धर्माचरण होणार नाहीं, हें पक्कें लक्षांत ठेविलें पाहिजे.

जगांत चालत असलेल्या सर्व उलाढाली पाहिल्या म्हणजे दिवसानुदिवस लोकसत्ता वाढत जाणार हें सिद्ध आहे. लोकसत्ता म्हणजे लोकमतानुवर्ती शासनसंस्था उत्पन्न होणें. हिंदुस्थानांत जें स्वराज्य पुढें मिळविलें

जाणार आहे तें अशाच प्रकारचें होय. लोकसत्तेच्या काळांत हिंदुस्थाना-सारख्या देशांतील भिन्न भिन्न समाजांत जितकी एकरूपता आणता येईल तितकी अवश्य आणली पाहिजे. धर्मांतर किंवा निराळ्या भाषेंत बोलावयाचें तर समाजांतर केलेल्या व्यक्ति व जाति या समाजाला व देशाला घातक होत असतात, असा अनुभव आहे. मुसलमानी रियासतींतील मुसलमानांच्या जयाचा व हिंदूंच्या अपजयाचा या दृष्टीनें विचार केल्यास धर्मांतर किंवा समाजांतर केलेल्या व त्यामुळें अंगीं एक प्रकारचें वारें भरलेल्या लोकांनींच ( यांना हिंदुसमाजाचीं बिंगेन बिंगें माहीत असल्यामुळें ) बंधुद्रोह करून देशाला पारतंत्र्य आणलें असें म्हणतां येतें. काय असेल तें असो, या मुसलमान समाजांत गेलेल्या हिंदूंनींच देशाचें स्वातंत्र्य गमावलें आणि हल्लीं ख्रिश्चन समाजांत गेलेले हिंदूसुद्धां पुढेंमागें " कुऱ्हाडीचे दांडे गोतास काळ " असेच होतील अशी भीति वाटते. यास्तव समाजांतर केलेल्या व अर्ध्या हळकुंडानें पिवळे होऊन स्वसमाजद्रोह करणाऱ्या अशा सर्व व्यक्तींना पुनः पूर्वसमाजांत गोवून घेणें अत्यावश्यक आहे. धर्माच्या तात्त्विक विचारांचा परिणाम होऊन कोणी धर्मांतर केल्यास त्यांत कांहींच हरकत नाहीं, व हीं अशीं विचारी माणसें केव्हांहि देशाला किंवा समाजाला त्रासदायक होत नाहींत.

जगांत सत्य बोलण्याचा, सत्य मार्ग दाखविण्याचा, प्रत्येकास अधिकार आहे. कोणाला आपल्या धर्मापेक्षां दुसऱ्या धर्मांतलि सत्य निरपवाद म्हणून पटलें तर त्यानें खुशाल परधर्मदीक्षा घ्यावी, याबद्दल कोणीहि सुज्ञ मनुष्य हुजत घालणार नाहीं. हिंदुस्थानांत जो मुसलमान समाज आहे त्याकडे जरा या दृष्टीनें पाहिल्यास बाहेरच्या देशांतून आलेले मुसलमान सोडून देऊन बाकीच्या सर्व मुसलमानांस एकजात हिंदूच केलें पाहिजे, असें कोणताहि सुज्ञ मनुष्य म्हणेल. कारण मुसलमानांच्या स्वाऱ्या हिंदुस्थानांत सुरू झाल्यापासून त्यांची स्वधर्मदीक्षा देण्याची पद्धत कांहीं औरच आहे. बायकोचें, नोकरीचें, वतनाचें आमिष दाखवून मुसलमानांनीं पुष्कळ हिंदूंना मुसलमान केलेलें आहे. जे हिंदु या राजसी आमिषास बळी पडले नाहींत त्यांच्यावर शेवटीं जुलुमाच्या जालीम मात्राचाहि प्रयोग झालेला

आहे. आपली मतें पटवून देऊन परक्यांना स्वधर्मदीक्षा देणें या सरळ व उत्तम मार्गाशीं मुसलमानांचा विळ्याभोपळ्याइतका सरळ संबंध आहे. बाहेरून आलेले मुसलमान सोडून दिले तर बाटलेले सर्व मुसलमान हिंदु रक्ताचे, हाडाचे, मांसाचे व संस्कृतीचे आहेत यात तिळप्राय शंका नाहीं. तेव्हां ज्यांची हिंदु संस्कृति अगदींच लोपली नाहीं, अशा सर्व मुसलमानांस त्याच्या पारलौकिक व ऐहिक स्वराज्याच्या दृष्टीनें हिंदु करणेंच अत्यावश्यक होणार आहे. आपल्याच समाजाच्या खिशांतून गळून गेलेल्या या कणांना वेंचून पुनः आपल्या खिशांत घालण्याचा हक्क हिंदुसमाजाचाच आहे. निदान ज्याला पुनः स्वधर्मामध्यें यावें असें वाटतें आणि ज्याची परंपरा अद्याप जिवंत आहे अशा बऱ्याचशा मुसलमानांना हिंदु करून घेण्याला तरी दिरंगाई होता कामा नये.

कोणी कदाचित् असें म्हणतील कीं, हें शुद्धिकार्य आपण आजवर कां केलें नाहीं ? आजच इतकी पोटांत तिडीक कां उठली ? त्याला उत्तर दोन प्रकारांनीं देतां येईल. एक असें कीं, आजपर्यंत शुद्धिकार्य झालें नाहीं ही गोष्ट खोटी आहे. शुद्धिकार्य झालें, याबद्दल अनेक प्रमाणें आतांपर्यंत दिलेलीं आहेत. इतकें खरें कीं, आज या शुद्धिकार्याला जसें सामाजिक व राष्ट्रीय व्यापक स्वरूप प्राप्त झालें आहे तसें पूर्वी केव्हांहि नव्हतें. हें स्वरूप प्राप्त होण्याचें कारण बहुमतानें कारभार चालण्याचे दिवस आले हें होय. बहुमताचा कारभार नव्हता, तेव्हां संख्याबल उपेक्षणीय होतें. धार्मिकदृष्ट्या अर्धीकच्चीं माणसें जरी समाजांतून गेलीं तरी अशांची संख्या उगीच फुगवून काय करावयाची आहे अशी मनोरचना एका काळीं होती. परंतु प्रत्येक मनुष्याला मत देण्याचा अधिकार जर उद्यां प्राप्त झाला तर हिंदुस्थानच्या हिताच्या दृष्टीनें कोणता समाज वाढला असतां श्रेयस्कर होईल हें पाहण्याची दृष्टि हल्लीं उत्पन्न झाली आहे. स्वसमाजांतील लोकांनीं परसमाजांत जाऊन तेथील संख्या फुगवून जर स्वकीय पूर्व समाजास सवत्या सुभ्याच्या नांवाखालीं त्रास देण्याला सुरवात केली तर त्या बाहेर जाऊन फुगलेल्या स्वसमाजघटकांना आत्मसात करण्याचा उद्योग केल्याशिवाय राहतां कामा नये व तसा उद्योग करण्याचा हिंदूंना हक्क आहे.

जो न्याय मुसलमान समाजाविषयीं सांगितला तोच ख्रिश्चन समाजालाहि लागू आहे. राज्यकर्ते हे नेहमीं राज्य चालविण्याकरितां एक आत्मसदृश जात उत्पन्न करीत असतात. मुसलमानांनीं अशा बाटग्यांची एक जात उत्पन्न केली. इह्लींचे राज्यकर्ते हे अधिक शहाणे असल्यामुळें त्यांनीं प्रशाहत करून अशी आधुनिक सुशिक्षितांतून राज्य चालविण्यास उपयुक्त अशी एक काळ्या इंग्रजांची जात निर्माण केली तशीच बाटलेल्या हिंदूंची एक ख्रिश्चन जात उत्पन्न केलेली आहे. हिंदुस्थानांत निरनिराळ्या मिशनांमार्फत बाटलेले ५०।६० लक्ष ख्रिश्चन असावेत, आकाशांतील बापाच्या कळपांत ओढण्याचे त्यांचे विविध व पद्धतशीर प्रयत्न एका दृष्टीनें मुसलमानांच्या पेक्षांहि घातक आहेत. इंग्रज सरकार जरी धर्माच्या बाबतींत औदासीन्याचा टेंभा मिरवितें तथापि ख्रिश्चन धर्माला व ख्रिश्चन मिशनऱ्यांना सरकारची चांगलीच मदत असते हें अनुभवसिद्ध आहे.

हिंदुस्थानांतील ख्रिस्ती लोकांची एका दृष्टीनें अत्यंत केविलवाणी स्थिति आहे. बाटल्यामुळें हिंदूसमाजांत तर त्यांना मान नाहींच; पण राज्यकर्ते अशा लोकांकडे तुच्छतेच्या दृष्टीनें पाहतात, हेंहि त्यांना कळून चुकलें आहे. स्वाभिमान तर नाहींच, पण स्वदेशाभिमानहि फारच क्वचित् दृष्टीस पडतो असें या समाजाचें सूक्ष्म निरीक्षण केलें असतां दिसेल. साहेब होणें, साहेबासारखें आचार ठेवणें, बायकोला मडम करणं अशा मूर्खपणाच्या फंदांत त्यांनीं आपली रक्तशुद्धिहि बिघडवून घेतली आहे. इंग्रजी राज्य हें चांगलें आहे, त्यामुळेंच आपल्यास शिक्षण व अन्न मिळत आहे. अशा समजुतीनेंच हा समाज वागत असल्यामुळें १९०६ सालापासून हिंदुस्थानांत जो स्वातंत्र्यसंग्राम चालला आहे त्यामध्यें या समाजाकडून किती कामगिरी झाली हें दिसतच आहे. स्वार्थत्याग, सर्वस्वत्याग, तुरुंग-स्वीकार, खादीप्रसार, राष्ट्रिय शिक्षण व स्वदेशी या निरनिराळ्या क्षेत्रांत आपल्या मुंबई इलाख्यांतील बॅरिस्टर बॅप्टिस्टासारखें कांहीं अपवाद सोडून दिले तर किती ख्रिश्चनांचीं नांवें सांगतां येतील बरें? धर्मभ्रष्टांच्या शुद्धी-करणासंबंधानें कित्येक रेव्हरंडांपाशीं बोलण्याचा जो आम्हांस प्रसंग आला, त्यावरून इंग्रजी राज्य हें आमचेंच आहे, कारण इंग्रज हे ख्रिश्चन आहेत

असें या दूधखुळ्यांना वाटतें असें दिसलें. आपल्यासारखा पुष्कळ ख्रिश्चन समाज झाला म्हणजे इंग्रज आपल्या हातांतच राज्य देऊन जाणार आहेत असेंहि एक रेव्हरंडबुवा म्हणाले. " अर्थस्य पुरुषो दासः " याचें प्रत्यंतर या अन्नानें ओशाळलेल्या माणसांमध्यें चांगलें दृष्टीस पडतें. इंग्रजी राज्याचे गुणानुवाद गाण्यातच यांना धन्यता वाटते. असो.

बाटलेल्या हिंदूंच्या साहाय्यानें मुसलमानांनीं जशी आमच्या अंतः-करणांत सुरी भोंसकली तशीच गत इंग्रजानीं या मिशनऱ्यांच्या साहाय्यानें करण्यास सुरवात केली आहे. खुद्द इंग्रजांना किंवा परकीय मिशनऱ्यांना हिंदूंना बाटवून ख्रिश्चन करण्याचा जितका उत्साह आहे त्यापेक्षां शतपट उत्साह या बाटलेल्या मिशनऱ्यांमध्यें आहे. हिंदुस्थानांत जीं अनेक मिशनें आहेत त्यांचें कार्य सर्वव्यापक होण्यास आमच्या लोकांशिवाय दुसरे कोण कारणीभूत झाले आहेत ! मिशनऱ्यांचे दवाखाने, मिशनऱ्यांच्या शाळा, हायस्कुलें व कॉलेजें या सर्वांत एकसूत्रता आणि एक धोरण जर कोणतें असेल तर तें हिंदूंना ख्रिस्ती करण्याचेंच आहे. शिक्षणाच्या व औषधाच्या आमिषानें आणि लालुचीनें जितके चांगले मासे आपल्या जाळ्यांत बिन-बोभाट अडकवितां येतील तितके अडकविण्याची यांची अहर्निश खटपट आहे. बेळगांवच्या मिशन हायस्कूलमध्यें १९०५ सालीं शिकत असतांना या लेखकाला स्वतः अशा प्रकारचा अनुभव आलेला आहे. दुष्काळासारख्या आपत्ति व रोगनिवारण यांचा फायदा घेऊन अशानानें फसगतीनें पुष्कळ हिंदूंना मिशनऱ्यांनीं बाटविलें आहे.

मुसलमानांची संख्या जशी जुलमानें बाटविल्यामुळें फुगली तशीच ख्रिश्चन लोकांची संख्याहि हिंदूंना फसवून बाटविल्यामुळें फुगलेली आहे. हिंदुस्थानच्या लोकांच्या अडाणीपणाचा व धर्मभोळेपणाचा पोर्तुगीज लोकानीं चागलाच फायदा घेतला. कोठें एखाद्या विहिरींत पावाचा तुकडा टाकावा किंवा तळ्यांत बिस्कुटें फेकावी, हा प्रकार न समजून त्या गांवाच्या लोकांनीं तें पाणी प्यावें कीं लगेच मिशनऱ्यांच्या झुंडीनें येऊन " तुम्ही ख्रिश्चन झालां, " असें ओरडून बाप्तिस्माचें पाणी अंगावर शिंपडावें. लबाड मिश-नऱ्यांनीं अशल्या हिकमतीनीं बाटविलेल्या लोकांना शुद्ध करून घेऊन त्यांच्यामध्यें मिशनऱ्यासमोर " हें पाहा पाणी पिऊन बिस्कुट खाऊन, फार

काय, पण अरे मिशनऱ्या ! तुला गिळूनसुद्धां मी बाटत नाहीं एवढा माझा हिंदु धर्म श्रेष्ठ आहे. " असे उद्गार काढण्याचें सामर्थ्य उत्पन्न केलें पाहिजे. हिंदुस्थानातले पुष्कळ ख्रिश्चन लोक हे जुलमानें क्वचित पण अज्ञान, फसगत व छद्म यामुळें आणि दुष्काळ व रोग यांच्या आपत्ती-मुळें बाटलेले आहेत. म्हणून ज्या अनेक दृष्टींनीं परदेशस्थ मुसलमान सोडून बाकीच्यांना एकजात हिंदु करणें जितकें आवश्यक आहे त्याच सर्व दृष्टींनीं प्रमाणांनीं, आणि न्यायांनीं बाटून ख्रिश्चन झालेल्यांना हिंदु करणें अगत्याचे आहे. अर्थात ज्यांचे आचारविचार, परंपरा, रक्तशुद्धि चांगली असेल व ज्यांची हिंदुसमाजांत पुनः येण्याची इच्छा असेल त्यांसच शुद्ध करून घेतलें पाहिजे हें सांगावयास नकोच.

ख्रिश्चन समाजाची आजची जी स्थिति आहे, ती यापुढें अशीच राहील असें दिसत नाहीं. ख्रिश्चनामध्यें साक्षरतेचें प्रमाण वाढत असल्या-मुळें दिवसानुदिवस वाढणाऱ्या दारिद्र्याची व अनादराची त्यांना चांगली जाणीव होऊं लागली आहे. मुसलमान समाजापेक्षां ख्रिश्चन समाज सुज्ञ व सुबुद्ध आहे. म्हणून या समाजाकडून इतःपर हिंदुद्रोह व देशद्रोह फारसा होणार नाहीं. हिंदुस्थानांतील ख्रिश्चन लोकांना हिंदुस्थान ही आपली जन्मभूमि किंवा मातृभूमि आहे असें वाटू लागलें आहे आणि तिच्या उद्धारार्थ राजकीय संग्रामांत ते धडाडीनें भाग घेऊं लागले म्हणजे त्यांची दृष्टि निवळेल. हिंदु समाजांत असलेली सहिष्णुता ख्रिश्चन समा-जाच्या अंगीं लवकर येईल. हिंदूशीं सहकार्य केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. परस्पर सहकार्यांतच देशाचा तरणोपाय आहे, अशी खात्री ख्रिश्चन समा-जाची झाली म्हणजे या समाजापासून हिंदुसमाजास फारसा त्रास होणार नाहीं. भाषा, पोषाक, राहाणी हीं सर्व हिंदुसदृश असल्यामुळें हिंदु समा-जांत व ख्रिश्चन समाजांत एकरूपता लवकर येईल. हिंदुस्थानांत अनेक धर्म, पंथ व मतें आहेत, त्यांतलाच आपला एक आहे आणि तो निराळा असला तरी हिंदु समाजाच्या सहिष्णुतेमुळें आपणास धार्मिक दृष्ट्या बिल-कुल त्रास होणार नाहीं अशा मनःस्थितीवरच ख्रिश्चन हे हिंदुसमाजाशीं गुण्यागोविंदानें राहतील. वस्तुतः ख्रिश्चन समाजापेक्षां हिंदुस्थानांतील मुसलमान समाज हाच हिंदुसमाजास फार जाचक होणार आहे. तो समाज

पचनीं पाडण्याचे सात्विक, राजस व तामस उपाय वेळ पडेल त्याप्रमाणें अमलांत आणिले पाहिजत. प्रसंगीं मारामाऱ्या, शुद्धि आणि सहकार्य या सर्व गोष्टी त्यांना शुद्धीवर आणण्याकरितां केल्याच पाहिजेत.

---

# प्रायश्चित्तविधि अथवा शुद्धिसंस्कार.

## अध्याय ६ वा.

हिंदुसमाज, हिंदी राष्ट्र आणि हिंदुधर्म या सर्व दृष्टींनीं शुद्धीकरणाची फारच जरूरी आहे, असें आतांपर्यंत केलेल्या विवेचनावरून वाचकाच्या लक्षांत आलें असेलच. हिंदुसमाजांतून जीं माणसें बाहेर ख्रिश्चन किंवा मुसलमान समाजांत गेलीं असतील, त्यांना परत हिंदुसमाजांत घेण्याकरिता हें कार्य करावयाचें आहे. कांहीं माणसें याहिपुढें जाऊन इतर धर्मीयांना हिंदु करण्याची मोहीम कां सुरू करू नये असें म्हणतील. आमचें मत असें आहे कीं, सगळेच प्रश्न एकदम पुढें घेऊन ते सोडविण्याचा उद्योगास आरंभ लागलों तर एकीहि धड होणार नाहीं. दुसरें असें कीं, घासामागें घास जर तोंडात कोंबले गेले तर घशांत अडकून जीव कासावीस होण्याचा संभव असतो, तसाहि प्रसंग आल्याचा भास समाजांतील अशिक्षित लोकांना होईल. शिवाय अगदीं परक्या समाजांतील लोकांना म्हणजे युरोपियन, जर्मन, फ्रेंच यांना हिंदुधर्माची व हिंदुसमाजाची दीक्षा देण्याइतकें या प्रश्नाला राष्ट्रिय स्वरूप अद्याप आलेलें नाहीं. म्हणून जगांतील सर्व समाजाच्या हिंदूकरणाचा प्रश्न सध्या बाजूस ठेवून आपल्या समाजाला आज पचनीं पडेल असलें शुद्धिकार्य नेटानें चालविलें पाहिजे.

जोंपर्यंत समाजाला शुद्धिकार्य नको होतें तोंपर्यंत शास्त्रीपंडितांना प्रायश्चित्तेंहि सांपडत नव्हतीं. आतां समाजाच्या शुद्धिकार्याच्या आकांक्षेबरोबर शास्त्रीपंडितांना शुद्धिकार्याचें रहस्य कळलें, तर ते सुलभ प्रायश्चित्तें पुढें मांडल्याशिवाय राहणार नाहींत. समाजांत रूढ नसलेल्या एकाद्या गोष्टीचें आचरण कोणी केलें व तो जर समाजानें आपणास बहिष्कृत करूं

नये म्हणून प्रायश्चित विचारूं लागला, तर त्याला एवढें अवडबंब प्रायश्चित्त सांगण्यांस येतें कीं, त्याच्या हातून तें होऊं नये. पण असें करणें हें प्रायश्चित्तशास्त्राचें रहस्य न कळल्याचें दर्शक आहे. प्रायश्चित्तशास्त्र हें चूक केली असल्यास थोडी शिक्षा देऊन पुनः तसें न करण्यास सांगणारें शास्त्र आहे. मानवी समाजांत केव्हांहि सगळे लोक अगदीं सज्जन किंवा केवळ दुर्जन असतात असें नाहीं. तर या दोनाहि वृत्ति समाजांमध्यें मिश्र असतात. तेव्हां शास्त्रकारांनीं कडकडीत प्रायश्चित्तें जर ठेविलीं तर प्रायश्चित्तार्ह व्यक्तींना प्राणास तरी मुकावें लागेल किंवा प्रायश्चितांचें वैय्यर्थ्य तरी सिद्ध करावें लागेल. शुद्धिकार्याच्या बाबतींत प्रायश्चित्तशास्त्राचें रहस्य लक्षांत घेऊन अवडंबरी व खर्चाचीं प्रायश्चितें न काढतां सुटसुटित व सुलभ प्रायश्चित्तें शोधलीं पाहिजेत, आणि तीं स्मृतिग्रंथांत सांगितलीं आहेत. प्रायश्चित्त देऊन शुद्ध केलेल्यांना कोणत्या जातींत घालावें, हा एक बिकट प्रश्न आहे, त्याचा थोडा विचार करूं

हिंदु-समाजाचा स्वसमाजांत बाह्यांना प्रविष्ट करण्याचा स्वभाव कशा तऱ्हेचा आहे हें आम्ही पहिल्याच अध्यायांत सांगितलें आहे. त्या दृष्टीनें विचार केल्यास तुटक तुटक व्यक्तींना शुद्ध करून घेण्यापेक्षां गांवचे गांव जातच्या जात, कुटुंबच्या कुटुंबें शुद्ध करून घ्यावीं हें बरें. चारदोन महिन्यांपूर्वीं एकादी व्यक्ती बाटली असली तर तिला शुद्ध करून पूर्वजातींतच समाविष्ट करण्यास बिलकुल हरकत नाहीं; परंतु कित्येक पिढ्या एकाद्या व्यक्तीच्या परकीय समाजांत जर गेल्या असल्या व ती व्यक्ति एकटीच शुद्ध होऊन हिंदु होण्यास तयार असली तर एका दृष्टीनें अशा व्यक्तीस कोणत्या जातींत प्रविष्ट करावयाचें, हा प्रश्न पडतो. उच्च जातींत ढकललें तर ज्या जातींतील लोक या व्यक्तीबरोबर रोटीबेटी व्यवहार करण्यास तयार होत नाहींत. खालच्या जातींत घातलें तर येणारी व्यक्ति असंतुष्ट राहते. यास्तव वैयक्तिक शुद्धीकरण न करतां सामुदायिक शुद्धीकरण करणें जास्त चांगलें. आतां मुंबईसारख्या बकाल वस्तीच्या शहरांत कोणीच कोणाच्या जातीचा किंवा गोताचा विचार करीत नाहींत. तेथें खुशाल वैयक्तिक शुद्धीकरण करावें. परंतु तालुक्याच्या ठिकाणीं खेडयांत अगर जिल्ह्याच्या ठिकाणीं सुद्धां उगीच एकाद्या उपटसुंभाला त्रैवर्णिकांत ढकललें तर त्याला कोणी मुलगी

देणार नाहीं, त्याचा संसार होणार नाहीं व त्याचा वेल मांडवावर चढणार नाहीं. म्हणून अनेक कुटुंबें जीं धंद्यानें व सोयरिकीनें पूर्वींच एकत्र झालेलीं आहेत, पूर्वीं हिंदु असतांना जो धंदा करीत होतीं तोच ज्यांचा कायम आहे, अशांना शुद्ध करून घेऊन पूर्वजातींत समाविष्ट करून टाकावें. उदाहरणार्थ, ठाणें जिल्ह्यांतील मच्छीमारीचा धंदा करणारे ख्रिश्चन घेऊं. हे लोक पूर्वीं जातीनें कोळी असून जो धंदा पूर्वीं करीत होते तोच आजहि करीत आहेत. ते अहिंदु असले तथापि जातिसंस्था त्यांच्यांमध्यें कायम आहे. या किरिस्तावांना शुद्ध करून घेऊन हिंदु कोळी जात असा त्याचा नामनिर्देश करावा; म्हणजे पूर्वींच्या धंद्यास किंवा गणगोतास त्यांना मुकावें लागणार नाहीं. मुसलमानामध्यें मोमीन, रंगरेज, बोहरी, अशा हिंदु जाति आहेत. त्यांतील मोमीन हे हिंदु कोष्टी होते. या जातींचा दायविभागहि हिंदुधर्म शास्त्राप्रमाणें होतो, असें आम्हीं ऐकलें आहे. या सर्व जाती अशा पूर्वीं बाटून एकदम मुसलमान झाल्या तशाच एकदम हिंदु करून घ्याव्या. हिंदु कोष्टी, हिंदु बोहरी असा त्यांचा नामनिर्देश करावा. त्यांचे पूर्वींचेच धंदे त्यांना करावयास सांगावे. जातिद्वारा समावेश करून घेण्याची पद्धति अमलांत आणली म्हणजे शुद्धिकार्याचा उपक्रम लौकर वृद्धि पावेल आणि कोणाला कोणत्या जातींत घालावयाचें ही सामाजिक अडचण पडणार नाहीं. कोणी असें म्हणतात कीं, या सगळ्या लोकांची एक निराळीच जात करावी. परंतु कित्येक वर्षें बाटून मुसलमान व ख्रिश्चन झालेल्या लोकांनीं तेथें सुद्धां आपल्या पूर्वजाती कायम ठेविलेल्या आहेत; ते सर्व लोक हिंदु होऊन एका जातींत, गणगोतांत व धंद्यांतहि एकरूप होतील हें संभवत नाहीं. म्हणून धर्मभ्रष्टांच्या मागील पिढ्यांचा इतिहास पाहूनच त्या सगळ्यांना पूर्वजातींत घालणें इष्ट होईल. धर्मभ्रष्टांपैकीं ज्यांचीं बीजक्षेत्रें शुद्ध राहिलेलीं नाहींत, ज्यांच्या रक्तांत भेसळ झालेली आहे अशी एक हाफ-कॅस्ट ( Half Caste ) जात हिंदुस्थानांत उत्पन्न झालेली आहे. तेव्हां अशा लोकांचें शुद्धीकरण करून यांचें अहिंदुत्व नाहींसें करावें. हिंदूंच्या शेजारी हे लोकसंख्येनें पुष्कळ अशा स्थितींत राहूं लागले म्हणजे कांहीं दिवसांनीं त्यांची एक जात बनेल. अशा लोकांची जात ठरविण्याची भानगड न करतां फक्त हिंदुत्व त्यांजवर ठेवून द्यावें. पुढें आपोआप त्यांची

निराळी जात बनेल. रक्तांमध्यें भेसळ झालेल्या लोकांची जात ठरविणें कठीण असलें तथापि अज्ञानानें, फसगतीनें, छद्मानें, जुलमानें आणि अनेक आमिषांनीं व अपकृत्यांनीं बाटलेल्या ज्या लोकांनीं आपलीं बीजक्षेत्रें कायम ठेवलीं आहेत, त्यांच्या धंद्याप्रमाणें हिंदूंच्या जातींपैकीं कोणत्याहि जातींत त्यांस समाविष्ट करावें. शिवाय हिंदूंच्या प्रत्येक जातींत अनेक पोटजाति आहेत. त्या पोटजातींचें एकीकरण होण्यास अवकाश आहे. धर्मभ्रष्टांना एकदम मुख्य जातींत समाविष्ट करणें जरी कठीण असलें तथापि मुख्य जातीची एक पोटजात म्हणून त्यांचें परिगणन करण्यास हरकत नाहीं. आपटे, आठवले, गोडशे अशीं आडनांवें ज्या ख्रिश्चन लोकांमध्यें आहेत त्यांना आज शुद्ध करून बीज व क्षेत्र शुद्ध असल्यास ब्राह्मणांमध्यें समाविष्ट केलें पाहिजे. परंतु त्यांच्या दोनचार पिढ्या लुप्तक्रिय व लुप्तसंस्कार झाल्या असल्यामुळें अशा शेंदोनशें कुटुंबांची लुप्तक्रिय म्हणून एक पोटजात बनेल; शेंपन्नास वर्षांनीं त्यांची संस्कृति सुधारल्यावर इतर ब्राह्मणांशीं त्यांचे आपोआपच रोटीबेटी व्यवहार होऊं लागतील व शुद्ध ब्राह्मणांत ते एकरूप होतील. तात्पर्य, धर्मभ्रष्टांचें समावेशन अशाच पद्धतीनें केलें पाहिजे. जुलूम, जबरदस्ती, अज्ञान, छद्म आणि अपकृत्य इत्यादि कारणांनीं धर्मांतर होतच नाहीं व होणें शक्य नाहीं, हेंच तत्त्व यापुढें समाजाच्या मनावर ठसविलें पाहिजे. धर्मांतर केव्हांहि विचारानेंच होतें. धर्म ही बाब जुलमानें लादण्यासारखी किंवा अज्ञानानें स्वीकारण्यासारखी नाहीं. लोकसमाजाला या गोष्टी जितक्या लवकर कळतील तितकें बाटविण्याचें व शुद्ध करून घेण्याचें कार्य संपुष्टांत येईल.

## शुद्धी संस्काराची रूपरेखा.

ज्या साधकाला शुद्ध व्हावयाचें असेल त्याची चौकशी गांवांतील चार दोन शिष्टांनीं करावी आणि पश्चाताप झाल्याचें दिसल्यास मिळालेल्या माहितिवरून देवलस्मृतिप्रमाणें प्रायश्चित्त ठरवावें. ( देवल स्मृती भाषांतर परिशिष्ट २ पहा )

एकादशी, पूर्णिमा, अमावस्या अशा पर्वकालीं धर्मभ्रष्टानें गांवांतील शिष्टांची शुद्ध करण्याबद्दल प्रार्थना करावी. मला पश्चाताप झाला आहे, मजवर अनुग्रह करा आपण सांगाल तें प्रायश्चित घेईन, अशी प्रार्थना करून

नमस्कार करावा. सभ्यांनीं त्याला उपवास करण्यास सांगावें. नंतर विहीर नदी ओढा अशा ठिकाणीं जाऊन धर्मभ्रष्टाकडून संकल्प सोडवावा. देशकालांचा उच्चार करून 'ऐस्त्य मत ( माहमदीय मत ), स्वीकारजन्य पातित्याभक्ष्यभक्षणापेयपानागम्यागमनादिदोषनिरासार्थं आचार्योपदिष्टं कृच्छ्त्रय प्रायश्चितं करिष्ये' असा संकल्प सोडवावा. नंतर तीर्थविधि प्रमाणें क्षौराचा संकल्प सोडवून आज्ञा देऊन त्याचा शेंडी ठेवून क्षौर करवावा. क्षौरानंतर भस्म, गोमय, मृत्तिका हीं शरिराला लावून स्नानें करवावींत. ही स्नानें झाल्यावर साधकाला पंचगव्य प्यावयास द्यावें. नंतर त्याजकडून यथा शक्ति दंड द्रव्य रूपानें घ्यावा. स्त्रियांना क्षौर नाहीं. त्यांना क्षौराशिवाय सर्व विधि सारखाच. नंतर एक किंवा दोन ब्राह्मणांनीं ताम्हनामध्यें स्वच्छ पाणी घ्यावें आणि त्याचें मार्जन अंब्याचीं पानें अथवा दर्भ यांनीं साधकाच्या अंगावर करावें. (मार्जनाचें पवमान परिशिष्ट१ ), पवमानानें शुद्धि झाल्यावर अंग पुसण्यास सांगावें व नवीन वस्त्रें धारण करण्यास द्यावीं. स्त्रियांना कुंकु, बांगडया, चोळी असें सौभाग्य अलंकार द्यावेत. पुरुषाला गंध लावून त्याच्या गळ्यांत तुळशीची माळ घालावी. पूर्वीचीं नांवें बदलून हिंदु पद्धतीचीं नांवें ठेवावीं; आणि मित्रायनमः रवयेनमः असें म्हणून सूर्याला पांच नमस्कार घालावयास सांगावें. 'अकाल मृत्यु हरणं' यामंत्रानें तीर्थ द्यावें नंतर आचार्यांनीं साधकांना " तुम्ही हिंदु झालां, तुम्ही हिंदु आहांत, सूर्य ही हिंदूंची देवता आहे, गीता हा तत्त्वज्ञानाचा ग्रंथ आहे असें सांगून गीता हातांत यावी. गीतेंतील पुढील श्लोक सर्व साधकांकडून तीन वेळां वदवावेत; आणि त्यांचा अर्थ समजून सांगावा.

## पंचश्लोकी गीता.

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।
स्वधर्मे निधनं श्रयः परधर्मो भयावहः ॥ अ. ४

ईश्वरः सर्व भूतांना हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।
भ्रामयन्सर्व भूतानि यंत्रारूढानि मायया । अ. १८

मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपिस्युः पापयोनय: ।
स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम् ॥

अपिचेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।
साधुरेवसमन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ॥
क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छांतिं निगच्छति ।
कौंतेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति ॥ अ. ९

शेवटीं ईश्वराची तुमच्यावर कृपा झाली आहे, तुम्ही निर्भय असा तुम्हाला कोणाचें भय नाहीं असें सांगावें आणि दररोज स्नान, सूर्यदर्शन गीतेचा एक श्लोक पाठ असा आचार सांगावा. शुद्धिकरणाचें सामान्यधोरण येथें दिग्दर्शित केलें आहे. स्थानिक शिष्टांनीं सोयीप्रमाणें इष्ट ते फेरफार करून संस्कार करावा.

---

# परिशिष्ट. १

## शुद्धीकरणाचें पवमान.

ॐ हिरंण्यवर्णाः शुचंयः पावका यासुं जातः कश्यपो यास्विद्रंः॥ अग्निं या गर्भं दधिरे विरूपास्ता न आपः शं स्योना भंवंतु ॥ यासां राजा वरुणो याति मध्यें सत्यानृते अंवपश्यं जनांनां ॥ मधुश्चुतः शुचंयो याः पांवकास्तान आपःशं स्योना भंवंतु ॥ यासां देवा दिवि कृण्वंतिं भक्षं या अंतरिक्षे बहुधा भवंति ॥ याः पृथिवीं पर्यसोंदंतिं शुक्रास्ता न आपः शं स्योना भंवंतु ॥ शिवेनं मा चक्षुषा पश्यतापः शिवयां तनुवोपंस्पृशत त्वचं मे ॥ सर्वां अग्नीं रंप्सुषदों हुवे वो मयि वर्चों बलमोजो निधंत्त ॥ पवंमानः सुवर्जनः॥ पवित्रेंण विचंर्षणिः॥ यः पोता स पुंनातु मा॥ पुनंतु मा देवजनाः॥ पुनंतु मनंवो धिया॥ पुनंतु विश्वं आयवंः॥ जातंवेदः पवित्रंवत् ॥ पवित्रेंण पुनाहि मा ॥ शुक्रेणं देव दीद्यंत् ॥

अग्ने क्रत्वा क्रतू ँ रनु ॥ यत्ते पवित्रमर्चिषि ॥ अग्ने विततमंतरा॥ ब्रम्ह तेन पुनीमहे ॥ उभाभ्यां देव सवितः॥ पवित्रेण सवेन च॥ इदं ब्रह्म पुनीमहे ॥ वैश्वदेवी पुनती देव्यागात् ॥ यस्यै ब्वह्वी-स्तनुवो वीतपृष्ठाः॥ तया मदंतः ॥ सधमाद्येषु ॥ वय ँ स्याम-पतयो रयीणां ॥ वैश्वानरो रश्मिभिर्मा पुनातु ॥ वातः प्राणे-नैषिरो मयोभूः ॥ द्यावापृथिवी पयसा पयोभिः॥ ऋतावरी यज्ञिये मा पुनीतां ॥ बृहद्भिः सवितस्तृभिः ॥ वर्षिष्ठैर्देव मन्मभिः ॥ अग्ने दक्षैः पुनाहि मा ॥ येन देवा अपुनत ॥ येनापो दिव्यं कशः ॥ तेन दिव्येन ब्रह्मणा ॥ इदं ब्रह्म पुनी-महे ॥ यः पावमानीरध्येति ॥ ऋषिभिः संभृत ँ रसं॥ सर्व ँ स पूतमश्नाति ॥ स्वदितं मातरिश्वना ॥ पावमानीर्यो अध्येति ॥ ऋषिभिः संभृत ँ रसं ॥ तस्मै सरस्वती दुहे ॥ क्षीर ँ सर्पिर्मधूदकं ॥ पावमानीः स्वस्त्ययनीः ॥ सुदुघा हि पयस्वतीः ॥ ऋषिभिः संभृतो रसः ॥ ब्राह्मणेष्वमृत ँ हितं ॥ पावमानीर्दिशंतु नः ॥ इमंल्लोकमथो अमुम्॥कामान्त्समर्धयंतु नः॥ देवीर्देवैः समाभृताः ॥ पावमानीः स्वस्त्ययनीः ॥ सुदुघा हि घृतश्चुतः ॥ ऋषिभिः संभृतो रसः ॥ ब्राम्हणेष्वमृत ँ हितं ॥ येन देवाः पवित्रेण ॥ आत्मानं पुनते सदा ॥ तेन सहस्रधा-रेण ॥ पावमान्यः पुनंतु मा ॥ प्राजापत्यं पवित्रम् शतोद्याम ँ हिरण्मयं ॥ तेन ब्रह्मविदो वयं ॥ पूतं ब्रह्म पुनीमहे ॥ इंद्रः सुनीती सह मा पुनातु ॥ सोमःस्वस्त्या वरुणः समीच्या ॥ यमो राजा प्रमृणाभिः पुनातु मा ॥ जातवेदा मोर्जयंत्या पुनातु ॥

ठाणे

## परिशिष्ट २

# देवलस्मृतिः ।

सिन्धुतीरे सुखासीनं देवलं मुनिसत्तमम्
समेत्य मुनयः सर्वे इदं वचनमब्रुवन् १
भगवन्म्लेच्छनीता हि कथं शुद्धिमवाप्नुयुः
ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्याः शूद्राश्चैवानुपूर्वशः २
कथं स्नानं कथं शौचं प्रायश्चित्तं कथं भवेत्
किमाचारा भवेयुस्ते तदाचक्ष्व सविस्तरम् ३

देवल उवाच—

त्रिशंकुं वर्जयेद्देशं सर्वं द्वादशयोजनम्
उत्तरेण महानद्या दक्षिणेन तु कीकटम् ४
प्रायश्चित्तं प्रवक्ष्यामि विस्तरेण महर्षयः
मृतसूते तु दासीनां पत्नीनां चानुलोमिनाम्
स्वामितुल्यं भवेच्छौचं मृते स्वामिनि यौनिकम् ६
अपेयं येन संपीतमभक्ष्यं चापि भक्षितम्
म्लेच्छैर्नीतेन विप्रेण अगम्यागमनं कृतम् ७
तस्य शुद्धिं प्रवक्ष्यामि यावदेकं तु वत्सरम्
चांद्रायणं तु विप्रस्य सपराकं प्रकीर्तितम् ८
पराकमेकं क्षत्रस्य पादकृच्छ्रेण संयुतम्
पराकार्धं तु वैश्यस्य शूद्रस्य दिनपञ्चकम् ९
नखलोमविहीनानां प्रायश्चितं प्रदापयेत्
चतुर्णामपि वर्णानामन्यथाऽशुद्धिरस्ति हि १०
प्रायश्चित्ताविहीनं तु यदा तेषां कलेवरम्

कर्तव्यस्तत्र संस्कारो मेखलादण्डवर्जितः ११
म्लेच्छैर्नीतेन शूद्रैर्वा हारिते दण्डमेखले
संस्कारप्रमुखं तस्य सर्वं कार्यं यथाविधि १२
संस्कारान्ते च विप्राणां दानं धेनुश्च दक्षिणा
दातव्यं शुद्धिमिच्छद्भिरश्वगोभूमिकांचनम् १३
तदासौ तु कुटुंबांना पङ्क्तिं प्राप्नोति नान्यथा
स्वभार्यां च यथान्यायं गच्छन्नेव विशुध्यति १४
अथ संवत्सरादूर्ध्वं म्लेच्छैर्नीतो यदा भवेत्
प्रायश्चित्ते तु संचीर्णे गंगास्नानेन शुध्यति १५
सिंधुसौवीरसौराष्ट्रं तथा प्रत्यन्तवासिनः
कालिंगकौंकणान्वंगान् गत्वा संस्कार मर्हति १६
बलाद्दासीकृता ये च म्लेच्छचाण्डालदस्युभिः
अशुभं कारिताः कर्म गवादिप्राणिहिंसनम् १७
उच्छिष्टमार्जनं चैव तथा तस्यैव भोजनम्
खरोष्ट्रविड्वराहाणामामिषस्य च भक्षणम् १८
तत्स्त्रीणां च तथा संगं ताभिश्च सहभोजनम्
मासोषिते द्विजातौ तु प्राजापत्यं विशोधनम् १९
चांद्रायणं त्वाहिताग्नेः पराकःस्त्वथ वा भवेत्
चाद्रायणं पराकं च चरेत्संवत्सरोषितः २०
संवत्सरोषितः शूद्रो माषार्धं यावकं पिबेत्
मासामात्रोषितः शूद्रः कृच्छ्रपादेन शुध्यति २१
ऊर्ध्वं संवत्सरात्कल्प्यं प्रायश्चित्तं द्विजोत्तमैः
संवत्सरैश्चतुर्भिश्च तद्भावमधिगच्छति २२
ह्रासो न विद्यते यस्य प्रायश्चितं दुरात्मनः
गुह्यकक्षाशिरोभ्रूणां कर्तव्यं केशवापनम् २३

प्रायश्चित्तं समारभ्य प्रायश्चित्तं तु कारयेत्
स्नानं त्रिकालं कुर्वीत धौतवासा जितेन्द्रियः २४
कुशहस्तः सत्यवक्ता देवलेन ह्युदाहृतम्
वत्सरं वत्सरार्धं वा मासं मासार्धमेव वा २५
बलान्म्लेच्छैस्तु यो नीतस्तस्य शुद्धिस्तु कीदृशी
संवत्सरोषिते शूद्रे शुद्धिश्चान्द्रायणेन तु २६
पराकं वत्सरार्धे च पराकार्धं त्रिमासिके
मासिके पादकृच्छ्रश्च नखलोमविवर्जितः २७
पादोनं क्षत्रियस्योक्तं घर्मं वैश्यस्य दापयेत्
प्रायश्चित्तं द्विजस्योक्तं पादं शूद्रस्य दापयेत् २८
प्रायश्चित्तावसाने तु दोग्ध्री गौर्दक्षिणा मता
तथाऽसौ तु कुटुम्बान्ते ह्युपविष्टो न दुष्यति २९
अशीतिर्यस्य वर्षाणि बालो वाऽप्यूनषोडशः
प्रायश्चितार्धमर्हन्ति स्त्रियो रोगिण एव च ३०
ऊनैकादशवर्षस्य पंचवर्षात्परस्य च
प्रायश्चित्तं चरेद्भ्राता पिता वाऽन्योऽपि वांधवा ३१
स्वयं व्रतं चरेत्सर्वमन्यथा नैव शुध्यति
तिलहोमं प्रकुर्वीत जपं कुर्यादतन्द्रितः ३१
संलापस्पर्शनिःश्वाससहयानासनाशनात्
याजनाध्यापनाद्यौनात्पापं संक्रमते नृणाम् ३३
याजनं योनिसंबन्धं स्वाध्यायं सहभोजनम्
कृत्वा सद्यः पतत्येव पतितेन न संशयः ३४
संवत्सरेण पतति पतितेन सहाचरन्
याजनासनयज्ञादि कुर्वाणः सार्वकामिकम् ३५
अतःपरं प्रवक्ष्यामि प्रायश्चित्तमिदं शुभम्

स्त्रीणां म्लेच्छैश्च नीतानां बलात्संवेशने क्वचित् ३६
ब्राह्मणी क्षत्रिया वैश्या शूद्रा नीता यदाऽन्त्यजैः
ब्राह्मण्याः कीदृशं न्याय्यं प्रायश्चित्तं विधीयते ३७
ब्राह्मणी भोजयेन्म्लेच्छमभक्ष्यं भक्षयेद्यदि
पराकेण ततः शुद्धिः पादेनोत्तरतोत्तरान् ३८
न कृतं मैथुनं ताभिरभक्ष्यं नैव भक्षितम्
शुद्धिस्तदा त्रिरात्रेण म्लेच्छान्नेनैव भक्षिते ३९
रजस्वला यदा स्पृष्टा म्लेच्छेनान्येन वा पुनः
त्रिरात्रमुषिता स्नात्वा पञ्चगव्येन शुध्यति ४०
स्पृष्ट्वा रजस्वलाऽन्योन्यं ब्राह्मणी क्षत्रिया तथा
त्रिरात्रेण विशुद्धिः स्याद्देवलस्य वचो यथा ४१
स्पृष्ट्वा रजस्वलाऽन्योन्यं ब्राह्मणी शूद्रजा तथा
पञ्चरात्रं निराहारा पञ्चगव्येन शुद्ध्यति ४२
ब्राह्मण्यनशनं कुर्यात्क्षत्रिया स्नानमाचरेत्
सचैलं वैश्यजातीनां नक्तं शूद्रे विनिर्दिशेत् ४३
म्लेच्छान्नं म्लेच्छसंस्पर्शो म्लेच्छेन सह संस्थितिः
वत्सरं वत्सरादूर्ध्वं त्रिरात्रेण विशुध्यति ४४
म्लेच्छैर्हृतानां चौरैर्वा कान्तारेषु प्रवासिनाम्
भुक्त्वा भक्ष्यमभक्ष्यं वा क्षुधार्तेन भयेन वा ४५
पुनः प्राप्य स्वकं देशं चातुर्वर्ण्यस्य निष्कृतिः
कृच्छ्रमेकं चरेद्विप्रस्तदर्धं क्षत्रियश्चरेत्
पादोनं च चरेद्वैश्यः शूद्रः पादेन शुध्यति ४६
गृहीता स्त्री बलादेव म्लेच्छैर्गुर्वीकृता यदि
गुर्वी न शुद्धिमाप्नोति त्रिरात्रेणेतरा शुचिः ४७
योषा गर्भं विधत्ते या म्लेच्छात्कामादकामतः

ब्राह्मणी क्षत्रिया वैश्या शूद्रा वर्णेतराच या ४८
अभक्ष्यभक्षणं कुर्यात्तस्याः शुद्धिः कथं भवेत्
कृच्छ्रं सांतपनं शुद्धिर्घृतैर्योनेश्च पाचनम् ४९
असवर्णेन यो गर्भः स्त्रीणां योनौ निषिच्यते
अशुद्धा सा भवेन्नारी यावच्छल्यं न मुञ्चति ५०
विनिःसृते ततः शल्ये रजसो वापि दर्शने
तदा सा शुध्यते नारी विमलं कांचनं यथा ५१
स गर्भो दीयतेऽन्यस्मै स्वयं ग्राह्यो न कर्हिचित्
स्वजातौ वर्जयेद्यस्मात्संकरः स्यादतोऽन्यथा ५२
गृहीतो यो बलान्म्लेच्छैः पञ्च षट् सप्त वा समाः
दशादि विंशति यावत्तस्य शुद्धिर्विधीयते ५३
प्राजापत्यद्वयं तस्य शुद्धिरेषा विधीयते
अतः परं नास्ति शुद्धिः कृच्छ्रमेव सहोषिते ५४
म्लेच्छैः सहोषितो यस्तु पंचप्रभृति विंशतिः
वर्षाणि शुद्धिरेषोक्ता तस्य चांद्रायणद्वयम् ५५
कक्षागुह्यशिरः श्मश्रुभ्रूलोमपरिकृन्तनम्
प्राहृत्य पाणिपादानां नखलोम ततः शूचिः ५६
यो दातुं न विजानाति प्रायाश्चित्तं द्विजोत्तमः
शुद्धिं ददाति चान्यस्मै तदशुद्धेः स भाजनम् ५७
सभायां स्पर्शने चैव म्लेंच्छेन सह संविशेत
कुर्यात्स्नानं सचैलं तु दिनमेकमभोजनम् ५८
माता म्लेच्छत्वमागच्छेत्पितरो वा कथंचन
असूतकं च नष्टस्य देवलस्य वचो यथा ५९
मातरं च परित्यज्य पितरं च तथा सुतः
ततः पितामहं चैव शेषपिण्डं तु निर्वपेत् ६०

स्त्रीणां चैव तु शूद्राणां पतितानां तथैव च
पञ्चगव्यं न दातव्यं दातव्यं मंत्रवार्जितम् ६१
वरुणो देवता मूले गोमये हव्यवाहनः
सोमः क्षीरे दाम्रि वायुर्घृतेरविरुदाहृतः ६२
गोमूत्रं ताम्रवर्णायाः श्वेतायाश्चैव गोमयम्
पयः काञ्चनवर्णाया नीलायाश्चापि गोर्दधि ६३
घृतं वै कृष्णवर्णाया विभक्तिर्वर्णगोचरा
उदकं सर्ववर्णं स्यात्कस्य वर्णो न गृह्यते ६४
षण्मात्रिके तु गोमूत्रं गोमयं च कुशोदकम्
त्रिमात्रिकं घृतं क्षीरं दधि स्याद्दशमात्रिकम् ६५
व्रते तु सर्ववर्णानां पञ्चगव्यं तु संख्यया
प्रायाश्चित्तं यथोक्तं तु दातव्यं ब्रह्मवादिभिः ६६
अन्यथा दापयेद्यस्तु प्रायश्चित्ती भवेद्द्विजः ६७
कपिलायाश्च गोर्दुग्ध्वा धारोष्णं यः पयःपिबेत्
एष व्यासकृतः कृच्छ्रः श्वपाकमपि शोधयेत ६८
तिलाहोमं प्रकुर्वीत जपं कुर्यादतन्द्रितः
' विष्णो रराट ' मंत्रेण प्रायश्चिती विशुध्यति ६९
बहुनाऽत्र किमुक्तेन तिलहोमो विधीयते
तिलान्दत्त्वा तिलान्भुक्त्वा कुर्वीताघनिवारणम् ७०
संपादयन्ति यद्विप्राः स्नानं तीर्थफलं तपः
संपादी क्रमते पापं तस्य संपद्यते फलम् ७१
प्रायश्चितं समाख्यातं यथोक्तं देवलेन तु
इतरेषामृषीणां च नान्यथा वाक्यमर्हथ ७२
सुवर्णदानं गोदानं भूमिदानं गवान्हिकम्
विप्रेभ्यः संप्रयच्छेत प्रायश्चित्ती विशुध्यति ७३

पञ्चाहात्प्रहवासेन संभाषणसहाशनैः
संप्राश्य पञ्चगव्यं तु दानं दत्त्वा विशुध्यति ७४
एकद्वित्रिचतुःसंख्यान्वत्सरान्संवसेद्यदि
म्लेच्छवासं द्विजश्रेष्ठः क्रमते द्रव्ययोगतः ७५
एकाहेन तु गोमूत्रं द्व्यहेनैव तु गोमयम्
त्र्यहात्क्षीरेण संयुक्तं चतुर्थे दधिमिश्रितम् ७६
पञ्चमे घृतसंपूर्णं पञ्चगव्यं प्रदापयेत्
पञ्चसप्तदशाहानि पञ्चदशान्च विंशतिः ७७
संवासं च प्रवक्ष्यामि देहशुद्धिं द्विजन्मनाम्
पञ्चहं पञ्चगव्यं स्यात्पादकृच्छ्रं दशाहिके ७८
पराकं पञ्चदशाभिर्विंशेऽतिकृच्छ्रमेव च
उदरं प्रविशेद्यस्य पञ्चगव्यं विधानतः ७९
म्लेच्छैर्नीतस्य विप्रस्य पञ्चगव्यं विशोधनम् ८०
पञ्चगव्यं च गोक्षीरं दधि मूत्रं घृतं पयः
यत्किंचिदुष्कृतं तस्य सर्वं नश्यति देहिनः
पञ्च सप्ताष्ट दश वा द्वादशाहोऽपि विंशतिः
प्राश्यापरेऽहन्युपवसेत्कृच्छ्रं सांतपनं चरेत् ८१
पृथक्सांतपनं द्रव्यैः षडहः सोपवासकः
सप्ताहेन तु कृच्छ्रोऽयं महासांतपनः स्मृतः ८२
पर्णोदुम्बरराजीवबिल्वपत्रकुशोदकैः
प्रत्येकं प्रत्यहं पीतैः पू ( प ) र्णकृच्छ्र उदाहृतः ८३
तप्तक्षीरघृताम्बूनामेकैकं प्रत्यहं पिबेत्
एकरात्रोपवासश्च तप्तकृच्छ्रस्तु पावनः ८४
एकभुक्तेन नक्तेन तथैवायाचितेन तु
उपवासेन चैकेन पादकृच्छ्र उदाहृतः ८५

कृच्छ्रातिकृच्छ्रः पयसा दिवसानेकविंशतिम्
द्वादशाहोपवासेन पराकः परिकीर्तितः ८६
पिण्याकशाकतक्राम्बुसक्तूनां प्रतिवासरम्
एकरात्रोपवासश्च कृच्छ्रः सौम्यः प्रकीर्तितः ८७
एषां त्रिरात्रमभ्यासादेकैकस्य यथाक्रमम्
तुलापुरुष इत्येष ज्ञेयः पञ्चदशाहिकः ८८
तिथिवृद्ध्या चरेत्पिण्डाञ्शुक्ले शिख्यण्डसंमितान्
एकैकं ह्रासयेत्पिण्डान्कृच्छ्रचांद्रायणं चरेत् ८९
यथाकथंचित्पिण्डानां चत्वारिंशच्छेवद्वयम्
इति देवल ( ले ) नकृतं धर्मशास्त्रं प्रकीर्तितम् ९०

समाप्तेयं देवलस्मृतिः

---

## देवलस्मृतीचें भाषांतर.

सिंधू नदाच्या तीरावर ( समुद्र कांठीं ) सुखानें बसलेल्या मुनिसत्तम देवलाकडे सर्व ऋषि एकत्र आले व असें म्हणाले ( १ ) भगवन् म्लेंच्छांनीं जुलमानें बाटाविलेले ब्राह्मण, क्षत्रिय वैश्य आणि शूद्र हे क्रमानें कसें शुद्ध होतील ? ( २ ) त्यांनीं कसें स्नान करावें, शुद्ध कसें व्हावें, कोणतें प्रायश्चित्त घ्यावें, आणि कसें वागावें हें सविस्तर आम्हास सांगा. ( ३ ) देवल म्हणाले, महर्षिहो, उत्तर बाजूला महानदी, दक्षिण बाजू कीकट (मगध) देश असा बारा योजनें विस्तीर्ण त्रिशंकु देश सोडून मी सविस्तर प्रायश्चित्त सांगतो. ( ४ व ५ ) अनुलोम विवाह केलेल्या पत्नीस व दासीस सोयेर व सुतक नवऱ्याचें जातीप्रमाणें पाळावयाचें असतें व तो मेल्यावर भाऊबंदाप्रमाणें पाळावयाचें. ( ६ ) म्लेंच्छांनीं जुलमानें बाटविलेल्या ब्राह्मणानें अपेय पान, अभक्ष्यभक्षण आणि अगम्यागमन एक वर्षापर्यंत केलें असलें ( ७ ) तर त्याच्या शुद्धीचें प्रायश्चित्त सांगतों. ब्राह्मणास सपराक चांद्रायण ( ८ )

क्षत्रियास पादकृच्छासहित पराक, वैश्यास पराकार्थ व शूद्रास पांच दिवस प्रायश्चित्त द्यावें ( ९ ) नखें व केंस काढून प्रायश्चित्त द्यावें कारण, ( क्षौरा- शिवाय चारहि वर्णांना शुद्धि नाहीं ( १० ) म्लेंच्छ झालेला मनुष्य प्राय श्चित्त न घेता मेला तर त्याच्या प्रेतास मेखला दंड वर्जित संस्कार करावेत ( ११ ) म्लेंच्छांनीं किंवा शूद्रांनीं दंड मेखला बळकाविल्यास त्याचे यथ विधी संस्कार करावेत. ( १२ ) संस्कार केल्यावर विप्रांना दान, धेनु, व दक्षिणा द्यावी. विशेष पावित्र्येच्छूंनीं घोडा, गाय, भूमि, सोनें यांचें दान द्यावें. ( १३ ) इतकें झालें की तो मनुष्य आपल्या कौटुंबियांच्या पंक्तीस बसण्यास योग्य होतो, नाहींतर होत नाहीं, तसेंच स्वतःच्या पत्नीकडे यथा- शास्त्र गमन करील तरच तो शुद्ध होतो.( १४ ) बाटून एक वर्षापेक्षां जास्त दिवस जर झालें तर वरील प्रमाणें प्रायश्चित्त घ्यावें व गंगास्नान करावें म्हणजे तो शूद्ध होतो ( १५ ) सिंधु, सौवीर आणि सौराष्ट्र तसेंच त्य देशांच्या सरहद्दी; कलिंग, कोंकण आणि वंग या देशांत जाऊन आलें असतां शुद्धीकरितां प्रायश्चित्त घ्यावें लागतें. ( १६ ) जबरीनें म्लेंच्छ, चांडाल आणि दस्यु यांनीं ज्यांना दास बनविलें. गायी इत्यादि प्राण्यांचीं हिंसाकर्मे करावयास लाविलीं ( १७ ) उष्टें काढावयास लाविलें, उष्टें खाण्यास भाग पाडिलें, तसेंच गाढव, उंट व डुक्कर यांचें मांस खावविले, (१८) म्लेंच्छ चांडाल दस्यु स्त्रियांशीं संग घडविला व भोजनहि घडविलें, अशास्थितींत ज्या द्विजांनीं महिना घालविला त्यांनीं प्राजापत्य प्रायश्चित्त घ्यावें. ( १९ ) आहिताग्नीला चांद्रायण किंवा पराक प्रायश्चित्त आहे पण एकवर्ष- पर्यंत असें राहण्याचा प्रसंग आल्यास चांद्रायण व पराक हीं दोन प्रायश्चित्तें घ्यावीं ( २० ) शूद्रास एक वर्षपर्यंत परधर्मीय समाजांत राहण्याचा प्रसंग आला तर त्यानें पंधरा दिवस गव्हाची पेज प्यावी. एक महिनाभरच राहिला असल्यास कृच्छ्रपाद प्रायःश्चित्तानें तो शुद्ध होतो ( २१ ) एक वर्षापेक्षां जास्त दिवस परधर्मीय समाजांत राहिला असल्यास त्याला कोणतें प्रायश्चित्त द्यावें, हें द्विजोत्तमांनीं ठरवावें. कारण चार वर्षे जर मनुष्य पर- धर्मीय समाजांत राहिला तर तो तद्रूप होतो. ( २२ ) बाटल्यांनतर ज्या दुरात्म्यानें प्रायश्चित्त घेतलें त्याचा ऱ्हास बंद होतो. गुह्य, खांक, डोकें व भुवया या ठिकाणचें केश काढावेत. ( २३ ) प्रायश्चित्ताला आरंभ झाल्या-

पासून प्रायश्चित्ताचे सर्व विधी करवावेत; त्रिकाल स्नान करावें व धुतलेलें धोतर नेसून इंद्रियनिग्रह पूर्वक असावें. ( २४ ) दर्भ हातांत घेतलेला सत्यवक्ता असें लक्षण देवलांनीं प्रायश्चित्त घेणाराचें सांगितलें आहे. जुलमानें बाटून वर्ष सहा महिने, महिना किंवा पंधरवडा परधर्मीय समाजांत राहिलेल्या माणसाची शुद्धि कशी करावी ? एकवर्षपर्यंत शूद्र जातीचा मनुष्य विधर्मी समाजांत राहिला तर चांद्रायण प्रायश्चित्तानें त्याची शुद्धि होते. ( २५ व २६ ) सहा महिने राहिल्यास पराक, तीन महिने राहिला तर पराकाचा अर्धा भाग आणि महिनाभर राहिल्यास पादकृच्छ्र प्रायश्चित्त क्षौरपूर्वक घ्यावें. ( २७ ) ब्राह्मणांना सांगितलेल्या प्रायश्चित्तांपैकीं एकचतुर्थांश कमी करून क्षत्रियांना त्यापैकीं अर्धें वैश्यांना आणि एक चतुर्थांश शूद्रांना द्यावें. ( २८ ) प्रायश्चित्तानंतर दुभतीगाय दक्षिणा म्हणून द्यावी. असें प्रायश्चित केल्यावर कुटुंबांत गेल्यास दोष लागत नाहीं. (२९) ऐंशी वर्षांचा म्हातारा सोळा वर्षांचे आंतील मुलगा स्त्रिया व रोगी यांना नेहमीं सांगितल्याच्या अर्धें प्रायश्चित्त द्यावें. ( ३० ) पांच वर्षांच्या पुढील व अकरा वर्षांच्या आंतील मुलांकरितां बाप, भाऊ किंवा अन्य पालक यांपैकीं कोणीहि प्रायश्चित्त करावें. ( ३१ ) याशिवाय इतरांनीं सर्व प्रायश्चित्तव्रत स्वतः करावें. तिळाचा होम करावा व निरलस जप करावा. ( ३२ ) संभाषण, स्पर्श, श्वास, बरोबर फिरणें, एकत्र बसणें, जेवणें, याजन, शिकवणें आणि योनिसंबंध यामुळें पापाचें संक्रमण होतें. ( ३३ ) पतित मनुष्याशीं याजन, विवाहसंबंध, अध्ययन व सहभोजन केल्यानें मनुष्य तात्काळ पतित होतो. ( ३४ ) अशा तऱ्हेनें एक वर्षपर्यंत पतिताशीं सहवास घडला आणि याजन, एकत्र बसणें, यज्ञ इत्यादि कामनिक क्रिया घडल्यास मनुष्य पतित होतो. ( ३५ ) यापुढें क्वचित बलात्कारानें बाटलेल्या व भोगिलेल्या स्त्रियांना शुद्ध करण्यासाठीं प्रायश्चित्त सांगतों. ( ३६ ) ब्राह्मणी, क्षत्रिया, वैश्यस्त्री व शूद्रा या जर अंत्यजांनीं जुलमानें भ्रष्ट केल्या तर ब्राह्मणीला कोणतें न्याय प्रायश्चित्त द्यावें ? ( ३७ ) ब्राह्मणी जर म्लेंच्छाला भोजन वाढील, अभक्ष्यभक्षण करील तर पराक प्रायश्चित्तानें तिची शुद्धि होते. क्षत्रिया, वैश्यस्त्री आणि शूद्रा यांना शुद्ध करण्याकरितां क्रमानें पाव पाव प्रायश्चित कमी करावें ( ३८ ) मैथुन व अभक्ष्यभक्षण

ज्यांच्याकडून झालें नाहीं, केवळ म्लेंछान्न भक्षण झालें त्यांना तीन रात्रीं व्रतस्थ राहिल्यानें शुद्धि प्राप्त होते. ( ३९ ) रजस्वला जर म्लेंच्छ किंवा अन्य यांनीं स्पार्शली तर ती तीन दिवस बसून पंचगव्य घेऊन शुद्ध होते. ( ४० ) तसेंच ब्राह्मणी अथवा क्षत्रिया रजस्वला जर परस्पराला स्पर्श करतील तर त्या तीन रात्रींनीं शुद्ध होतात असें देवल वचन आहे. (४१) ब्राम्हणी आणि शूद्रा परस्पराला स्पर्श करतील तर पांच रात्रीं निराहार करून पंचगव्य घेऊन त्या शुद्ध होतात ( ४२ ) ब्राम्हणीनें उपवास, क्षत्रियानें स्नान, वैश्य स्त्रीला सचैल स्नान आणि शूद्रीला नक्त सांगावें. ( ४३ ) म्लेंच्छान्न, म्लेंच्छसंस्पर्श आणि म्लेंच्छासहवर्तमान एक किंवा अधिक वर्षे वस्ती झाली असेल तर तीन रात्रीं शुद्धि होते. ( ४४ ) अरण्यांत प्रवास करीत असतां चोर किंवा म्लेंच्छ यांनीं पळविल्यामुळें भुकेनें किंवा भयानें भक्ष्याभक्ष्याचा प्रश्न आल्यास ( ४५ ) पुनः स्वदेशांत येऊन चातुर्वर्ण्य यांनीं प्रायश्चित्त घ्यावें. ब्राह्मणांनीं एक कृच्छ्र क्षत्रियांनीं त्याच्या निम्मे वैश्यांनीं त्यापेक्षां एकचतुर्थांश कमी व शूद्रांना एकचतुर्थांश प्रायश्चित्त द्यावें.(४६).जर बलात्कारानें म्लेंच्छांनीं स्त्रीला धरून व्याभिचार केला आणि ती गरोदर राहिली,तर ती इतर स्त्रिया प्रमाणें तीन दिवसांत शुद्ध होत नाहीं ( ४७ ) जी स्त्री इच्छेनें किंवा अनिच्छेनें म्लेंच्छापासून गरोदर होते ती स्त्री ब्राह्मणी, क्षत्रिया, वैश्य स्त्री, शूद्रा किंवा इतर कोणी असली आणि तिनें अभक्ष्य भक्षण केलें असलें तर तिची शुद्धि कृच्छ्रसांतपन केल्यानें व तुपानें योनि पाचन केल्यानें होते ( ४८।४९ ) असवर्ण पुरुषापासून गरोदर झालेली स्त्री बाळंत होईपर्यंत शुद्ध होत नाहीं. ( ५० ) स्त्री प्रसूत झाली किंवा तिला रजोदर्शन घडलें म्हणजे ती सुवर्णा प्रमाणें शुद्ध होते. असवर्ण गर्भ दुसऱ्याला द्यावा स्वतःकेव्हांहि घेऊं नये स्वतःच्या जातींत त्याला ठेविल्यास संकर होतो. ( ५२ ) बलात्कारानें म्लेच्छांनीं बाटाविलेल्यांची शुद्धि पांच सहा सात वर्षे किंवा दहा ते वीस वर्षें पर्यंत केली जाते ( ५३ ). त्याला प्राजापत्यद्वय प्रायाश्चित्त द्यावें. म्हणजे तो शुद्ध होतो. यापेक्षां अधिक दिवस राहिला असल्यास जातींत समाविष्ट करण्यासारखी शुद्धि करितां येत नाहीं केवळ इतकीं वर्षे राहणें झालें असेल तर कृच्छ्र प्रायाश्चित्तानें शुद्धि होते ( ५४ ). पांच वर्षांपासून वीस वर्षांपर्यंत म्लेंच्छ सहवास घडेल

तर चांद्रायणद्वय प्रायश्चित्त घेतल्यानें शुद्धि होते. ( ५५ ). खाक, गुह्य, मस्तक, मिशा व भुंवई या ठिकाणचे केश हातापायांची नखें काढल्यानें म्हणजे सक्षौर प्रायश्चित्त घेतल्यानें शुद्ध होतो. ( ५६ ) ज्याला प्रायश्चित्त देण्याचें समजत नाहीं आणि जो प्रायश्चित्त देऊन दुसऱ्याला शुद्ध करितो तो बाटलेल्या माणसाऱ्या पातकाचा अधिकारी होतो. ( ५७ ) सभेंत म्लेंच्छांशीं घसटून बसण्याचा प्रसंग आल्यास तर सचैल स्नान करून एक दिवस उपवास करावा. ( ५८ ). आईबाप यांपैकीं कोणी बाटलें तर ते मेल्यानें सुतक नाहीं असें देवलमुनि सांगतात. ( ५९ ) श्राद्ध करितांनाही बाटलेल्या आईबापांना पिंड न देतां न बाटलेल्या पितामहादिकांना द्यावे. ( ६० ) बाटलेल्या स्त्री शूद्रांना पंचगव्य देऊं नये. देणें झाल्यास मंत्राशिवाय द्यावें. ( यापुढें ६७ श्लोकापर्यंत पंचगव्याचें महत्व व तें देण्याचें प्रकार सांगितले आहेत. )

काळया गाईचें दूध काढून तें धारोष्ण असतांना जर पीईल तर व्यासांनीं सांगितलेल्या कृच्छ्र प्रायश्चित्तानें चांडाळही शुद्ध होईल ( ६८ ). तिळाचा होम करावा. आस्थेनें 'विष्णोरराट ' या मंत्राचा जप करावा म्हणजे बाटलेला मनुष्य शुद्ध होतो. +( ६९ ) फारकाय सांगावें तिळाचा होम करावा. तीळ द्यावेत. तीळ खावेत व पाप निवारण करावें. ( ७० ) विप्र स्नान, तीर्थ, फल व तप या पासून जें संपादितात तें पुण्य शुद्ध होणाराला मिळतें व त्याचें पातक नाहींसें होतें. ( ७१ ) अशा प्रकारें देवल ऋषींनीं बाटलेल्यांना शुद्ध करण्याचें प्रायश्चित्त सांगितलेलें आहे. अन्य मुनींचींहि मते यांहून वेगळीं असणार नाहींत. ( ७२ ) सुवर्णदान, गोदान, भूमिदान व गाईला लागणारीं खाद्य वगैरे सामुग्री ब्राह्मणाला दिली तर बाटलेला मनुष्य शुद्ध होतो. ( ७३ ) पांच दिवस संभाषण, एकत्र रहाणें व भोजन असा व्यवहार घडल्यास पंचगव्य घेऊन व दान देऊन शुद्ध होतो. ( ७४ ) एक, दोन, तीन अगर चार वर्षें पर्यंत म्लेंच्छाच्या सहवासांत राहिल्यास पुढील प्रमाणें प्रायश्चित्त केलें असतां ब्राह्मण जातीचा मनुष्य

---

+ ॐ विष्णो॑ र॒राट॑ मसि॒ विष्णो॑ः पृ॒ष्ठम॑सि॒ विष्णो॒श्नप्त्रे॑स्थो॒ विष्णो॒ स्यूर॑सि॒ विष्णो॑ ध्रु॒वम॑सि वैष्ण॒व म॑सि॒ विष्ण॑वे त्वा ॥ १ ॥

शुद्ध होतो ( ७५ ) एक दिवस गोमूत्र, दोन दिवस शेण, तीन दिवस दूध चवथ्या दिवशीं दह्यासहित दूध पांचव्या दिवशीं घृतयुक्त पंचगव्य द्यावें, म्हणजे शुद्धि होते ( ७६ ) पांच, सात, दहा, आणि पंधरापासून वीस दिवसपर्यंत जर म्लेंच्छांशीं सहवास घडला तर ब्राह्मणांची देहशुद्धि कशी होईल तें सांगतो. पांच दिवस सहवास झाल्यास पंचगव्य द्यावें.दहा दिवस सहवास झाल्यास पादकृच्छ्र प्रायश्चित्त द्यावें. ( ७७ व ७८ ) पंधरा दिवस सहवास झाल्यास पराक प्रायश्चित्त, वीस दिवस झाल्यास अतिकृच्छ्र प्रायश्चित्त द्यावें. ज्याच्या पोटांत शास्त्रोक्त विधानानें पंचगव्य जाईल त्याचें सर्व पातक नष्ट होतें. ( ७९ ) ज्याचें जें पातक असेल तें पंचगव्यानें नाहींसें होतें. पांच, सात,आठ,बारा फार काय वीसहि दिवस बाटलेल्या ब्राह्मणाची पंचगव्यानें शुद्धि होते.( ८० ) पंचगव्य घेऊन दुसरे दिवशीं उपवास करावा, म्हणजे **कृच्छ्र सांतपन** होतें ( ८१ ) प्रथक् सांतपन म्हणजे वेग वेगळ्या पदार्थांनीं सहा दिवस उपवास करणें, असा सात दिवस उपवास केल्यास त्यास कृच्छ्र म्हणतात तें **महासांतपन** होय ( ८२ ) पर्ण, उंबर, कमल, बिल्वपत्र, कुशोदक यापैकीं एक दिवस एक अशा क्रमानें प्याल्यास **पूर्णकृच्छ्र** होतो ( ८३ ). तापलेलें दूध, तूप पाणी यापैकीं एक दिवस एक प्याल्यास आणि एक रात्र उपास केल्यास **तप्त कृच्छ्र** नांवाचें पावन प्रायश्चित्त होतें (८४) एकवेळा जेवण,नक्त त्याचप्रमाणें अयाचित वृत्तीनें राहणें किंवा एक उपवास केल्यास **पादकृच्छ्र** होतें. ( ८५ ) एक दिवस दूध पिऊन राहिलें असतां **कृच्छ्रातिकृच्छ्र** प्रायश्चित्त होतें, बारा दिवस उपवास केल्यास **पराक** नांवाचें प्रायश्चित्त होतें ( ८६ ) पेज, भाजी, ताक, पाणी आणि सातू यांपैकीं प्रत्येक दिवशीं एक खाऊन एक रात्र उपवास केल्यास **सौम्यकृच्छ** प्रायश्चित्त होते ( ८७) वरील प्रत्येक पदार्थ तीन दिवस पंधरा दिवसांचें क्रमानें पुनः भक्षण केल्यास **तुला-पुरुष** नांवाचें पंधरा दिवसाचें व्रत होतें. ( ८८ ) तिथिक्रमानें शुक्ल पक्षांत मोराच्या अंडा एवढें अन्नाचे ग्रास वाढवावे आणि कृष्ण पक्षांत कमी करावे यास **कृच्छ्र चांद्रायण** असे म्हणतात ( ८९ ) कोणत्याही रीतीनें एका महिन्यांत दोनशे च्याळीस घांस व्हावेत असे देवलानें धर्मशास्त्रांत सांगितलें आहे ( ९० ).

———

# परिशिष्ट ३

## शुद्धीकरणाबद्दल शंकराचार्यांचें आज्ञापत्र.

श्रीमत्परमहंस...श्री कैलासक्षेत्रस्थित...सिंहासनाधिरूढ श्री. विष्णुप्रयागतीरनिवास......ज्योतिर्मठाधीश्वर नित्यानंदसरस्वतीस्वामी मुक्काम कसबे आगाशी तालुके वसई येथें कसबे मजकुरीं श्रीं भवानी शंकराचे देवालयांत.

परमशिष्य वर्ग शिरोमणी वेदमूर्ति ब्रह्मशास्त्रज्ञ षटकर्माधिकारी चतुर्वर्णस्य ज्योतिष्युपाध्येष्ठाधिकारी ब्रह्मवृंद वंद्य रा. रा. पांडुरंग हरि जोशी, पुरंदरे आदिकरून वृत्यंशी वास्तव्य तालुके वसई येथील यांसी आज्ञा कीं मागें फिरंगी राज्यांत महाराष्ट्र लोकांपैकीं कित्येक शुद्ध जातीचे लोकांस बलात्कारें बाटविलें याजवर श्रीमंत पेशव्यांचे राज्यांत त्या बाटविलेल्यांपैकीं पेशवे सरकारास शरण गेल्यावरून श्रीमंतहि धर्मशास्त्राप्रमाणें प्रायश्चित्त देऊन शुद्ध करून महाराष्ट्र धर्मांत आणिलें आणि त्यांजकडे शुभाशुभ करणेची आज्ञा तुम्हांकडे केली. त्याप्रमाणें तुम्ही अविच्छिन्न चालवितां. पुढें मेहेरबान इंग्रज सरकार बहादूरचे राज्यांत राजहुकमतीनें महाराष्ट्र धर्मांत लोक आले. त्याजकडे शुभाशूभ कर्में तुम्ही चालवीत नाहीं असें कळलें. त्याजवरून चौकशी करून तुमचे चतुर्वर्णांचे यजमानांची आम्ही समजूत करून तुम्हांस कोणी हरकत न करी अशी आज्ञा केली आहे आणि साहेबांचे राज्यांत महाराष्ट्र धर्मांत आलेल्या लोकांपैकीं तालुके वसई येथील राहाणारे व तालुके साष्टी येथील रायमुर्दे व खारी येथील लोकांपासून आम्ही भिक्षा घेतली आहे आणि त्यांस आजपासून तुम्ही श्रीमंत सरकारनें शुद्ध केलेल लोकांकडे जशी शुभाशुभ कर्में करितां तशी ह्या लोकांकडे चालवावी अशी आज्ञा आहे. कळावें मिति चैत्र कृष्ण १३ त्रयोदशी भृगुवासरे शके १७९१ शुक्ल नामसंवत्सरे

नित्यानंद सरस्वती दस्तुरखुद.

निबंध ... २८१.५४

## परिशिष्ट ४.

### भक्तिविजयांतील बहिरंभटाचें शुद्धीकरण.

आणि कथा ऐका उद्भट । प्रतिष्ठान क्षेत्रीं बहिरंभट । जो षट-शास्त्रीं निपुण पंडित । वेदांत शास्त्रीं प्रवीण ॥ ८ ॥ ( तो ) एके दिवशीं भोजनीं बैसला । तो आपुले स्त्रियेशीं विनोद केला । अलवण शाक वाढली मजला । हा शब्द ऐकिला कांतेनें ॥ १४ ॥ मग उत्तर काय देतसे त्यासी। साठ वर्षे जाहली तुम्हांसी । आतां रसनेस चवी आपणासी । वृथा कासया पाहिजे ॥ १५ ॥ कांतेचें वचन ऐकोनी ।......म्हणे आतां जिणें कासया व्यर्थ ॥ १६ ॥ ( असें मनांत आणून ) मग अविंध पुरोहिताचे घरीं । बहिरंभट गेले ते अवसरीं । काजीस बोले मधुरोत्तरीं । स्वयातींत सारीं आम्हातें ॥ २४ ॥ ऐसी निष्ठा देखोनि । बहिरंभटासी भ्रष्टविलें त्यांनीं । ( पैठणचे ) ब्राह्मण (हा) वृत्तांत ऐकून श्रवणीं । उद्विग्न मनी सर्वत्र॥२९॥ कांहींच उपाय न चले म्हणोनि । मग निवांत राहिले आपुले मनी ॥३०॥ तंव कोणे अवसरीं । (पैठणचे) विप्र बैसले गंगातीरीं । त्यांपासी (बहिरंभट) जाऊनी सत्वरीं । रुदन करी अनुतापें ॥ ३९ ॥......ऐसें दृष्टि देखोनि त्वरित ब्राह्मण पुसत तयासी ॥ ४० ॥ ......तुम्ही किमर्थ झालेत यवन। दिधलें टाकून आम्हातें ॥ ४१ ॥ ( त्यावर बहिरंभट म्हणतात ) माझें कर्म बलवत्तर । म्हणोनि अविचार घडला कीं ॥ ४२ ॥ ( त्यावर प्रतिष्ठान नगरीचे ब्राह्मण ) विचार करिती एकमेक ॥ ४४ ॥ म्हणती हा सर्वज्ञ गुणी । निजकर्मे भ्रष्टला आपुले मनीं । तरी आतां विधियुक्त प्रायश्चित्त देऊनी । ब्राह्मणपणीं आणावा ॥ ४५ ॥ इतर ग्रामांचे शास्त्ररीति । सकळ पुसावया आपणांस येती । आणि यास शुद्ध करावया निश्चिति । संशय चित्तीं कासया ॥ ४६ ॥ ...इतर ग्रामींचे भ्रष्टले कोणी । ते शुद्ध होतात प्रतिष्ठानीं । आणि येथील दवडावा सर्वज्ञ गुणी । तरी आपणा शब्द येईल ॥ ४८ ॥ मग शास्त्र पाहोनिया त्वरित । तयासि दिधलें प्रायश्चित । द्रव्य वेंचोनि अपरिमित । ब्राह्मणा पवित्र त्या केलें ॥ ४९ ॥ भक्तिविजय, अ० ॥ ४४ ॥

ॐ

॥ धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा ॥

## प्राज्ञपाठशाळा मंडळ–पुस्तकमाला.

# पुस्तक तिसरें.

क्षत्रिय वैश्यांचें शास्त्रसिद्ध अस्तित्व आणि प्रायश्चित्त.

### भाग १ ला.

# वेदोक्त चळवळीचा पूर्ववृत्तांत.

पेशवाईचा अंत झाल्यानंतर हिंदुस्थानांतील लोकांना विशेषतः राजेरजवाड्यांना स्वारीशिकारीचा कांहींच खटाटोप उरला नाहीं. इंग्रजांनीं संरक्षण पालन संवर्धनाची सर्व जबाबदारी घेतल्यामुळें सर्वांस पूर्ण स्वास्थ्य व सुखानुभव मिळाला. अव्वल इंग्रजीमध्यें इंग्रजी ज्ञानाचा लाभ झालेल्या सुशिक्षितांमध्यें नवीन विचाराचें चैतन्य खेळूं लागलें. अनेक प्रकारच्या चळवळी देशोद्धारार्थ सुरू झाल्या. जोतिबा फुल्यांनीं १८८३ त सत्यशोधक समाजाची स्थापना केली. ब्राह्मणेतरांना ब्राह्मणांच्या गुलामगिरींतून सोडवून त्यांना शिक्षण देऊन ब्राह्मणेतर समाजाची सामाजिक सुधारणा करण्याचा त्यांचा हेतु होता. त्यांनीं दीनबंधु नांवाचें १८७७ त वर्तमानपत्र काढून आपली मतें प्रसृत करण्यास प्रारंभ केला. इंग्रजी शिक्षणामुळें समान हक्काची, समत्वाची, आणि समाजांतल्या सर्व घटकांना स्वाभिमानाची जाणीव होऊं लागली. शिक्षण घेतलेल्या मराठ्यांना आपण क्षत्रिय आहोत, अर्थात् आपणांस वेदाधिकारही आहे असें वाटूं लागलें. श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या सारख्या प्रतिभासंपन्न, सुज्ञ व शोधक संस्थानिकांचेंही या प्रश्नाकडे मन वेधल्यामुळें या विषयाला चांगलेंच महत्त्व आलें "राजा-बोले दळ हाले" या म्हणीप्रमाणें बडोदे संस्थानांत हा विषय रंगूं लागला.

गायकवाड सरकारचे आश्रित श्री. बिरजे यांनीं ' क्षत्रिय आणि त्यांचें अस्तित्व ' या विषयावर एक पुस्तकही लिहिलें. या पुस्तकावर उलटसुलट चर्चा होऊं लागली. याच सुमारास कै. वा. श्रीमंत छत्रपति शाहू महाराज, संस्थान कोल्हापूर, यांनाहि वेदोक्त कर्म करण्याची इच्छा उत्पन्न झाली. छत्रपति महाराजांजवळ जी वृद्ध आप्त मंडळी होती ती " जुनें मोडूं नये नवें करूं नये " अशा बुद्धीची होती. तथापि महाराजांनीं श्री शंकराचार्यांपर्यंत तें प्रकरण नेऊन वेदोक्त कर्मांचा अधिकार संकेश्वर मठाधिपतीकडून मिळविला; आणि ब्राह्मणांनीं वेदोक्त कर्मे महाराजांच्या घरीं खुशाल करावें असेंही आज्ञापत्र मिळविलें. हा अधिकार श्री शिष्य जगद्गुरु यांच्या कडून मिळाला होता म्हणून वाईकर ब्रह्मवृंदांनीं मुख्य श्रीकडे शास्त्राविरुद्ध निर्णयाचा फिरून विचार व्हावा असा तपासणी अर्ज केला त्यामुळें श्रींनीं छत्रपतींचा वेदोक्ताचा अधिकार रद्द केला म्हणून तंट्यास सुरवात झाली.

मुख्य श्री भिल्लवडीकर स्वामी यांचे श्री शिष्य ब्रह्मनाळकर स्वामी व कोल्हापूरचे महाराज हे एका बाजूस व दुसऱ्या बाजूस मुख्य श्री. वांईकर ब्रह्मवृंद, आणि पुराणमताभिमानी मंडळी असे दोन जोराचे तट पडले आणि केवळ अभिनिवेशानें एकमेकांवर टीकास्त्रांचा मारा सुरू झाला भिल्लवडीकर मुख्य श्रींनीं मिरजकर यांस श्रीशिष्य केलें. तिकडे कोल्हापुरच्या महाराजांनीं ब्रह्मनाळकरांना उचलून धरून वेदोक्तविरुद्ध चळवळ करणाऱ्या कोल्हापूर संस्थानांतील राजोपाध्ये प्रभृति ब्राह्मण मंडळीवर शस्त्र उचालिलें. या वेदोक्त प्रकरणापासून तों आज तागायत कोल्हापुर संस्थानांत काय काय प्रकार घडले आहेत व घडत आहेत ते किंमूलक आहेत हें सांगण्याचें प्रयोजन नाहीं. तसेंच ब्रम्हनाळकरांचे शिष्य व त्यांचे शिष्य पित्रे स्वामी, व पित्रे स्वामींचे शिष्य डॉक्टर कुर्तकोटी, आणि मिरजकरांचे शिष्य शेंडे स्वामी आणि शेंडे स्वामींचे शिष्य शिरोळकर स्वामी अशा परंपरेंत जगत्गुरूंचे तंटे आणि वेदोक्त प्रकरणाची खळबळ कशी अव्याहत चालली आहे हें सर्वश्रुत आहे. या वादांत धर्मसत्ताधिष्ठित जगद्गुरु व शासनसत्ताधिष्ठित कै. वा. छत्रपति हे मुख्य दोन सोडून दिले तर बाहेरचे पुष्कळ अतिरथी महारथी या वाग्युद्धांत पडलेले होते. श्री कृष्णानंद स्वामी चिंतामणराव वैद्य, कै. वा, लोकमान्य टिळक, काळकर्ते, अशी मंडळी,

वेदोक्ताचा पुरस्कार करीत होती, तर कै. वा. धर्ममार्तंड भाऊशास्त्री लेले, कै. वा. विद्यावाचस्पति आपाशास्त्री राशिवडेकर, व अशीच कांहीं इतर शास्त्री मंडळी या कार्याला कंबर कसून विरोध करीत होती. तात्पर्य, १९०५ सालच्या या वादाचीही अशी हकीगत आहे.

३ पुढें १९०६ सालीं बंगालची फाळणी झाल्यामुळें सर्व राष्ट्रांत एका नव चैतन्याचा संचार झाला. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रियशिक्षण व स्वराज्य या विषयांच्या गदारोळानें, सर्व देश दुमदुमून गेला, त्यामुळें पूर्वीच्या या तुणतुण्याच्या नादाकडे कुणाचें लक्ष्य गेलें नाहीं. किंबहुना असेंही म्हणतां येईल कीं जागृतीच्या काळांत या प्रश्नाचें पूर्वीचें उग्र स्वरूप बहुतेक नाहींसें झालें. १९१४ सालीं महायुद्ध सुरू झालें, व सरकारला हिंदुस्थानची मदत घेण्याची तीव्रता भासूं लागली. त्याच वेळीं हिंदी राष्ट्रानें स्वराज्याची मागणी जोरानें केली म्हणून प्रातिनिधिक स्वरूपाचें स्वराज्य कसें काय द्यावें, हें ठरविण्याकरितां भारत मंत्री मॉंटेग्यु साहेब हे हिंदुस्थानात आले. त्यामुळें जातवार प्रतिनिधींच्या चळवळीला तोंड लागलें. १९१६ सालीं लखनौ कांग्रेसमध्यें मुसलमानांना सवता सुभा देण्यांत आला होता; म्हणून इतर जातींना उचल घेण्यास भारत मंत्र्याचें आगमन हें मोठेंच कारण सांपडलें. जातिजातींच्या सभा भरूं लागल्या. निरनिराळ्या जातींचीं शिष्ट मंडळें विलायतेस रवाना झालीं. त्यांनीं विलायतेस जाऊन आपापलीं मतें कळविलीं. परंतु जातवार प्रतिनिधींच्या स्वरूपाचें स्वराज्य सर्वांशीं मिळालें नाहीं. समुद्रमंथनांतून जसें हालाहल विष उत्पन्न झालें तसें या चळवळींतून पुढें ब्राह्मणब्राह्मणेतरांचें द्वेषविष उपस्थित होऊन अत्याचार सुरू झाले. सत्यशोधकांनीं तमाशाच्या द्वारें धिंगाणे घालण्यास सुरवात केली. पुष्कळ खेडयांतील ब्राह्मणांना अतिशय त्रास झाला. अद्यापही सत्यशोधकी अत्याचार घडल्याचें केव्हां केव्हां वृत्तपत्रांत वाचावयास मिळतें.

४ काल ही एक मोठी चमत्कारिक वस्तु आहे. कालाच्या उदरांतून काय काय बाहेर पडेल, काल कोणाला पोटांत घेईल, काल कोणाची बुद्धि फिरवील, हें कांहीं सांगतां येत नाहीं. कालाच्या ओघांत सापडलेल्या, दुर्दशेनें ग्रासलेल्या आणि अवनतीच्या फेऱ्यांत पडलेल्या स्वराज्यैकदृष्टी

हिंदु समाजाला अलीकडे म्हणजे गेल्या पांच चार वर्षांत संघटित होण्याची बुद्धि तीव्रतेनें होऊं लागली आहे. जातीजातींतले तंटे मोडावे, सर्वांचें ऐक्य करावें, समाजाचें बल वाढावें, अशा बुद्धीनें पुष्कळ परिषदा भरूं लागल्या आहेत. त्यांतच हिंदुधर्म परिषदेचा स्तुत्य उपक्रम चालला आहे.

५ महाराष्ट्रांत धर्म आणि राष्ट्रीय शिक्षण देण्याकरितां 'प्राज्ञपाठ-शाळा मंडळ' ही संस्था स्थापन झालेली आहे. या संस्थेंतील पंडित व शास्त्री मंडळी व्यापक दृष्टीनें देशकाल वर्तमान लक्ष्यांत घेऊन धार्मिक प्रश्नांचे विचार करीत असते. या मंडळीच्या चर्चेंत ठरलेली हिंदुधर्म-सुधारणेची योजना आम्हीं आपली म्हणून गेलीं चार वर्षे धर्मपरिषदेपुढे व महाराष्ट्रापुढें मांडीत आहोंत. आमच्या योजनेंत क्षत्रिय आणि वैश्य यांच्याबद्दल एक कलम आहे. या विषयांवर आम्हीं वेळोवेळीं आमचे विचार प्रकट केले आहेतच. शिवाय नागपूर येथें महाराष्ट्र-धर्म-परिषदेनें क्षत्रिय वैश्यांचें अस्तित्व मान्य केलें आहेच; तथापि अद्याप कांहीं शास्त्री मंडळी आणि इतर पुराणमताभिमानी लोक हा वाद पुनः पुनः उकरून काढीत असतात. त्यांच्या या वादाला हल्लींची जनता किती मान देते हें सांगण्याचें प्रयोजन नाहीं. तथापि भावी पिढीस क्षत्रियवैश्यांच्या अस्तित्वाचें आणि त्यांच्या प्रायश्चित्ताचें स्वरूप समजावें म्हणून हा विषय आम्हीं पुस्तक रूपानें पुढें ठेवीत आहोंत.

---

## भाग २ रा.

# अभाववाद्यांचा पूर्वपक्ष.

१ या विषयावर जो वाद चालला आहे, तो केवळ कांहीं पुराण-वाक्यांच्या आधारें चालला आहे. तीं पुराणवाक्यें उद्धृत करणारा अर्वाचीन ग्रंथकार कमलाकर भट्ट हा होय. तेव्हां त्यांचें म्हणणें येथें प्रथम देतों.

ननु कलौ क्षत्रिय वैश्याभाव उक्तो भागवते नवमस्कंधे ।

इक्ष्वाकूणामयं वंशः सुमित्रांतो भविष्यति ।

यतस्तं प्राप्य राजानः संस्थां प्राप्स्यंति वै कलौ ॥

देवापिर्योगमास्थाय कलाप ग्राममास्थितः ।

सोमवंशं कलौ नष्टं कृतादौ स्थापयिष्यतीति ॥

द्वादशेपि.

एतेषां नामलिंगानां पुरुषाणां महात्मनाम् ।

कथामात्रावशिष्टानां कीर्तिरेव स्थिता भुवि ॥

देवापिः शंतनोर्भ्राता मरुश्चेक्ष्वाकुवंशजः ।

कलापग्राम आसाते महायोगबलान्वितौ ॥

ताविहैत्य कलेरंते वासुदेवानुशिक्षितौ ।

वर्णाश्रमयुतं धर्मं पूर्ववत्प्रथयिष्यतः ॥

विष्णुपुराणेऽपि—

देवापिः पौरवो राजा मरुश्चेक्ष्वाकुवंशजः ।

कृते युग इहागत्य क्षत्रमावर्तकौ हि तौ ॥

तथा—

महापद्मपतिः कश्चिन्नंदक्षत्रविनाशकृत् ।........

पुराणांतरेऽपि—

ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्याः शूद्रा वर्णास्त्रयो द्विजाः ।

युगे युगे स्थिताः सर्वे कलावाद्यंतयोः स्थितिरिति ।

अतः कथं द्विज संकरजा उक्ताः । मैवम ।

कलौ तु बीजभूतास्तु केचितिष्ठन्ति भूतले ।

तथैव देवापिपुरू ( मरू ) सांप्रतं समवास्थिताविति विष्णुपुराणात् ।

ब्रह्मक्षत्रविशः शूद्रा बीजार्थे य इह स्थिताः ।

कृते युगे हि तैः सार्धं निर्विशेषास्ततोभवन्निति ।

मात्स्योक्तेश्च—प्रच्छन्नरूपाः स्वकर्मभ्रष्टाः

क्षत्रिया वैश्याश्च संत्येव केचिदित्यस्मत्पितृचरणाः ॥

बाई येथील कै. वा. धर्ममार्तंडांच्या भाषेंत या सर्व वचनांतील मुद्दे मुख्य दोन असून ते पुढीलप्रमाणें आहेत.

२ कलावाद्यतयोः स्थितिः हें वचन व्यास महर्षींचेंच असल्यामुळें "श्रुतिस्मृतिपुराणोक्तफलप्राप्त्यर्थं" असें म्हणून प्रत्येक कर्मांचा संकल्प करणाऱ्या द्विजांना तें अत्यंत मान्य आहे.

३ याज्ञवल्क्य मुनींनीं धर्मस्थानामध्यें पुराणांचें परिगणन केलें असल्यामुळें हें पुराण वचन धर्मशास्त्रामध्यें प्रमाणभूत मानणेंच भाग आहे. परिसाप्रमाणें क्षत्रिय नांवानें विद्यमान, परंतु रूपानें गुप्त असल्यामुळें हें वचन अर्थवादपर अथवा अतिशयोक्तीचें नसून अक्षरशः खरें मानण्यासारखें आहे. आणि या वचनांत सांगितल्याप्रमाणें कलींत क्षत्रिय व वैश्य नसल्याचें सिद्ध होत आहे.

---

## भाग ३ रा

# पूर्वपक्षखंडण व अस्तित्वसिद्धि.

१ आर्य संस्कृतीच्या आणि सनातन वैदिक धर्मांच्या इतिहासामध्यें चातुर्वर्ण्यसंस्थेचें बरेंच महत्व आहे. किंबहुना असेंही म्हणतां येईल कीं चातुर्वर्ण्य संस्थेच्या जोरावरच हिंदुसमाज हा इतके दिवस टिकलेला आहे. ईश्वराचे अवतार चातुर्वर्ण्यसंस्थापना आणि धर्मसंस्थापना करण्याकरितांच होत असतात. चातुर्वर्ण्यांचे धर्म आणि संस्कृति या दोन्ही दृष्टींनीं इतकें महत्व असतां जगाला ललामभूत होणाऱ्या या संस्थेचा नायनाट करण्याचा प्रयत्न जेव्हां सनातन वैदिक धर्मीय लोकच करूं लागतात तेव्हां "कालाय तस्मै नमः" असें म्हणण्याची पाळी येते. परक्या संस्कृतीनें आर्य संस्कृतीची ही संस्था आधींच खिळखिळी करून टाकली आहे. अशा स्थितींत जेव्हां कांहीं लोक पुराण वाक्यें पुढें करून क्षत्रिय वैश्यांचा अभाव प्रति-

पादन करतात. तेव्हां " कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ " या म्हणीचें स्मरण होतें. असो.

पूर्वपक्षाची बाजू किती लंगडी आहे आणि क्षत्रिय व वैश्य यांचें अस्तित्व कसें सिद्ध आहे हें आतां पाहूं.

श्रुति, स्मृति आणि पुराणें हे आमचे धर्मग्रंथ होत. पुराणापेक्षां स्मृति आणि स्मृतीपेक्षां श्रुति यांना उत्तरोत्तर प्रामाण्य जास्त आहे असें शास्त्रमत आहे; म्हणून श्रुति,स्मृति आणि पुराणदृष्ट्या या प्रश्नाचा विचार करू.क्षत्रिय-वैश्यांचें अभावबोधक श्रुति वाक्य कोठेंहि नाहीं. उलट समाजाच्या सामर्थ्या करितां कोणकोणत्या गोष्टी असाव्यात असें जेथें जेथें वर्णन आलेलें आहे, तेथें तेथें आमच्या राष्ट्रामध्यें क्षत्रिय, वैश्य असावेत असेंच म्हटलें आहे. नमुन्याकरितां तैत्तिरीय संहितेंतील एक सूक्त देतो.

आब्रह्मन् ब्राह्मणो ब्रह्मवर्चसी जायतामास्मिन् राष्ट्रे राजन्य इषव्यः शूरो महारथो जायतां दोग्ध्री धेनुर्वोढानड्वानाशुः सप्तिः पुरंध्रियोषा जिष्णू रथेष्ठाः सभेयो युवास्य, यजमानस्य वीरो जायतां निकामे निकामे नः पर्जन्यो वर्षतु, फलिन्यो न ओषधयः पच्यंतां योगक्षेमो नः कल्पताम् ।

या सूक्तांत, हे परमेश्वरा, आमच्या राष्ट्रामध्यें ब्रह्मतेजानें युक्त असे ब्राह्मण, शूर, महारथी, आणि अचुक नेम मारण्यामध्यें पटाईत असे क्षत्रिय, दुभत्या गाई, चांगले अवलादीचे बैल ( यांची पैदास करणारे उत्तम वैश्य ) वेगवान् घोडे, पतिव्रता स्त्रिया, सभापंडित तरुण, वेळचे वेळीं पाऊस आणि सर्व प्रकारची धनधान्यसमृद्धि होवो असें मागितलें आहे. यावरून क्षत्रियांची राष्ट्राच्या सुस्थितीस किती आवश्यकता आहे याची कल्पना येईल.

बृहदारण्यक उपनिषदाच्या पहिल्या अध्यायाच्या चौथ्या ब्राह्मणांत सृष्ट्युत्पत्ति सांगितली आहे. तेथें परब्रह्मानें आधीं ब्राह्मण उत्पन्न केले. परंतु तेवढ्यानें पूर्तता झाली नाहीं म्हणून " श्रेयोरूपमत्यसृजत क्षत्रम् " श्रेयस्कर असें क्षत्र उत्पन्न केलें व पुढें " सविशमसृजत " विश् म्हणजे वैश्य उत्पन्न केले असें म्हटलें आहे.

तात्पर्य, चार वर्ण किंवा वर्ग उत्पन्न केल्याशिवाय समाजाला सुख आणि शांति यांचा अनुभव येत नाहीं. म्हणूनच परब्रह्मानें ही व्यवस्था केली.

श्रुतीनंतर सुप्रसिद्ध व सर्वमान्य मनु, याज्ञवल्क्य व पराशर अशा स्मृतींमध्यें कोठेंहि क्षत्रियवैश्यांचा अभाव सांगितला नाहीं. उलट क्षत्रियवैश्य यांना उद्देशून ब्राह्मणांप्रमाणें सर्व धर्म सांगितले आहेत. पराशर स्मृतीमध्यें प्रस्तावनेंतच ( त्या वेळीं सर्व वर्ण शूद्रतुल्य झाले होते म्हणून) " तेषां निंदा न कर्तव्या युगरूपा हि ते द्विजाः " असें स्पष्ट म्हटलें आहे. कलियुगामध्यें प्रमाण म्हणून समजलेली जी पराशर स्मृति तिच्यावरून क्षत्रिय–**वैश्यांचा अभाव बिलकुल सिद्ध होत नाहीं**. महाभारत हा इतिहास ग्रंथ आहे. तथापि त्यांतील भगवद्गीतला स्मृतितुल्य मान देतात, त्या गीतेमध्यें व महाभारतामध्यें कलियुगांत क्षत्रिय वैश्यांचा अभाव आहे असें कोठें म्हटलेलें नाहीं. शांतिपर्वाच्या ७३ व्या अध्यायांत पुढील वचनें आहेत.

परस्परस्य सुहृदौ विहितौ समचेतसौ ।
ब्रह्मक्षत्रस्य संमानात्प्रजा सुखमवाप्नुयात् ॥ ४ ॥
विमाननात्तयोरेव प्रजा नश्येयुरेव हि ।
ब्रह्मक्षत्रं हि सर्वेषां वर्णानां मूलमुच्यते ॥ ५ ॥
यदा हि ब्रह्म प्रजहाति क्षत्रं ।
क्षत्रं यदा वा प्रजहाति ब्रह्म ॥ ६ ॥
एतौ हि नित्यसंयुक्तावितरेतरधारणे ।
क्षत्रं वै ब्रह्मणो योनिर्योनिः क्षत्रस्य वै द्विजाः ॥ ११ ॥

या श्लोकांचें सूक्ष्म निरीक्षण केल्यास ब्राह्मणांशिवाय क्षत्रिय आणि क्षत्रियांशिवाय ब्राह्मण राहूंच शकत नाहींत असा सिद्धांत निघतो. म्हणून श्रुति, स्मृति आणि भारत यांमध्यें क्षत्रिय आणि वैश्यांचें अस्तित्व साधार सिद्ध आहे असेंच म्हटलें पाहिजे.

३ कलियुगांत क्षत्रियवैश्यांचा अभाव आहे असें म्हणणाऱ्यांची मुख्य मदार येऊनजाऊन काय ती शूद्रकमलाकरांतील ' ब्राह्मणाः क्षत्रियाः वैश्याः शूद्रा वर्णास्त्रयो द्विजाः । युगे युगे स्थिताः सर्वे कलावाद्यंतयोः स्थितिः ॥ या वाक्यावर आहे. कमलाकर भट्टानें ' पुराणांतरेऽपि ' असें म्हणून हें वाक्य उद्धृत केलें आहे. परंतु हा पूर्वपक्ष आहे आणि त्याच ग्रंथांत पुढें

ग्रंथकारानें आपल्या पूज्य वडिलांचें क्षत्रियवैश्यांच्या अस्तित्वाबद्दलचें अनुकूल मत स्पष्ट सांगितलें आहे. तें असें—

कलौ बीजभूतास्तु केचित्तिष्ठन्ति भूतले ॥

प्रछन्नरूपाः स्वकर्मभ्रष्टाः क्षत्रियवैश्याश्च सत्येव कचिदिति अस्मत्पितृचरणाः ॥ यावरून बीजरूप प्रछन्नरूप म्हणजे उघडपणानें ज्यांचें अस्तित्व भासमान होत नाहीं अशा प्रकारचे क्षत्रियवैश्य कलियुगांत सुद्धां आहेत हें ठरतें. श्री. चिंतामणराव वैद्य हे हें वाक्य अनिर्दिष्ट पुराणांतलें आहे असें म्हणतात. जरी हें पुराणवाक्य असें कबूल केलें, तथापि त्यावरून श्रुति व स्मृति ह्या कलियुगांत रद्द आहेत असें ठरत नाहीं. पुराणाचा दर्जा हा श्रुति स्मृति यांच्या खालचा आहे असें आम्ही प्रथमच सांगितलें आहे.

इंग्रजी शिक्षणामुळें अंधश्रद्धा बरीचशी नाहींशी होत आहे आणि तिच्या ठिकाणीं चिकित्सा उत्पन्न होऊं लागली आहे. या चिकित्सेची छाया जुन्या लोकांवरहि पडूं लागलेली दिसते. पुण्यास भरलेल्या ब्राह्मण्यसभेचें हस्तपत्रक आमच्या हातीं आलें. त्यांत "श्रुतिस्मृत्युक्त धर्म पाळणारा ब्राह्मण" असें म्हटलें होतें. श्रुतिस्मृतिपुराणोक्त या संकल्पांतून पुराणोक्त हें पद बुद्धिपुरःसर ज्याअर्थीं हल्लीं गाळण्यांत येऊं लागलें आहे, त्याअर्थीं पुराणप्रामाण्याबद्दल बेभरंवसा उत्पन्न झाला आहे, हें उघड दिसतें. पुराणाला प्रामाण्य दिल्यास कोणकोणत्या आपत्ति आपणावर येऊन कोसळतील, याची कल्पना पुराणमताभिमान्यांना सुद्धा येऊं लागल्यामुळें पुराणप्रामाण्यावर बोट ठेवून दहा वर्षांपूर्वी जसें नामानिराळें होतां येत असे, तसें आतां येईनासें झालें आहे,

घटकाभर प्रतिपक्षाचें म्हणणें कबूल केलें, तरी कशी आपत्ति येते पहा. महाभारतांतील वनपर्वामध्यें "ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्याः नशिष्यंति जनाधिप ॥ एकवर्णस्तदा लोको भविष्यति युगक्षये ॥" —व. प. अ. १९० म्हणजे कलियुगाचे शेवटीं एकवर्ण होणार असें भविष्य सांगितलें आहे. कलियुगाच्या शेवटीं म्हणजे चौथ्या चरणांत क्षत्रियवैश्यांचा अभाव असूं शकेल. तो प्रथम चरणांत आहे असें म्हणण्यांत काय पुरुषार्थ आहे? पांचवा वेद मानलेल्या भारतांतील वाक्याची किंमत पुराणवाक्यापेक्षां केव्हांहि कमी मानतां येणार नाहीं.

पुराणास जर प्रामाण्य द्यावयाचें असेल तर तीं सर्व पुराणें आणि उपपुराणें व्यास महर्षिप्रणीत आहेत असें समजून त्यांना वेदतुल्य मान्यता दिली पाहिजे. तशी द्यावयाची असेल तर पुनः कशी अडचण येते तें पहा. हल्लीं बौद्ध अवतार असून पुढें कलंकी अवतार होणार आहे, ही गोष्ट आबालवृद्धांसहि माहीत आहे. कलंकी अवताराची हकीकत कल्कि पुराणांत दिलेली आहे. त्यांत १० व्या अध्यायांत कल्कीच्या विवाहाचें वर्णन आहे:—

"विवाहो रमया कल्केरभूदतिसुखावहः ॥ ३० ॥ नृपा नानाविधैर्भोज्यैः पूजिता विविशुः सभाम्। ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्याः शूद्राश्चापरजातयः ॥३१॥ विचित्रभोगाभरणाः कल्किं द्रष्टुमुपाविशम् ॥" कलियुगांत जर क्षत्रिय वैश्य नव्हते तर कल्कीच्या विवाहप्रसंगीं ते एकदम कोठून उत्पन्न झाले ? अभावापासून भावाची उत्पत्ति कशी मानतां येईल ? बरें हेंच कल्किपुराण इतर पुराणाप्रमाणें व्यासप्रणीतच आहे असें मानलें तर त्यांतील प्रथमाध्यायाची संगति कशी लावावयाची ? कल्कि पुराणाच्या प्रथमाध्यायांत

एवन्नु प्रथमे पादे कलेः कृष्णविनिंदकाः ॥ ३७ ॥
द्वितीये तन्नामहीनास्तृतीये वर्णसंकरः ।
एकवर्णाश्चतुर्थेच विस्मृताच्युतसत्क्रियाः ॥ ३८ ॥

असें वर्णन आहे. त्यावरून तृतीय चरणापासून वर्णसंकर होत होत चतुर्थ चरणांत चातुर्वर्ण्य बुडेल असें भविष्य आहे. कलीच्या तृतीय किंवा चतुर्थ चरणामध्यें बुडणारें चातुर्वर्ण्य आज बुडविण्यांत धर्माभिमान्यांना काय फलप्राप्ति आहे तें कळतें तर बरें झालें असतें.

एवढा वेळपर्यंत केलेल्या विवेचनावरून "कलावाद्यंतयोः स्थितिः" हें अनिर्दिष्ट पुराणवाक्य आहे, तें पूर्वपक्षांतलें आहे. श्रुतिस्मृतिप्रामाण्यापुढें तें रद्द आहे आणि इतर पुराणवाक्यांनाहि तसेंच प्रामाण्य दिलें तर कसा अनवस्थाप्रसंग येतो इत्यादि मुद्दे वाचकांच्या लक्षांत आले असतीलच. आणखी एक प्रश्न असा उपस्थित होतो कीं, हें प्रतिपक्षाचें सगळें म्हणणें जरी कबूल केलें तरी स्कंदपुराणांतील हें भावी स्थितीचें वर्णन कशावरून नसेल ? अध्यात्मरामायण, भागवत वगैरे ग्रंथांतहि कलियुगांतील सामाजिक

परिस्थितीचें भेसूर चित्र रेखाटलेलें आहे. कलियुगांत आचार नाहीं; विचार नाहीं; ताळ नाहीं, तंत्र नाहीं, वर्ण नाहीं, आश्रम नाहीं, असें सांगण्याच्या श्लोकांत " कलावाद्यंतयेः स्थितिः " असें म्हटलेलें नसेल कशावरून ? सगळ्याच गोष्टी जेथें अंधारांत आहेत, तेथें अमकेंच खरें आहे असें म्हणण्यांत काय स्वारस्य आहे ! महापुराणांपैकीं भागवत ग्रंथामध्यें " विप्रत्वे सूत्रमेव-हि " " शूद्रप्रायेषु वर्णेषु " असें कलियुगवर्णन द्वादशस्कंधामध्यें आहे. या शब्दांचा केवळ वाच्यार्थच घ्यावयाचा असेल तर कलियुगांत ब्राह्मणहि नाहींत असेंच म्हटलें पाहिजे. कलियुगांत आदिअंत म्हणजे ब्राह्मण आणि शूद्र आहेत असें जर एका पुराणवाक्यानें ठरवावयाचें असेल तर दुसऱ्या पुराणवाक्यांनीं ब्राह्मणच नाहींत असें कां म्हणूं नये ! पुराणांतील वर्णनें हीं अर्थवादपार असतात आणि प्रकरणांवरून त्यांचा अर्थ लावावयाचा असतो, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. क्षत्रियवैश्यांच्या आभावाचीं वर्णनें तेवढीं प्रमाण म्हणून पुढें करावयाचीं आणि ब्राह्मणांच्या अभावाचीं वर्णनें मागें दडवून ठेवावयाचीं यांत शहाणपणा नाहीं. " राजपुतान्यांत, उत्तर हिंदुस्थानांत आणि आंध्र प्रांतांत जर क्षत्रिय आहेत आणि ते जर प्रत्यक्ष आहेत तर महाराष्ट्रांतीलच गेले कशावरून ? महाराष्ट्रांतहि गागाभट्ट आणि समर्थ रामदासस्वामी यांनीं मान्यता दिलेलें भोसल्यांचें क्षत्रिय घराणें अद्याप जिवंत आहे " ब्राह्मणांच्या अदर्शनामुळें क्षत्रियवैश्यांच्या आचारांचा आणि क्रियांचा लोप झाला असेल तर तेवढ्याबद्दल प्रायश्चित्तें दिलीं म्हणजे झालें. महाराष्ट्रांत क्षत्रियांपेक्षां वैश्यच या कामीं जास्त अघाडी मारणार असा रंग दिसतो. अखिल भारतीय वैश्य कोमटी परिषद व वैश्यविद्याश्रम सासवनें या संस्थांची जी आम्हास माहिती आहे तीवरून वैश्यवर्णाचें अस्तित्व दहा पांच वर्षांत चांगलेंच भासमान होईल अशी खात्री वाटते. महाराष्ट्रीय क्षत्रिय वर्गास आम्ही यापूर्वींच म्हणजे नागपूर येथील महाराष्ट्र धर्मपरिषदेनंतर एक अगत्याची सूचना केली होती. सारांश, याप्रमाणें क्षत्रिय-वैश्यांचें प्रत्यक्ष अस्तित्व शास्त्रानें सिद्ध झाल्यावर फक्त क्रियालोप आणि संस्कारलोप याबद्दल प्रायश्चित्ताचाच तेवढा विचार शिल्लक राहतो. तो करण्यापूर्वीं इतिहास काय म्हणतो हें पाहूं.

## भाग ४ था.

# इतिहास काय म्हणतो ?

क्षत्रिय-वैश्यांचें अस्तित्व शास्त्रसिद्ध आहे. हें आम्ही एवढा वेळ केलेल्या विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत आलें असेल. पराशर स्मृतीचा प्रारंभ, देवल स्मृतींतील क्षत्रियवैश्यांचा उल्लेख आणि कल्किपुराण हे ग्रंथ पाहिले तर त्यांवरून क्षत्रिय वैश्यांचा अभाव आहे, असें म्हणतां येणार नाहीं. प्रतिपक्षाला बरें वाटावें म्हणून घटकाभर क्षत्रियवैश्यांचा अभाव संस्कृत ग्रंथावरून कबूल केला तथापि इतिहासाला अगदींच गुंडाळून ठेवाव-याचें कीं काय ? इतिहास हें प्रमाण अगदीं टाकाऊ आहे कीं काय ? कलि-युगाला प्रारंभ भारतीय युद्धाच्या वेळीं झालेला होता; असे उल्लेख भारता-मध्यें सांपडतात. भारतीय युद्ध ख्रिस्त पूर्व ३१०१ इतकें प्राचीन मानलें तरी वराहमिहिरावरून ख्रि. पू. २५२६ वर्षांपर्यंत यौधिष्ठिर घराणें राज्य करीत होतें असें दाखवितां येतें. भारतीय युद्ध रा.ज. स. करंदीकरांच्या मताप्रमाणें अलीकडे ओढलें, तरी सुद्धां कलियुगाला प्रारंभ झाल्यानंतर पुष्कळ दिवस क्षत्रिय वैश्य हयात होते हें ठरतेंच. बुद्ध धर्माच्या सर्वव्यापी क्रांतीनंतर शुंगघराण्यांतील पुष्यमित्र नांवाच्या राजानें अश्वमेघ यज्ञ केला. महाभाष्य-कार पतंजली या यज्ञास हजर होते, असा पुरावा सांपडतो. महाभाष्य-कारांचा काल ख्रि. पू. १५० हा आहे. शुंग घराण्यानंतर गुप्त घराण्यांतील समुद्रगुप्तानें मोठा अश्वमेघ यज्ञ केला. समुद्रगुप्त हा सम्राट् होता. त्याचीं नाणीं हल्लीं जीं उपलब्ध झालीं आहेत; त्यावर अग्निकुंड व अश्वमेघाचा घोडा यांचें चित्र आहे. समुद्रगुप्तानंतर हर्षवर्धन हाही मध्यकालांत मोठा सम्राट् होऊन गेला. हा मोठा सम्राट् विख्यात सत्याश्रय पुलकेशीचा सम-कालीन होता. उभयतांनींही अश्वमेघ यज्ञ केला. हर्षवर्धनाचा अश्व पुल-केशीनें अडविला, उभयतांत तुंबळ युद्ध झालें, आणि नर्मदेपलीकडे हर्ष व दक्षिणेस पुलकेशी अशी मर्यादा ठरली. शिवाय आंध्रभृत्य,राष्ट्रकूट,चालुक्य, शिलाहार वगैरे अनेक घराण्यांचीं अधिराज्यें महाराष्ट्रावर झालेलीं आहेत.

या घराण्यांचा इतिहास झुगारून दिल्याशिवाय कोणत्याही विचारी मनुष्याला क्षत्रियवैश्य नाहींत, असें म्हणतां येणार नाहीं. इस्लाम संस्कृतीशीं आपल्या छातीचा कोट करून लढणारे राजपुतान्यांतील वीर क्षत्रिय नव्हते असें जो म्हणेल त्याला मनुष्य कोटींतून बाहेर काढावें लागेल! मुसलमानांनीं रजपूत क्षत्रियांची घराणीं सोयरीकीनें बिघडविलीं तेव्हां ते कसले आले आहेत क्षत्रिय ? असें कोणी म्हणतील परंतु अकबरानें व त्या नंतरच्या बादशहांनीं हीं घराणीं बिघडविलीं असें धरून चाललें तरी अकबराच्या पूर्वीं म्हणजे अलीकडे कलियुगांत क्षत्रिय वैश्यांचा अभाव होता; असें सिद्ध होत नाहीं. मुसलमानांचा चांद सर्व हिंदुस्थानभर फडकण्यापूर्वीं सर्व हिंदुस्थान देशांत लहानमोठीं बरींच राज्यें होती. त्या राजवटींतील सर्व राजे क्षत्रिय नसले तरी बरेचसे क्षत्रिय होते असें म्हणणें भाग आहे. महाराष्ट्रांत हिंदुपदपातशाहीकरितां श्रीशिवभूपतीबरोबर ज्या अनेक मराठ्यांच्या घराण्यांनीं आपल्या आहुति समर कुंडांत दिल्या, त्या घराण्यांना शूद्र म्हणणार कीं काय ? तात्पर्य, इतिहासाकडे कानाडोळा करून, परिस्थितीकडे दुर्लक्ष्य करून, नुसती शास्त्रांतील वाक्यें तर्कशून्य पद्धतीनें सांगत बसण्याचा आणि क्षत्रियवैश्यांचें अस्तित्व नाहीं, असें म्हणण्याचा काळ निघून गेला आहे. इतिहाससूर्याचे जे प्रखर किरण आज अनेक संशोधकांच्या प्रयासानें भरत खंडावर पडत आहेत, ते ज्याला सहन होत नसतील त्यानें यापुढें घूकवृत्ति स्वीकारिली पाहिजे. हिंदुस्थानांत जो इतिहास भास्कराचा उदय झाला आहे तो अस्ताला जाण्याचा संभव नाहीं. याकरितां शास्त्री मंडळींनीं यापुढें कोणत्याही धार्मिक प्रश्नांचा विचार करतांना नुसतें वाक्य घेऊन भागणार नाहीं. कोणतेंही शास्त्रीय वाक्य कोणत्या परिस्थितींत उत्पन्न झालें; हें नीट पाहिलें पाहिजे व नंतरच वाक्यार्थ केला पाहिजे. नुसतें अमक्या ग्रंथांत अमकें आहे म्हणून लोकांनीं तसें वागावें असें म्हटल्यानें सांगणाराचा अजागळपणा तर दिसतोच, पण मुख्य ग्रंथकाराच्याही पदरांत बावळटपणाचा दोष येतो. इतिहास ही बाब शास्त्रार्थ निर्णयाला लक्ष्यांत घेण्यासारखी आहे. थोडी कल्पना यावी म्हणूनच येथें हा त्रोटक विचार केला आहे.

## भाग ५ वा.

# प्रायश्चित्त विचार.

१याप्रमाणें क्षत्रियवैश्यांचें अस्तित्व सिद्ध झाल्यावर त्यांच्या प्रायश्चित्ताचा विचार सहजच उपस्थित होतो. महाराष्ट्रामध्यें असलेल्या क्षत्रियवैश्यांना व्रात्य प्रायश्चित्त देऊन त्यांचे पुनः संस्कार करून त्यांना विहित क्रिया करण्यास लावणें अगत्याचें आहे. कित्येकांना महाराष्ट्रांतील क्षत्रिय–वैश्यांच्या कांहीं पिढ्या संस्कारलोप व क्रियालोप यांमध्यें गेल्या असल्यामुळें क्रियाभ्रष्ट व आचारभ्रष्ट अशा या लोकांना कसले संस्कार व कसला आचार शिकवावयाचा असें गूढ पडतें. " वृषलत्वं गता लोके ब्राह्मणादर्शनेन च " या मनुस्मृतीच्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें महाराष्ट्रांतले क्षत्रिय वृषलत्वाप्रत पोंचले आहेत म्हणजे शूद्रसम झाले आहेत हें खरें; परंतु ते खास शूद्र मात्र नाहींत. म्हणून उपायचिंतनाला अवसर आहे. जुन्या मताचे अडाणी ब्राह्मण आणि फाजील सुधारलेले सुशिक्षित ब्राह्मण यांच्या घरांतील आचारविचारांकडे पाहिलें तर हे लोकसुद्धां शूद्रसमच आहेत असें म्हणावें लागेल. महाराष्ट्रांतला कांहीं भाग सोडला तर खानदेश, बागलाण, नगर, वगैरे जिल्ह्यांतील आणि कृष्णाकांठ व गोदाकांठ सोडला तर इतर प्रांतांतील ब्राह्मणही राहाणीनें घाणेरडे असेच आढळतील. त्यांना पाहिले म्हणजे भागवतांतील ' शूद्रप्रायेषु वर्णेषु ' या वचनाची सत्यता पटते. निष्कर्ष इतकाच कीं, महाराष्ट्रांतील क्षत्रियवैश्यांचा आचारविचार निकृष्ट अशा ब्राह्मण वर्गाच्या आचारासारखाच आहे. येऊन जाऊन कांहीं रूढि व पाटासारख्या चाली यांमध्येंच थोडा फरक पडेल.

क्षत्रियवैश्यांचे आचारविचार मलिन असल्यामुळें ते शूद्रसम झालेले आहेत, म्हणून त्यांना संस्कार करण्याच्या वेळीं कांहीं विशिष्ट बंधनें त्यांच्यावर लादण्यांत यावींत असें कांहीं लोक म्हणतात. परंतु ब्राह्मण मुलाची मुंज लावण्याच्या वेळीं त्याच्या बापानें अमुक इतका गायत्री मंत्र जपला आहे काय, किंवा हा मुलगा वर्षभर तरी बिनचुक संध्या करील काय, हा

विचार कोणीहि करीत नाहीं, ब्राह्मणामध्यें गर्भाधान, उपनयन, विवाह वगैरे संस्कार होतात असें म्हणण्यापेक्षां संस्कारांचीं सोंगें होतात असें म्हणणेंच बरें. कारण गर्भाधानाचा संस्कार न होतांहि पुष्कळ ब्राह्मणांचे व्यवहार चाललेलेच असतात. संभोगकालीं रात्रीं नवऱ्यानें म्हणावयाचे मंत्र हे उपाध्याय दिवसाच स्वतः म्हणून टाकतो ! उपनयन किंवा 'मुंज' म्हणजे आज ' बांध मुंज ' आणि उद्यां ' सोडमुंज ' अशी सोडण्याची घाई होते ! वेदविद्येला आरंभ करण्याच्या पूर्वीचा उपनयन हा एक धार्मिक, पवित्र व गंभीर संस्कार आहे, हें तत्त्व किती आईबापांच्या लक्षांत येत असेल, ईश्वरच जाणे ! उपनयन म्हणजे अशास्त्रीय अशा मातृभोजनाच्या अंगतीपंगतीचा थाट, भिक्षावळ म्हणजे भिक्षेच्या वेळची घोडयावरून वाजतगाजत, शोभेची दारू उडवीत मिरवणूक आणि लग्न म्हणजे एक प्रकारचा विहिणींचा उत्सवच, अशी सर्व ब्राह्मणांची समजूत झालेली आहे. लग्नांतील विडया तोडणें, तेलफळ, रुखवत वगैरे सर्व गोष्टींना इतकें महत्व आलें आहे कीं, त्या बिचाऱ्या उपाध्याला आकाशांतील अरुंधतीचें दर्शन दिवसाच करविणें भाग पडतें. शिवाय उपाध्येबुवासहि ध्रुव व अरुंधती मुळींच माहीत नसतात. एवंच क्षत्रियवैश्यांप्रमाणें कलियुगांत अभावरूपानें नसलेला व शुद्ध परंपरेनें असलेला जो ब्राह्मणवर्ण किंवा जी ब्राह्मण जात तिच्यामध्यें सुद्धां संस्कारांची ही अशी रडकथा, मग इतरांना नांवें ठेवण्यांत काय अर्थ आहे ?

२ वैदिक संस्कारांना आलेलें हें उत्सवाचें स्वरूप लक्षांत घेतलें असतां ब्राह्मण संस्कारापासून कसे च्युत झालेले आहेत याची स्पष्ट कल्पना येते. ' जसा देव तसा नंदी, ' 'जसा गुरु तसा शिष्य' याच न्यायानें इतरांच्या संस्कारांचीहि वाट लागणार आहे. तेव्हां यापुढें संस्काराच्या वेळीं ब्राह्मणावर जर आचरणासंबंधीं कांहीं नियम लादावयाचे असले आणि ते त्यांना मान्य असले तरच क्षत्रियवैश्यांना अमुक अमुक करा असें म्हणणें उचित होईल. आम्हास तर अशी खात्री वाटते कीं, उद्यां प्रसंग आला तर ब्राह्मणांपेक्षां क्षत्रियवैश्य हेच नियमबद्धतेला जास्त अनुकूल होतील.

महाराष्ट्रांत क्षत्रियांपैकीं जर एक भोंसलेंघराणें घेतलें तर त्या घराण्यास गागाभट्ट आणि श्रीरामदास यांनीं पूर्वींच मान्यता दिली आहे.

अर्थात् भोंसलेकुळाशीं संबद्ध असणारीं उच्च मराठा कुळें यांना प्रथम व्रात्य प्रायश्चित्त देऊन त्यांचें उपनयन करावें आणि वेदाधिकार द्यावा. हा वेदाधिकार देण्याच्या बाबतींत दोन मतें आहेत. एका पक्षास असें वाटतें कीं, एकदम जे कोणी आपली परंपरा दाखवून क्षत्रिय म्हणवून घेण्यास तयार असतील त्यांचें सरसकट एकदम प्रायश्चित्तीकरण करून उपनयन करून टाकावें. दुसऱ्या पक्षास असें वाटतें कीं, हें असलें झटपट प्रायश्चित्त म्हणजे पैशावर येतें व पैसा हटला कीं, ब्राह्मणांची लबाडी दिसून येते; म्हणून दुसरीच कांहीं तरी तोड काढावी.

४ आम्हाला असें वाटतें कीं, वेदसंस्कार व धार्मिक आचार यांबद्दल हल्लीं उत्पन्न झालेला अनादर कांहीं चांगला नव्हे. समाजांत अश्रद्धान माणसें असणें इष्ट नव्हे. श्रद्धा, सद्भावना आणि सुविचार हीं उत्पन्न होण्याला थोडयाबहुत तरी धार्मिक आचरणाची अत्यंत आवश्यकता आहे. 'पी हळद व हो गोरी 'या म्हणीप्रमाणें एकदम ' हा घ्या वेदाधिकार ' हे घ्या संस्कार, ' असें म्हणणें कोणास योग्य वाटेल तर तें वाटो ! परंतु वैदिक आचारभ्रष्ट क्षत्रियवैश्यांमध्यें जे अवैदिक असे आचारविचार रूढ झालेले आहेत ते नाहींसे होऊन त्यांच्याहि ठिकाणीं खरी वैदिक तेजस्विता व आत्मनिष्ठा ही उत्पन्न व्हावयास पाहिजे असली तर आपस्तंब सूत्रांत सांगितल्याप्रमाणेंच प्रायश्चित्त घेतलें पाहिजे.

अथ यस्य पिता पितामह इत्यनुपेतौ स्यातां ते ब्रह्महसंस्तुतास्तेषामभ्यागमनं भोजनं विवाहमिति वर्जयेत् । अतिक्रांते सावित्र्याः कालऋतुं त्रैविद्यकं ब्रह्मचर्यं चरेत्तत उपनयनमथोदकोपस्पर्शनमथाध्याप्यः ॥ तेषामिच्छतां प्रायश्चित्तं यथा प्रथमेतिक्रमे ऋतुरेवं सवत्सरं प्रतिपुरुषं संख्याय संवत्सरान्यावंतोऽनुपेताःस्युः॥

बाप व आजा हे दोघे उपयनरहित असले तर ते ब्रह्मघातकी होत म्हणून त्यांची भेट घेऊं नये, त्यांचें अन्न सेवन करूं नये, आणि त्यांच्याशीं विवाहहि करूं नये. उपनयनकाल अतिक्रांत झाला असेल तर एक ऋतु लोटेपर्यंत त्रैविद्यक ब्रह्मचर्य आचरावें; नंतर उपनयन, स्नान आणि अध्ययन वगैरे करावींत. उपनयनरहित लोकांची इच्छा असल्यास त्यांना प्रायश्चित्त द्यावें. एक वर्षाचा कालातिक्रम झाला असल्यास जसें एक ऋतु लोटेपर्यंत प्रायश्चित्त सांगितलें आहे, तसेंच जितक्या पिढ्या अनुपनीत अशा गेल्या

असतील तितकीं वर्षे लोटेपर्यंत प्रायश्चित्त करीत राहावें असा या धर्मसूत्रांचा अर्थ थोडक्यांत आहे. प्रत्येक पिढीला एक वर्ष याप्रमाणें प्रायश्चित्त घेणें क्षत्रियवैश्यांना एका दृष्टीनें जरी अवघड वाटलें तथापि तें दुसऱ्या दृष्टीनें सवघड वाटण्यासारखें आहे. आम्ही महाराष्ट्रांतील सर्व क्षत्रियवैश्यांच्या अनुपनीत अशा सरसकट सहा पिढ्या गेल्या असें समजतों. सरासरी प्रत्येक पिढीचें आयुर्मान ३० पासून ४० वर्षांचें धरण्यास कांहीं हरकत नाहीं. इतक्या पिढ्या ज्यांच्या अनुपनीत गेल्या आहेत, त्या क्षत्रियवैश्यांनीं आपल्या मुलांना योग्य अधिकारी बनविण्याकरितां सहा वर्षांचें प्रायश्चित्त द्यावें. हें सहा वर्षांचें प्रायश्चित्त योग्य गुरुजनांनीं द्यावें. म्हणजे निराळ्या भाषेंत असें म्हणावयाचें कीं, 'एकादशे क्षत्रियं द्वादशे वैश्यं' या आश्वलायन सूत्रांत सांगितल्याप्रमाणें ११।१२ वर्षांचीं क्षत्रियवैश्यांचीं मुलें घेऊन त्यांना ६ वर्षांत धार्मिक, व्यावहारिक शिक्षण देणारी आणि प्रायश्चित्त देणारी अशी एक शाळा असावी किंवा आश्रम असावा. कुलाबा जिल्ह्यांत मौजे सासवनें येथें एक वैश्य ज्ञातीची संस्था कोंकणस्थ वैश्यांकरितां निघाली आहे, ती आदर्शभूत आहे. कोमटी वैश्य हे चांदा किंवा वणी येथें मध्यप्रांतांत किंवा वऱ्हाडांत तशाच प्रकारची एक संस्था काढू पाहत आहेत. क्षत्रियांनीं आपलीं मुलें तेथें पाठवावींत किंवा मराठा क्षत्रियांकरितां स्वतंत्र क्षात्रविद्याश्रम काढावा. प्राथमिक शिक्षण झालेले क्षत्रियवैश्य बटु शाळेंत घेऊन सहा वर्षांत कोणत्याहि विश्वविद्यालयाचे प्रवेशपरीक्षेस बसतां येईल, असा अभ्यासक्रम आंखावा. उत्तम मराठी भाषा, उत्तम संस्कृत भाषा येऊं लागली आणि वाणी शुद्ध झाली म्हणजे या विद्यार्थ्यांचें १५।१६ व्या वर्षी उपनयन करून वेदाध्ययन करवावें. मराठी आणि संस्कृत भाषा २।४ वर्षांत चांगली येईपर्यंत इकडे विद्यार्थिगृहाच्या आणि शाळेच्या शिस्तीनें क्षत्रियवैश्यबटूंच्या अंगीं ब्रह्मचर्यधर्म हळूहळू मुरेल. क्षत्रियवैश्यांचें उपनयन २२।२४ वयापर्यंत केलें तरी तो कालातिपात होत नाहीं. तेव्हां उपनयन होण्यापूर्वी चार वर्षे आणि उपनयनोत्तर दोन वर्षे या विद्यार्थ्यांचीं ह्या आश्रमांत गेलीं म्हणजे त्यांना एक प्रकारचें शुद्ध वळण लागेल, आश्रमधर्माचें प्रतिपालन होईल, आचार व उच्चार हीं सुधारतील, आणि मग वेदाध्ययनाचेंहि फळ मिळेल. आश्र-

मांतून ही एक पिढी अशी बाहेर पडली म्हणजे हे गृहस्थ पुढें आपल्या मुलांना पहिल्यापासूनच चांगलें वळण लावतील आणि थोडक्या कालांत या वर्णामध्यें विहित आचार, विचार व उच्चार दिसूं लागतील. प्रायश्चित्तापरी प्रायश्चित्त होऊन धर्मशिक्षण मिळेल. धर्मशिक्षणाबरोबर व्यावहारिक उपयुक्त शिक्षणाचाहि विचार करण्याचा असल्यामुळें प्रचलित शिक्षणपद्धतीचे दोषहि टाळतां येतील आणि ज्या मुलांच्या पालकांना क्षत्रियवैश्य होण्याबद्दल केवळ आर्थिकच प्रायश्चित्त द्यावयाचें असेल त्यांनाहि शक्य तेवढें आर्थिक साहाय्य प्रायश्चित्त म्हणून अशा संस्थांना करण्यास अवसर मिळेल. कोणतें-हि प्रायश्चित्त म्हटलें कीं पैसा, आणि तो पैसा अर्थात् ब्राह्मणाकडे जावयाचा, अशा प्रकारच्या समजुतीस या योजनेंत बिलकुल वाव नाहीं. झटपट प्रायश्चित्त घेणाऱ्या क्षत्रिय वैश्यांनीं प्रायश्चित्ताचा पैसा, आपल्या तरुण पिढीच्या ठिकाणीं खरें वैश्य वर्णाचें आणि क्षत्रिय वर्णाचें वैदिक संस्कार व तेज उत्पन्न व्हावें म्हणून अशा संस्थांकडे खर्च करावयाचा आहे. पंढरपूर येथील कोमटी वैश्य परिषदेंत आम्हीं ही कल्पना मांडली व ती पुष्कळांना पसंत पडली. ज्या महाराष्ट्रिय क्षत्रियवैश्यांस आमची ही कल्पना पसंत पडेल त्यांनीं आमच्याशीं पत्रव्यवहार केल्यास आम्ही मदत करूं.

आपस्तंब सूत्राप्रमाणें प्रत्येक पिढीला एक वर्ष याप्रमाणें तरुण पिढीच्या बाबतींत सहा वर्षें हें प्रायश्चित्त सर्वांना पटण्यासारखें आहे. इतरांच्या बाबतींत प्रायश्चित्ताचा विचार सहानुभूतीनें करावयाचा असल्यास शास्त्र कांहीं आडवें येणार नाहीं.

अनुक्तनिष्कृतीनां तु पापानामपनुत्तये ।
शक्तिं चावेक्ष्य पापं च प्रायश्चित्तं प्रकल्पयेत् ॥ २०९॥ म. अ. ११
देशं कालं वयः शक्तिं पापं चावेक्ष्य यत्नतः ।
प्रायश्चित्तं प्रकल्प्यं स्याद्यत्र चोक्ता न निष्कृतिः ॥ याज्ञवल्क्य ९३
अनाम्नातेषु धर्मेषु कथं स्यादिति चेद्भवेत् ।
यं शिष्टा ब्राह्मणा ब्रुयुः स धर्मः स्यादशांकितः ॥ मनु. अ. १२

मनु व याज्ञवल्क्य अशा महान् अधिकारी धर्मशास्त्रप्रयोजकांनीं अडचणीच्या काळाकरितां जी वाट ठेवलेली आहे तिचा उपयोग करून घेण्याचें औदार्य दाखविलें तरी सुद्धां पुष्कळ कार्य होणार आहे.

५ क्षत्रियवैश्यांच्या मुलांना क्रियालोपाबद्दल आणि संस्कारलोपाबद्दल सहा वर्षांचें प्रायश्चित्त म्हणजे पुष्कळच आहे. हा प्रायश्चित्तविधि विद्यार्थ्यांनीं क्षत्रिय आणि वैश्य शाळांच्या विद्यार्थिगृहामध्यें विशिष्ट प्रकारच्या शिस्तींत उरकावयाचा असल्यामुळें तो सहजासहजींच होणार आहे. म्हणजे त्यापासून प्रायश्चित्त देणाऱ्याला व घेणाऱ्याला फारशी पंचाइत पडावयाची नाहीं. आतां फक्त विद्यार्थिदशा ज्यांची अतिक्रांत झालेली आहे, त्यांचाच प्रश्न राहतो. त्यांनाहि आपद्धर्म लक्षांत घेऊन प्रत्येक पिढीला एक वर्ष आणि प्रत्येक वर्षाला एक दिवस अशा प्रमाणांत सहा दिवसांचें प्रायश्चित्त सांगतां येईल. क्षत्रियवैश्यबंधूंनीं हल्लीं जसें निरनिराळ्या कार्यांचे आठवडे नेमले जातात तसा एक आपल्या प्रत्यश्चित्ताचा आठवडा नक्की करावा. सर्व क्षत्रिय-वैश्यांचें एकीकरण दुरापास्त असलें तथापि निरनिराळ्या जातींचें अगर पोटजातींचे गट एकत्र करणें शक्य आहे. एका गांवांतील पांचपन्नास कोमटी वैश्यांनीं किंवा क्षत्रिय मराठ्यांनीं हा उपक्रम केल्यास त्यांचें अनुकरण दुसऱ्या गांवचे लोक करूं लागतील आणि हां हां म्हणतां प्रायश्चित्त घेऊन शुद्ध झालेल्या क्षत्रियवैश्य वर्णांच्या अस्तित्वाची साक्ष उज्वलतेनें पटूं लागेल. या सात दिवसांच्या प्रायश्चितसत्रांत सकाळीं सर्वप्रायश्चित्त होम आणि दोन प्रहरीं भजन, पुराण, कीर्तन, व्याख्यान असा कार्यक्रम ठेवावा. प्रारंभीं पुरुषांनीं सक्षौर प्रायश्चित्तपूर्वक पंचगव्यप्राशन व यज्ञोपवीत धारणविधि उरकून क्षत्रिय वैश्य वर्णांच्या कर्तव्याची व आचारधर्माची माहिती करून घ्यावी, आणि खऱ्या क्षत्रिय वैश्य कर्माला आपण कसे मुकलों याचा विचार करून सर्व प्रायश्चित्तहोमांत क्रियालोप व संस्कारलोपाचें पातक दहन करावें व यापुढें स्ववर्णोक्त विधिनिषेध पाळण्याची अग्नि गाय, आणि गुरु यांच्यापुढें शपथ वाहावी.

---

उपसंहारः—" वादे वादे जायते तत्वबोधः " असें म्हणतात. पण केव्हां केव्हां तत्वबोध बाजूला राहून वादच वाढतो असा अनुभव आहे. वेदोक्त प्रकरणाचा इतिहास जरा सूक्ष्म दृष्टीनें डोळ्यापुढें आणल्यास उभयपक्षीं केवळ हट्टच दृष्टीस पडतो. बडोदें संस्थानांतील आणि कोल्हापूर संस्थानांतील या चळवळीचें पहिलें विकृत स्वरूप आतां फारसें राहिलेलें नाहीं,

१०५५८८० २८४००

म्हणून शुद्ध आस्तिक दृष्टीनें विचार करण्याची आतां वेळ आली आहे, असें आम्हांस वाटतें. हल्लीं वादाला पूर्वीसारखें महत्त्व राहिलेलें नसून कार्याला महत्त्व येत चाललें आहे. त्यांतल्या त्यांत या विषयाच्या वादाची समाजाला ओकारी आली आहे यास्तव शहाणपणाचा मार्ग म्हटला म्हणजे वावदूकांच्या तोंडीं न लागतां कामास लागणें हा आहे.

चातुर्वर्ण्याचें पुनरुज्जीवनः—ही ईश्वरप्रिय गोष्ट कोणताहि विचारी मनुष्य प्रियच मानील. चातुर्वर्ण्याच्या अभिमान्यांना क्षत्रियवैश्यांचा अभाव आहे असें म्हणण्यांत काय पुरुषार्थ वाटत असेल तें ईश्वर जाणे; परंतु आमच्या सारख्यांना तो दैवदुर्विपाक वाटतो. ब्राह्मण वर्ण आज आहे, क्षत्रिय आणि वैश्य वर्ण हे पुढच्या दहाबारा वर्षांत उत्पन्न होतील. विशेष महत्त्वाची क्रांति ही होईल कीं, हिंदु-समाजाचा जो एक घटक फार दूर जाऊन बसलेला आहे तोहि चवथ्या वर्णांत आपलें स्थान शोधूं लागेल. दूर पडलेल्या हिंदु-समाजाच्या त्या अवयवाला जवळ आणण्यास आज एकपरीनें क्षत्रिय आणि वैश्य हेच अजाणपणामुळें विरोध करणारे आढळ तात. परंतु शुद्ध क्षत्रिय वैश्य पिढी निर्माण होतांच हिंदु-धर्माला ललामभूत होणारी चातुर्वर्ण्य संस्था सुधारलेल्या स्वरूपांत चमकूं लागेल. तो योग लवकर येवो अशी ईशचरणीं प्रार्थना करून हा विषय संपवितों.

ॐ

॥ धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा ॥

प्राज्ञपाठशाळा मंडळपुस्तकमाला.

## पुस्तक ४ थें.

# हिंदु विधवांचा धर्म.

नवरा मेलेल्या स्त्रियांना प्राचीन कालापासून तीन मार्ग सांगितलेले दिसतात. हे तिन्ही मार्ग विहित आहेत आणि समाजानें त्यांना मान्यता दिली आहे असें मात्र नाहीं. हे तीन मार्ग म्हटले म्हणजे ( १ ) सहगमन करणें, ( २ ) विधवा धर्मानें राहणें व ( ३ ) पुनर्विवाह करणें, हे होत. हल्लीं प्रत्यक्ष व्यवहारामध्यें पहिला मार्ग नाहींच; दुसरा व क्वचित् तिसरा असे मात्र आहेत. तथापि आम्हांस हिंदु विधवांच्या धर्माचा विचार करावयाचा असल्यामुळें तीनहि मार्गांचा परामर्श घेणें क्रमप्राप्त आहे.

१ सहगमनः—सहगमनाबद्दल स्मृतिवचनें पुष्कळच आढळतात. त्यावरून प्राचीन काळीं सहगमनाची चाल होती असें सिद्ध होतें.

पतिव्रता संप्रदीप्तं प्रविवेश हुताशनम् ।
तत्र चित्रांगदधरं भर्तारं साऽन्वपद्यत ॥ १ ॥
ततः स्वर्गं गतः पक्षी भार्यया सह संगतः ।
कर्मणा पूजितस्तत्र रेमे च सह भार्यया ॥ २ ॥व्यासः ॥
तिस्रः कोट्योऽर्धकोटी च यानि लोमानि मानुषे ।
तावत्कालं वसेत्स्वर्गे भर्तारं याऽनुगच्छति ॥ शंखांगिरसौ ॥
मृते भर्तरि या नारी समारोहेद्धुताशनम् ।
साऽरुन्धतीसमाचारा स्वर्गलोके महीयते ॥

आर्ताऽऽर्ते मुदिते हृष्टा प्रोषिते मलिना कृशा ।
मृते म्रियेत या पत्यौ सा स्त्री ज्ञेया पतिव्रता ॥ नारदः ॥

वर उद्धृत केलेल्या पहिल्या दोन श्लोकांत भगवान् व्यासांनीं श्येन—कपोताच्या उल्लेखानें पतिव्रतेनें कपोतीप्रमाणें सहगमन करावें असें सांगितलें आहे. इतर वाक्यांचा तात्पर्यार्थहि " सहगमन करणारी स्त्री पतीला स्वर्गांत नेते, स्वर्गांत तिची मान्यता होते, वसिष्ठपत्नी अरुंधतीच्या तोडीचा तिला मान मिळतो " असा आहे. नारद तर असें म्हणतात कीं, ' नवरा मेला असतांना जिचे प्राण स्वाभाविकच जातात तीच खरी पतिव्रता होय. '

२ सहगमनाधिकारी स्त्रिया—पतीच्या पश्चात् सहगमन करणें हा आचंडाल सर्व स्त्रियांचा धर्म आहे. मात्र तो गरोदर स्त्रियांना व ज्यांचीं मुलें अर्भकावस्थेंत आहेत त्यांना विहित नाहीं असें शास्त्रकार सांगतात. सहगमन हें रूढ होतें, तेव्हांसुद्धां त्याचे दोन प्रकार दिसतात. एक स्वाभाविक सहगमन म्हणजे पति मेल्याबरोबर आपोआपच प्राणोत्क्रमण होणें ( कारण पति हाच स्त्रियांचा प्राण असतो ) व दुसरा अग्निप्रवेश करणें. नवरा मेल्याबरोबर ज्यांचें आपोआप प्राणोत्क्रमण झालें, अशा पुष्कळ सतींच्या आख्यायिका सांगण्यांत येतात. जयदेव कवीच्या स्त्रीची अशीच गोष्ट आहे. " पतिव्रता जिणें ! भ्रताराच्या वर्तमानें ॥ " अशांतलाच तिचा प्रकार समजावयाचा. परंतु अशा सती फार थोड्या होत्या. सर्वसामान्य प्रकार म्हटला म्हणजे नवऱ्याची चिता पेटवून, सौभाग्यवायनें देऊन, सर्व सौभाग्य अलंकार धारण करून, सर्वांचा निरोप घेऊन मोठ्या थाटामाटानें अग्नींत प्रवेश करण्याचा हा होता. पहिल्या पहिल्यानें हा अग्निप्रवेश मोठ्या समारंभाचा व हौसेचा वाटत होता परंतु अशा प्रकारें सहगमन करण्याची तयारी सदैव व सतत केव्हांहि अपेक्षणें मनुष्यस्वभावाबाहेरची गोष्ट आहे. असें होण्यास धर्माच्या राज्यांत जुलमाची लुडबुड चालू होणें अपरिहार्य आहे. लोकलज्जेकरितां अग्नींत उडी टाकणें व अंग भाजू लागल्यावर बाहेर येण्याची धडपड करणें व नंतर भोंवतीं उभे असलेल्या लोकांनीं काठ्यांनीं भोसकणें असे अथवा अशाच तऱ्हेचे रानटी क्रूर प्रकार पुढें पुढें सुरू झाले. बेंटिकसाहेबांनीं सतीची चाल बंद करण्यापूर्वीं अशा गोष्टी पुष्कळ पाहिल्या असाव्यात. कायद्यानें सहगमनाची जरी बंदी केलेली असली तथापि

निरतिशय प्रतिप्रेमामुळें विव्हल झालेल्या स्त्रिया अद्यापि केव्हां केव्हां अग्नि-प्रवेश करतांना ऐकूं येतात. हें प्रसिद्धच आहे. निरतिशय प्रेमाला कायदा प्रतिबन्ध करूं शकत नाहीं, हें बंगाल्यांतील सती सरलादेवीच्या सहगमना-वरून सिद्धच आहे. पतिव्रता स्त्रिया हा आर्य संस्कृतीचा दुर्भेद्य दुर्ग आहे. महाराष्ट्र हिंदुधर्मपरिषदेपुढें कांहीं स्त्रिया सहगमनाची आज्ञा मागूं लागल्या ही आमच्या मतें मोठ्या अभिमानाची गोष्ट आहे. ' धर्मे चार्थे च कामे च नातिचरामि नातिचरामि नातिचरामि । ' अशा त्रिवार घेतलेल्या शपथेची कमाल अंमलबजावणी ज्या जीवांकडून होते ते जीव पुरुष अथवा स्त्री कोण-त्याहे देहांत असले तरी धन्यच मानले जाणार. बंगाल्यांतील सती सरला-देवीसारख्या स्त्रिया सर्व हिंदुधर्मीयांना अभिमानास्पद होत यांत शंका नाहीं.

३ सहगमनाबद्दल दुमत—हल्लीं सतीची चाल कायद्यानें बंद झालेली आहे. तथापि सहगमनाची चाल सर्वत्र रूढ होती, तेव्हांहि शास्त्रकार आत्म-हत्येप्रमाणें सहगमनाचा निषेध करीत होते असें दिसतें. विज्ञानेश्वरांनीं समन्वय करितांना जीं वाक्यें दिलीं आहेत, त्यांवरून ब्राह्मण स्त्रियांना सह-गमन विहित नाहीं असें दिसतें.

मृतानुगमनं नास्ति ब्राह्मण्या ब्रह्मशासनात् ।
इतरेषु तु वर्णेषु तपः परममुच्यते ॥
जीवन्ती तद्धितं कुर्यान्मरणादात्मघातिनी ।
या स्त्री ब्राह्मणजातीया मृतं पतिमनुव्रजेत् ॥
या स्वर्गमात्मघातेन नात्मानं न पतिं नयेत् ॥

हे श्लोक मिताक्षरेमध्यें पहिल्या अध्यायाच्या ८६ व्या श्लोकावर टीका करतांना आलेले आहेत. त्यावरून " इतर वर्णांतील स्त्रियांना सह-गमन हें परम तप असलें तरी ब्राह्मणजातीय स्त्रीनें आत्मघात न करतां जिवंत राहूनच स्वहित साधावें. आत्महत्येनें ब्राह्मण स्त्री स्वतःचें किंवा पतीचें हित करूं शकत नाहीं किंवा त्याला स्वर्गाला नेत नाहीं " असा निष्कर्ष निघतो. मनुस्मृतीच्या अध्याय ५ श्लो. १५६ वर टीका करितांना सुप्रसिद्ध टीकाकार मेधातिथि, केवल ब्राह्मणस्त्रीबद्दलच नव्हे तर कोणत्याहि वर्णाच्या स्त्रीबद्दल, असें म्हणतात कीं, ' सती जाणें हें प्रत्यक्ष श्रुतिविरुद्ध आहे. '

'तस्माद्‌ह न परायुषः प्रेयात्'।

म्हणजे आयुष्य संपण्यापूर्वी मरूं नये. आत्मघाताचें पातक हें पुरुष व स्त्रिया यांना सारखेंच आहे. म्हणून "जीवितस्य अतिप्रियत्वात्तदुपेक्षणस्य अशास्त्रत्वात्प्रतिषिद्धत्वात्" म्हणजे जीवित हें प्रत्येक प्राण्याला प्रिय आहे, त्याची उपेक्षा करणें शास्त्रविरुद्ध आहे आणि आत्महत्येचा प्रतिषेध असल्यानें या टीकाकाराला अनुमरण अशास्त्रीय वाटत आहे. तात्पर्य सहगमन हा एकच मार्ग विधवा स्त्रियांना सर्वथैव योग्य आहे अशी उच्च भावना समाजाच्या वाढत्या संख्येबरोबर टिकणें शक्य नव्हतें व त्याप्रमाणें त्यांच्या दुर्बलतेचें अस्तित्व वरील उद्गारात दिसून येतें हें अपरिहार्यच होतें. असो. कोणच्याहि कारणानें कां होईना, सतीची चाल हल्लीं बंद झाल्यामुळें आणि निरतिशय प्रेमाला कायदा प्रतिबंध करूं शकत नसल्यामुळें या प्रश्नाचा जास्त विचार करण्याचें कारण उरत नाहीं.

४ विधवापुनर्विवाहनिषेध—विधवांनीं सहगमन करावयाचें नाहीं तर मग अर्थात् दुसरा मार्ग म्हणजे पुनर्विवाह करून पूर्व दुःख विसरून संसारास लागावयाचें हाच उरतो असें वाटेल; पण हा पुनर्विवाहाचा प्रश्नहि इतका वादग्रस्त आणि गुंतागुंतीचा आहे कीं, त्याबद्दल जास्त न लिहिणें हेंच चांगलें. शास्त्र काय म्हणतें हेंच पहावयाचें असेल तर शास्त्रांत उलटसुलट, अनुकूल प्रतिकूल पुष्कळ वाक्यें आढळतात. हिंदु-समाज हा कित्येक हजार वर्षांच्या अनेक परिवर्तनांतून गेला असल्यामुळें समाजावरच्या सर्व प्रकारच्या आपत्तीचा त्याला पूर्ण अनुभव आलेला आहे. आठ प्रकारचे विवाह, अनुलोमप्रतिलोम विवाह बालप्रौढ विवाह अशा सगळ्या विवाहांचा अनुभव हिंदुसमाजानें घेतला आहे. देशकालवर्तमान पाहून कोणतें शास्त्रवचन पुढें आणून कोणता कोणता मार्ग स्वीकारावयाचा हेंच खरें शहाणपणाचें, दूरदर्शीत्वाचें आणि व्यवहारचातुर्याचें लक्षण आहे. सुधारकांच्याकडून हें धारण पाळलें गेलें नाहीं. इतकेंच नव्हे तर त्यांनीं औचित्यभंग केला असेंहि दिसतें. असो. स्त्रियांचा पुनर्विवाह कायद्याच्या जोरावर रूढ करण्याचा सुधारकांनीं प्रयत्न केला, पण त्यांत त्यांना अपयशच आलें. अक्षतयोनि कन्येचा किंवा वाचादत्त कन्येचा जरी पुनर्विवाह सांगितला असला तथापि त्या कालांत सुद्धां अशा पुनर्विवाहाला समाजानें मान्यता

दिलेली दिसत नाहीं. ब्राह्मणेतरांमध्यें पाटाची किंवा गंधर्वांची चाल आहे. पण त्यांनाहि त्यांच्या जातींत उत्कृष्ट लेखीत नाहीं. स्त्रियांच्या अंतःकरणाचा ठाव घेतला तर त्या अंतःकरणाला पुनर्विवाह संमत नाहीं असेंच म्हणावें लागेल. विधवांच्या कैवाऱ्यांनीं "पुरुषांनीं मात्र पाहिजे तेवढीं लग्नें करावींत आणि अबलांनीं मात्र लग्नाच्या गोष्टीहि काढूं नयेत" हा जो मोठा अन्याय आपल्या पक्षाचें समर्थन करण्याकरितां पुढें आणलेला आहे, त्याच्यावरच आतां आघात सुरू केला म्हणजे आटपलें.

५ पुरुषपुनर्विवाहनिषेध—सनातन वैदिक धर्माचा आणि आश्रमसंस्थेचा हेतु लक्षांत घेऊन पुरुषपुनर्विवाहाच्या निषेधाची मोहीम सुरू केली पाहिजे. स्त्रीपुनर्विवाहाप्रमाणें पुरुषपुनर्विवाहहि निषिद्धच आहे. पुरुषांना पूर्वीं ज्या कारणाकरितां पुनर्विवाहाची परवानगी दिली तीं कारणें आतां मुळींच शिल्लक राहिलेली नाहींत. प्राचीन काळीं प्रत्येक त्रैवर्णिक गृहस्थांच्या घरांत स्मार्त किंवा श्रौत अग्नि ठेवण्याचा प्रघात होता. 'यावज्जीवं अग्निहोत्रं जुहुयात्' म्हणजे प्रत्येक गृहस्थानें मरेपर्यंत अग्निहोत्र ठेऊन हवन केलेंच पाहिजे असा श्रुतीचा दंडक असल्यामुळें पहिली स्त्री मेली तर अग्निहोत्राकरितां दुसरी स्त्री करावी लागत असे हें, "आहरेद्विधिवद्दारानग्नींश्चैवाविलंबयन्" याज्ञ. स्मृ. १–८९. "पुनर्दाराक्रियां कुर्यात्पुनराधानमेव च"॥ मनु. अ. ५–१६८ या श्लोकावरून स्पष्ट होतें. हल्लीं लग्नानंतर किती दिवस अग्नि सिद्ध असतो हें सांगावयास नकोच. एवंच श्रौत स्मार्त कोणताच अग्नि जर गृहस्थ ठेवित नाहीं, तर त्याला पुनर्विवाहाचा अधिकार कसा पोहोंचतो ? अशा पुरुषांच्या पुनर्विवाहाला लोकांनीं अडथळा केला पाहिजे व अशा माणसावर बहिष्कारहि घातला पाहिजे असें आमचें मत आहे. आजपर्यंत या स्वातंत्र्याचा वाटेल तसा अनुभव घेतल्यामुळें आणि स्त्रियांच्याकडे अनुदारपणें पाहाण्याची संवय झाल्यामुळें जुन्या मताच्या पुष्कळ धर्ममार्तंडांना आमच्या म्हणण्याचा राग येईल किंबहुना त्यांच्या नाकास मिरच्या झोंबतील हेंहि आम्ही जाणून आहों. परंतु 'अवगुण त्यागायाकारणें। न्यायनिष्ठुर लागे बोलणें॥' असें करावें लागतें; त्यास इलाज नाहीं. धर्म धर्म म्हणून नुसत्या रूढीचें समर्थन करणाऱ्यांनीं साठाव्या वर्षीं लग्न करून आश्रमव्यवस्था बुडवावी हा

अधर्म नव्हे काय ? सनातन वैदिक धर्मांतल्या वर्ण व आश्रम या दोन विशिष्ट गोष्टी असतांना वानप्रस्थाचें नांव काढतांच ' कलौपंच विवर्जयेत ' या वाक्याची त्यांना ताबडतोब आठवण होते. परंतु पंच वर्ज्य गोष्टीमध्येंच अग्निहोत्र आहे आणि अग्निहोत्र नाहीं. तर पुरुषास दुसरी बायको करण्यास अधिकार नाहीं असें त्याच वाक्यावरून दाखवून दिलें तर मग राग कां यावा ? आम्ही पुरुष आणि स्त्रिया या ' अबला ' एवढ्याच गोष्टीवर ज्यांना मिशीवर ताव देऊन समर्थन करावयाचें असेल त्यांचें समाधान करण्याच्या भानगडींत ब्रह्मदेवानें सुद्धां पडूं नये हें चांगलें.

आश्रमाच्या दृष्टीनें विचार केल्यास ' शतायुर्वै पुरुषः ' म्हणजे शंभर वर्षें मनुष्याचें आयुष्य असतें, असें मानून आश्रम व्यवस्था केली आहे. वयाचीं पहिली पंचवीस वर्षें विद्यार्थ्यानें गुरुगृहीं काढावीं आणि पुढची पंचवीस म्हणजे ' द्वितीयमायुषो भागं कृतदारो गृहे वसेत् ' । म. अ. १०॥ वयाच्या पन्नास वर्षांपर्यंत गृहस्थाश्रम करावा. पन्नास वर्षांपर्यंत तीनहि ऋणांचें अपाकरण करून आयुष्याचा तिसरा भाग वनामध्यें काढावा व चवथ्या भागांत सर्वसंगपरित्याग करून संन्यास घ्यावा अशी शास्त्राज्ञा आहे.

वनेषु च विहृत्यैवं तृतीयं भागमायुषः ॥
चतुर्थमायुषो भागं त्यक्त्वा संगान्परिव्रजेत् ॥ म. अ.

हल्लीं आयुष्याचें मान कमी झालें आहे हें निर्विवाद आहे. म्हणून बायको पाठीमागून बायको करून स्वार्थमूलक संसारच करावा असें म्हणण्याचे दिवस गेले. देशांत दारिद्र्य वाढलेलें, आयुष्यमान कमी झालेलें, अग्निहोत्र बुडालेलें, धर्मबंधन नष्ट झालेलें व समाजशासन शिथिल झालेलें अशा स्थितींत पुरुषांनीं निदान वयातीतांनीं पुनर्विवाह करणें म्हणजे आत्मघाताबरोबर राष्ट्रघात करण्यासारखें आहे. कोणी म्हणेल कीं औरस संततीच्या अभावीं संस्थान अगर जहागीर खालसा होत असेल तर दारपरिग्रह करावयास नको काय ? पण हल्लीं डलहौसी साहेबांची कारकीर्द नाहीं आणि माणसानें माणूस दत्तक घेतला म्हणजे झालें, इतका कायदा सैल झाला आहे. वानप्रस्थाश्रमाचें पुनरुज्जीवन करावयाचें म्हणजे अशा लोकांनीं स्वार्थमूलक संसार सोडून देशाच्या किंवा समाजाच्या संसारांत पडावयाचें असेंच

समजलें पाहिजे. प्रत्येक पुरुषानें एकदांच दारपरिग्रह करावा कोणत्याहि कारणानें द्वितीय संबंध करूं नये हा उत्तम मार्ग होय. पुरुषांच्या पुनर्विवाहास आळा न घातल्यामुळें देशांत दारिद्र्य वाढलें, क्षुद्रवृत्ति बोकाळली आणि स्वार्थाची परमावधि झाली. वृद्ध व अनुभवी अशीं माणसें संसार-सुखाच्या व मुलाबाळांच्या प्रेमपाशाच्या मागें लागल्यामुळें कोणत्याहि सार्वजनिक कार्याला पोक्त आणि अनुभवी अशीं माणसें मिळत नाहींत, अशी सर्वत्र ओरड आहे. पंचावन्न वर्षांनंतर मनुष्य जर सरकारी नोकरीला असमर्थ होतो तर तोच पन्नासाव्या वर्षी स्वार्थमूलक संसाराला असमर्थ असा समाजानें त्याच्यावर शेरा मारला पाहिजे. निदान पन्नास वर्षांच्या पुढें कोणाहि पुरुषानें परार्थाच्या म्हणजे देशाच्या कार्यास आपलें सर्वस्व वाहिलें पाहिजे, असा निर्बंध घालण्याची परिस्थिति येत चालली आहे. पुरुषपुनर्विवाहास आज्ञा व स्त्रीपुनर्विवाहास प्रतिबंध हा केवढा अन्याय! असें ज्यांना वाटतें, त्यांच्याकरितां हा विस्तार करावा लागला. हल्लीं रूढ होत असलेल्या प्रौढ विवाहाबरोबर पुरुषपुनर्विवाहाचा प्रतिबंध होऊन तो नष्ट झाला म्हणजे स्त्रियांनाहि वैषम्य वाटणार नाहीं, इतकेंच नव्हे तर हल्लीं क्वचित जे पुनर्विवाह ऐकूं येतात तेहि ऐकूं येणार नाहींत. सुप्रसिद्ध बाळंभट्टींत विधुराश्रमाचें उद्घाटन केलेलें लक्ष्यांत घेतलें म्हणजे महाराष्ट्रियांना विधुराश्रमच संमत असल्याचें दिसून येईल.

६ विधवाधर्मानें राहणें—पतिपश्चात् सहगमन करणें व दुसरा विवाह करणें या विधवांच्या पुढ असलेल्या दोन मार्गांचा विचार झाला. आतां हल्लीं व्यवहारांत रूढ असलेला जो मुख्य मार्ग विधवाधर्माचरण याचा विचार करूं. धर्माचें तत्त्व आणि व्यवहार यांची जशी इतर बाबतींत फारकत झालेली आहे, तशीच विधवाधर्माच्या बाबतींतहि झालेली आहे. हिंदु विधवांना आपल्याकरितां धर्मांत काय सांगितलें आहे, आपण कसें वागलें पाहिजे, आपल्या आयुष्याचें ध्येय काय, आपली इतिकर्तव्यता काय याची कल्पनाहि त्यांना नसते. पति वारल्या नंतर पुष्कळ विधवा मरणाचीच वाट पाहात असतात. कित्येक तर नानाप्रकारच्या हाल अपेष्टांनीं आपलें आरोग्य गमावतात. कांहीं विधवा तीर्थयात्रांच्या मागें लागतात, तर कांहीं विधवा कोत्या समजुतीनें ब्रह्म दाखविणाऱ्या एखाद्या गुरूच्या नादीं लाग-

लेल्या दिसतात. अतएव विधवा धर्माचें स्वतंत्रपणें विस्तृत विवेचन व्हावयास पाहिजे. ह्या छोट्या निबंधांत फक्त संक्षिप्त दिग्दर्शन होणें शक्य आहे, म्हणून आम्हीं सर्व शास्त्रवचनें आणि त्यांचें शब्दशः भाषांतर देण्याचें विस्तारभयास्तव टाळलें आहे.

विधवांचे सकेशा व विकेशा असे दोन भाग पडतात. दिवसानुदिवस केशवती विधवांची संख्या जास्त दिसूं लागली आहे, म्हणून धर्म बुडूं लागला असेहि उद्गार कित्येकांच्या तोंडून ऐकूं येतात. विधवांच्या धर्माचरणाची माहिती शास्त्रोक्त अशी थोडयांनाच असते. जी कांहीं असते तीहि परंपरेनें व रूढीनें चालत आलेली अशीच असतें निरनिराळ्या स्मृतीमध्यें जो विधवाधर्म सांगितला आहे,त्यांचें संकलन थोडक्यांत पुढीलप्रमाणें करितां येईल.

'पति मेल्यानंतर विधवांनीं ब्रह्मचारी व्रतानें राहावें, परपुरुषांचें स्मरणहि करूं नये, व्रतवैकल्य आणि यमनियम यांच्या साधनानें इंद्रियांवर जय मिळवावा, शुक्ल वस्त्र परिधान करावें. सर्व तऱ्हेच्या उत्तेजक वस्तूंपासून दूर असावें, गंधपुष्प, चित्रविचित्र वस्त्रें, आणि असेच विषयोपभोग यांचें सेवन करूं नये, डोळ्यांत काजळ घालूं नये, सौभाग्य अलंकार सर्व वर्ज्य करावे, जमिनीवर निजावें ( म्हणजे गादी किंवा पलंग यांचा उपयोग करूं नये ), जडान्न खाऊं नये, एकवेळ भोजन करावें, अंगाला तेल लावूं नये, सुवासिनीप्रमाणें न्हाणें माखणें करूं नये, चोळी वापरूं नये. आई, बाप, मुलगा, सासरा, मामा, बहीण, भाऊ यांच्या आश्रयानें राहावें, युक्ताहारविहारानें उदासीन वृत्तीनें यावज्जीव ईश्वराधनेंमध्यें तत्पर असावें.' ( मनु अ. ५ श्लो. १५६–१६०, अंगि. स्मृ. २१–३९; याज्ञव. स्मृ. १८०; वृद्ध हारीतस्मृ. १९७–२०६; बौधायनसूत्र ३–१२–१–३; मदनपारिजात, निर्णयसिंधु तृ. प. उ.; वसिष्ठ स्मृ. अ. २१ श्लो. १।२. ) वाचकांना कल्पना येण्यास एवढेंच दिग्दर्शन पुरें आहे असें वाटतें.

७ विधवाधर्माचा हेतु——सनातन वैदिक धर्माचे अभ्युदय व निःश्रेयस असें दुहेरी ध्येय असल्यामुळें कोणत्याहि गोष्टींत शास्त्रकारांना फार विचारपूर्वक आज्ञा करावी लागते शास्त्रकारांच्या डोळ्यांपुढें जो समाज होता त्याची परिस्थिति लक्षांत घेऊन विधवांच्या धर्माची त्यांनीं आंखणी केली आहे. शास्त्रदृष्टीनें जायापती ही एकमूर्ति समजली जाते. त्यापैकीं एक अंग

गळून दुसरें अवशिष्ट राहिल्यास त्याजवर दाराग्निपरिग्रहापासून देहपातापावेतों गार्हस्थ्यांत असलेल्या सर्व जबाबदाऱ्या पडतात. जसें पतीच्या पश्चात् पतीवर तसेंच पतीच्या पश्चात् विधवांवर, लहान मुलें असल्यास त्यांची, प्रौढ मुलें असल्यास त्यांच्या संसाराची, आणि इतर जे कांहीं आप्त असतील त्यांच्याहि ऋणानुबन्धित्वाची कांहीं कांहीं जबाबदारी असतेच. तेवढी जबाबदारी त्यांनीं कुटुंबांत राहून पार पाडली कीं, त्यांचें अभ्युदयकार्य झालें. अर्थात् बाकीची सर्व शक्ति निःश्रेयसप्रवण व्हावी, अशा हेतूनें विधवाधर्माची व्यवस्था लाविली आहे.

८ विधवाकेशवपन--विधवांच्या धर्मांपैकीं विधवाकेशवपन हा एक मुख्य भाग मानण्यांत येतो. इतकेंच नव्हे तर सकेशा विधवा पाहिल्या असतां अद्यापहि पुष्कळ लोकांना धर्म बुडाल्याबद्दल वाईटहि वाटतें. आश्रमव्यवस्थेंत जसा पुरुषांचा संन्यास तसा विधवांचाहि वपनानंतर एकप्रकारचा संन्यासच समजला जातो. प्रपंचाची फारशी उस्तवार न करितां शरीरपोषणापुरतीच हालचाल करून विधवांनीं संन्यस्त वृत्तीनें राहावें अशी धर्माज्ञा आहे. सामान्य जनसमूहाची पुष्कळ दिवसांपासून रूढीनें चालत आलेल्या या आचारांबद्दल वरीलप्रमाणेंच ठाम समजूत आहे. विधवावपनाकडे जर ऐतिहासिक दृष्टीनें पाहिलें तर बुद्ध पूर्वकालांत विधवांचें वपन होत नसावें असें अनुमान करण्यास बराच पुरावा सांपडतो. महाभारतामध्यें कौरवांच्या विधवांचें जें वर्णन आहे अथवा कुंतीचें जें वर्णन आहे त्यामध्यें वपनाचा उल्लेख नाहीं. बाणभट्ट तर आपल्या हर्षचरित्रांत " बध्नातु वैधव्यवेणिमि । " ( उच्छ्वास ५ ) असें म्हणतो. क्वचित् क्वचित् स्त्रियांच्या वर्णनामध्यें ' एकवेणीधरा ' अशीं विशेषणें लाविलेलीं आढळतात. तीं प्रोषितभर्तृकांना व विधवांनाहि उद्देशून योजलेलीं असावीत. शास्त्रांमध्यें विधवांनीं शुक्लवस्त्रपरिधान करावें असें सांगितलें आहे. असें असतां हल्लीं रक्तवस्त्रपरिधानाची चाल सर्रास पडलेली दिसते. ह्याचें कारण बौद्ध भिक्षूकिणीचें अनुकरणअसावें, असें पुष्कळांना वाटतें. एकंदर संन्यास धर्माची प्रचंड लाट बुद्धोत्तर कालांतच उसळली असें अलीकडे सर्व जाणत्या माणसांना वाटूं लागलें आहे. बुद्ध भिक्षु आणि भिक्षुणी यांच्यावर तोडीस तोड करण्याकरितां थोडया बहुत अनुकरणानें या गोष्टी केल्या नसतील असेंहि

म्हणतां येत नाहीं. बौद्ध धर्मानें वैदिक धर्मावर निःसंशय असा स्थायी परिणाम झाला ही गोष्ट निर्विवाद आहे. आपल्या संस्कृतीच्या स्वभावाच्या दृष्टीनें असें म्हणतां येईल कीं, बुद्धधर्मातील एक चांगली गोष्ट आपल्या धर्मांत आली आणि ती चांगली आहे म्हणूनच तिचें समर्थन केलें गेलें.

आतां केवळ शास्त्राकडे पाहिलें तर असें दिसेल कीं, विधवाकेशवपनाबद्दल शास्त्रकार फारसा आग्रह धरीत नाहींत. वपनाबद्दल साक्षात ' सत्यं वद । धर्मं चर ' अशा प्रकारची विधायक श्रुति नाहीं. पण श्रुतीनें कोठें निषेधहि केला नाहीं. श्रुतीच्या खालोखाल स्मृतींना प्रामाण्य आहे. मनु, याज्ञवल्क्य व पाराशर स्मृति या स्मृतिग्रंथांमध्यें ' बलवत्तम ' मानण्यांत येतात. या तीनहि स्मृतींत विधवाकेशवपनाचा मुळींच उल्लेख नाहीं. स्मृतींहून उच्च प्रकारचा मान सूत्रांना देण्यांत येतो. आश्वलायन, आपस्तंभ, खादिर या सूत्रग्रंथामध्यें वपनाचा उल्लेखच नाहीं. बौधायनसूत्रांतहि ( ३. १२-१-३ ) या ठिकाणीं विधवाधर्म चांगला विस्तारानें सांगितला आहे. परंतु तेथें वपनाचा उल्लेख नाहीं. परंतु विवाहप्रकरणामध्यें [ प्र. १ अ. ४ सू. २२ ] मा ते गृहे निशिघोष........मात्वं विकेश्युर आवधिष्ठा........पतिलोके विराज ॥ असा एक मंत्र आहे. या मंत्रामध्यें " तुझ्यावर *विकेशी होऊन ऊर बडविण्याचा प्रसंग न येवो " अशी ईश्वराची प्रार्थना केली आहे. तसेंच " यत्सीमंतं कंकतः......यद्वा क्षुरः परिववर्ज " ( २·७·१७ ) असे दोन मंत्र आहेत. यावरून विकेशी होण्याची चाल असावी असें अनुमान कोणी करतात. परंतु इतिहाससंशोधकांनीं हे सर्व सूत्रग्रंथ बुद्धोत्तर कालांतील आहेत असें ठरविलें म्हणजे सगळाच ग्रंथ आटोपला. मीमांसकांच्या शुद्ध शास्त्रीय कसोटीनें या मंत्राकडे पाहिलें तर ' श्रुति, लिंग, वाक्य, प्रकरण, स्थान, समाख्या ' यापैकीं लिंग या सदरांत हे मंत्र येतात. अर्थात् हें प्रकरण वपनाच्या समर्थनाला लेचेंपेचें पडतें. पण या सूत्रवाक्याला उचलून धरणारें एक बलवत्तर प्रमाण व्यासस्मृतीमध्यें आहे.

---

* विकेशी म्हणजे मुक्तकेशी नव्हे तर कृत्तकेशी अशा अर्थास आधार काय ?

मृतं भर्तारमादाय ब्राह्मणी वन्हिमाविशेत् ॥ ५२ ॥
जीवंती चेत्त्यक्तकेशा तपसा शोधयेद्वपुः ॥ ५३ ॥

आनंदाश्रम स्मृ. स. प्र.

जिवंत राहूं इच्छिणाऱ्या ब्राम्हणस्त्रीनें पतीच्या पश्चात् वपन करून केश टाकून तपानें शरीराचें शोधन करावें असें फक्त याच ठिकाणीं स्पष्ट म्हटलें आहे. ( परंतु पहिल्या वाक्यांत ब्राम्हणस्त्रीनें अग्निप्रवेश करावा हें जें म्हटलेलें आहे तें सर्वथैव मागें आम्ही सहगमनाच्या शास्त्रार्थांत जीं वचनें दिलीं आहेत त्याविरुद्ध आहे. ) आनन्दाश्रम आणि व्यंकटेश्वर या ठिकाणीं प्रसिद्ध झालेल्या स्मृतिसमुच्चयामध्यें स्पष्ट विधायक असें स्मृतिवाक्य आम्हांला फक्त व्यासस्मृतींतच आढळलें. निर्णयसिंधूसारख्या अलीकडच्या प्रबंधग्रंथांमधें निरनिराळ्या स्मृतिकारांची म्हणून जीं वचनें उद्धृत केलेली आहेत, त्यांच्या उलट विधवाकेशवपनाचा निषेध करणारींहि त्याच स्मृतिकारांची अन्यत्र वचनें आढळतात. हा घोटाळा लक्षांत यावा म्हणून आम्ही येथें या प्रश्नाबद्दलची कांहीं उलट सुलट वचनें देतों.

## विधवाकेशवपनाबद्दल अनुकूलप्रतिकूल वचनें

( हीं सर्व वचनें हल्लीं प्रसिद्ध असलेल्या ग्रंथांत सांपडतातच असें नाहीं. टीकाग्रंथांतून या वाक्यांचे संदर्भ आलेले आहेत. )

### अनुकूल वचनें

विधवा कबरीबंधो भर्तृबंधाय जायते ।
शिरसो वपनं तस्मात् कार्यं विधवया सदा ॥

निर्णयसिंधौ मदनरत्ने स्कांदे ॥

ब्राह्मण्याः शिरसि वपनं कारयित्वा ॥ वसिष्ठस्मृ० २१।१–२ ॥
ब्राह्मणी चेत्त्यक्तकेशा तपसा शोधयेद्वपुः ॥ व्यासस्मृ० ॥
विधवाया वपनपूर्वकं कृच्छ्रत्रयाचरणम् ॥ धर्मसिं. यतिसं. ॥
चित्रांगदाच्या स्त्रीची पुराणांतील कथा.

## प्रतिकूल वचनें

प्रयोजनांतरसंसक्ता विधवा वापयेत् शिरः ।
मुमुक्षुर्यदि सा तस्या वपनं तु निषिध्यते ॥ खगेश्वरसंहिता ॥
क्षौरकर्म न कुर्यात्सा भगवद्द्रोहिणी भवेत् ॥ वसिष्ठसंहिता ॥
जन्मरोमाणि या नारी क्षौरकर्म समाचरेत् ।
कन्या वा विधवा वापि रौरवं नरकं व्रजेत् ॥ शंखस्मृतिः ॥
भर्तृहीना च या नारी मुंडयित्वा समाचरेत् ।
श्रौतस्मार्तानि कर्माणि चांडालीं योनिमाप्नुयात् ॥ लिखितस्मृ० ॥
नाचरेत् वपनं स्त्रीणामष्टादशसु कर्मसु ।
कन्यानां विधवानां चेदित्येवं मनुरब्रवीत् ॥ वृद्धमनुः ।

वपनाच्या चालीला किंवा धर्माला फक्त व्यासस्मृतींतीलच वचन जसें ठसठसीतपणें दाखवितां येईल, त्याचप्रमाणें वपन न करण्यालाहि वृद्धहारीत स्मृतींतील वचनें पुढें करतां येण्याजोगीं आहेत: ( श्लो. १९७–२०६ )

साध्वीनामिह नारीणामग्निप्रपतनादृते ।
नान्यो धर्मोऽस्ति विज्ञेयो मृते भर्तरि कुत्रचित् ॥
गर्भिणी नानुगंतव्या मृतं भर्तारमव्ययम् ।
ब्रह्मचर्यव्रतं कुर्याद्यावज्जीवमतंद्रिता ।
केशरंजनतांबूलगंधपुष्पादिसेवनम् ।
भूषणं रंगवस्त्रं च कांस्यपात्रेषु भोजनम् ॥
द्विवारं भोजनं चाक्ष्णोरंजनं वर्जयेत्सदा ।
स्नात्वा शुक्लांबरधरा जितक्रोधा जितेंद्रिया ॥
सुनिर्मलशुभाचारा नित्यं संपूजयेद्धरिम् ।
क्षितिशायी भवेद्रात्रौ शुचौ देशे कुशोत्तरे ॥
ध्यानयोगपरा नित्यं सतां संगे व्यवस्थिता ।
तपश्चरणसंयुक्ता यावज्जीवं समाश्रयेत् ॥
तावत्तिष्ठेन्निराहारा भवेद्यदि रजस्वला ।

हे सर्व श्लोक आमच्या मतें फारच महत्त्वाचे आहेत. साध्वी स्त्रियांना पतीच्या पश्चात् अग्निप्रवेशाशिवाय दुसरा धर्मच नाहीं असें पहिल्या श्लोकांत म्हटलें असून, गरोदर स्त्रीनें सहगमन न करितां यावज्जीव ब्रह्मचारी व्रतानें राहावें असें पुढच्या श्लोकांत सांगून स्मृतिकार विधवा धर्माचें म्हणजे आचाराचें निरूपण करीत आहेत. त्यांत तिसऱ्या श्लोकांत विधवांनीं केश-रंजन करूं नये, विडा खाऊं नये, गंधपुष्प इत्यादि विषयांचें सेवन करूं नये, डोळ्यांत काजळ घालूं नये, रंगवस्त्र म्हणजे चित्रविचित्र वस्त्र नेसूं नये आणि दोन वेळां भोजनहि करूं नये ( एक वेळां जेवावें ) अशा प्रकारच्या आज्ञा आहेत. गरोदर स्त्रीनें किंवा आम्ही मागें सांगितल्याप्रमाणें जिच्यावर कांहीं कुटुंबीयांची जबाबदारी आहे अशा स्त्रीनें सहगमन करूं नये, हें युक्तच आहे. परंतु गर्भमोचनानंतर वपन करण्यास काय हरकत आहे ? फार काय पण वपन हें बाळंतपणाच्या आड येतें असाहि बिलकुल प्रकार नाहीं. परंतु या स्मृतिकारांनीं वपनाचा उल्लेख तर केला नाहींच तर उलट केशरंजन करूं नये म्हणजे नवरा असतांना केश हे एक सौभाग्यालंकार व शृंगारविषय अशी जी एक समजूत असते ती सोडून द्यावी एवढेंच म्हटलें आहे. यावरून केशरंजन न करितां केशधारण करणाऱ्या विधवा स्त्रिया आणि वपन केलेल्या विधवा स्त्रिया या दोन्हीहि शास्त्रसंमत आहेत, असें म्हणण्यास हा आधार चांगला आहे. वपन करावें असें जसें व्यासस्मृतींत सांगितलें आहे तसेंच वृद्धहारीत स्मृतीमध्यें ( आनंदाश्रमस्मृतिसमुच्चय पृ. ३४९ ) केशरंजन करूं नये असें सांगितलें आहे. वपनविधायक श्रुति नाहीं. मनु, याज्ञवल्क्य, पराशर या प्रसिद्ध स्मृति वपनाबद्दल कांहींच बोलत नाहींत. गृह्य सूत्रांमध्येंहि स्पष्ट आज्ञा नाहीं. अशा स्थितींत आनंदाश्रम व वेंकटेश्वर या संस्थांनीं छापलेल्या स्मृतिसमुच्चय या ग्रंथांवरून असें स्पष्ट म्हणतां येतें कीं, व्यासस्मृति व वृद्धहारीतस्मृति या तुल्यबल असल्यामुळें ' विरोधे तु विकल्पः ' या न्यायानें वपन आणि अवपन या दोन्हीहि गोष्टी शास्त्रसिद्ध आहेत. शास्त्र सोडून केवळ ऐतिहासिक दृष्टि ग्रहण केल्यास वपनाला काडीचाहि आधार रहात नाहीं.

पण आमच्या लिहिण्याचा झोक वपन करूं नये असा आहे, असें वाचकांनीं बिलकुल समजूं नये.आम्हीं एवढेंच म्हणतों कीं,वपन आणि अवपन

या दोन्हीहि गोष्टी शास्त्रांत आहेत, म्हणून विधवावपनाचा आग्रह नसावा. पण यावर आम्हांस असेंहि म्हणावयाचें आहे कीं, हल्लीं जी वपनाची चाल आहे ती सर्वथैव बदलल्याशिवाय विधवांचें वपन करूंच नये. परपुरुषस्पर्श हा पातिव्रता धर्माला मोठा बाधक आहे, इतकेंच नव्हे तर तो एक महादोष आहे असें म्हटलें आहे. घरंदाज घराण्यांमध्यें भावजयीबरोबर दिराला किंवा बहिणीबरोबर भावाला परगांवीं लग्नकार्याकरितां अगर कार्यप्रस्थाकरितां जाण्याचा प्रसंग आला तर बैलगाडी, आगगाडी व टांगा या वाहनामध्यें भाऊ व दीर हे आपल्या बहिणीचा व भावजयीचा साक्षात् स्पर्श न होईल अशा बेतानें कसे वागत असतात, हें घरंदाज माणसांना सांगावयास नकोच. प्रत्येक घरंदाज घराण्यांत वृद्धांच्या तोंडून

मात्रा स्वस्रा दुहित्रा वा न विविक्तासनो भवेत् ।
बलवानिंद्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति ॥

हें स्मृतिवचन मोठया कंठरवानें सांगण्यांत येत असल्यामुळें वरील दक्षता घेण्यांत येते; पण जुलूम किंवा धडधडीत अन्याय म्हणा, हेंच ' अपि कर्षति ' तत्व विधवावपनाच्या व्यवहारांत कोणीच लक्षांत घेत नाहींत. सर्वच विधवा व नापित वृद्ध असतात असें म्हणतां येणार नाहीं. उलट एकांतांत ' अपि कर्षति ' चें भय बाळगण्याचीच पुष्कळ ठिकाणीं स्थिति असते. हा प्रश्न फार नाजूक आहे. मनुष्यस्वभावाची ज्याला ओळख झाली आहे आणि ज्याला ब्राह्मण्याचा अभिमान आहे अशा मनुष्यांनीं अशा प्रश्नांत फार खोल शिरून हात दाखवून अवलक्षण करून घेण्यापेक्षां अशा प्रच्छन्नगर्तामय मार्गांत स्त्रियांना जाण्याचा प्रसंगच न येईल असें प्रशस्यतर धोरण स्वीकारणें इष्ट आहे. वपन कर्तव्य असल्यास आम्ही तें चार प्रकारांनीं करावें असें सुचवितों.

१ स्त्रीनापित–वर्ग तयार करून त्यांनीं विधवांचें वपन करावें.

२ स्त्रियांनीं आपापसांत एकमेकींचें वपन करावें.

३ प्रत्येक स्त्रीनें कांहीं कालपर्यंत जटाकलाप धारण करून दोन तीन महिन्यांच्या मुदतीनें स्वहस्तानें केशकर्तन करावें म्हणजे जटा कातराव्या.

४ या तीनहि गोष्टी अंमलांत येणें अशक्य असल्यास पुरुषवर्गाच्या श्मश्रूचा सर्वांच्या डोळ्यांदेखत जसा व्यवहार होतो तसा विधवावपनाचा पुरुष नापिताकडून उघड विधि व्हावा.

वर दिलेल्या या चार प्रकारांबद्दल कोणी आम्हांस नांवें ठेवतील. परंतु हिंदुस्थानची जनता व त्यांतल्यात्यांत स्त्रिया खरोखरी मुक्या आहेत. त्यांच्या अंतराची परीक्षा पाहिल्यास ज्या माउलींच्यावर दरमहा असला एकांताचा जो प्रसंग येतो त्या वेळीं त्यांचें काळीज कसें चर्र होतें, याची कल्पना सहृदय मनुष्यांवाचून कोणालाहि होणार नाहीं. नागपूरच्या महाराष्ट्र धर्मपरिषदेंत आम्हीं या विषयावर भाषण केल्यानंतर कित्येक स्त्रिया आम्हांस भेटावयास आल्या आणि त्यांनीं कत्तलखान्याकडे जाणाऱ्या गाईच्या स्थितीशीं आपल्या स्थितीचें सकरुण वाणीनें सादृश्य निवेदन केलें. तात्पर्य आपल्या आयाबहिणींवर येणारा हा बारमहाचा प्रसंग टाळण्यास हे वरील उपाय आहेत. स्त्रीनापित वर्ग निर्माण करण्याची खटपट केल्यास यश येईल. श्रीक्षेत्र रामेश्वर येथें आम्हीं हा धंदा करणाऱ्या स्त्रिया पाहिल्या आहेत. श्रीक्षेत्र वाई व पुणें येथें दहा वर्षांपूर्वी अशाच एक दोन बाया होत्या असें वृद्ध सांगतात. तात्पर्य वपनाची आज्ञा आहे म्हणून, वपन कर्तव्य आहे म्हणून, वरील चारहि उपायांपैकीं स्त्रीनापितांचा वर्ग उत्पन्न करण्याचा उपाय पुष्कळ अंशीं साधेल असें सांगून हा वपनविषय एवढ्यावरच संपवितों.

९ सकेशा विधवांचा धर्म—ज्या विधवांना वपन करावयाचें नाहीं त्यांनीं केशरंजन करूं नये अशीहि शास्त्राज्ञा आहे. हल्लीं सकेशा विधवा पुष्कळ दिसूं लागल्या आहेत. विकेशा विधवांना जगांत मिरवावयास सापडत नाहीं. कारण समाजांत त्यांना आपलें विरूप दाखविण्याचा संकोच वाटतो. त्याच्या उलट, आपलें एक कुकुम काय तें गेलें बाकीच्या सर्व गोष्टी यथापूर्व आहेत अशी जी सकेशा विधवांची समजूत असते ती सर्वथैव चूक आहे. वैधव्य येणें म्हणजे सौभाग्याच्या सर्व ऐश्वर्याला मुकणें असा खरा अर्थ आहे. केश हा एक शृंगारविषय असून, सौभाग्यलंकार आहे हें सर्वमान्य आहे. पति गेला म्हणजे सौभाग्य गेलें असें समजून सकेशा विधवांनीं डोक्यावर पदर घेण्यास सुरवात केली पाहिजे. आर्यसंस्कृतीच्या तात्विक दृष्टीनें पाहिल्यास सौभाग्याचें कवच गेल्यानंतर विधवांना उजळ माथ्यानें फिरावयाचा हक्कच उरत नाहीं. सकेशा विधवांनीं डोक्यावर पदर घेण्याचा प्रघात सुरू केला म्हणजे पुढचा

केशरंजनाचा प्रश्न आपोआपच सुटतो. आतां केशांचा तुळतुळितपणा, त्यांची मृदुता आणि सौंदर्य हा लोकांना दाखविण्याचा विषय किंवा त्यांनीं पाहाण्याचा विषय राहिलेला नसतो. फणी, भांग, नट्टापट्टा इत्यादि मोह आवरून धरणें म्हणजेच केशरंजन न करणें असें आहे. महाभारतांत कौरवांच्या विधवांचें वर्णन स्त्रीपर्वांत आलेलें आहे. त्यांत त्यांच्या समिंतांचें उद्धरण झालें होतें म्हणजे केशांचा भांग त्यांनीं काढलेला नव्हता असें म्हटलें आहे. 'एतास्त्वसमिंतशिरोरुहा याः' या वाक्यावरून विधवांना भांग काढण्याचा अधिकार नाहीं, म्हणजे केश फणीनें न विंचरितां नुसतें बांधून ठेवण्याची वहिवाट होती. ती हल्लींहि सकेशाविधवांनीं अंमलांत आणावी, आणि डोक्यावर पदर घ्यावा. दुसरी एक गोष्ट अशी सांगावयाची कीं, विधवांच्या वस्त्रामध्यें हल्लीं शास्त्रशुद्धता राहिली नाहीं. रंगी बेरंगी वस्त्रें परिधान करणें हें सकेशा विकेशा विधवांना अयोग्यच होय. सर्व विधवांनीं शुक्लवस्त्रच परिधान करावें असें शास्त्र सांगतें. शुक्ल म्हणजे अगदीं परीट घडी स्वच्छ असा अर्थ कोणी समजूं नये. कारण पोशाखावरून त्या माणसाची कोणत्या प्रकारची मनःस्थिति आहे हें चटकन् समजतें. पोलीसचे डगले घातले कीं थोडासा पोलिसी डौल सात्विक मनुष्याच्या अंगांतहि येतो, असा अनुभव आहे. विधवांची मनःस्थिति सत्त्वगुणप्रधान राहील अशीच त्यांनीं खबरदारी घेतली पाहिजे. फार भडक वस्त्रें न वापरणें, केशरंजन न करणें सदैव कार्यव्यापृत असणें, निरंतर अध्यात्मचिंतन करणें आणि ऐहिक जगाबरोबर पारलौकिक हिताचा विचार करणें हीं त्यांची प्रमुख कर्तव्यें आहेत. सामान्यतः युक्ताहारविहाराचे नियम जे विद्यार्थ्यांनीं, ब्रह्मचाऱ्यांनीं, संन्याशांनीं पाळले पाहिजेत तेच विधवांनांहि लागू आहेत. उत्तेजक पदार्थ सेवन नाटक कादंबऱ्यांचें वाचन, सिनेमा नाटकें यांचें प्रेक्षण, या गोष्टी आमच्या मतें सर्वस्वी वर्जिल्या पाहिजेत. नाटकें, सिनेमा व कादंबऱ्या यांचा फाजील प्रसार एकंदरींत समाजाच्या व राष्ट्राच्या अधोगतीला कारणीभूत आहे. हीं सर्व करमणुकीचीं साधनें स्वराज्यकालामध्यें स्वतंत्र देशांत जरी आवश्यक असली तरी परतंत्र देशाला ती सर्वस्वी अपायकारक आहेत यांत संशय नाहीं.

११ भोंदू गुरूंच्या नादीं लागूं नये.—विधवाधर्माच्या नियमांचें विवे-

चन वर आलेंच आहे. पण पुष्कळ विधवांना गुरूकडून परमार्थ साधण्याचा मोह उत्पन्न होतो, म्हणून एक सावधगिरीचा इशारा देणें भाग आहे. ईश्वराची प्रसन्नता होण्यास मोठा अधिकार पाहिजे. तो अधिकार अंगी आणण्याचीं परोपकार, शील व सदाचरण हींच साधनें आहेत. साधु कोण, भोंदु कोण हें चांगल्या चांगल्यांना सुद्धां कळत नाहीं. मग सामान्य स्त्रियांची कथा काय ? तेव्हां भलत्या सलत्याच्या नादीं न लागतां स्वतःच्या शास्त्रप्रोक्त सदाचारानें, नीतीनें, उदार अंतःकरणानें आणि उच्च मनोभावनेनें वागावें म्हणजे परमेश्वर आपोआपच येऊन भेटतो. सर्व संतांना सदाचारसंपन्न मनुष्यच आवडतो.तो असेल तेथें संत त्याला हुडकीत येतात. कारण

शुद्ध चर्या हेंचि संतांचें पूजन । लागतचि धन नाहीं वित्त ॥ असें तुकोबाराय सांगतात. तुकाराममहाराजांना आपोआप अधिकार आल्यावर गुरुदर्शन झालें. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात कीं, " अवचितसद्गुरु निवृत्ति भेटला कृपाळु " । अधिकार आला कीं गुरुप्रसाद व ईश्वरप्रसाद आपोआप होतो; हें विधवांनीं पक्कें लक्षांत ठेवावें. वेदांतश्रवणमनन हें संस्कृत प्राकृत भाषांच्या द्वारानें पाहिजे तितकें करावें. त्यास बिलकुल हरकत नाहीं. परंतु वेदांतप्रतिपाद्य ब्रम्ह गुरु दाखवितो असें समजून कर्तव्यशून्य होणें आणि आपल्याबरोबर कांहीं सधवा स्त्रियांनाहि ओढणें हें अनर्थकारक आहे. सधवांचा गुरु पति असून, विधवाचा गुरु सत्कर्म व सदाचार आहे.

१२ विधवांनीं पोट कसें भरावें ? हिंदुस्थानांत हल्लीं पोटाचा मोठा पेंच पडलेला आहे. दारिद्र्यामुळें उपाशीं राहण्याचा प्रसंग पुष्कळांवर आहे. त्यांत नवरा मेलेल्या अशा अबलांना तर फारच दुर्घर अडचण भासते. निम्या वयाच्या पुढें वैधव्य आल्यास आणि मुलगे कर्ते असल्यास फारसा प्रश्न पडत नाहीं. किंवा नवऱ्यानेंच आपल्या बायकोकरितां कांहीं व्यवस्था केलेली असली म्हणजे सर्व ठीक जुळतें. निराधार बालविधवांना कांहींच आधार नसतो. अशा स्थितींत विधवांनीं स्वावलंबनाचा स्वीकार करून आर्यधर्म रक्षून मुख्यतः खालील तीन प्रकारांनींच आपलें पोट भरावें.

( अ ) महात्मा गांधींच्या पुण्यप्रभावामुळें देशांत सूत आणि खादी यांचा प्रसार होत आहे. ज्या प्रांतांत कापूस पिकतो आणि

निबंध २५६

ज्यांनीं लहानपणीं कापूस वेचणें, वळणें, कांतणें असें सर्व व्यवहार पाहिले असतील त्यांना खादीचा प्रसार म्हणजे जुन्या एका धंद्याचें पुनरुज्जीवनच वाटतें. अर्थात् पुष्कळ लोकांकडून खादीप्रसारावर अशक्य आणि अव्यवहार्यतेचा शेरा जरी बसत चालला असला तथापि खादीचें उच्चाटण होणें अशक्य आहे. विधवांनीं तर सूत कांतण्याच्या धंद्यावर पोट भरावें असें मनुस्मृतीचे टीकाकार कुल्लूकभट्ट आणि मेधातिथि म्हणतात. पूर्वीं सुद्धां सर्व स्त्रियांची पोटापाण्याची व्यवस्था अगदीं आयतीच होती असें नाहीं. पुष्कळ निराधार विधवावर हा प्रसंग येत असे. विधवांनीं " जीवेच्छिल्पैरगर्हितैः " ( मनु. अ. ९ श्लो. ७५ ) म्हणजे अनिंदित अशा हस्तकौशल्याच्या धंद्यावर पोट भरावें. कल्लूकभट्ट ' सूत्रनिर्माणादिभिरनिंदितशिल्पेन जीवेत् ' म्हणजे सूत कांतणें, विणणें इत्यादि अनिंदित धंद्यावर त्यांनीं उपजीविका करावी असें सांगतात. मनु. अ. ५. श्लो. १५६ वर टीका करतांना मेधातिथि " मृतपतिकाया अनपत्याया असति भर्तृधनादौ दायिके च कर्तनादिना च केनचिदुपायेन जीवंत्याः " नवरा मेलेल्या अपत्यविहीन आणि नवऱ्यानें कांहींच न ठेवलेल्या विधवेनें कर्तन म्हणजे सूत काढून उपजीविका करावी असें म्हणतात.

वीस पंचवीस वर्षांपूर्वीं प्रत्येक खेडयापाडयांत पुष्कळ स्त्रियाच सूत काढीत असत. विधवांनीं उदरंभरणार्थ सूत कांतण्याचा व पुढें विणण्याचा घरबसल्या धंदा केल्यास स्वार्थ व परमार्थहि साधणार आहेत. आपल्या समाजावर विधवांचें एका दृष्टीनें ओझेंच आहे असें पुष्कळ लोक म्हणतात. संपन्न असंपन्न, साधार निराधार, आश्रित अनाश्रित अशा सर्व विधवांनीं रिकामपणीं सूत कांतण्याचा उद्योग केल्यास स्वतःच्या हातानें काढलेली पवित्र शुक्ल वस्त्रें परिधान करण्यास त्यांना बिलकुल अडचण पडणार नाहीं. चरक्याशिवाय नुसतें हातावर सूत काढून बेलवाती व विष्णुवातीचे लक्ष देवापुढें लावण्याचा प्रघात परवां परवांपर्यंत होता. अद्यापहि तो क्वचित असेल. एवंच दरिद्री विधवांना पोट भरण्याचा धंदा, श्रीमंतांना रिकामपणाचा उद्योग, देशाची भरभराट करण्याचें साधन असें हें सूत कांतण्याचें कौशल्य विधवांनीं हस्तगत केल्यास देशाला व स्वतःला फायदा झाल्यावांचून राहणार नाहीं.

( आ ) विधवांना पातिव्रत्य संभाळून घरबसल्या करतां येण्यासारखा दुसरा एक धंदा आर्य वैद्यकाचा आहे. डॉक्टरीण होणें हें प्रत्येक विधवेला अशक्य आहे. तथापि आर्यवैद्यकाची म्हणजे सांगशी, बटवा आणि संपुष्टांतलि मात्रा अशा या आजीबाईच्या वैद्यकाची माहिती मिळविण्यास खर्च व प्रयास फारसा पडणार नाहीं. घरंदाज घराण्यांतलि जुन्या, वृद्ध, आजीबाई म्हणजे तीन चतुर्थांश वैद्य असत. बायकांची बारिक सारीक दुखणीं, मुलांच्या पोटांतले रोग, हिंवताप असे सर्व सामान्य रोग आजीबाईच बरे करीत असत. हल्लीं पुरुषांप्रमाणेंच बायकांनाहि मुलांला जरा कुठें पडसें, खोकला आला कीं, डॉक्टरांकडे धांव घेण्याची मूर्खपणाची संवय लागली आहे. ती सर्वस्वी घातुक आहे. अगदीं साधीं घरगुतीं औषधें हलगर्जीपणानें नाहींशीं होत चाललीं असून सातासमुद्रापलीकडील औषधें पांच सात महिन्याच्या अर्भकाच्या पोटांत घालण्याचा प्रसंग येत आहे, हें सर्वस्वी निसर्गविरुद्ध आहे. विधवांच्या व आर्यवैद्यकांच्या अभिमान्यांनीं अशा विधवांकरितां स्वतंत्र आयुर्वेदविद्यालय काढावें. म्हणजे आर्यवैद्यकाचें पुनरुज्जीवन व विधवाना घरबसल्या उद्योग आणि अर्भकांचें आणि स्त्रियांचें आरोग्यरक्षण केल्याचें त्यांना श्रेय मिळेल. आम्ही तर यापुढें असें म्हणतों कीं, स्त्रियांच्या व अर्भकांच्या आरोग्याची जबाबदारी स्त्रियांनींच घेतली पाहिजे त्यांत पुरुषांनीं ढवळाढवळ करूं नये. प्रपंचाच्या अनेक प्रकारच्या उस्तवारींत सधवा स्त्रियांना हें कार्य उपकारदृष्ट्या सर्वस्वी करितां न आलें तरी घरापुरता व शेजाऱ्यापाजाऱ्यांपुरता त्यांचा उपयोग खास होईल. वैद्यकाची मदत देणाऱ्या स्त्रिया सल्यामुळें स्त्रियांची फार कुचंबणा होते.त्यांना पुरुष वैद्याकडे जाऊन सर्व गोष्टी उघडपणें सांगतां येत नाहींत. म्हणूनच स्त्रियांमध्यें रोग चोरून ठेवण्याची प्रवृत्ति जास्त वाढते आणि रोगाचा पूर्ण अंमल बसल्यावर उपाय करण्याची बुद्धि झाली तरी त्यापासून यश न येतां पुष्कळ स्त्रिया अशा संकोचामुळेंच मृत्युमुखीं पडतात. स्त्रियांचे आणि अर्भकांचे मृत्यु वांचविण्यास विधवा स्त्रियांनीं वैद्यक हातांत घेऊन औषधोपचार करणें हाच आमच्यामतें श्रेयस्कर असा मार्ग आहे. घरबसल्या हें परोपकाराचें कार्य विधवांनीं केल्यास त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न सुटून जन्मास आल्याचें कांहीं तरी साफल्य झालें असेंहि त्यांना वाटेल.

( इ ) विधवांना अन्नानें पोट भरण्यासारखा तिसरा धंदा म्हटला म्हणजे अध्यापनाचा होय. दिवसानुदिवस साक्षरतेची जरुरी सर्वत्र अधिकाधिक भासत आहे. हिंदुस्थानासारख्या उदयोन्मुख राष्ट्रामध्यें साक्षरतेचा प्रसार झपाट्यानें होणार हें सिद्धच आहे. मुलांच्या शिक्षणाप्रमाणें मुलींच्या शिक्षणाचें महत्त्व लोकांना सारखेंच वाटूं लागलें आहे. परंतु खेदाची गोष्ट ही कीं, धर्माभिमानी व देशाभिमानी लोक स्त्रीशिक्षणाकडे दुर्लक्ष करीत आहेत. स्त्रीशिक्षण हें पाहिजे त्यांच्या हातीं जाऊन भागणार नाहीं. भलत्याच्या हातांत स्त्रीशिक्षण गेलें म्हणजे परंपरेनें तरुण स्त्रियांची पिढी दुसऱ्याच्या हातांत जाणार. मग राष्ट्राच्या अधःपातास वेळ लागणार नाहीं. ' स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसंकरः " । " सूक्ष्मेभ्योऽपि प्रसंगेभ्यः स्त्रियो रक्ष्या विशेषतः " ही गीता व मनुस्मृति यांतील वाक्यें त्रिकालाबाधित असल्यानें लक्षांत ठेवण्यासारखी आहेत. पातिव्रत्यसंपन्न धर्माभिमानी व देशाभिमानी स्त्रियांनींच जर स्त्रियांचें शिक्षण हातीं घेतलें तर तें फार चांगलें होणार आहे. स्त्रीशिक्षणाला आणि एकंदर चालू असलेल्या जनरूढीला नांवें ठेवणारे लोकच अपरिहार्य म्हणून आपल्या मुली स्वाभिमानशून्य स्वसंस्कृतिशून्य अशा शिक्षकांच्या किंवा मास्तारेणांच्या शाळांमध्यें पाठवितात. सर्वांत दुःखाची गोष्ट ही कीं, युरोपियन व ख्रिश्चन मास्तरिणींच्या शाळांमध्यें आपल्या लहान मुली पाठवितांना हिंदु आईबापांना कांहींच दिक्कत वाटत नाहीं. वंशाचा, कुलाचा व चारित्र्याचा इतिहास ज्यांच्यामागें मुळींच नाहीं अशा माणसांनीं स्त्रीशिक्षण हातीं घेण्यापेक्षां विधवांनीं विशेषतः ब्राह्मण विधवांनीं तें हातीं घ्यावें. प्रो. धोंडोपंत कर्वे यांच्या अनाथ बालिकाश्रमाचें आम्हीं या दृष्टीनें अभिनंदन करितों. कारण ह्या आश्रमांतून तयार झालेल्या अध्यापिका हें पवित्र शिक्षणकार्य हातीं घेण्यास समर्थ अशा होतील. हिंदुस्थानांतील भावी स्त्रिया कशा निपजल्या पाहिजेत आणि त्यांच्या ठिकाणीं आमच्या संस्कृतीचा धर्माचा व देशाचा उज्ज्वल आणि उठावदार अभिमान कसा उत्पन्न झाला पाहिजे हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. आमच्या समजुतीनें अशा प्रकारचा अभिमान आणि शील उत्पन्न करणाऱ्या संस्था अद्याप निघावयाच्या आहेत. ज्या संस्था हल्लीं आहेत त्या अनुकरणवजा पाश्चात्य धर्तीवर निघालेल्या आहेत. कारकूनपुरुषांना उपयुक्त

स्त्रिया प्राप्त करून देण्याचे ते कारखाने आहेत, असें म्हटलें तरी चालेल. इंग्लंड व इतर अभ्युदित उद्योन्मुख वर्धिष्णु राष्ट्रांत पब्लिक स्कूल्स नामक संस्था, ज्या पद्धतीनें आपले पूर्वींचे आश्रम अथवा गुरुकुलें चालत होतीं, त्या धर्तीवर सर्वत्र प्रचलित आहेत. विवक्षित कालापुरता व विवक्षित प्रयोजनापुरता गुरुशिष्यसंबंध व तदितर बाबींत उभयतांचा काडीमोड असा हास्यास्पद प्रकार शिक्षणाच्या कक्षेतून या संस्थांच्या योगानें नाहींसा होत आहे. छात्राच्या बौद्धिक शिक्षणाबरोबर, त्याच्या संस्कृतीचीं जीं इतर अंगें म्हणजे शरीरपरिपोष, मनःस्वच्छता, उदारचरित इत्यादि त्यांचा विकास त्या गुणांच्या अंतर्बाह्य साधनांचा अहर्निश मिलाफ असल्याशिवाय होणें शक्य नाहीं. शाळा, कुलें अथवा आश्रम आपल्या देशांत मुलांकरितां किंवा मुलींकरितां झपाट्यानें चालू करण्याचा काळ केव्हांच येऊन गेलेला आहे. अशा उपक्रमांत मुलांच्या खाण्यापिण्याची व इतर मातृस्थानान्तर्गत मानल्या गेलेल्या कार्याची जबाबदारी कुलीन विधवांनीं उचलल्यास शिक्षणांतील एक महत्त्वाचा प्रश्न सुटल्यासारखें होणार आहे. आपल्या राष्ट्रांमध्यें मोठ्या झपाट्यानें हल्ली विचारक्रांति होते आहे. म्हणून स्त्रीशिक्षणाच्या तत्वामध्येंहि लौकरच परिस्थित्यनुरूप बदल होईल आणि स्त्रीशिक्षण हें केवळ पाश्चात्य सुधारणाप्रिय सुधारकांचें कर्तव्य नसून खऱ्या राष्ट्राभिमान्यांचें ते श्रेष्ठ कर्तव्य आहे, अशी प्रतीति लौकरच येईल. हिंदु विधवांनीं, विशेषतः ब्राह्मण विधवांनीं स्त्रीशिक्षणाचें प्राथमिक आणि माध्यामिक कार्य अवश्य हातीं घेतलें पाहिजे. प्राथमिक व माध्यामिक शिक्षण हें घरांतल्याघरांत सुद्धां घेतां येण्यासारखें आहे. पुरुषांप्रमाणें बायकांना अद्याप सरकारी नोकरीकडे धांव घेण्याचा सुदैवानें प्रसंग आलेला नाहीं. गृहिणी, माता, आणि आर्यस्त्री अशा तिहेरी नात्यांनीं येणारी जबाबदारी संभाळण्यास स्त्रिया लायख झाल्या आणि त्यांना प्रचलित परिस्थितीचें पूर्ण आकलन झालें म्हणजे पुष्कळ झालें. हिंदु स्त्रियामध्यें हल्लीं एकंदरींत पुष्कळच प्रगतीला जागा आहे, ती करण्याचें श्रेय शिक्षणामुळें विधवांना मिळून त्यांचें पोटही भरेल.

REFBK-0006971